


# आंदोलन

अनंत उमरीकर

# आंदोलन

अनंत उमरीकर

जनशक्ती वाचक चळवळ

**आंदोलन** । अनंत उमरीकर

Andolan । Anant Umarikar

© अनंत उमरीकर

नानलपेठ,
परभणी-४३१४०१
फोन : (०२४५२) २२० २५५,
भ्रमणध्वनी : ९८९०३ ९६६५७

**मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी

**अक्षरजुळणी**
श्रीकांत उमरीकर
जनशक्ती वाचक चळवळ
औरंगाबाद.

**मुद्रित शोधन**
अरुण पळणीटकर

**प्रकाशक**
जनशक्ती बुक्स ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि.
जनशक्ती वाचक चळवळ,
'पिनाक', २४४, समर्थनगर,
औरंगाबाद. ४३१ ००१.
☎: (०२४०) ६९९ २०५०

**प्रथमावृत्ती**
०९ ऑगस्ट १९९२

**सुधारीत तृतीयावृत्ती**
७ जुलै २००८

**मुद्रक**
राजमुद्रा, औरंगाबाद

मूल्य । १२०/- रु.

**शरद जोशी**
**यांना**

## मनोगत

आंदोलन पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रकाशित होते आहे. शेतकरी संघटनेचा विचार मराठी वाङ्मयातून थोड्या प्रमाणात का होईना मांडला जात आहे. शेतकरी संघटनेनं मांडलेला मुक्त अर्थव्यवस्थेसंबंधीचा विचार तर विरोधकही हा आमचाच विचार म्हणून मांडत आहेत. या सगळ्यांमधून शेतकरी आंदोलनाचे महत्त्व जास्तच ठळक होत आहे.

सोळा वर्षांपूर्वी हे पुस्तक प्रसिद्ध करतांना हा विषय शेतकरी नसलेल्या शहरी वाचकांपर्यंत पोचावा ही भूमिका होती. आजही ती तशीच आहे; पण थोडासा फरक पडलेला आढळून येतो. नवीन पिढी आज शेतकरी आंदोलन आणि त्या अनुषंगाने मांडल्या गेलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेसंबंधीच्या विचाराकडे फार आशेने पाहत आहे. अशा वर्गाला या आंदोलनातील विचार ललित वाङ्मयाच्या माध्यमातून पोचवण्याची गरज आहे. ही गरज अल्प प्रमाणात का होईना हे पुस्तक पूर्ण करते आहे, याचाच पुरावा म्हणजे पुस्तकाची तिसरी आवृत्ती.

या आवृत्तीत यापूर्वी प्रकाशित झालेल्या 'वाटचाल' या पुस्तकातील लेखांचाही समावेश केला आहे.

पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक डॉ. प्रभाकर मांडे यांनी सोळा वर्षांपूर्वी हे पुस्तक प्रकाशित करण्याचं धाडस दाखवलं त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. अमरावतीच्या जनसंसदेच्या निमित्ताने या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आणि आता शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद येथे संपन्न होणाऱ्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही तिसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. नवीन मजकुराचा समावेश तसेच जुन्या मजकुरातील अल्पशा फेरबदलासह सिद्ध झालेल्या या आवृत्तीचे वाचकांकडून स्वागत होईल अशी आशा मला वाटते.

७ जुलै २००८ **अनंत उमरीकर**

परभणी

“ अनुक्रम

१) पाउले चालती परभणीची वाट ००७
२) आंदोलन ०२८
३) चांदवडच्या वाटेवर १०३
४) कापूस रक्ताळला १२९

”

# पाउले चालती परभणीची वाट

॥ १ ॥

चौऱ्यांशी सालच्या जानेवारीचा महिना. कुठल्या तरी सुटीचा दिवस. वेळ साधारण दुपारची. मी परभणीच्या शनिवार बाजार मैदानालगतच्या रस्त्यावरून चाललो होतो. बाजूच्या बी. रघुनाथ सभागृहामध्ये माणसांची गर्दी दुरूनही जाणवत होती. काही तरी कार्यक्रम असावा. हॉलबाहेरील ओट्यावर प्रसादजी उभे दिसले. प्रसादजी म्हणजे वसमतचे गंगाप्रसादजी अग्रवाल. सर्वोदयी चळवळीतील एक अग्रगण्य कार्यकर्ते. भारतभरातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांपैकी एक. त्यांची माझी जुनीच ओळख. जनता विकास परिषदेपासून इतर अनेक सामाजिक चळवळींत त्यांचा एक साथीदार म्हणून, त्यांना मी जवळून पाहिलेलं. आणीबाणीत तुरुंगवास भोगलेला. त्यांना ओट्यावर पाहून मी थबकलो. हॉलमध्ये अन् भोवती असलेल्या माणसांना आणि गर्दीला पाहून, हा सर्वोदयी कार्यक्रम वाटेना. सर्वोदयी कार्यक्रमाला तर मोजकेच लोक येणार. इथे तर गर्दी ओसंडून वाहते आहे अन् तरीही प्रसादजी ओट्यावर उभे. या कार्यक्रमाशी प्रसादजींचा काय संबंध? मला उत्सुकता वाटली. मी त्यांना नमस्कार घातला.

"या ! या! वकील साहेब. बरं झालं तुम्ही आलात."

"कसला कार्यक्रम आहे?"

"शेतकरी संघटनेचं फार मोठं अधिवशेन आहे पुढच्या महिन्यात. त्याच्या तयारीची बैठक आहे."

"शेतकरी संघटना ? ही काय भानगड आहे ?"

"महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांची फार मोठी संघटना आहे. शरद जोशी नावाचे युनोत काम केलेले फार मोठे अर्थशास्त्री या संघटनेचे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातलं पहिलंवहिलं आणि महाराष्ट्रातलं दुसरं अधिवेशन परभणीला होणार आहे. त्या अधिवेशनासाठी स्थानिक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करायला काही कार्यकर्ते नाशिक वगैरे भागातून आलेले आहेत."

"पण तुम्ही यांच्यात कसे ? सर्वोदयाचा आणि या संघटनेचा काही संबंध आहे की काय ?" माझा आपला एक भाबडा प्रश्न. सर्व विधायक कार्यांत प्रसादजींचा सहभाग

असतो. कुणी वंदा अथवा निंदा. तेव्हा या उपक्रमात ते कसे नसणार? तरीही मी हा प्रश्न केलाच.

''त्याचं असं आहे उमरीकर, ही एक फार चांगली चळवळ आहे. अशा चांगल्या चळवळीला मदत करणं आपलं कर्तव्य आहे. शिवाय, ही मंडळी बाहेरून येणारी. त्यांना स्थानिक परिस्थितीची पुरती जाण असेलच असं नाही. तेव्हा त्यांना आपली मदत द्यायला पाहिजे. नाही तर राजकीय पक्षाचे लोक घुसखोरी करतील आणि अनेक चांगल्या चळवळींचं वाटोळं त्यांनी केलं, तसं याही चळवळीचं होईल. म्हणून मी या बैठकीत सहभागी होतो आहे. माझी अशी इच्छा आहे, तुम्हीसुद्धा अधिवेशनासाठी या लोकांना मदत करावी.''

प्रसादजींची इच्छा म्हणजे आमच्यासाठी आदेशच. तेव्हा 'आपने बुलाया, हम चले आये !' नाही तर कुठली शेतकरी संघटना, कुठलं त्यांचं अधिवेशन, आपल्याला काय देणंघेणं. ज्या गावाचं नावही माहीत नाही त्या गावी कशाला जायच; पण प्रसादजींसारखा माणूस म्हणतो तेव्हा काहीतरी चांगलं आहे असं समजून त्या गावाला जायला काय हरकत आहे? प्रयोग करून पाहावं, पटलं तर पटलं, नाही तर शर्ट झटकून निघाले आपले. एवढ्यात एक फाटक्या अंगाचा मूठभर दाढी हनुवटीवर असलेला, धुवट खादी कपडे अंगी असलेला एक युवा कार्यकर्ता घाईघाईनं बाहेर प्रसादजींकडं आला. त्याच्या छातीवर लाल रंगाचा कसला तरी एक बिल्ला लावला होता. सर्वोदयी कार्यकर्त्यांकडे जशा व्यक्तिमत्वाचा राबता अपेक्षित तसाच हा; पण वयानं बराच तरुण. माझ्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह पाहून प्रसादजींनी ओळख करून दिली.

''उमरीकर, हे ब.ल. म्हणजे ब.ल. तामसकर. तुम्ही यांचं नाव ऐकलंच असेल.''

''नाव ऐकलं असेल म्हणजे काय? अहो यांचं नांव ऐकलं नाही असा माणूस परभणीत दाखवा-'' आणि शंभर रुपये बक्षीस मिळवा हे पुढचं वाक्य मी बोललो नाही एवढंच. 'मराठवाडा' दैनिकात दिवसाआड त्यांचं नाव येत होतं. चळवळे तरुण ते काय, ते युवक क्रांती का कसलं आणि कसली कसली दलं त्यांचे ते क्रियाशील सदस्य. हौशी पत्रकारही होते ते. मीही एक छोटामोठा पत्रकार. नाव ओळखून होतो; पण प्रत्यक्ष भेट आजच. बलं बलं म्हणतात ते हेच तर ! मी त्यांना नमस्कार घातला.

''बरं झालं. तुम्ही आलात वकीलसाहेब.'' ब.ल. म्हणाले, '' आम्हाला तुमच्या-सारख्यांची फार आवश्यकता आहे. चला आत जाऊया.'' एव्हाना मला त्यांनी संघटनेचा





शिक्का मारलाच होता. मी विचार केला, कुठे आपण आखाड्यात उतरत आहोत? आत्ता कुठे अंगाला तेल चोपडलंय. कुस्ती अवघड वाटण्याची शक्यता दिसली तर जाऊ मैदान सोडून. कुठे आपल्याला जन्मजन्मांतरीची साथ द्यायची आहे. नाही जमलं तर म्हणू तलाक ऽ तलाकऽऽ तलाकऽऽऽ अन् होऊ मोकळे.

प्रसादजींबरोबर आम्ही हॉलमध्ये प्रवेशलो. हॉल गच्च भरलेला. बहुतेक जण तरुण अन् ग्रामीण विभागातले. अनेक जण कृषी विद्यापीठातले विद्यार्थी. दाटीवाटीनं सारे बसलेले. दाराबाहेर हा खेटरांचा ढीग लागलेला. समोर एक वक्ता भाषण देत होता. चाळिशीत रेंगाळणारं वय. रंग शेतकऱ्याचा असावा तसा; पण तरतरीत चेहरा, पांढरीशुभ्र टोपी, सदरा, दुकाष्टी धोतर चापूनचोपून नेसलेलं. प्रसन्न व्यक्तिमत्त्व. प्रसादजींनी हळूच ओळख करून दिली,

''हे रामचंद्र बापू पाटील, नाशिक - सटाण्याचे. संघटनेचं पहिलंवहिलं अधिवेशन झालं ते सटाण्याला. त्या अधिवेशनाचे हे सर्वेसर्वा.'' तिथला अनुभव गाठीला घेऊन इथल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करायला आलेले. वरच्या आवाजात बोलायची सवय असावी त्यांना.

अधिवेशनात 'अ' 'ब' 'क' पासून त्यांनी सांगायला सुरवात केली. मंच कसा असावा, मांडव कसा असावा, लांबीचा भाग कुणीकडे आणि रुंदीचा कुणीकडे, आतील बसण्याची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था हे सारं आमच्या पार डोक्यावरून चाललं होतं. आम्ही आपले हजार दोन हजारांच्या प्रचंड सभा पाहिलेले अन् हा बुवा लाखा लाखांच्या सभेच्या बाता मारतो आहे. काही खरं दिसत नाही. मी हळूच बाहेर सटकलो, प्रसादजींचा डोळा चुकवून. नाही तरी मला शेतकऱ्यांच्या संघटनेत काय रस असणार? माझ्या नावावर सातबाराची नक्कल; म्हणून मी शेतकरी एवढंच. जो थोडाफार संबंध आला आठ दहा वर्षांपूर्वीपासून त्यावरून हा व्यवसाय म्हणजे एक दलदल आहे, त्यात फसलेला बाहेर पडणं कठीण; त्यामुळे फसायच्या आतच मी बाहेर पडून शेतीला टाटा केलेलं.

॥ २ ॥

याही घटनेला बराच काळ लोटला. आमचं कोर्टाचं रहाटगाडगं चालूच होतं. कामाच्या रगाड्यात मी शेतकरी संघटना, त्यांचं अधिवेशन सारं विसरून गेलो. दहा-पंधरा दिवसांनी केव्हातरी नारायणराव मूलगीरांनी सहज विषय काढला. नारायणराव

म्हणजे आमचे वकील मित्र. पंढरीचा विठ्ठल जिवंत होऊन चालला, त्यानं काळा कोट, पांढरी पँट घातली म्हणजे जसा दिसला असता, अगदी तश्शा रूपाचा हा गडी अन् वृत्तीनं माळकरी, वारकरी किंवा त्यांच्या डोकीवर फेटा बांधून कमरेवर हात ठेवून देवळात उभं केलं तर खुश्शाल लोकांनी 'ठोब्बा रखूमाई' म्हणून लोटांगण घातलं असतं. गडी उत्तम कवी, साहित्यिक, रसिक. त्यांचं व्यक्तिमत्त्व एवढं लोभस, की स्वत: विठ्ठलानं त्यांचं दर्शन घ्यावं. स्वत: नारायणराव विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते; पण शेतकरी चळवळीबद्दल विलक्षण उत्सुकता. पुढे सुरेगाव न्यायालयीन चौकशीप्रकरणी त्यांनी संघटनेची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी वसंतराव पाटलांना खूपच साह्य केलं. त्यांच्या अकाली मृत्यूनं चळवळीचं फार नुकसान झालं. ते स्वत: शेतकरी संघटनेत नव्हते; पण संघटनेबद्दल त्यांना फार आस्था. पुढच्या काळात त्यांनी शरद जोशींवर एक सुरेख भारूडही लिहिलं:

*जो तो सांगे ज्याले त्याले, कलीयुगी नवल जाले*
*बळीचे पुण्य फळा आले*
*शरद जोशी आले, आता शरद जोशी आले ॥धृ.॥*

*शरद जोशी येताच काय झाले*
*उभे होते ते आडवे झाले, काठाळ नाठाळ सरळ झाले*
*बांडगूळ बच्चे लया गेले,*
*सम्राट सरदार वाया गेले, शरद जोशी आले ॥१॥*

*शरद जोशी बघताच काय झाले*
*मेले होते ते जिते झाले, मेंढरू होते ते वाघरू झाले*
*होत्याचे नव्हते झाले*
*नव्हत्याचे होते झाले, शरद जोशी आले ॥२॥*

*शरद जोशी बोलताच काय झाले*
*भल्या भल्यांचे नेसू गेले, बाजिंद्याचे हसू झाले*
*बगळे डोमकावळे गेले*
*वासरू गेले बैल गेले, शरद जोशी आले ॥३॥*





*बळीराजाचे दैन्य गेले, लक्ष्मीला बरे दिवस आले*
*गावगाडे उजळून गेले,*
*त्याच्या मागे भाग्य आले, शरद जोशी आले ॥४॥*

पुढे कापूस आंदोलनामध्ये ८६ साली हे भारूड परभणीच्या सत्याग्रहींमध्ये फार आवडीनं गायिले जायचे. सारे अडीचशे सत्याग्रही एका सुरात ' शरद जोशी आले शरद जोशी आले', असं म्हणायचे.

आम्हा दोघांच्या जोडीला आणखी एक सहानुभूतीदार दादा जहागीरदार. त्यांना स्वत:ला कुठलाही पक्ष नाही; पण सहानुभूती भाजपला. काँग्रेसचे कट्टे विरोधक. राजकीय वा सामाजिक चळवळीकडे अत्यंत तटस्थ दृष्टीनं पाहणारे. गंभीर पुस्तकांचा, विशेषत: तत्त्वज्ञान, आध्यात्मिक पुस्तकांच्या वाचनाचा विशेष नाद. त्यांनाही शेतकरी संघटनेबद्दल विलक्षण आकर्षण.

हां, तर मूलगीरांनी विषय काढला,

''चला उमरीकर, आपण संघटनेच्या अधिवेशन कार्यालयाला भेट देऊ.''

''कुठली संघटना ? कशाचं अधिवेशन ? काय काढलं काम ?'' मी एव्हाना शेतकरी संघटनेची बैठक विसरूनही गेलो होतो.

''बाबूराव, येत्या महिन्यात परभणीला शेतकरी संघटनेचं अधिवेशन होणार आहे. तयारीसाठी बाहेरगावांहून काही मंडळी आलेली आहे. कोर्टाच्या जवळच ओस्तवाल बिल्डिंगमध्ये त्यांनी ऑफिस थाटलेले आहे. आपण त्यांना भेटून तर येऊ.''

दादा जहागीरदारांनी उत्सुकता दाखवली तेव्हा मला नाइलाजाने त्यांच्याबरोबर जावं लागलं; पण मनातल्या मनात मात्र चोरट्यासारखं वाटलं. काही दिवसांपूर्वी प्रसादजींनी मला आग्रहाने या लोकांना सहकार्य देण्याचं आवाहन केलं होतं. एव्हाना मी मात्र ते साफ साफ विसरून गेलो होतो. नारायणरावांनी आठवण दिली नसती तर एका महान (?) कार्यकर्त्याला संघटना मुकली असती. काही का असेना उशिरा का होईना शहाणपण तर सुचलं. तेव्हा आम्ही तिघे संमेलन कार्यालयाकडे निघालो. कार्यालय जवळच ओस्तवाल कॉम्प्लेक्समध्ये होते. कोर्टापासून काही मिनिटांच्या रस्त्यावर.

आम्ही तेथे गेलो तेव्हा तिथे सामसूम होती. कार्यालय म्हणजे काय -रस्त्यावरील शटर असलेली एक खोली. खिडक्या ना दरवाजे. खोलीत सतरंजी अंथरलेली. एका कोपऱ्यात समोर छोटी लाकडी आलमारी. त्यासमोर एक अद्बड वयाचे गृहस्थ काही

लिहीत बसले हाते. एकूण वेशभूषेवरून गृहस्थ ग्रामीण भागातून आलेले दिसत होते. त्यांच्या बाजूला आणखी एक गृहस्थ भिंतीला टेकून बसले होते. वय पंचेचाळीसच्या आसपास. शुभ्र पांढरा खादीचा सदरा अन् विजार. स्वच्छ इस्त्री केलेले कपडे; पण राजकीय पुढाऱ्यांची कलपी वेशभूषा नाही. दाट कुरळे, मागे वळवलेले केस, चेहऱ्यावरचे भाव शांत. आत्मीयता वाटावी असं व्यक्तिमत्त्व. त्यांचा एकूण नूर पाहताच गृहस्थ आपल्या भागातले नसावेत, हे पक्कं. आम्ही आलेलं पाहून मान वर करून "या !" म्हणाले. आम्ही आमची ओळख करून दिली आणि सांगितलं,

"आम्ही वकील मंडळी. आपल्या संघटनेला संमेलनकामी काही सहकार्य पाहिजे असेल तर आम्ही ते देण्यास तयार आहोत हे सांगण्यासाठी आलो आहोत. इथून जवळच कोर्ट आहे. तेव्हा रोज आम्ही आपल्या कामात मदत करायला येऊ शकतो. आपल्या संघटनेतील कुणा कार्यकर्त्यांची आमची ओळख नाही. तशी तुमची संघटना या भागात नवीनच. कोण कोण कार्यकर्ते हेही माहीत नाही. त्यामुळे आम्ही आपल्या भेटीसाठी आलो आहोत." आमची रेलगाडी थांबली अन् ते गृहस्थ म्हणाले,

"व्वा, छान झालं की. आम्हाला आपल्यासारख्यांचं सहकार्य तर पाहिजेच आहे. आमच्या संघटनेत सदस्य नोंदणी हा प्रकार नाही. जो कार्य करील तो कार्यकर्ता अशी आमची व्याख्या आहे. तुमचं आमच्या संघटनेत स्वागत असो. आता मी माझी ओळख करून देतो. माझं नाव भास्कर बोरावके; पण लोक मला भाऊ याच नावाने ओळखतात. मी नगर जिल्ह्यातील कोपरगावजवळ येसगाव वस्तीवर राहतो."

बोरावके नाव थोडंसं ओळखीचं वाटलं. राष्ट्र सेवादलाच्या विश्वस्त मंडळाशी संबंधित हे नाव असावं असं ओझरतं आठवलं. आनंदराव कौसडीकर आमचे मित्र. ते समाजवादी. त्यांच्या निमित्ताने समाजवादी मांडवातून जाण्यायेण्याचा प्रसंग अनेक वेळा आलेला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत समाजवाद्यांनीं महत्त्वाची भूमिका वठवलेली. त्या काळात या मंडळीशी बराच संबंध आलेला. तेव्हा राष्ट्र सेवादलवाले बोरावके हेच असावेत असं वाटलं. "हो, तो मीच !" भाऊ म्हणाले.

भाऊंची आणि माझी ही पहिली भेट. पुढे या भेटीचं मैत्रीत रूपांतर झालेलं. पुढच्या काळात सभा मेळाव्यानिमित्त भेटी होत गेलेल्या. पहिल्या भेटीतच आमचं त्यांच्याबद्दल मत चांगलं झालं अणि ते मत बदलावं असं पुढेही काही घडलं नाही. भाऊ महाराष्ट्रातील ख्यातकीर्त कुटुंबातील कर्ते पुरुष. खानदानी श्रीमंत. मोठे शेतकरी, मैल





मैल पसरलेल्या शेतजमिनीचे मालक; पण वागण्यात श्रीमंतीचा डौलही नाही. त्यांच्या वागण्याबोलण्यात विलक्षण शालीनता. त्यामुळे कुणीतरी त्यांची माहिती दिल्याशिवाय त्यांच्या आर्थिक संपन्नतेबद्दल कल्पनाही करवली नसती. भाऊंचा स्वभाव तसा अबोल; पण तरीही आमची रास जुळली. पुढे भाऊ संघटनेचे अध्यक्ष झाले. त्याआधी आणि नंतरही ते परभणीला दौऱ्यानिमित्त येत राहिले. संघटनेत फार वर्षांपासून राहिलेले. तसे अनेक जण संघटनेत आले अन् गेलेही. काही लहान होऊन आले, मोठे झाले, बाहेर पडले अन् लहानच राहिले. भाऊ मात्र संघटनेशी इमान राखून आहेत. संघटनेतील चढ -उतार, पडझड अत्यंत शांततेनं त्यांनी पाहिली; पण त्यांच्या निष्ठा अविचल राहिल्या.

त्या बैठकीत थोड्या गप्पा झाल्या. गप्पा झाल्या म्हणजे आम्ही तिघे आपसात बोललो. भाऊ ऐकत होते. काही वेळाने आम्ही नमस्कार करून उठलो, तेव्हा "येत चला, सहकार्य होईल तुमचं." असं म्हणून त्यांनी आम्हाला निरोप दिला. त्यानंतर जेव्हा जेव्हा आम्हा तिघांना वेळ मिळे, त्या त्या वेळी आम्ही कार्यालयात जाऊन भाऊंशी गप्पा मारत असू.

आतापर्यंतचा संघटनेकडील माझा प्रवास म्हणजे तलावाच्या काठापर्यंतचा राहिला; पण हळूहळू कळत नकळत मी संघटनेकडे ओढला गेलो. गेलो तो पुरता ओढला गेलो आणि आपण तलावात उतरलो आहोत हे लक्षात आलं, प्रत्यक्ष पोहू लागल्यावर आणि तेव्हा इतका आत गेलो होतो, की पोहण्याशिवाय इलाज राहिला नव्हता. पोहण्याची मजा पोहणाऱ्यालाच कळणार. काठावर बसून पाहणाऱ्यांना त्यातली मौज काय कळणार? *'लूतफे मय तुझ से क्या कहू, हाय कंबख्त तूने पीही नही '*

॥ ३ ॥

एके दिवशी भाऊ अचानक घरी आले. सोबत आणखी दोघांना घेऊन. त्या तिघांना अचानक आलेलं पाहून मी आश्चर्यचकित झालो. "असे अचानक कसे काय बुवा ?"

*वो आये घर हमारे ये खुदा की कुदरत है,*
*कभी हम उनको कभी अपने आपको*
*कभी अपने घर को देखते हैं।*

हा घिसापिटा शेर ऐकवला त्यांच्यावर छाप पाडायला आणि छाप पडली की!

"व्वा ! म्हणजे वकील साहेब, तुम्हाला उर्दूही येतं की काय ?"

"येतं म्हणजे काय, येणारच. अहो आम्ही निजामी राजवटीतले, उर्दू येणारच." आमच्या मोडक्यातोडक्या उर्दूची शान मारायला पुन्हा काय संधी मिळणार? माझ्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर देत भाऊ म्हणाले,

"आम्ही रस्त्यानं फिरत चाललो होतो. परभणी गाव पाहावं म्हटलं. रस्त्यावरून जाताना तुमच्या नावाची पाटी वाचली अन् म्हटलं भेटावं. म्हणून आलो. माझ्यासोबत आलेल्यांची ओळख करून देतो."

भाऊंसोबत आलेल्या दोघांपैकी एक चांगला उंचापुरा, बाळसेदार, काहीसा स्टायलीश, जीन पँट अन् वर सोडलेला सदरा. एखादा राष्ट्रीय पेपरचा पत्रकार वाटावा असा. तिशीत घोटाळणारं वय.

"हा बद्री देवकर, टाकळी गावाचा आणि हा अनिल गोटे धुळ्याचा." मराठी दूरदर्शन व चित्रपटांतील रमेश भाटकर नावाचा हिरो दिसतो न त्याची मूळ कॉपी, थोडी उंची, जाडी कमी; पण चांगला संघटक. परभणी अधिवेशन प्रचाराची आघाडी सांभाळणारा. मराठवाड्यात आणि विशेषत: परभणीच्या आसपास भिंती, पूल, पाणी टाक्या जिथे शक्य तिथे 'परभणी अधिवेशन' रंगवायचं मोठं काम यानं पार पाडलेलं होतं. उत्तमराव पाटलांचे सचिव म्हणून काम केलेलं असल्यामुळे, जनसंघातील वास्तव्यामुळे आणि काही काळ पत्रकार म्हणूनही केलेल्या कामांमुळे नेतागणांच्या ओळखीपाळखी खूप अन् कामाचा उरकही दांडगा.

बद्री अगदी उलट. इंग्रजी शाळेत शिक्षण झालेलं, त्यामुळे 'अमक्या अमक्याचे फाड फाड इंग्लिश'वालं फर्डं इंग्रजी. श्रीमंत शेतकरी कुटुंबात वाढलेला आणि पंचतारांकित लाईफ स्टाईलवाला आणि हो, परभणीतल्या एका घाणेरड्या जागेत उतरलेले. हे सारं अर्थात फार पुढे पुढे समजलं. काही नाही तर निदान उतरायला चांगली व्यवस्था तर करता आली असती. चांगल्या हॉटेलातल्या भाड्याचा बोजा संघटनेवर नको म्हणून कुठेही उतरायचं, त्याऐवजी कुणाच्या घरात सोय करता आली असती. परभणीत नव्याने संघटना कार्यरत होत आहे. संबंध शेतकऱ्यांशी येणार तेव्हा कुणाच्या घरी उतरून त्यांना त्रास देण्याऐवजी स्वतंत्र व्यवस्था केलेली बरी. शिवाय महिनाभर मुक्काम करायचा तेव्हा हॉटेलभाडेही परवडणार नाही. अशा परिस्थितीतला हा मार्ग काढलेला. त्या काळात परभणीतील हॉटेल्स नाही तरी गणेश लॉज छाप अंधाऱ्या खोल्यावाली. परभणीच्या





मुक्कामातील काय आठवणी घेऊन गेली असतील ही मंडळी; पण आज पावेतो यासंबंधी एका शब्दानेही कुणी तक्रार केली नाही. हा त्यांचाच मोठेपणा.

"आपण कशा प्रकारे मदत करू शकता?" गप्पांच्या ओघात, अनिल गोटे यांनी मला विचारलं.

"मी काही शेतकरी कुटुंबातील नाही तेव्हा त्यांच्या समस्यांशी मी परिचित नाही. संघटनेशी माझा संबंध नाही. प्रचारकामी माझा थेट उपयोग होऊ शकणार नाही; पण काही पत्रकारांशी माझा परिचय आहे. तेव्हा या माध्यमातून अधिवेशनाच्या प्रचारकामी मी मदत करू शकतो." मी म्हणालो.

त्या वेळी मला हे माहीत नव्हतं, की स्वत: अनिल गोटे हे 'लोकसत्ता' या दैनिकाशी संबंधित पत्रकार आहेत. तेव्हा त्यांना मी काय मदत करणार होतो म्हणा; पण गोटेंनी याची त्या क्षणी तरी ओळख दिली नाही. आता हे सगळं आठवलं म्हणजे वाटतं, किती भाबडेपणाने आपण वागत होतो. एव्हाना गप्पा संपल्या होत्या. रामराम झाला व मंडळी आली तशी गेली.

॥ ४ ॥

आमच्या कार्यालयीन भेटी अधूनमधून व्हायला लागल्या. एव्हाना नारायणराव मूलगीर अन् जहागीरदार बाजूला सरकले होते अन् मी मात्र अडकत गेलो. अधिवेशन जवळ यायला लागलं, तशा भेटीगाठी वाढत गेल्या. कार्यालयातील माणसांची वर्दळही वाढत राहिली. ही वर्दळ अर्थातच तरुण कार्यकर्त्यांची. इतक्या मोठ्या प्रमाणावर तरुण कार्यकर्त्यांचा राबता असलेली ही एकमेव संघटना असावी.

आधी ओळख झाली, ती बाहेरच्या कार्यकर्त्यांची आणि हळूहळू ओळख व्हायला लागली, ती स्थानिक कार्यकर्त्यांची, मराठवाड्यातील युवकांची. असंच केव्हा तरी कार्यालयात गेलो. तिथे तरुणांची कसली तरी बैठक घेत होते भास्करभाऊ. बहुधा कुठल्या तरी दौऱ्याची आखणी करीत असावेत. बहुतेक युवक कृषी विद्यापीठातील. त्या युवकांपैकी एकानं माझं विशेष लक्ष वेधून घेतलं. काळा तुकतुकीत रंग. सडसडीत बांधा. पांढरे, मोठमोठे डोळे, मोठं कपाळ, पातळ केस, शुभ्र सदरा अन् पांढरी शुभ्र पँट. ज्या तऱ्हेने बोलत होता, त्यावरून त्या टोळक्याचा तो म्होरक्या असावा हे स्पष्टच होतं. मी भाऊंना खुणेनं विचारलं, कोण हा?

''शेषराव मोहिते. कृषी विद्यापीठातील विद्यार्थी.''

आपल्या नावाचा उल्लेख ऐकून शेषरावनी भाऊंकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं.

''नाही, काही काम नाही. हे वकीलसाहेब तुझं नाव विचारीत होते. तू यांना ओळखतोस का?''

''हो, बऱ्याच कार्यक्रमांत मी यांना पाहिलं आहे,'' शेषरावनं सांगितलं. पुढे त्याची आाणि माझी चांगली पट्टी जमली. ती आजही कायम आहे. आता शेषराव नोकरीत स्थिरावला आहे. कृषी विद्यापीठातील एम. एस्सी., पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली आहे. त्याच्या नावावर दोन कादंबऱ्या आहेत. चांगला साहित्यिक, टीकाकार, रसिक म्हणून नाव आहे. संघटनेवर आणखी प्रेम आहेच. विद्यार्थिअवस्था होती तोपावेतो आम्ही जोडीनं काम केलेलं. अनेक सभा, संमेलनं केलेली. त्याने लिहिलेली 'आमचा १५ आगस्ट कवा हाय?' ही कविता विशेष गाजली. त्याच्या अवतीभोवती चांगली प्रभावळ होती त्या काळी विद्यार्थ्यांची. सुयश डाके, रमेश चिल्ले, एल.पी. देशमुख, लक्ष्मण वंगे या साऱ्यांची पुढे पुढे प्रचारकामी चांगलीच जानपछान झालेली. या तरुणांचा उत्साह बघण्यासारखा होता.

किरायाने सायकली घेऊन गटागटाने ही मुलं परभणीजवळच्या खेड्यापाड्यातून संघटनेचा प्रचार करणार होती. प्रचाराचा कार्यक्रम ठरला अन् राम राम घालून ही मंडळी कामाला लागली. जवळजवळ महिनाभर या युवकांनी सायकलीवर छोट्या छोट्या प्रचारयात्रा काढल्या. घोषणा लिहून, पोस्टर्स चिकटवणं, गावागावातून प्रचार फेऱ्या काढणं अशी सारी कामं शेषराव मोहिते आणि त्याची मित्रमंडळी पार पाडीत होती. या साऱ्या मुलांचे अन् एकूणच मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचे नेते होते अंबाजोगाईजवळील मोरेवाडीचे श्रीरंगराव ऊर्फ नाना मोरे. भास्करभाऊंच्या वयाचे आणि संघटनेचे सुरुवातीपासून कार्यरत असलेले. शेतकरी संघटनेआधी त्यांनी शेतकरी चळवळी चालवलेल्या. 'भूमिपुत्र' नावाचे एक साप्ताहिकही चालवलं होतं. या अधिवेशनानिमित्त त्यांचीही चांगलीच ओळख झाली व पुढेही आमच्या भेटीगाठी होत राहिल्या. परभणी अधिवेशनाची धुरा त्यांच्या खांद्यावर होती. मराठवाड्यातील ते ज्येष्ठ नेते तेव्हा साहजिकच या अधिवेशनाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. पुढे शेतकरी संघटनेत त्यांना उपाध्यक्ष करण्यात आलं. गेल्या काही वर्षांपासून त्यांची प्रकृती साथ देत नाही आणि सततच्या आजारपणामुळे संघटनेसाठी वेळ देऊ शकत नाहीत; पण संघटनेशी सोयरीक आजही





कायम आहे.

संघटनेनं नादावलेला माणूस काय करू शकतो, याचं उदाहरण म्हणून शेषराव मोहितेकडे बोट दाखविता येईल. मोहितेची घरची परिस्थिती बेताबाताची. एखाद्या सामान्य शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्याची असावी तशी आणि संघटनेत काम करायची तर जबर इच्छा. घरच्यांना वाटायचं-शिक्षण लवकर आटोपून नोकरी करावी अन् घराचा गाडा रेटावा. याचं मन तर संघटनेत अडकलेलं. तेव्हा जमेल तितकं शिक्षण लांबवायचं. बी.एस्सी. नंतर एम्.एस्सी. साठी प्रवेश घेतला. म्हणजे हॉस्टेलवर स्वतंत्र राहण्याची सोय. हॉस्टेलवरील त्याची खोली म्हणजे संघटनेचं ऑफिसच. दारावर संघटनेचं मोठं स्टिकर चिकटवलेलं. एम.एस्सी. झाल्यावर पीएच.डी.साठी नाव नोंदवलं. म्हणजे परत हॉस्टेलची सोय. पीएच.डी. चा प्रबंध लांबवणं जरुरी, नाही तर खोली खाली करावी लागणार आणि मग संघटनाकार्याचं कसं ? तेव्हा शेषरावनं जितकं शक्य आहे तितक्या काळापर्यंत प्रबंध सादर करणं लांबवलं. नोटिसावर नोटिसा येऊ दिल्या आणि शेवटी पाणी जेव्हा नाकावर गेलं तेव्हा एकदाचा प्रबंध सादर करून पीएच.डी. पदरात पाडून घेतली. तोपावेतो शेतकरी संघटनेची युवा आघाडी, 'द्वारा' कृषी विद्यापीठ वसतिगृह, परभणी ! साहित्यिक क्षेत्रातही त्यानं आपल्या एका लेखानं प्रचंड खळबळ माजवली. मराठी ग्रामीण लेखकांनी शेतकऱ्यांचं खरं दुःख न मांडता, केवळ त्यांचं दारिद्र्यच विकलं अशी टीका केली. ती लेखकांना फार बोचली. ग्रामीण जीवनावर लिखाण करणाऱ्यांना त्या लेखाची जाहीर दखल घ्यावी लागली.

या विद्यार्थी कार्यकर्त्यांबरोबरच हळूहळू नागरिक कार्यकर्त्यांचीही ओळख होत गेली. प्रताप बांगर या तरुण वकिलाच्या नेतृत्वाखाली हा वर्ग तयार झाला होता. त्यांत होते ब.ल. तामसकर, कै. प्रकाश साखला, गोपाळ व्यास, बिरबलसिंग ठाकूर, नारायण जाधव. यांतील प्रकाश साखला हे धनिक, व्यास हे व्यापारी, ठाकूर गुत्तेदार, जाधव धडपड्या तरुण शेतकरी. त्या वेळी प्रचारकामासाठी परभणीत काही दिवस संघटनेच्या त्रिमूर्तीपैकी एक श्री. प्रल्हाद पाटील कराड हे मुक्काम ठोकून होते. त्यांच्या हाताखाली ही टोळी प्रचारासाठी गावोगाव फिरत होती. प्रचारासाठी एक जीप घेतलेली. दिवसभर गावोगावी प्रल्हाद पाटलांच्या प्रचारसभा व्हायच्या. रात्री केव्हातरी प्रचार आटोपून कंपनी परत येई. दुसऱ्या दिवसाचं नियोजन केलं जाई आणि दुसऱ्या दिवशी सकाळी एकत्र जमून पुढील काम सुरू. असा अखंड प्रचार चाललेला. या गटाचं मुख्यालय होतं रेल्वे

स्टेशनजवळील श्री. प्रकाश साखला यांचं घर. पुढे शरद जोशी अधिवेशनासाठी उतरले ते साखला यांच्या याच घरी.

॥ ५ ॥

अधिवेशनासाठी परभणीतील अनेक जागांची पाहणी करण्यात आली व शेवटी मराठवाडा प्रशालेचे मैदान निवडण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.हरिश्चंद्र दळवी यांनी संपूर्ण सहकार्य देऊ केलं. ते आणि त्यांचे संस्थेतील सहकारी अधिवेशनकामात संघटनेच्या पाठीशी उभे राहिले. त्या वेळी संस्थेचे मैदान म्हणजे काट्याकुट्यांनी, झुडुपांनी भरलेलं एक घाणेरडं मैदान होतं. ज्याचा वापर बहुधा प्रातर्विधीसाठीच केला जायचा; पण मैदान तयार करायचा विडा उचलला संस्थेतील एक उत्साही शिक्षक श्री. भेडसुरकर यांनी. अधिवेशन अगदी तोंडावर आलेलं. तेव्हा मैदान तयार होतं किंवा नाही ही भीती होतीच; पण श्री.भेडसुरकर यांनी रात्रंदिवस खपून स्वत: समोर उभं राहून मैदान तयार करून घेतलंच. या कामाकडे लक्ष द्यायला संघटनेच्या कार्यकर्त्यांना फुरसत नव्हती. त्यांच्या पायाला तर भिंगरी बांधलेली. उरता उरलो मी. मी तर बिनखात्याचा मंत्री. *'आ बे लड्डू जा बे लड्डू'* करणारा. घोडं मेलं ओझ्यानं अन् शिंगरू मेलं येरझाऱ्यानं अशी माझी अवस्था झालेली. त्यामुळे जिवाची नुसती घालमेल होत होती; पण मैदान तयार झालं अन् जीव भांड्यात पडला. खरं म्हणजे ज्यांचा जीव भांड्यात पडावा त्यांना तर काळजी करायलाही रिकामपण नव्हतं.

एव्हाना मैदानावर मांडव घालणाऱ्या जमदाडे पाटलांचं सामानही येऊन पडलेलं होतं. दहा हजार प्रतिनिधींनी बसावं एवढा मांडव तयार करायचा होता त्यांना, पूर्व-पश्चिम लांबीचा. पूर्वेकडे टोकाला होणार होता अडीच फूट उंचीचा मंच. तीस-चाळीस माणसं बसतील अशा आकाराचा. या मांडवालगतच मैदानात पूर्वेकडे तोंड करून दहा फूट उंचीचं एक व्यासपीठ होणार होतं, खुल्या अधिवेशनासाठी. एवढा मोठा आवाका असलेला मांडव घ्यायच्या कल्पनेचं मला तर हसू यायला लागलं.

''भाऊ, एवढा मोठा मांडव तुम्ही घालत आहा, एवढी माणसं येणार का? नाही तर व्हायचं काय दोनतीनशे माणसं यायची अन् कुठे तरी एका कोपऱ्यात बसायची. सारा मांडव ओकाबोका वाटेल.'' जाहीर सभेचं, म्हणजे खुल्या अधिवशेनाचंही तसंच. ''लाखभर माणसं बसतील अशा कल्पनेनं तुम्ही मैदान घेरताय. अहो, लाखभर माणसं





जमवणं काय मामुली बाब आहे? आमच्या परभणीची सारी लोकसंख्या आणून बसवली तरी जागा मोकळीच राहील.'' माझा जीव काळजीनं वर-खाली आणि हा गडी निश्चिंत. यापूर्वी परभणीतली मोठ्यात मोठी सभा म्हणजे शनिवार बाजारातली ५ ते ६ हजारांची. त्याहीपेक्षा थोडी मोठी सभा म्हणजे इंदिरा गांधींची इदगाह मैदानावरची १५ ते २० हजारांची; पण एवढं मोठं मैदान भरवणं म्हणजे,

''काही म्हणा भाऊ...'

''जाउ द्या हो वकीलसाहेब, चिंता कशाला करता?'' आता चिंता म्हणजे काय घराचं दार आहे, रात्र झाली, की बंद करायला!

आता अधिवेशन जेमतेम चारपाच दिवसांवर आलेलं. आमची कामाची लगबग चाललेली. कामाला कार्यकर्ते अन् लगबगीला आम्ही. म्हणून 'आमची' एवढं प्रघात म्हणून म्हणायचं. कामात नाना-मोहिते आणि कंपनी. आम्ही आपले डोळे ताणताणून आकाराला येणारा मांडव, सखल होणारं मैदान पाहत होतो.

एव्हाना पोस्टर्स आलेले, गावोगावी लागलेले होते. कार्यालयात नुस्ती गर्दी उसळलेली. पाय ठेवायला जागा नाही. प्रचाराच्या घोषणा आम्हाला नवीन अन् पुरजोश होत्या. *'दणकट मनगट छातीत हिंमत, घेऊन दावू घामाची किंमत'*, *'सूट सबसिडीचे नाही काम, हवे घामाचे दाम'*.

कामाच्या घाईत पाणी प्यायलाही फुरसत नव्हती. नाना, मोहिते आणि कंपनीला तर श्वास घ्यायलाही रिकामपण नव्हतं. आता वाट होती, ती '*डी*' डेची-अधिवेशन दिवसाची. एक दिवस अगोदर शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी येणार होते. त्यांना पाहण्याची फार फार उत्सुकता होती. काही महिन्यांपूर्वी शनिवार बाजारातील एका सभेत रात्रीच्या वेळी दुरून त्यांना पाहण्याचा योग आला होता. काही कामांसाठी त्या मैदानातून जाता जाता सहज कानावरून काही शब्द गेले होते. संघटनेबद्दल त्या काळी काही माहिती नव्हती आणि उत्सुकताही नव्हती. तोपावेतो शरद जोशी यांचं केवळ नाव कानावर पडलेलं होतं; पण अधिवेशनानिमित्त कार्यकर्त्यांच्या बोलण्यात सतत त्यांच्या नावाचा उल्लेख व्हायचा. त्यावरून त्यांना पाहण्याची उत्सुकता होती. शरद जोशी हे साधा माणूस की कुणी - पण आता दिसणारच आहे की काही दिवसांचा तर प्रश्न आहे.

'*डी*' डेच्या आधी साखलाच्या घरी तयारीची पाहणी करणारी शेवटची बैठक झाली. भास्करभाऊ, अनिल गोटे, ब.ल.तामसकर, प्रताप बांगर, व्यास, मोहिते सारे

प्रमुख कार्यकर्ते हजर होते. झाल्या-राहिल्या कामाचा आढावा झाला. पुढील कामांचं वाटपही झालं. उद्या साहेब येणार, पैशाचा हिशेब तयार पाहिजे. साहेब हिशेब पाहणार, झाल्या कामांची पाहणी करणार - परवा तर प्रत्यक्ष उद्घाटन. उरला फक्त उद्याचाच दिवस,

"साहेब केव्हा येणार ?" मी मध्येच विचारलं.

"सकाळी सकाळी एस.टी.नं पुण्याहून येणार."

साहेबांच्या उतरण्याची व्यवस्था साखलाच्या घरी केली होती. बैठक रात्री उशिरापर्यंत चालली. परत सकाळी साहेबांना घेण्यासाठी लवकर यायचं म्हणून बैठक संपवून आम्ही सारे पांगलो. पहाटे सहापर्यंत स्टँडवर जायला पाहिजे. म्हणजे सकाळी पाच वाजता तरी उठायला पाहिजे आणि आता तर - सकाळी जाग येईल का? आणि नाही गेलो स्टँडवर तर कोण विचारणार आहे... वकील साहेब, तुम्ही आता खूप गुंतलेले आहात. कुणी विचारणार नाही असं समजू नका. आत्ताच्या बैठकीतच तर ठरलं, स्थानिक समितीतर्फे तुम्ही साहेबांचं स्वागत करायचं. यार, कसे अडकलो आपण. खैर, अडकलो तर अडकलो. अडचण पहाटे उठण्याची, दुसरं काही नाही.... !

॥ ६ ॥

पहाटे आम्ही हजर झालो साखलाच्या घरी तर श्रेष्ठी झोपलेले होते. आता साहेबांना ओळखावं कुणी? मी तर साहेबांचा फोटोही पाहिलेला नाही. स्टँडवर काय साहेबांच्या नावाचा पुकारा करीत बसू की काय? एव्हाना संघटनेतील अँग्री यंग मॅन ब.ल. आले अन् माझा जीव पारंपरिकरीत्या 'भांड्यात' पडला.

"चला बलं, स्टँडवर जाऊ या." मी त्यांना म्हटलं,

"इतक्या लवकर कशाला? आणखी वेळ आहे."

बसच्या वेळेवर आम्ही गेलो. बस आलेली होती; पण साहेब काही दिसले नाहीत. साहेब गेले तरी कुठं ? तेवढ्या थंडीतही बलंना घाम फुटला. मी तर काय काठावरून पोहणारा. त्यामुळे मी आपला थंडच. आम्ही दोघे साखलाच्या घरी परतलो. आम्ही परततो न परततो तो आमच्या मागून मिनी बस आली. त्या बसमधून निळी जीन्स, पांढरी बंडी, दोन्ही खांद्यांवरून शाल लपेटलेले उंचेपुरे गृहस्थ उतरले. उतरताच,

"नमस्कार मंडळी !" त्यांना पाहून बलं गोंधळले. साहेब बसनं न येता मिनी





बसने कसे आले याची आधी चौकशी करावी की आधी माझा परिचय करून द्यावा, हे त्यांना सुधरेना.

"हे वकील साहेब, स्थानिक स्वागत समितेच्या वतीने आपले स्वागत करण्यासाठी...." बलं.

एव्हाना बलं सैल झाले होते. साहेब आल्याचं कळलं तसे अवतीभोवती अनेक कार्यकर्ते जमा झाले. आमची वरात साखलाच्या घरी माडीवर गेली. साहेबांशी औपचारिक बोलणं झालं. चहाचा एक राउंड झाला. सकाळी नऊ वाजता भेटायचं ठरलं अन् ही बैठक बरखास्त झाली.

आपल्या देशातील पक्षोपपक्षांच्या नेत्यांचे 'छाप' ठरलेले आहेत. कडक इस्त्री, पांढरे शुभ्र कलपी, खादीचे कपडे अन् त्या कपड्यांत न मावणारं शरीर म्हणजे काँग्रेस. कसेही अस्ताव्यस्त केस, रागीट चेहरे, कपड्यांची काळजी नाही म्हणजे डावी आघाडी. धुवट, बिन कलपी, ढगळ खादी अन् खांद्यावर शबनम म्हणजे समाजवादी; दुटांगी धोतर, सदरा, खांद्यावर उपरणं/पंचा, कपाळी गंध म्हणजे भाजप; पण साहेब म्हणजे कुठल्याच छापात न बसणारा गडी. मुळात जीन्स घालणारा शेतकऱ्यांचा नेता असू शकत नाही, ही कल्पना आमच्या डोक्यात एवढी घट्ट बसलेली, की इंग्रजी नियतकालिके साहेबांचं वर्णन करताना 'जीन्स क्लॅड फार्मर लीडर' असा आवर्जून उल्लेख करतात. शेतकऱ्यांनी चांगले कपडे घालणं- नीटनेटकं राहणं कुणाला अपेक्षितच नाही. एवंच हा नेता तसा होता-तरीही खऱ्या अर्थाने नेता होता. त्यांच्याभोवती झुलणारी, शब्दासाठी जीव टाकणारी पोरं अन् भाऊ, नाना, बापू अशी 'थोरं' मी पाहिलेली. काहीही असो, व्यक्तिमत्त्व छाप पाडणारं होतं हे मात्र खरं !

॥ ७ ॥

सकाळी नऊ वाजता आम्ही साखलाकडे जमलो. तो भास्करभाऊ, बद्री ही पाहुणे मंडळी आणि श्रीरंगनाना मोरे त्यांच्या धाकट्या पातीसह जमा झालेले. येणाऱ्या पाहुण्यांची, प्रतिनिधींची, आंतरराज्य समन्वय समिती सदस्यांची उतरण्या-राहण्याची व्यवस्था कुठे कशी केली हे पाहणे जरुरी असल्यामुळे आधी ही पाहणी करावी असे ठरले. साहेबांनी आणलेली मिनी बस, संघटनेसोबतची जीप आणि एक कार एवढ्या लवाजम्यानिशी आमचा काफ़िला पाहणीसाठी बाहेर पडला. आंतरराज्य किसान समन्वय

समितीच्या बैठकीसाठी पंजाब, हरयाना गुजराथ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश आदी भागांतून दोनअडीचशे माणसं येण्याची शक्यता होती. एवढ्या सर्व माणसांना एकत्र ठेवणं कठीण, तेव्हा दोनतीन जागा निश्चित केल्या. माझी आपली कल्पना होती, की या लोकांसाठी परभणीतील उपलब्ध असलेले हॉटेलं, डाक बंगल्यातील खोल्या आरक्षित केल्या जातील; पण इथे सारा खाक्याच वेगळा. अशा तोकड्या व्यवस्थेबद्दल कुणाची तक्रारही नसायची, हे पुढे आम्हाला कळलं. प्रतिनिधी काय आणि कार्यकर्ते काय झोपायला जमीन अन् पांघरायला आकाश मिळालं की खूष ! नानलपेठेतील शाळेच्या ज्या इमारतीमध्ये आम्ही पंजाबी लोकांची व्यवस्था केली होती, त्या शाळेत न्हाणीचा पत्ता नव्हता तर संडासची दारं एवढी छोटी, की पाठीमागून धक्का मारल्याशिवाय सरदारजी आत जाऊच शकणार नाही; पण साऱ्या पंजाबी लोकांनी त्या सर्व अडचणी हसत हसत झेलल्या. या जागांची पाहणी करून आमचा काफिला वळला संमेलनस्थळी, म्हणजे मराठवाडा प्रशालेच्या मैदानाकडे. तिथे एव्हाना प्रतिनिधींसाठी मांडव तयार झालेला होता. मांडवातलं व्यासपीठ तयार होतं. साऱ्या व्यवस्थेवर शेवटचा हात फिरवण्याचं काम चालू होतं अन् ते काम दिवसभरात पार पडू शकत होतं. खुल्या अधिवेशनासाठी वेगळे व्यासपीठ राहणार होतं आणि त्याच्या बांधणीचं काम चालू होतं. त्यासाठी आणखी दोन संपूर्ण दिवस हाताशी होते. हे व्यासपीठ दहा फूट उंच राहणार होतं. त्याच्याशेजारीच चौदा फूट उंचीचे शेतकऱ्याचं एक कटआउट उभं करण्यात आलेलं होतं. हे कटआउट फारच प्रेक्षणीय होतं. परभणीकरांसाठी तोपावेतो कटआउट आणि तेही इतकं उंच ही गोष्टच नावीन्यपूर्ण होती. हे कटआउट परभणी अधिवेशनाचं एक आकर्षण ठरलं होतं. केवळ कटआउट पाहण्यासाठी लोक मैदानाला भेटी देत होते. आपसांत चर्चा करायचे. 'मायझे हे आणलं कसं असंन बरं? मारुती रायानं दुरणागिरी आणला तसं आणलं असंन की काय?' ही एक प्रतिक्रिया.

मराठवाडा प्रशालेचं आवार खूप मोठं. मैदानच नव्हे तर सारी शाळा दळवी सरांनी उपलब्ध करून दिलेली होती. पैकी एका खोलीत अधिवेशन दिवसापासून म्हणजे अकरा फेब्रुवारी ८४ पासून कार्यालय थाटलं जाणार होतं. दुसऱ्या एका मोठ्या हॉलमध्ये आंतरराज्य किसान समन्वय समितीच्या बैठका होणार होत्या. त्याप्रमाणे त्या त्या ठिकाणी नावाच्या पाट्या लावण्यात आल्या. या साऱ्या पाहणीत दुपार टळून गेलेली; पण या मंडळीचं काम काही संपेना. माझ्या पोटात तर एव्हाना कावळ्यांच्या थेट दुसऱ्या पिढीनं





कावकाव सुरू कलेली. तेव्हा मी त्या साऱ्या गर्दीतून हळूच सटकलो.

संध्याकाळी आम्ही सारे, म्हणजे धाकटी अन् थोरली, दोन्ही फळ्या मैदानावर जमा झालेल्या. दिवसभरात सर्व जागा पाहून झालेल्या होत्या. आता फक्त बाहेरगावांहून येणाऱ्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी उतरण्याची जागा तेवढी पाहायची राहिली होती. त्यासाठी हडकोमधील बांधून नुकतीच तयार झालेली घरांची जागा निवडलेली होती; पण ते ठिकाण थोडंसं दूर, आडवळणाचं आणि एव्हाना रात्र झालेली. तेव्हा ही वेळ टाळावी असं प्रताप बांगर यांनी सुचवलं. त्यामुळं तो बेत रद्द झाला. एव्हाना शेषराव मोहिते आणि त्यांची विद्यार्थी मंडळी यायला लागली होती. त्यांनी आपापल्या कामांचा आढावा दिला. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरील भावनांचे खेळ पाहण्यात मी रंगून गेलो. शरद जोशींबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आदर होता; पण त्यांपैकी पुष्कळ जणांनी जोशीसाहेबांना प्रत्यक्ष पाहिलेलं नव्हतं. ती संधी आता आलेली होती. त्यांच्या उपस्थितीत केलेल्या कामाचा आढावा सादर करताना वाटणारा अभिमान, जोशींना जवळून पाहण्याची उत्सुकता, आनंद, नव्याने सोपवली जाणारी कामगिरी स्वीकारण्याची मानसिकता अशा अनेक भावनांचे खेळ चालले होते त्यांच्या मनात आणि ते सारे भाव चेहऱ्यावर उमटून जात होते. रांगत्या बाळाला दिसेल त्या वस्तूला हात लावायची इच्छा असते. या कार्यकर्त्यांनाही तसंच वाटत असावं. जर शक्य झालं असतं तर त्यांच्या हाताला हात लावून साऱ्यांनी आपला आदर व्यक्त केला असता.

आता रात्र चांगलीच अंधारली होती. एव्हाना बरीच माणसं आलेली होती. आता अनेक लहान लहान गट तयार झाले होते. पूर्वीपासूनच संघटनेत काम करणाऱ्यांनी आपला गट तयार केला. मोहितेंच्या सहकारी विद्यार्थ्यांचा एक गट. बांगर, ठाकूर, व्यास, बलं, साखला यांचा एक गट. भाऊ, बद्री, नाना, शरद जोशी यांचा एक गट. गटागटांनी चर्चा, गप्पा चाललेल्या. माझ्यावर कुठलीच जबाबदारी नव्हती. संघटनेतील लोकांची फारशी ओळखही नव्हती. मी सुटा सुटा फिरत होतो. रात्र बरीच गर्द झाली तेव्हा हळूच घराकडे सटकलो.

॥ ८ ॥

सकाळी जरा लवकरच उठलो. तयार होऊन नाश्ता करून सरळ साखलाच्या बंगल्यावर गेलो, तो समजलं शरद जोशी अधिवेशन मैदानावर गेले. तेव्हा मीही तिकडे

गेलो. तिकडे पाहतो तो काय, ही रीघ लागलेली माणसांची! मैदानाकडे जाणारे सारे रस्ते अक्षरशः वाहत होते. मैदानावर सर्वत्र माणसंच माणसं. जिकडेतिकडे संघटनेचे पांढरे, हिरवे झेंडे वाऱ्यावर फडफडत होते. सारं मैदान पताकांनी सजवलेलं. अधिवेशनाचा मांडव अत्यंत साधा; पण सुबक. पांढऱ्याशुभ्र चादरींनी व्यासपीठ सजवलेलं. मागे 'शेतकरी संघटना दुसरे अधिवेशन ११,१२,१३ फेब्रुवारी १९८४' असं लिहिलेला मोठा कापडी फलक. मांडवातल्या खांबाखांबावर छोटे छोटे झेंडे. खाली जमिनीवर पाणी शिंपडलेलं. मातीचा एक खास सुगंध दरवळलेला.

काल संध्याकाळपर्यंत वाटत होतं, कशाला एवढा खटाटोप? एवढी माणसं येणार आहेत का प्रतिनिधी अधिवेशनाला? पण सकाळी पाहतो तो सारा मंडप माणसांनी गजबजून गेलेला. लोक गटागटांनी जागा धरून बसलेले. व्यासपीठाच्या एका बाजूला परप्रांतांतील प्रतिनिधींची व्यवस्था. समोर मांडवात पुढे महिला, पत्रकार, प्रतिनिधी यांची अलग अलग व्यवस्था. बाहेर मैदानात लोकांनी दशम्याची गाठोडी सोडलेली अन् जागा मिळेल तिथे भाकर खात बसलेले शेतकरी. पाण्याच्या टाकीजवळ ही झुंबड उडालेली!

जुन्या कार्यकर्त्यांना ओळखीच्या नविनीकरणाची ही अमूल्य संधी, ''राम राम हो व केव्हा आलात ?'', ''हे काय आत्ताच ठेपलो की.'', '' कसे आलात?'', ''रेल्वेनं'' ''तुम्ही?'', ''आम्ही ट्रकनं आलो. सोबत बायामाणसं, तेव्हा म्हनलं आपलं वाहन असलेलं बरं.'' मग व्हायच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी. सटाणा अधिवेशनाच्या आठवणी निघायच्या. मध्येच कुणी तरी हाक देणार, ''अहो वकीलसाहेब, जरा इकडे येता का?'', ''काय हुकूम आहे?'', ''हुकूम कशाचा साहेब. हे आंतरराज्य समन्वय समितीचे सदस्य बाहेरून आलेले आहेत. त्यांची व्यवस्था कुठे आहे बघा जरा.'' मग कुणीतरी कार्यकर्ता बघायचा. बहुधा धाकट्या पातीकडेच ही कामं होती. त्यांना गाडीतून घेऊन जायला सांगायचं. कुणी मध्येच येऊन सांगायचं, ''ही वर्ध्याची मंडळी आलेली आहेत. त्यांची व्यवस्था कुठे करायची?'' मग कुणाला तरी तिकडे पिटाळायचं.

एव्हाना श्रेष्ठींनी यायला सुरवात केली. हे बघा हे विजय जावंधिया वर्ध्याचे- आंतरराज्य समन्वय समितीचं काम पाहतात. हे भूपेंद्रसिंह मान. ते उंच धिप्पाड ते आहेत पेशावर सिंग, पंजाबमधून आलेले आणि ते अंगावर हिरवी शाल घेतलेले नंजुडास्वामी कर्नाटकचे. एक ना दोन. समन्वय समितीची संख्याच शेकड्यात. आणि हो, ही आली गुजराथची मंडळी. हे बिपिनभाई, हे भूलाभाई, हे हे.... कार्यकर्त्यांची





एक्सप्रेस गाडी जी सुटली ती थांबायचं नावच घेईना. मी आपला काही जबाबदारी नसूनही पुलंच्या नारायणसारखा धावतो आहे, इकडून तिकडे बिनकामाचा !

शरद जोशींभोवती तर कार्यकर्त्यांचं हे मोहोळ जमलेलं! कुणी विचारलं ना, ''साहेब कुठे आहेत?'' तेव्हा मैदानावरील सर्वांत जास्त गर्दी जिथे असेल तिकडे बोट दाखवलं, की साहेब सापडलेच म्हणून समजा. आता प्रतिनिधी अधिवेशनाची वेळ झालेली. मांडवाच्या दारावरच नोंदणीची व्यवस्था केलेली. काही लोक तर आत जाऊन जागा धरून बसलेले. बरोबर अकरा वाजता अधिवेशनाची सुरवात होणार होती. आधी अध्यक्षांच्या उपस्थितीत झेंडावंदन झालं आणि मग कार्यकर्ते मांडवाकडे लोटले. मंचावर स्थानापन्न होते शरद जोशी, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड, रामचंद्र बापू पाटील, भास्करभाऊ बोरावके, श्रीरंगनाना मोरे, विजय जावंधिया, अनिल गोटे आदी. या बैठकीला मी मात्र थांबू शकलो नाही. एकदोन फुटकळ कामे मागे लागली होती. मलाच काय कुणालाही उसंत नव्हती. अख्खी धाकटी पाती झुलत होती व्यवस्थेत.

मांडवाबाहेर तर जत्रेचं वातावरण होतं. खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, चहाचे, भाकरी बेसनाचे स्टॉल्स. खरमुरे विकणारी पोरं, पुस्तकांचे स्टॉल्स, कॅसेटस्, '... माननीय शरद जोशी यांच्या सटाणा अधिवेशनातील भाषणांची, तसेच शेतकरी संघटनेची मुलूखमैदान तोफ माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील यांच्या भाषणांच्या...' तरणाबांड, गोरापान, जीन्स पँट, हिरव्या रंगाचा बाहेर सोडलेला सदरा - कोण हा तरुण? 'नरेंद्र अहिरे', पुढे चालून गिरणा साखर कारखान्याचा चेअरमन झालेला. आणखी पुढे एक छोटं टोळकं उभं आहे. सारखी खसखस पिकते आहे. कोण आहे ही मंडळी? 'बाबूलाल परदेशी, शंकरराव वाघ आणि कं.' एकेक माणूस ओळखीचा व्हायला लागला.

रात्रीच्या वेळी मैदानावर ठिकठिकाणी चुली पेटलेल्या. दुरदूरून आलेले शेतकरी बायामाणसं पीठमिठाची शिदोरी घेऊन आलेली. त्यांनी चुलीवर भाकरी भाजून घेतल्या. बेसन शिजवलं. त्याचा खमंग वास दरवळत होता. कुणी ढोलकीवर गाणी म्हणताहेत, कुणी भजन गाताहेत. हजारोंनी जमा झालेल्या शेतकऱ्यांनी जमेल तिथे पथारी लावली. हळूहळू रात दाटत गेली. चुली थंड झाल्या. दिवे मंद झाले. दिवसभराच्या खटाटोपात त्याआधीच्या प्रवासात थकलेभागले लोक अगदी चिडीचीप झोपले.

तीन दिवस चाललं अधिवेशन. तिसऱ्या दिवशी खुलं अधिवेशन. त्या दिवशीच्या गर्दीची गिनती करायला नको. परभणीच्या इतिहासात एवढी गर्दी कुठल्याच कार्यक्रमाला

झाली नव्हती. माणसांचा समुद्र कशाला म्हणतात ते दिसलं, त्या दिवशी. नजर जाईल तिथपर्यंत माणसंच माणसं. दुपारी दोनला सुरवात झाली, खुल्या अधिवेशनाला. डोक्यावर उन्हं घेत कानात जीव ओतून ऐकत होते लोक. मोठमोठ्या अर्थशास्त्र्यांना न उलगडलेलं शेतीमालाच्या भावाचं कोडं लोक समजून घेत होते. प्रचंड घोषणांच्या नादात अधिवेशन संपलं. लोक गावोगावी परतले.

काय आकर्षण असेल लोकांना? कुणी आणण्या-नेण्याची व्यवस्था करीत नाही. राहण्या-उतरण्याची व्यवस्था नाही. बसायलासुद्धा आसनं नाहीत, जेवणा-खाण्याची बातच सोडा. कसलं आश्वासनही मिळणार नाही. परभणी म्हणजे काही तीर्थक्षेत्र नाही किंवा पर्यटनस्थळही नाही, महानगरही नाही, ज्याला भेट देण्याच्या आकर्षणानं तरी यावंसं वाटावं. परभणी म्हणजे शहराचा तोंडवळा असलेलं एक मोठं खेडं, एवढंच. पदरमोड करून, डोईवर बाडबिस्तर घेऊन मैल मैल चालून यावं, पीठमीठ आणावं; पण हजेरी लावावी असं काय होतं संघटनेच्या अधिवेशनात?

त्या वेळी आघाडीवर असलेली मंडळी आज कुठे आहेत? संघटनेची त्रिमूर्ती म्हणवले जाणारे शरद जोशी, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड त्या वेळी ऐन भरात होते. त्यांच्या शब्दातून आग बाहेर पडायची. माधव खंडेराव मोऱ्यांचं भाषण म्हणजे उपहास, कारुण्य, जोश यांचा अजब मिलाफ असायचा. आज ते व्याधींनी ग्रस्त घरी बसून आहेत. प्रल्हाद पाटील राजकारणापासून फारकत घेऊ शकत नाहीत तेव्हा ते राजकारणग्रस्त. राहता राहिले शरद जोशी. ते आजही खंबीर आहेत. दुसऱ्या फळीतले भास्करभाऊ, रामचंद्र बापू, विजय जावंधिया, अनिल गोटे, श्रीरंगनाना मोरे. पैकी जावंधिया अन् गोटे आज संघटनेपासून दूर झालेले. श्रीरंगनाना प्रकृती अस्वास्थ्यामुळे घरी बसून. भास्करभाऊ त्यांच्या पत्नीच्या मृत्यूपासून आणखी सावरले नाहीत. बापूही अथक प्रवासात थकलेले.

आज इतक्या वर्षांनी अधिवेशनाकडे मागे वळून पाहताना, आठवणींचा कल्लोळ उठतो. पहिल्याच भेटीत आपण जोशीसाहेबांच्या इतक्या जवळ जाऊ कसे शकलो याची गंमत वाटते. माझी आई तशी काही बाबतीत कडक. वकिली सोडून इतर क्षेत्रात लुडबूड करू पाहणाऱ्या माझ्या स्वभावावर ती नाराज असायची. त्यामुळे तशी कुणी माणसं आली, की ती नाराजी व्यक्त करायची; पण का कोण जाणे प्रत्यक्ष संबंध न येताही शरद जोशींबद्दल तिला आपुलकी वाटायची. त्यांचा उल्लेख ती नेहमी 'गुरू' असा





करायची. साहेबांचा दौरा असला, की 'कधी येणार रे तुझे गुरू?' असं विचारायची. काही माणसांबाबत आपल्याला अकारण ओढ का वाटते कोण जाणे, पण वाटते एवढं खरं.

आजही आठवतो- पाणी हापसून बकीट बकिटांनी सरदार लोकांना थंड पाण्यानं आंघोळ घालणारा पाहोंडूळकरांचा अशोक. घराच्या शेजारी नारायण जाधव राहायचा. त्याच्या घरी उतरल्या होत्या साहेबांच्या मुली आणि सरोजताई. आजही आठवतो नारायण जाधव घराच्या दारातून डोकावताना म्हणणारा ''वकील साहेब, ती पलीकडे दिसते ना ती साहेबांची मुलगी बरं.'' आजही आठवतात मांडव घालणारे जमदाडे पाटील.

अधिवेशनादरम्यान पाहुण्या लोकांना घरी बोलावण्याची माझी इच्छा होती. मी संधी साधून भाऊंना विचारलं. भाऊ म्हणाले, ''त्यात काय मोठंसं. येऊत की.'', ''पण माझी कुणाची ओळख नाही. माझ्या वतीने तुम्हीच आमंत्रण द्या की.'' ''असं करूया मुख्य कार्यकर्त्यांची बैठकच घेऊ तुमच्या घरी, नाही तरी ठराव लिहून काढायचे आहेत.'' अन् मग घरी सर्व श्रेष्ठी आले. साहेब, भाऊ, प्रल्हाद पाटील, माधव खंडेराव मोरे, विजय जावंधिया, अनिल गोटे, बबन शेलार. घरी रांगोळ्या, केळीच्या पानावर पुरणपोळीचं जेवण असा घाट घातलेला. बैठक सजवलेली. घरात प्रवेश करताच माझ्या मुलांनी दोरी ओढली अन् पाहुण्यांच्या डोक्यावर पुष्पवृष्टी झाली. तो सारा थाट पाहून, ''ही तर पेशवाईच झाली,'' अशी शाबासकी दिली साहेबांनी. जेवण आटोपून सुपारी चघळत माडीवर मंडळी विसावली. नाही तरी रात्र झालेली होतीच. ''असं जेवल्यावर कामं कशी व्हावीत हो,'' कुणीतरी म्हणालं आणि मंडळी सगळी कामं बाजूला सारून गप्पांत रंगली. त्याही गोष्टीला आज अठरा वर्षे होताहेत; पण ती रंगलेली मैफल आजही मनात ताजी आहे. आजही पुरणाचा, उदबत्तीचा, गरम भात आणि केळीच्या पानाचा सुगंध दरवळतो आहे.

■■

# आंदोलन

॥ १ ॥

लातूरच्या गाडीतळावर मी बसमधून उतरलो, तो सारा गाडीतळ माणसांनी फुलून गेलेला. येणाऱ्या प्रत्येक बसमधून माणसांचे जथेच्या जथे घोषणा देत उतरत होते. छातीवर बिल्ले लावलेल्या माणसांचे लोंढेच्या लोंढे रस्त्याने जात होते. सभेचं ठिकाण कुठे आहे हे विचारायचं कामच नव्हतं. या लोंढ्याबरोबर गेलो तरी सापडलंच असतं ठिकाण. मी या प्रवाहात स्वत:ला झोकून दिलं अन् वाहत वाहत सभाकिनारी लागलो. तिथं तर माणसांचा विशाल सागर पसरलेला. शरद जोशींची जाहीर सभा, तेव्हा लगतच्या जिल्ह्यातून अन् अवतीभोवतीच्या खेड्यांतून येणाऱ्या माणसांची रीघ ही लागणारच होती. दुपारी प्रचंड मिरवणूक निघाली अन् शेवट झाला जाहीर सभेत. चौदा जुलैच्या त्या सभेला लातूरच्या इतिहासात तोड नव्हती. एवढी प्रचंड सभा असूनही अधूनमधून होणाऱ्या संघटनेच्या घोषणा सोडता पूर्ण शांतता होती. साहेबांच्या प्रत्येक भाषणातून काही तरी आगळावेगळा विचार ऐकायला मिळतो. काही नवीन कार्यक्रमाची दिशा कळते. कधी एखाद्या कार्यक्रमाची घोषणा केली जाते.

त्याही दिवशी शरद जोशींनी आपल्या भाषणात घोषणा केली, "सरकारच्या भयानक दडपशाहीमुळे पंजाबचा शेतकरी आज भेदरून गेला आहे. त्याच्या या मानसिक अवस्थेत त्याच्या पाठीशी उभा राहून त्याला 'शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यात तू एकटा नाहीस. तुझ्या पाठीशी महाराष्ट्रही आहे,' असे आश्वस्त करणे आवश्यक आहे. म्हणून मी जाहीर करतो, की पंजाबच्या शेतकऱ्यांच्या लढ्यात सामील होण्यासाठी महाराष्ट्रातून आम्ही दहा जणांची एक तुकडी नेणार आहोत. आज पंजाबमधील अवस्था पाहता, तेथील दडपशाही वातावरणाचा विचार करता या लढ्यात या तुकडीचं काय होईल ते काळच ठरवणार आहे. काय होईल ते होवो, आम्हीमात्र जाणार हे निश्चितच !" टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात, शेतकरी संघटनेच्या घोषणांच्या गजरात या घोषणेचं स्वागत करण्यात आलं. "दहाच सत्याग्रही काय म्हणून ? गेल्या मार्चच्या घेराओसाठी आपण महाराष्ट्रातून हजारावर सत्याग्रही चंडीगडला नेले होते. पंजाबमधील मोर्चे प्रचंड असतात. तेव्हा आपण किती लोकांना नेतो या संख्येला महत्त्व नाही. याही आंदोलनात आपल्याबरोबर





यायला हजारो सत्याग्रही तयार आहेत; पण आपला पाठिंबा प्रतीकात्मक व भावनिक आहे. म्हणून आपण फक्त दहाच जणांची एक तुकडी नेणार आहोत." हे दहा जण कोण? एक तर ठरलेलाच होता. स्वत: साहेब म्हणजे श्री. शरद जोशी. बाकी नऊ कोण? या संपूर्ण योजनेबद्दल गुप्तता ठेवायची होती. नसता शासनानं अटकसत्र चालवून मुळावर आघात केला असता. पुढे मला कळलं, तिकिटाचं आरक्षण केलेलं होतं, दुसरीच नावं घेऊन. सत्याग्रहात सामील होणाऱ्या माणसांची नावं जाहीर केली नाहीत ती यासाठी. सभा संपली अन् नावांची उत्सुकता घेऊनच लोक घरोघरी परतले.

दुसऱ्या दिवशी, १५ जुलै १९८४ ला मराठवाडा कार्यकर्ता बैठकीत दुपारी भाऊंनी- भास्करराव बोरावके- मला सांगितलं,

"वकीलसाहेब, तुमचं नाव आलंय आमच्याकडे."

"कशासाठी आलंय माझं नाव?"

"पंजाबला जाणाऱ्या दहांतील एक म्हणून."

मी तर हे ऐकून चकितच झालो. संघटनेतील आघाडीच्या कार्यकर्त्यांपैकी मी एक नव्हतोच. मी होतो संघटनेतील मागच्या बाकावरील एक कार्यकर्ता. तेव्हा हा बहुमान मला मिळेल असं वाटलं नव्हतं. तसा विचारही मनात आला नव्हता. मी क्षणभर गप्प राहिलो. पंजाबला सत्याग्रही म्हणून जायला मी घाबरलो की काय, असं वाटून असेल कदाचित, भाऊंनी विचारलं,

"मग काय करताय वकीलसाहेब ?" पंजाबची समस्या जवळून समजावून घेण्याची संधी, शिवाय शरद जोशींच्या सहवासाचंही आकर्षण. तेव्हा,

"प्रश्नच नाही. येणार म्हणजे येणारच मी." माझ्या नावावर शरद जोशी अन् भास्करभाऊंनी शिक्कामोर्तब केलं. चला दोन नावं तर कळली. निदान मला तरी. एक शरद जोशी अन् दुसरा मी. म्हणजे दोन टोकंच !

आता वेध लागले पंजाबचे. कार्यकर्ता बैठकीत बसायला वेळ नव्हता आता. परभणीला परतून पंजाब दौऱ्याची तयारी करायची होती. कोर्टातल्या कामाची व्यवस्था लावायची होती. घरच्या लोकांना नीट समजावून सांगायचं होतं. भाऊंची परवानगी घेतली अन् मी लगेच परतलो परभणीला.

दुसऱ्या दिवशी परभणीचा युवा कार्यकर्ता नारायण जाधव घरी येऊन मला म्हणाला, "वकीलसाहेब, तुम्ही उद्या- म्हणजे सतरा जुलै- दुपारी मनमाडकडे जायचं.

तिथं रात्री झेलम एक्स्प्रेस पकडायची. तुमचं आरक्षण पुण्याहून केलेलं आहे; मात्र ही सारी बातमी गुप्त ठेवायची. हो, नाही तर व्हायचा घोटाळा !'' नारायण म्हणजे मोठा उमदा कार्यकर्ता. विलक्षण तडफ, बोलका स्वभाव अन् मोहक व्यक्तिमत्त्व. खरं तर फिल्मलाइनमध्ये असायला पाहिजे होतं त्यानं. मार्चच्या घेराओसाठी चंडीगडला जाऊन काही दिवस राहून आलेला. तेव्हा तेवढ्याच वडीलकीच्या थाटात पुढे म्हणाला, ''घाबरायचं काही कारण नाही. पंजाबी माणसं फार चांगली हो, व्यवस्था वगैरे उत्तम राहणार !''

पंजाब म्हटलं, की घरी धडकी भरली असती. म्हणून मी आईला सांगितलं, ''शरद जोशींबरोबर एका मेळाव्यासाठी मी दिल्लीला जात आहे. जाणंयेणं व तिथला मुक्काम मिळून आठ-दहा दिवस तरी लागतील. सत्तावीस-अठ्ठावीस तारखेपर्यंत येईन मी.'' आईनं जोशीसाहेबांच्या सहवासाचं 'घ्री' अपेक्षिलं होतं; पण पंजाबचा बडगा कुठं माहीत होता तिला?

बातमी 'गुप्त' ठेवूनही सतरा तारखेला दुपारी स्टेशनवर मित्रमंडळी, वकीलवर्ग अन् कार्यकर्त्यांनी ही गर्दी केलेली पाहून जीव मात्र सुखावला. सर्वांनी वरचेवर पत्र पाठवून वृत्तांत कळवायची आठवण दिली अन् आमची गाडी हालली.

॥२॥

मनमाडच्या स्टेशनवर आमची गाडी आली, तो रात्रीचे पावणेदहा वाजले होते. झेलम येणार होती, रात्री साडेबारा वाजता. तेव्हा गावात राहणारे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. शेजूळ यांची भेट घ्यावी की काय असा विचार करत होतो मी. माझ्या आरक्षणासंबंधी किंवा इतर काही निरोप असेल तर, ''शेजुळांना विचारा. स्टेशनजवळच राहतात ते,'' असं नारायणनं सांगितलंच होतं. एव्हाना पावसाची रिपरिप सुरू झाली होती. पावसात भिजत जाऊन त्यांना भेटण्यात काही अर्थ नव्हता, म्हणून दोन नंबरच्या फलाटावर गाडीची वाट पाहत मी बसलो एका बाकावर. अख्खा फलाट रिकामा होता. सगळी धावपळ होती, ती समोरच्या तीन नंबरच्या फलाटावर. तिथून मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांचा राबता होता. ती गडबड पाहण्यात वेळ कसा गेला ते कळलंही नाही.

पाऊस आणखी चालूच होता. अकराच्या सुमारास समोरच्या दादऱ्यावरून हातात बॅग घेतलेले दोन तरुण खाली येताना दिसले. त्यांच्या छातीवर शेतकरी संघटनेचे बिल्ले





पाहून बरं वाटलं. गाडी येईपर्यंत तोंड मोकळं करायला मिळेल, ओळख नसली तर काय +झालं! संघटनेचे बिल्ले ही मोठी ओळख. त्या दोघांनाही कदाचित असंच वाटलं असेल माझ्या छातीवरचा बिल्ला पाहून. ते दोघेही मी बसलेल्या बाकाकडे आले. दोघांनीही आपापली ओळख करून दिली . कसबे सुकेनुचा नाना जाधव अन् निफाडचा अर्जुन दामू बोराडे होते ते. त्यांच्या बोलण्यावरून तेही चंडीगडला येताहेत असं कळलं.

''आम्ही नानांना (माधव खंडेराव मोरे) भेटायला गेलो होतो संध्याकाळी. तेव्हा ते म्हणाले, 'नाना तुला जावं लागतं साहेबांबरोबर (शरद जोशी) सत्याग्रहासाठी चंडीगडला. त्यांनी सांगितलं संध्याकाळी अन् लगेच निघालो आम्ही. घरी परतलो, सामान भरलं अन् धावतपळत गाडी गाठली अन् हे आत्ता पोचतो आहोत.'' बोलण्याच्या खास लहजात नाना जाधवनं सांगितलं. भोकऱ्या डोळ्यांचा नाना अन् मिशाळ बोराडे. मस्त जोडी वाटली मला. दोघेही साहेबांचे भक्त. पूर्वीच्या गोष्टी निघाल्या गप्पांच्या ओघात. त्यांनी सांगितलेले नाशिकच्या परिसरातील कांदा, उसाच्या आंदोलनातील रोचक अनुभव ऐकण्यात गुंगून गेलो मी. लोकांच्या हालअपेष्टांची अन् जिद्दीची ती कथा मती कुंठित करणारी होती. इतकी प्रचंड शक्ती असणारा हा देश, एवढी जिद्दीची ही माणसं अन् तरीही हे सारं असं का? शेतकऱ्यांच्या नावावर मताचा जोगवा मागून निवडून यायचं अन् एकदा का निवडून आलं, की त्यांनाच लाथा घालायच्या, हे असं का? याच प्रश्नाची उकल करायला तर जन्मली होती शेतकरी संघटना.

गाडीची घंटा झाली अन् पिंपळगाव बसवंतच्या आंदोलनातून आम्ही जमिनीवर उतरलो. वेळ कसा गेला ते कळलंही नाही. गाडी आता येण्याच्या बेतात होती. आमचं आरक्षण कोणत्या डब्यात होतं, ते आम्हाला माहीत नव्हतं. तेव्हा एका टोकाला नाना, मध्ये बोराडे अन् दुसऱ्या टोकाला मी असे आम्ही उभे राहिलो. गाडी स्टेशनात आली तेव्हा डब्याच्या दारात उभे बद्री देवकर (कोपरगाव) आम्हांला खुणावत होते. त्यांच्यामागून चटकन खाली उतरले शंकरराव वाघ (चाकण) अन् बबन शेलार (कोपरगाव). तिघेही परभणी अधिवेशनापासून परिचित. त्यांनी हाक दिली अन् आम्ही त्यांच्यापाठोपाठ गाडीत चढलो. एव्हाना सात नावं कळली होती. बाकी सकाळी पाहून घेऊ. साहेब झोपलेले होते. त्यांची झोप मोडू नये म्हणून शक्यतो आवाज न करता आम्ही बर्थ आडवे टाकले अन् त्यावर पहुडलो. खूप विचारायचं होतं, बोलायचं होतं; पण साहेबांची झोप मोडली असती. तेव्हा आम्हीही झोपी गेलो. गाडीचा लयबद्ध आवाज

अन् शरीराला बसणारे लयबद्ध धक्के. झोप कशी मस्त आली.

तसे आम्ही सूर्यवंशी! आमची सकाळ फार उशिरा होते. आमच्या 'सकाळी' आम्ही खाली उतरलो, तो ''नमस्कार वकील साहेब'' म्हणत साहेबांनी स्वागत केलं. मोठ्या माणसांना आपणहून कुणाला विश करणं अपमानास्पद वाटतं की काय कुणास ठाऊक. कुणी नमस्कार केला तर मान जरा कलती करून प्रतिसाद दिलाच तर भाग्य समजावं. सामाजिक समतेच्या आजच्या काळातही समतेच्या पायऱ्या असतातच; पण साहेबांचा खाक्या काही निराळा. साहेबांपाठोपाठ दिसले ते वर्ध्याचे विजय जावंधिया. त्यांनीही नमस्कार केला साहेबांपाठोपाठ अन् मी आणखीच अवघडलो. लगेच माझी सुटका केली शंकरराव वाघांनी. ''किती वेळ चढून बसणार ? उतरा खाली आता,'' ते म्हणाले. मी बर्थ अन् सुस्कारा एकदमच सोडला.

जावंधिया वाटतात काहीसे गंभीर; पण बोलायला मिठास. बाह्य व्यक्तित्वाकडे पाहिलं तर त्यांच्या या गुणाची कुणाला ओळखही पटणार नाही. उंचीपुरी देहयष्टी, गव्हाळी रंग, चेहरा राकट करणाऱ्या मिशा, विशिष्ट ठेवण असणारे डोळे, ताठ उभे राहणारे पातळ, कुरळे केस. त्यांच्याकडे पाहिलं, की वाटतं खांद्यावरची बंदूक हातात घेऊन समोरच्यावर रोखून ते आता विचारतील, ''अरे ओ सांबा! कितने आदमी थे!'' पण बोलायला तोंड उघडलं, की लक्षात येतं, त्यांचं बाह्य व्यक्तिमत्त्व फसवं आहे. समोरचा माणूस मोठा की छोटा, हे न पाहता त्याला आपलंसं करण्याचं विलक्षण कसब आहे या माणसाजवळ. सर्वांना अभिवादन करून खऱ्या अर्थानं पोटात मुंडी घालणारा आहे हा माणूस 'उस डोंगा, परी रस नोहे डोंगा !'

विजय बाबूंचा संघटनाप्रवेश हा काही अपघात नव्हता. महाविद्यालयातील पदव्युत्तर शिक्षण संपवून, स्वप्नाळू विचारांनी विजयबाबू शेतीकडे वळले, पुस्तकी ज्ञानामुळे घरची चाळीस एकर कोरडवाहू जमीन, पुष्कळ वाटली त्यांना. ते *'जिस देशकी धरती सोना उगले, उगले हीरे मोती'* वगैरे स्वप्नं पाहिली होती म्हणून. त्यांनीपण जमिनीवर राबायला सुरवात केली, शेतीचे चटके अनुभवले अन् एकेक स्वप्न ढासळत गेले. खाली उरलं कटू सत्य! व्यवहारवादी असलेल्या समाजात जन्मूनही शेतीवरच गुजराण करायची कल्पना त्यांना सुचलीच कशी? खरं म्हणजे छोटामोठा व्यापारधंदा करत 'घणो चोखो' संसार करायचं सोडून, त्यांना देशाच्या संसाराकडे कसं वळावंसं वाटलं कुणास ठाऊक! सुरुवातीच्या काळात मूळचा धडपडा स्वभाव गप्प बसू देत नव्हता, तेव्हा छोटे मोठे





मोर्चे काढ, जनता पार्टीत प्रवेश घे, अन्यायाविरुद्ध कसली पत्रकं काढ अशी मार्ग चाचपडणारी धडपड चालली होती त्यांची. या प्रवाहातच बुडून जातो की काय असं वाटत असतानाच दूर एक दीपस्तंभ दिसला अन् विजयबाबूंचं हे गलबत संघटनेच्या किनारी लागलं.

तसे विजयबाबू अभ्यासू. विचारांची बैठकही पक्की. गडी चर्चेला केव्हाही तयार. पटकन बधणार नाही. शेतकरी संघटनेच्या आंतरराज्य समन्वय समितीचे ते निमंत्रक. एक चांगले वक्ते. त्यांचाही परिचय परभणीला झालेला होता. आतापावेतो आठ जणांची नावं कळाली होती. नववा होता लातूर जिल्ह्यातील देवर्जनचा तरुण शेतकरी बाबूराव हाडोळे. दहावा मात्र पक्का सूर्यवंशी निघाला. तो होता लातूर जिल्ह्यातील तरणाबांड पोरगा राजकुमार मजगे.

शरद जोशींच्या भोवती संघटनेच्या कामानिमित्त जमा झालेले कार्यकर्ते पाहिले, की शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांची याद यावी! शंकरराव वाघ म्हणजे रंगानं काळ्या मातीशी इमान राखणारा, अंगानं फाटका; पण तोंडानं अफाट बोलणारा माणूस. साहेबांसकट सर्वांशी 'मुक्त' बोलणारा, त्यांचा जुना सहकारी. साहेबांनी शेतकरी आंदोलनात पाऊल टाकलं ते शंकरराव वाघ आणि बाबूलाल परदेशी या अफाट जोडगोळीला हाताशी धरूनच. अगदी सुरवातीच्या काळात प्रचाराला हे त्रिकूट बाहेर पडायचं ते सायकल, मोटारसायकल, जीप, मिळेल ते वाहन घेऊन. कुठल्या तरी गावी जायचं. बाबूलाल परदेशी यांनी भाषणाला सुरवात करायची अन् गर्दी जमली, की साहेबांनी लोकांना विचार सांगायचे. साहेबांचा दुसरा सहकारी म्हणजे बबन शेलार. अत्यंत बेरकी. बोलता बोलता कुणाला कसा बनवील काही सांगता येत नाही. बोलताना तीळ भिजणार नाही तोंडात. थट्टा करताना साहेबांनाही सोडणार नाही, आम्ही तर फार दूर. बेताची उंची, शेलाटा बांधा अन् वाघाचं काळीज. साहेबांचा सारथी, खासगी सचिव अन् सबकुछ. तिसरा सहकारी म्हणजे बद्री देवकर. वयानं तरुण, चेहऱ्यानं बालीश, अन् स्वभावानं काहीसा गंभीर. खात्यापित्या घरचा; पण अल्प वयात घरची जिम्मेदारी अंगावर पडलेली. इंग्रजी शाळेतील शिक्षण अन् जीन वगैरे संस्कृतीत रापलेला. तिघांचीही साहेबांवर अपार श्रद्धा. साहेबांना काही दुखलं तर यांचा जीव वरखाली व्हायचा. त्यांच्या पायात काटा बोचला तर पाणी यांच्या डोळ्यात. साहेबांची थट्टा करताना किंवा त्यांच्याशी स्पष्ट बोलतानासुद्धा डोळ्यातील भाव काही वेगळेच सांगून जायचे. त्रयस्थ म्हणून हे

सारं नोंदण्याचा एक छंद लागला होता मला. काय असेल साहेबांकडे, या लोकांनी जीव लावावा असं? साहेबांबरोबर राहून कुठलंही पद मिळणार नाही. सत्ता तर नाहीच नाही, पैसा मिळण्याचा प्रश्नच नाही. मिळणार फक्त हालअपेष्टा. तरीही कार्यकर्त्यांचं हे मोहोळ जमतं त्यांच्याभोवती. या लोकांशी बोलताना हळूहळू साहेबांचंही चित्र उभं राहू लागलं माझ्यासमोर, त्याबरोबरच स्पष्ट होऊ लागलं, संघटनेचंही चित्र. नाही तरी दोन्ही चित्रं एकमेकांत मिसळून गेलेली आहेत. दोघांचंही अस्तित्व हे एवढं एकरूप झालेलं !

गाडीत या साऱ्यांबरोबर बोलता बोलता गप्पांत वेळ कसा गेला हे कळलं नाही. दिल्लीला गाडी पोचल्यावर म्हणजे अठराच्या पहाटे एकच्या सुमारास निघालेलो आम्ही रात्री अकरा-साडेअकराच्या सुमारास दिल्लीला उतरलो. तब्बल एकविस तास संपले होते आमचे प्रवासात !

॥ ३ ॥

आपल्या रेल्वे खात्याचा कारभारही मोठा अजब आहे. आमच्या गाडीनं जेव्हा पुणं सोडलं तेव्हा गाडी थेट अंबाला कँटवरून पुढे जाणार होती; पण गाडी दिल्ली स्टेशनवर आली अन् आम्हांला झोपेतून उठवलं एका हमालानं अन् सांगितलं,

"बाबूजी ये गाडी आगे नही जाएगी."

"क्यूं भाई ? हमारा टिकट तो अंबाला तक का है."

"वो हम नही जाने बाबूजी. आप टिकट-बाबूसेही पूछ ले तो ठीक होगा." आम्हांला दिल्ली स्टेशनवरच उतरावं लागलं; मग दिल्ली ते अंबाला कँट या प्रवासाची सोय नको का करायला? किमान पैसे परत करायला काय हरकत आहे? 'वो तो आप पूना वालोंसे पूछिए, या फिर अंबाला वालोंसे, हम आपके लिए कुछ नही कर सकते...' बद्रीनं येऊन रिपोर्ट दिला. सार्वजनिक खात्यातील काम हे बद्रीचं वैशिष्ट्य. त्यामुळे या कामात तोच आमचा पुढारी. पंजाबमध्ये चाललेल्या प्रकारामुळे गाड्या फक्त दिल्लीपर्यंतच जात होत्या; पण हे सारं पुण्यातही सांगता आलं असतं की! पण मग ती भारतीय रेल कसली? आता सकाळपर्यंत पुढे जायला गाडी नाही. पंजाबचा पहिला हिसका बसला तो हा असा दिल्लीतच. बद्रीनं साहेबांना रिटायरिंग रूममधे चलायला सांगितलं; पण आपल्या मावळ्यांना सोडायला साहेब तयार नव्हते. बद्रीचा सारा आग्रह मोडून ते म्हणाले, "पडू इथेच" अन् नंबर दोनच्या लंबेलाट फलाटावर त्यांनी पथारी लावली. त्यांच्या हिशेबी





रिटायरिंग रूम अन् फलाट सारखाच. साहेबांचाच कित्ता गिरवला इतर साऱ्यांनी अन् एकापाठोपाठ एक सारे मावळे 'धाराशयी' झाले. साऱ्यांनी पथारी लावली; पण आमच्यातली 'वकिली इभ्रत' आम्हाला झोपू देईना फलाटावर. आमची चुळबूळ सारखी चाललेली पाहून लगेच शंकरराव वाघांनी फटकारले, "झोपा आता वकीलसाहेब फलाटावर. कुणी ओळखत नाही तुम्हाला इथे." हे फटकारणं कुणी ऐकलं की काय हे चोरून एकदा पाहिलं मी इकडंतिकडं अन् सकाळी घेतलेला एक्स्प्रेस आम्ही फलाटावर पसरला. हल्ली एक्स्प्रेसला पानंही खूप यायला लागलीत. हेही आमच्या पथ्यावर पडलं. मराठी पेपरपेक्षा इंग्रजी पेपरला रद्दीवाले भाव जास्त देतात ते उगाच नाही !

सर्वांना झोपवून स्वत: मात्र जागत बसले शंकरराव. कितीही जागरण झालं तरी काही परिणाम होत असेल या पठ्ठ्यावर असं वाटत नाही. नाही तरी जागरणाचा परिणाम व्हायला शरीरात फारसा वाव नाहीच म्हणा. हाडं अन् कातडं यांच्यात मांसाचा थर आहेच कुठे? मला तर वाटतं व्यवस्थित झोप मिळाली तर तब्येत बिघडत असेल त्यांची. हातात विडीचा कट्टा अन् काड्यांचं डबडं असलं की पुरे. याउलट बबनचा खाक्या. पठ्ठ्याला झोप यायला पाठ टेकवायचीच काय ती वाट!

आमच्या वकिली इभ्रतीचे केव्हाच तीनतेरा वाजले होते. तेव्हा एक्स्प्रेस अंथरला फलाटावर अन् खुश्शाल झोपलो त्याच्यावर. सकाळी गाडीच्या वेळेवर उठलो तो लक्षात आलं फलाटावरही चांगली झोप येऊ शकते. फलाटाशेजारून जाणाऱ्या गाड्यांची धडधड, प्रवाशांचा कलकलाट, काही काही जाणवलं नाही. उठल्या उठल्या शंकररावांनी आणला बेड टी - की 'प्लॅटफॉर्म टी' ?

प्रवासात माणसांत जास्त जवळीक निर्माण होते. शंकररावांचा आणि माझा तसा फारसा परिचय नव्हता; पण एका रात्रीतून खूपच जवळीक निर्माण झाली होती. दिल्लीपर्यंतच्या प्रवासात साहेबांनी वाघांचा टायगर बनवून टाकला होता. आम्ही शंकररावांचा सॅक्स बनवला. पुढे जेलमध्ये तर टायगर सॅक्स हेच नाव लोकप्रिय झालं होतं. रात्री झोपण्याआधीच सकाळच्या गाड्यांची चौकशी केलेली होती. तेव्हा सकाळी सहा वाजता 'हिमालयन एक्स्प्रेस' व 'शाने पंजाब' या जोडगाडीनं आम्ही निघालो. त्या गाडीची आरक्षणं बद्रीनं कशी मिळवली कुणास ठाऊक किंवा ठाउक आहेच म्हणा, "काही नाही, सीटमागे पांच रुपये अधिक दिले एवढंच." बद्रीनं हळूच मला सांगितलं.

दिल्ली सोडून गाडी बाहेर पडली. गाडीनं पंजाबात प्रवेश केला अन् नजर खिळून

राहिली खिडकीबाहेरच्या दृश्यावर. पंजाबला 'पंजाब'च का म्हणतात, तिथली माणसं एवढी धसकट का? एवढी भावनाप्रधान 'रॉ' का, साऱ्या साऱ्यांचं उत्तर समोर दिसत होतं. खिडकीतून बाहेर रुळांच्या दोन्ही बाजूंस नजर जाईल तिथपर्यंत दिसत होती हिरवी हिरवी गार डुलणारी शेतं. सर्व जमीन सपाटीवर, काठाबांधावर उंच उंच निलगिरीची झाडं, धो धो पाणी फेकणाऱ्या खेंच विहिरी- ट्यूब वेल्स... काळ्या आईचं ते हिरवं हिरवं लेणं पाहून नजर सुखावून जात होती, मन वेडावून जात होतं. भान हरखून टाकणारी ती हिरवाई खऱ्या अर्थानं पंजाबी किसानांना वेड लावत होती. अनंत हातांनी सहस्र ओंजळींनी भरभरून पीकं देणारी ही आई असताना पंजाबी शेतकरी असा निर्धन, कर्जबाजारी अन् अस्वस्थ का? वेड लावणारा प्रश्न होता. उत्तर कोण देणार होतं? पंजाबी तर विलक्षण दडपणाखाली होते. पंजाबबाहेर कुणी तोंड उघडायला तयार नव्हते. शिखांची बाजू समजावून घ्यायची कुणी ? सरकारी यंत्रणेनं उभं केलेलं चित्र भयाण, एकांगी होतं. काय उत्तर मिळणार होतं मला या प्रवासात ?

॥ ४ ॥

गाडीत कुणी तरी आम्हांला सांगितलं चंडीगडला गाडीतून उतरलं, की धूम पळायचं अन् बस पकडायची. स्टेशनपासून गाव बरंच दूर म्हणजे काही किलोमीटर्स इतकं दूर आहे. एकदा का बस चुकली तर परत एक तास गावात जायला वाहन नाही. त्यामुळे आम्ही गाडीतून उतरलो, की धूम ठोकली. सर्वांत पुढे होते टायगर सॅक्स. पळापळीत पुणेकरांनी आम्हाला हरवलं. नाही तरी बाजीराव पेशव्यांच्या काळापासून पुणेकर पळापळीत आघाडीवरच आहेत म्हणा! शंकररावांनी पळत पुढे जाऊन सिटा पकडल्या होत्या. त्यावर आम्हांला बसवून स्वत: उभेच राहिले. आम्ही उगाच हालचाल केल्यासारखं दाखवून टायगरला बसण्याचा आग्रह केला. "राहू द्या ! राहू द्या ! कशाला नाटकं करता." तोंडातील विडी शिलगावता शिलगावता टायगरनी आमच्या नाटकावरचा पडदा ओढला.

चंडीगडच्या रस्त्यावर अजिबात गर्दी नव्हती. सर्व रस्ते कसे अगदी सुने सुने वाटत होते, बेवफा प्रेयसीच्या दिलासारखे ! 'ये तो आतंकवादियोंका करिश्मा है. नही तो क्या चहलपहल हुवा करती थी इस शहर में!" बसमधील एक जण म्हणाला. निमलष्करी दलातील रजेवरून परतणारा एक जवान होता तो. चंडीगडची शांतता नष्ट झाल्याबद्दल





त्याला मनस्वी दु:ख झालं होतं. त्याच्या बोलण्यातून ते दु:ख जाणवत होतं. बोलण्याच्या ढंगावरून तो हरियानवी वाटला. शहरात शिरताना तपासणी नाक्यांवर निमलष्करी दलाच्या एका दस्त्यानं, बसची तपासणी केली. नंतरच रस्त्यावरील आडवा दांडू दूर केला. गेल्या काही महिन्यांपासून शहराबाहेरील सर्व तपासणी नाक्यावर कडक तपासणी केली गेल्यावरच वाहनांना प्रवेश मिळतो. तो सोपस्कार उरकला गेला अन् आमची बस पुढे सरकली.

बबनच्या शब्दांत चंडीगड म्हणजे काड्याच्या पेट्या रचलेलं, पेटाऱ्याच्या आकाराचं शहर. रस्ते प्रचंड रुंद, चोहीकडे हिरवळ, अगदी फूटपाथवरसुद्धा ! रस्त्यांच्या कडांनी डौलदार झाडं अन् रचनाबद्ध घरे! घरांभोवती कुंपणं भिंतींची अन् त्यात झाडं लावलेली, नाही तर हिरवळीचा गालिचा तरी. सगळं कसं अगदी पावसाळ्यातल्या चित्रासारखं, 'श्रावणमासी हर्ष मानसी ...' वगैरे वगैरे. आम्हा परभणीतल्या माणसांना धुळीची सवय झालेली. तेव्हा या शहरातल्या स्वच्छ मोकळ्या हवेत गुदमरल्यासारखं व्हायला लागलं. पानाच्या ठेल्यांना सरावलेल्या आमच्या नजरेला मैल मैल अंतर कापलं तरी पानाचा ठेला दिसेना की पानतंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या भिंती, कोपरे दिसेनात. झालंय तरी काय इथल्या लोकांना? इतकी शांतता, इतकी स्वच्छता. अरे, हे हिंदुस्थान आहे की सिंगापूर? चंडीगडच्या बस स्टँडवर उतरल्यावर तिथली प्रचंड गडबड, गोंधळ, घाण पाहिली अन् माझ्या जिवात जीव आला ! कसं एकदम बरं वाटलं. आहे हो, आपल्या हिंदुस्थानची झलक इथेही आहे हो! कसं माणसांत आल्यासारखं वाटलं मला!

आमच्या उतरण्याची व्यवस्था चंडीगडच्या 'पंचायत भवन' मध्ये केलेली होती. 'पंचायत भवन' म्हणजे भली दोनतीन मजली प्रचंड इमारत. मोठमोठे हॉल्स अन् भरपूर खोल्या. सगळीकडे खूप खाटा टाकलेल्या. प्रतापसिंग कैरो मुख्यमंत्री असताना त्यांनी ही इमारत बांधली. चंडीगडला कामासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांच्या राहण्यासाठी सर्व सोयींनी युक्त अशी ही इमारत खरंच शेतकऱ्यांसाठी फार मोठा आसरा आहे. एका एका हॉलमध्ये वीस वीस, पंचेवीस खाटा सहज मावू शकतील एवढे मोठे हॉल्स. शेतकऱ्यांची इमारत म्हटलं, की आपल्याला आठवतो तो मोंढा नाही तर धर्मशाळा- कोंदट वास मारणारी, 'अमक्या तमक्या सेठ यांनी आपल्या मातोश्री श्रीमती तमक्या तमक्या यांच्या स्मृतीत, शेतकऱ्यांसाठी बांधली.' एकदा धर्मशाळा बांधून अमके तमके सेठ हे पापमुक्त झाले! मात्र ती धर्मशाळा नरक झाली तरी तिला पाहायला कुणी पुढे येत नाही. नाही तरी शेतकऱ्याला काय पाठ टेकण्यापुरती जागा अन् तेवढाच डोईवर निवारा असला की पुरे.

मोंढ्यात सोडलेल्या गाडीच्या सावलीत घरून आणलेली भाकर खायची अन् तिथेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हौदातलं पाणी पिलं की बस! बाकी सोय पाहिजे कशाला? पण चंडीगडचे 'पंचायत भवन' म्हणजे मोंढा छाप किंवा 'राम भरोसे उतरण्याची उत्तम सोय' नसून शासकीय डाक बंगल्यासारखी व्यवस्था असलेली मस्त आकाराची इमारत आहे. आवारात सगळीकडे हिरवळ अन् झाडं लावलेली. जेवणासाठी मोठा हॉल. चोवीस तास पाणी अन् सेवेत कर्मचारी. जागेचं भाडंही अत्यल्प. सामान्य शेतकऱ्यांनाही परवडेल असं. आमच्या महाराष्ट्रातील शेतकरी बिचकेल इतक्या छान जागेत उतरायचं म्हटलं तर! नाही तरी चांगलं राहण्याचं त्याला कुणी शिकवलंच नाही. चांगले राहणे, चांगली व्यवस्था म्हणजे काय असते हे त्याला कळू द्या, म्हणजे त्याला कळेल तरी त्याचं मोंढ्यातलं उतरणं काय आहे ते. माझा एक मित्र आहे हॉटेल चालवणारा. त्याचं हॉटेल खूप घाण, फर्निचर कळकट. हॉटेलात काम करणाऱ्या पोरांचा अस्वच्छपणा तर विचारू नका. त्याला मी कळकटपणाबद्दल बोललो असता तो म्हणाला, ''अरे बाबा, मी हॉटेल पॉश केलं तर खेड्यातील गिऱ्हाइकं येणार नाहीत माझ्याकडे. चांगलंचुंगलं असलं, की ते आपल्यासाठी नाही हा पक्का विश्वास त्यांच्याजवळ.''

पुढे पंचाऐंशीच्या डिसेंबरात शेतकरी संघटनेनं मुंबईला बाबू गेनू स्मृतिदिन साजरा केला. त्याच्या प्रचारासाठी शरद जोशींनी महाराष्ट्राचा दौरा केला. त्या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांना सांगितलं, ''तुमच्या घामाची पाइपलाइन पूर्वी इंग्लंडात जायची. आता काळ्या इंग्रजानं ती पाइपलाइन मुंबई, कलकत्ता अशा मोठ्या शहरांकडे वळवली आहे. पाइपलाइनचं एक तोंड फक्त बदललं. तुमचं शोषण चालूच आहे. एकदा मुंबईला या अन् बघा तुमच्या शोषणावर उभ्या राहिलेल्या शहरातील प्रचंड इमारती अन् कारखाने. तुम्हाला सालचंदी मिळत नाही, एवढं एकदोन दिवसाचं भाडं भरावं लागतं, इथल्या पंचतारांकित हॉटेलात! तुमच्या मतावर निवडून आलेल्यांचा थाट पाहा. त्यांची संस्कृती पाहा अन् विचार करा, जीवनमान काय असू शकतं.''

अशाच सोयींनी युक्त अशी एखादी इमारत मुंबईत का असू नये शेतकऱ्यांसाठी? नानाविध कामांसाठी त्यांना यावं लागतं मुंबईत. हॉटेलचा आतापता माहीत नाही. लॉजवर जागा नाही. मुंबईत होणाऱ्या हालांना सीमा नाही. रेल्वे प्रवासाचे धक्के खात यावं अन् अफाट मुंबईत बावरून जावं. भल्या भल्यांना घाम फुटतो मुंबई म्हटलं की, तिथे ग्रामीण भागातून येणाऱ्या बिचाऱ्या शेतकऱ्यांचं काय? अधिकाऱ्यांसाठी त्यांच्या वेगवेगळ्या





सोयी आहेत. साखरसम्राट, सहकारदादांना तर काय नाही? नाही फक्त शेतकऱ्यांना. कुठेही पडा, कुठेही खा, कोण सोय विचारणार आहे त्यांची? शेतकरीपुत्र म्हणवणाऱ्या आजच्या राजकर्त्यांनी मुंबईत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'पंचायत भवन'सारखी एखादी इमारत अवश्य बांधली पाहिजे. शेतकऱ्यांच्या सोयीचं काही होवो; पण आमदारनिवासावर पडणारा प्रचंड बोजा तर कमी होईल.

'पंचायत भवन'मध्ये आमचं स्वागत केलं पंजाबच्या भारतीय किसान युनियनच्या अजायबसिंग खारा यांनी. अजायबसिंग खारा म्हणजे आडव्या अंगाचा मर्द माणूस. त्यांच्या एकट्याच्या रुंदीत आमचे तीन टायगर सॅक्स बसले असते. आम्ही विधी आटोपून बैठकीला बसलो. बैठकीला भारतीय किसान युनियनचे पदाधिकारी अजमेरसिंग लाखोवाल, बलबीरसिंग रझेवाल, भामिया अन् आंतरराज्य समन्वय समितीचे श्री. भूपेंद्रसिंग मान हे सारे जमले होते, पंचायत भवनात. लगोलग हरियानाच्या भारतीय किसान युनियनचे अध्यक्ष श्री. मांगेरामजी मलिक व त्यांचे सहकारी आले. मांगेरामजी म्हणजे ग्रामीण भारताचे खरेखुरे प्रतिनिधी. अंगावर धुवट सदरा, धोतर, डोक्यावर तांबडा फेटा, उन्हात तापलेल्या तांब्यासारखा राट रंग- काहीसे भेदक बारीक, घारवट डोळे, हातात एक सोटा. ग्रामीण महाराष्ट्रातील कुठल्याही करारी शेतकऱ्यासारखं वाटणारं हे त्यांचं रूप - रंग वजा जाता त्यांचं बैठकीतील साधं बोलणं म्हणजेही भाषणच. गरजत्या आवाजात दिलेलं. जसं काही हजारो माणसांचा जमाव उभा आहे समोर. गुजराथच्या प्रतिनिधींना यायला आणखी वेळ होता. ते येईपर्यंत आम्हा सर्वांच्या गप्पा सुरू झाल्या. गप्पांचा विषय साहजिकच पंजाबमधील परिस्थिती हा होता अन् तो ओघ नंतर वळला स्वर्णमंदिराकडे. स्वर्णमंदिरात सैन्य घुसवल्याबद्दल शिख लोकांच्या मनात विलक्षण चीड दिसली. याची काहीशी कल्पना शरद जोशींना होती. म्हणून त्यांनी आम्हा सर्वांना सांगून ठेवलं होतं, की या प्रश्नावर त्यांच्याशी चर्चा करू नका म्हणून. स्वर्णमंदिरात सैन्य घुसवल्याबद्दल शिख आणि हिंदू या दोघांच्याही भूमिका दोन टोकाच्या.

शिख लोकांनी अती पवित्र मानलेल्या मोजक्या ठिकाणांपैकी सर्वांत पवित्र ठिकाण म्हणजे अमृतसर येथील सुवर्णमंदिर. हिंदूंना पूजाअर्चा करण्यासाठी लक्षावधी देवळं आहेत; पण शिख लोकांना त्यांचं काशिविश्वेश्वर, त्यांचं बद्रिकेदार, त्यांचं सबकुछ केवळ स्वर्णमंदिर. या मंदिरात अनवाणी पायांनी अन् डोक्यावर आच्छादन घेऊन नम्रतेनं जायचं. काडीविडी काय असेल जवळ ते सारं बाहेर ठेवायचं. स्वर्णमंदिराशी त्यांच्या भावना या

एवढ्या निगडित झालेल्या. ज्या मंदिरात वहाणांना प्रवेश नाही. ज्या देवळाच्या सरोवरातील पाण्यालाही अमृत मानलं जातं, त्या मंदिरात सैनिकांनी खाड्खाड् बूट वाजवत जावं, त्या सरोवराचं पावित्र्य नष्ट करावं. ज्या अकाल तख्तला शिख लोक अतिशय नम्रतापूर्वक वंदन करतात, त्या अकाल तख्तावर प्रच्छन्न गोळीबार करावा. जिथं गुरूबाणीचे प्रसन्न सूर ऐकू यावेत तिथे किंकाळ्या अन् तोफांचा गडगडाट निनादावा, यापरते दुर्दैव कोणते? त्यामुळे या प्रश्नावर शिखांच्या भावना विलक्षण भडक झालेल्या.

हिंदूंची नेमकी उलटी दृष्टी, स्वर्णमंदिराचा अतिरेक्यांनी गैरवापर केला, किती तरी कट रचले गेले, तिथे हिंदूंच्या कत्तलीचे. भिंद्रनवाले आणि त्यांच्या अतिरेकी सहाय्यकांचा आणि पाकी हेरांचा स्वर्णमंदिर हा अड्डा बनला होता. एवढंच नव्हे तर स्वर्णमंदिर म्हणजे हत्यारांचं एक प्रचंड साठाघर झालेलं. पंजाबात दहशतवाद फैलावणाऱ्या, बँका लुटणाऱ्या, हिंदूंचे खून पाडणाऱ्या अतिरेक्यांचं ते आश्रयस्थान बनलं होतं, तेव्हा पावित्र्याचा प्रश्न येतोच कुठे, अशी हिंदूंची भावना झालेली. त्यामुळे सैन्य घुसवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी विचारधारा होती त्यांची.

शिख लोकांच्या भावनेला, त्यांच्या अभिमानाला फार खोलवर जखम झालेली आहे. याचा कल्पनेनेच अंदाज आलेला होता जोशी साहेबांना. म्हणून तर त्यांनी लातूरला घोषणा केलेली होती ऑपरेशन ॲपलची ! इथे येऊन हे सगळं ऐकल्यावर लक्षात आलं, शरद जोशींनी घेतलेल्या मोहिमेचं मोठेपण, तिची ऐतिहासिकता. पंजाबी शेतकऱ्याला राजकीय परिस्थितीपासून दूर; पण शांततेच्या मार्गावर ठेवणं केवढं महान कार्य आहे याची दखल इतिहासाला घ्यावीच लागेल. निदान शिख व हिंदूंना एकाच दावणीला बांधून सामंजस्याचं वातावरण निर्माण करता आलं, हेही नसे थोडके. जोशीसाहेबांच्या जवळ राहून त्यांना ऐकण्याची, समजून घेण्याची केवढी संधी मिळाली होती मला!

थोड्या वेळानं सुरू झाली शेतकरी संघटनांच्या आंतरराज्य समन्वय समितीची बैठक. बलबीरसिंग रझेवालांनी अगोदर अहवाल दिला, पंजाबमधील घटनांचा. मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात भारतीय किसान युनियन अन् शेतकरी संघटना यांनी दिलेल्या आठवड्याभराच्या प्रचंड घेराओनंतरच्या प्रगतीचा आलेख त्यांनी सादर केला. मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात आपल्या काही मागण्यांसाठी पंजाब-हरियानाच्या भारतीय किसान युनियनने चंडीगडच्या राजभवनाला प्रचंड घेराओ दिला होता. हजारोंच्या संख्येनं या घेराओमध्ये शेतकरी सहभागी झाले होते. या घेराओसाठी महाराष्ट्रातूनही बाराशेवर शेतकरी





गेलेले होते. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली जवळजवळ आठवडाभर चालला हा घेराओ. चंडीगडच्या राजभवनाकडे जाणारे सर्व रस्ते रोखून धरण्यात आलेले होते अन् राजभवनाची नाकेबंदी केलेली होती. इतका काळ चाललेल्या या घेराओमध्ये एकही अनुचित प्रकार घडला नाही. हजारोंच्या संख्येनं शिखभाई जमून इतक्या शांततेनं आपल्या मागण्यांसाठी आठ दिवस एकत्र बसतात. याचा योग्य तो अर्थ आपण समजून घ्यायला पाहिजे. माणूस हिंसेकडे वळतो, ते इतर सर्व मार्ग बंद झाल्यावर. या आठ दिवसांत हिंदू-शिख एकमेकांच्या गळ्यात गळे घालून राहिले. कुठलाही भेदभाव न मानता.

चंडीगडचा घेराओ म्हणजे एक प्रचंड प्रकरणच. शेवटी सरकारला नमावं लागलं या शक्तीपुढे. परिणामी पंजाब सरकार अन् शेतकरी संघटना यांच्यात एक करार झाला. त्यानंतरच हा आठवडाभराचा घेराओ समाप्त करण्यात आला होता. या कराराने गव्हाच्या रास्त भावाची चौकशी व्हावी, वीजदराच्या आकारणीची पद्धती निश्चित पायावर करण्यात यावी असं उभयपक्षी मान्य करण्यात आलं. या चौकशीसाठी पंजाबच्या कृषी विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. जोल यांच्या नेतृत्वाखाली एक समिती कायम करण्यात आली. बलबीरसिंगांनी हा सारा इतिहास सांगितला अन् हेही सांगितलं, की जोल समितीनं आपला अहवाल शासनाला सादर केला आहे असं अनधिकृतरीत्या कळलं आहे. त्यांनी असंही सांगितलं, की जोल समितीनं गव्हाच्या उत्पादनाचा खर्च लक्षात घेता प्रति क्विंटल १९० रुपये या भावाची शिफारस केली म्हणून; पण शासनानं या अहवालासंबंधी किसान युनियनला आणखी काही कळवलेलं नाही ही व्यथाही त्यांनी मांडली. लष्कराच्या मदतीने, दडपशाही कायद्यांचा बडगा दाखवून सक्तीनं कर्जवसुलीस सुरवात केली होती. एवढंच नव्हे तर सरकारनं नवीन कर्जे देऊ केली अन् त्या वाढीव रकमांतून पूर्वीच्या कर्जाची वसुलीही करावयास सुरवात केली. विजेच्या बिलाची वसुलीही सक्तीनं सुरू झाल्याचं स्पष्ट दिसत होतं. पंजबामधील अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारने आपल्या कराराला चक्क कोलून दिल्याचं स्पष्टच दिसत होतं.

लोक भेदरलेले असल्यामुळे विरोधी आवाज अगदीच घुसमटून गेलेला होता. त्यामुळं तर सरकारला अधिकच फावलं होतं. इकडे भारतीय किसान युनियनही फार पेचात आलेली होती. काही कृती करावी तर प्रचंड धरपकड, लाठीहल्ला, गोळीबाराची भीती. एकूणच परिस्थिती भयावह होती. सरकारच्या या धोरणामुळे शेतकऱ्यांत प्रचंड वैफल्य आलेलं होतं. याची परिणती कशातही होऊ शकत होती. वैफल्यग्रस्त माणूस

काय करेल याचा अंदाज बांधता येत नाही. तेव्हा पुढची पावलं काय उचलावीत हा प्रश्नच पडलेला होता. सध्या तरी २५ जुलैपासून रोज पंजाबातील एका जिल्ह्याच्या ठिकाणी किमान शंभर लोकांनी सत्याग्रह करावा असं ठरलं होतं. यासाठी पंजाबातील सर्व जिल्ह्यांपैकी रोज दोन जिल्ह्यांतील लोकांनी एके ठिकाणी येऊन सत्याग्रह करावा अशी आखणी केलेली होती. सर्व जिल्ह्यांना वारसुद्धा वाटून दिलेले होते. रविवार हा सुटीचा दिवस धरला होता. पहिला सत्याग्रह आंतरराज्य समन्वय समितीच्या वतीने २० जुलै रोजी लुधियाना येथे व्हावा असं ठरलं होतं. पंजाबची परिस्थिती पाहता पंजाबातील जिल्ह्यात न्याय्य वागणूक मिळेल याची शंकाच होती. एकही अनुचित प्रकार घडला तर कशाचाही बाऊ करून शासन गोळीबाराचा अवलंब करण्यास मागेपुढे पाहणार नाही अशी परिस्थिती असल्यामुळे जोशीसाहेबांनी सुचवलं, की लुधियानाऐवजी चंडीगड येथेच सत्याग्रह घ्यावा. चंडीगड केंद्रशासित प्रदेश, शिवाय मोठमोठ्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधीही तिथे असल्यामुळे सत्य प्रकारही सहज बाहेर येऊ शकतात अन् दडपशाहीला फारसा वाव राहत नाही. ही सूचना सर्वांना पसंत पडली. तेव्हा इतर सत्याग्रहही चंडीगडलाच व्हावेत असं जोशीसाहेबांनी सुचवलं. त्यावर काही कार्यकर्ते म्हणाले, की चंडीगडला येणं ही खर्चाची बाब आहे. तेव्हा शरद जोशींनी समजावून सांगितलं, की हाही प्रश्न फक्त दोन जिल्ह्यांचाच आहे. बाकींना तर लुधियाना आणि चंडीगड जवळजवळ तेवढंच पडतं. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे दडपशाही अन् दहशतवादी वातावरणापासून दूर राहणं केव्हाही इष्टच. हेही म्हणणं शेवटी सर्वांना पटलं अन् सर्व सत्याग्रह चंडीगडलाच व्हावे या साहेबांच्या सूचनेवर शिक्कामोर्तब झालं.

आता गुजराथचे प्रतिनिधी आलेले होते. गुजराथच्या खेडूत समाजाचे अध्यक्ष श्री. भूलाभाई पटेल अन् त्यांचे सहकारी सर्वश्री बालमुकुंद ऊर्फ बालूभाई पटेल, बिपिनभाई देसाई अन् गुणवंतभाई देसाई. चौघेही काहीसे वयस्क अन् अबोल, निदान पहिल्या दिवशी तरी वाटले. पुढे तुरुंगात बालूभाई म्हणजे बालमुकुंद पटेल यांची अन् माझी रास चांगलीच जुळली. गडी बराच बोलका निघाला. त्यांच्या मनात भूलाभाईंबद्दल विलक्षण आदर. भूलाभाईंनी म्हणावं अन् बालूभाईंनी विहिरीत उडी टाकावी. भुलाभाई हे स्वत: चांगल्यापैकी शेती करणारे, निरनिराळ्या झाडांची कलमे करणारे तज्ज्ञ. खरं आश्चर्य वाटलं ते बिपिनभाई अन् गुणवंतभाई या जोडीचं. दोघेही नात्याचे ना गोत्याचे; पण दोघांनीही गांधीजींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शेतीवर सहजीवनाचा प्रयोग केलेला.





म्हणजे मुलांबाळांसह एकत्र राहून असा हा प्रयोग गेल्या कित्येक वर्षांपासून केलेला आहे. एकत्र म्हणजे अक्षरश: एकत्र राहून, एकत्र जेवणखाण करून. शेतीचं येणारं उत्पन्नही एकत्रच ठेवायचं अन् गरजेप्रमाणे घ्यायचं; पण वाटणी नाही कशाची करायची. खरं वाटणार नाही इतकं खरं आहे हे सारं. दोघांचेही कपडे अगदी जुळ्या भावासारखे. खादीची अर्धी चड्डी,क्वचित विजार अन् खादीचीच बंडी. उंच सडसडीत बांध्याचे, रंगाने उजळ असलेले बिपिनभाई म्हणजे गांधीवादी विचारवंत. काही काळ ते गुजराथमधील एका विद्यापीठाचे उपकुलगुरू राहिलेले. दोघेही शुद्ध खादीधारी, आतून अन् बाहेरूनही; कृतीनं अन् विचारांनही. विचारातील हिंसाही नाही चालायची त्यांना. जेलमध्ये मी एक गीत लिहिलं होतं. त्या गीतात शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांचं थोडंसं वर्णन होतं अन् शेवटी लिहिलेलं होतं, 'हाती घे तलवार, एकीची, हाती घे तलवार.' त्यावर गुणवंतभाई म्हणाले, "वकीलसाब ये तलवार निकाल दो भाई, ये हिंसा हमे अच्छी नही लगती।" दोघेही तत्त्वाचे पक्के. दोघेही राजकीय कैदी म्हणून जेलच्या नियमाप्रमाणे काही सवलतींचे अधिकारी. तरीही कसल्याही सवलतींची मागणी नाही केली त्यांनी. गुणवंतभाईंचा मुलगा अमेरिकेत जाणार होता. त्याच्या प्रवासाची तारीख अन् आमच्या सत्याग्रहाची तारीख जवळजवळ तीच येत होती. सत्याग्रह टाळणं त्यांना पटेना, म्हणून ते चंडीगडला आले खरे; पण दोघांनाही थोडी खंत वाटत होती. पुढे जेलमध्ये गुणवंतभाईंचा मुलगा अमेरिकेला जाण्यापूर्वी भेटायला आला. तो भेटला, बोलला, त्याने विचारविनिमय केला तो बिपिनभाईंबरोबर, गुणवंतभाईंबरोबर नाही. आमच्यापुढे आदर्श नाहीत म्हणणाऱ्यांना आदर्श नकोच आहेत मुळी. आदर्श तर असे समोरच आहेत ना; पण ते पाहावेत कुणी? जेलात येताना त्याला जोशीसाहेबांना भेटण्याची खूप इच्छा होती. तोही खादीधारी. त्याच्या अमेरिकत जाण्यावरून साहेबांनी खूप थट्टा केली त्याची.

गुजराथी लोक उशिरा आलेले, तेव्हा त्यांना सारा वृत्तांत बलबीरसिंग अन् विजय जावंधियांनी सांगितला व सत्याग्रहासाठी दुसऱ्या दिवशी दुपारी दोनचा मुहूर्त धरल्याचे सांगितले. एव्हाना दुपार उलटली होती. तेव्हा जोशीसाहेब, जावंधिया, बद्री अन् शंकरराव वाघ हे चौघेही साहेबांचे एक चाहते व चंडीगडचे ख्यातनाम वकील श्री. भालसिंग मलिक यांच्याकडे गेले. बबन व इतर सहकारी चंडीगडचा फेरफटका मारायला गेले. मी एकटाच पंचायत भवनाच्या विशाल गच्चीवरील एका खाटेवर पहुडलो. परभणी सोडल्यापासून असा निवांत वेळ मिळाला नव्हता. घटना एवढ्या वेगाने घडत होत्या, की

विचार करायलाही फुरसत नव्हती मिळाली आतापावेतो. या निवांत क्षणी मात्र विचारांनी विश्रांती घेतल्यासारखी वाटली क्षणभर.

आजपर्यंत सर्व राजकीय चळवळींपासून अलिप्त राहिलेला मी या कामात पडलोच कसा, हा विचार मात्र मनात परत परत येत होता. आतापावेतो सामाजिक, सांस्कृतिक कामात सारखी लुडबूड चालू होती माझी. राजकीय पक्षांनी खूप लंडोर टाकले होते माझ्या पतंगावर; पण तिकडे मन कधी ओढलं गेलंच नाही. या वेळी मात्र काय घडलं? शरद जोशींच्या सहवासात परभणीच्या अधिवेशनात काही दिवस राहिलो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे मी चळवळीकडे आकर्षिला गेलो की त्यांनी दिलेल्या विचाराकडे ओढला गेलो की शेतकऱ्यांची दैन्यावस्था गेल्या कित्येक वर्षांपासून मी पाहतोय, त्यांच्या उद्धाराची घडी आता आली आहे या भावनेतून इकडे आलो! काय कारण असेल कोण जाणे; पण प्रवाहाच्या धारेत ओढला जावा तसा ओढला गेलो होतो आणि ओढला गेलो तोही इतक्या वेगात, की विचार करायलाही वेळ नाही मिळाला. एव्हाना संध्याकाळ होऊन 'लाइट लागण' झाली होती. प्रवासाचा शिणोटाही आलेला होता. तेव्हा खाटेला पाठ लागताच झोप केव्हा लागली ते कळलं सकाळी उठल्यावर.

॥ ५ ॥

वीस जुलैचा दिवस उगवला, तोच मुळी जत्रेची गडबड घेऊन. साऱ्यांनी वरातीत जाण्यासाठी तयारी करावी असे कपडे पेहरले होते. स्वच्छ, नीटनेटके, दुल्हेमियां होते शरद जोशी, तर दुल्हन होती जेल. आम्ही सारे वऱ्हाडी. उत्साह नुसता ओसंडून जात होता. महाराष्ट्राच्या टीममधील श्री. शरद जोशी, बबन शेलार, बद्री देवकर, शंकरराव वाघ, विजय जावंधिया हे सारे अनेक जेलयात्रा करून आलेले 'अनुभवी योद्धे' -पुराने पापी! त्या लोकांच्या बोलण्यात कधीमधी यायचं 'हे तर काहीच नाही. त्या अमक्या तमक्या जेलमधील तर काहीच विचारूच नका. फारच भयानक बुवा.' ते जेलबद्दल जे असं बोलायचे अन् तेही सहजगत्या, जसं शेजारी राहणाऱ्या अमक्या तमक्याला भेटायला गेलेत. मीमात्र जेलयात्रेला अगदी नवखा. एखाद्या पहिलटकरणीसारखी झाली होती अवस्था माझी. थोडीशी भीती, खूपशी उत्सुकता होती; पण वरवर मात्र मला त्यात काहीच वाटत नाही असा आव आणत होतो. गुजराथी मंडळीपैकी श्री. बालमुकुंद पटेल थोडेसे अडचणीत आलेले होते. त्यांना चंडीगडला अगदी अचानक यावं लागलं होतं. ऐन निघताना भूलाभाई





पटेलांनी फोन करून ताबडतोब यायला सांगितलं. दिल्लीला जायचं आहे. सत्याग्रह करायचा आहे ही कल्पनाही त्यांना दिलेली नव्हती, तशी त्यांची मानसिक तयारीही नव्हती अन् आता सारे लोक सत्याग्रहाला तयार झाल्यावर माघार घेणं त्यांच्या मनाला बरं वाटेना. जोशीसाहेब बालूभाईंची सारखी थट्टा करायला लागले.

''देखो बालूभाई, जादा नही युंही कुछ एखाद महिना रहना होगा अंदर. आजकल कोलू तो नही पिसना पडता, फिर भी छोटे मोटे काम कराही लेते हैं.''

ही सारी थट्टा आहे हे कळत असूनही बालूभाईंना भीती वाटत होती. इथे पंजाब-प्रमाणेच अशांत वातावरण आहे. काय सांगावं, कडक शिक्षा देतीलही. तेव्हा मनात भीती असूनही वरवर ते म्हणत,

''तो हम क्या डरते हैं।'' त्यावर साहेब आणखी चिडवत,

''आप डरे या ना डरे, महिनाभर तो रहनाही होगा.''

आम्हा वऱ्हाडी लोकांपैकी हरियानवी पाचहीजण अगदी निर्विकार होते. नाही तरी पाचांपैकी चौघेजण निवृत्तीचेच आयुष्य जगत होते. त्यांच्या वागण्याबोलण्यात घरची काही विशेष काळजी कधीच जाणवली नाही. त्यांच्या दृष्टीने घर अन् जेल सारखंच. अंधे को क्या, बस दिनरात बराबर !

हा सत्याग्रह केवळ परप्रांतीयांचाच असावा असं व्हायला नको. सोबत पंजाबीही पाहिजेत असं कालच सुचवलं होतं साहेबांनी. तेव्हा वेळेवर धावाधाव करून बलबीरसिंगांनी काही शिख शेतकरी जमा केले. त्यांत सहा स्त्रिया, चार मुली, एक पोरगा अन् बाकी पुरुष असा पंजाबी लवाजमा होता.

दुपारी दोनच्या सुमारास आमची 'वरात' निघाली. वरातीत होते आंतरराज्य समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. भूपेंद्रसिंग मान, त्याच समितीचे निमंत्रक श्री. विजय जावंधिया, गुजराथच्या खेडूत समाजाचे अध्यक्ष श्री. भूलाभाई देसाई व त्यांचे तीन सहकारी. पंजाबच्या भारतीय किसान युनियनचे कार्यकर्ते अन् महाराष्ट्राच्या शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी अन् त्यांचे आठ सहकारी. दहावा माणूस म्हणजे शंकरराव वाघ. त्यांना मुद्दाम बाहेर ठेवलं होतं. बाहेरची अनेक कामं त्यांना पार पाडायची होती. ते त्यासाठी आमच्यापासून अलग, ॲड. भालसिंग मलिक यांच्याकडे उतरले होते. चंडीगडचा जेल आणि महाराष्ट्रातील कार्यकर्ते यांच्यातील दुवा म्हणून ते काम करणार होते.

पंचायत भवनापासून सुमारे वीस ते पंचेवीस मिनिटांच्या अंतरावर राजभवनाकडे आमची वरात निघाली, भर दुपारच्या तळपत्या उन्हात. त्या दिवसांत चंडीगडला उष्मा होताही फार. वरातीच्या अग्रभागी होते शरद जोशी अन् भूपेंद्रसिंग मान. आमच्याबरोबरच; पण शेजारच्या फुटपाथवरून चालले होते शंकरराव वाघ. जणू काही आमचा आणि त्यांचा काही संबंधच नव्हता. राजभवनापासून अलीकडेच आमची वरात अडवली पोलिसांनी. एव्हाना काही पत्रकारही तिथं हजर झाले होते. पोलिसांच्या दोन गाड्यांत आम्हांला बसवण्यात आलं. ते क्षण सोबतच्या छायाचित्रकारांनी अलगद टिपले. आम्ही गाडीत बसलो आणि आतापावेतो अवाक्षरही न काढलेल्या हरियानाच्या घाशीरामजींना कंठ फुटला. एकदम आपल्या बुलंद आवाजात त्यांनी घोषणा द्यायला सुरवात केली:

*हिंदोस्तांसे आयी आवाज, किसान युनियन जिंदाबाद*
*कोणेकोणेसे आयी आवाज, किसान युनियन जिंदाबाद*
*पिंडपिंडसे आयी आवाज, किसान युनियन जिंदाबाद*
*अभी तो ए अंगडाई है, आगे घोर लडाई है*
*जब तक दुखी किसान रहेगा, धरतीपर तूफां रहेगा*
*किसानों से जो टकराएगा, भूख से वो मर जायेगा*

घाशीरामजींनी दे दणादण घोषणाबाजी चालवली. आमच्या गाड्या पोलिस ठाण्यात आल्या. आम्हांला ठाण्यात बसवण्यात आलं, तेव्हाच घाशीरामजींचं तोंड त्यांच्या घोसाळ मिशात बंद पडलं. त्यांच्या स्टॅमिनाचं कौतुक करायला पाहिजे. पन्नाशीच्या पुढे गेलेल्या घाशीरामजींचा या बाबतीतला उत्साह तरुणांनाही लाजवण्यासारखा होता. आमच्या मागेच आले, पत्रकार पोलिस ठाण्यात. त्यांनी साहेबांची भेट घेतली. भूपेंद्रसिंग मान, भूलाभाई पटेल, बिपिनभाईबरोबर चर्चा केली. एव्हाना सत्याग्रहींच्या नावांची यादी तयार झाली होती ठाण्यात. आम्हा साऱ्यांना परत एकदा बसवण्यात आलं पोलिसांच्या गाड्यात अन् आमची वरात परत निघाली कोर्टाकडे. परत एकदा घाशीरामजींची दे दणादण घोषणाबाजी सुरू झाली.

*हिंदोस्तांसे आयी आवाज ....*

आणि या घोषणा थेट चंडीगडच्या न्यायालयाच्या इमारतीत शिरून पायऱ्या चढून कोर्ट हॉलमध्ये जाईपर्यंत चालू होत्या. या घोषणाबाजीनं कोर्टाची इमारत गर्जून





गेली. आजूबाजूच्या कॅरिडोर्समधून आमची गर्दी पाहायला ही गर्दी जमा झाली! आम्हा सर्वांना कोर्टापुढे हजर करण्यात आलं अन् तिथे बसला पहिला झटका - कोर्टाचा! आलेल्या आरोपींची विचारपूस करायला पाहिजे, न्यायमूर्तींनी, अटक केल्यावर पोलिसांनी काही मारहाण केली का, काही त्रास दिला का वगैरे वगैरे. तसं कायद्याचं बंधनच आहे. आमच्या कोर्टात रोज बघतो ना आम्ही. जो कायदा महाराष्ट्रात तोच चंडीगडलासुद्धा; पण न्यायाधीश, पोलिस अन् सरकारी वकील यांच्यात काय खुसरपुसर झाली आम्हांला कळलं नाही; पण कुणी तरी कुजबुजलं,

"सोला दिन का रिमांड दिया है."

मी तर चाटच पडलो. सोळा दिवसांचा रिमांड पाहिजे कशाला? रिमांड पाहिजे असतो खून, डाका, मारामारी अशा भयंकर प्रकरणात. पोलिसांना चौकशी करायची असते, जाबजवाब घ्यायचे असतात. आरोपीकडून काही मुद्देमाल जप्त होण्याची शक्यता असते. क्वचित प्रसंगी इतर आरोपींची नावे कळण्याची शक्यताही असते. शिवाय आरोपी जर कुख्यात असेल तर साक्षीदारांना त्याची दहशतही बसू शकते. तेव्हा अशा परिस्थितीत पोलिस चौकशीसाठी रिमांड म्हणजे अवधी मागून घेतात आणि अशा भयानक गुन्ह्याच्या बाबतीत न्यायालयेही सहसा एकदम चौदा दिवसांचा रिमांड न देता छोट्या मुदतीचा रिमांड देतात अन् त्याची मुदत वेळोवेळी वाढवतात, आवश्यकतेप्रमाणे. त्या मार्गाने न्यायसंस्थेचा अंकुश राहतो पोलिसांवर, त्यांच्या चौकशी यंत्रणेवर आणि एकूणच शासनावर. इथे आम्ही भारतीय दंड विधानाखालील खतरनाक मुजरीम नव्हतो, तर होतो सत्याग्रही, 'धारा एक सो चंवालीसचा'चा भंग करणारे. तेव्हा पुढे होऊन मी न्यायाधीशांना विचारलं,

"महाराज, चार ऑगस्टपर्यंत आपण रिमांड दिला तो कशासाठी?"

"कशासाठी म्हणजे काय, चौकशीसाठी."न्यायाधीश.

"कशाची चौकशी करणार आहेत हे लोक? आम्ही सत्याग्रही आहोत. आम्हांला गुन्हा कबूल आहे. आता चौकशी करायची ती कशाची? कुणाचे जाबजवाब घ्यायचे आहेत?" जरा वेळ न्यायाधीश गप्प राहिले. परत फौजदार सरकारी वकील व न्यायाधीश यांची कुजबूज झाली. न्यायाधीशांचा चेहरा उजळला. ते म्हणाले,

" तुम्हाला गुन्हा जरी कबूल असला तरी पोलिसांनी प्रथम खबरी रिपोर्ट आणखी दिलेला नाही कोर्टापुढे. इथल्या नियमाप्रमाणे त्यावर असिस्टंट कमिशनरची सही लागते

अन् त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी अवधी लागतो.''

''महाराज, आम्ही आज सत्याग्रह करणार आहोत याची पूर्वकल्पना बऱ्याच अगोदर दिलेली होती पोलिसांना. शिवाय आम्हांला अटक दोन वाजता करण्यात आली व आता साडेचार वाजले आहेत हाही बराच अवधी मिळाला आहे त्यांना. एवढ्या वेळात त्यांना फिर्याद तयार नसती का करता आली? त्यांच्याकडे सर्व प्रकारची यंत्रणा आहे, तेव्हा त्यांना एवढंही करता येऊ नये?''

''महाराज, आमची अन् असिस्टंट कमिशनरांची भेट होऊ नाही शकली.'' इन्सपेक्टर.

''मग महाराज, एक दिवसांचा रिमांड द्यावा. त्यासाठी सोळा दिवसांचा रिमांड कशाला? खुनासारख्या प्रकारातही एकदम सोळा दिवसांचा रिमांड सहसा देत नाहीत, मग आम्ही तर सत्याग्रही आहोत. कलम १४४ चा भंग आम्ही केला आहे, समजूनउमजून.''

...पण सारा युक्तिवाद पालथ्या घड्यावर पडत होता. आमचे सारे आक्षेप न्यायालयाच्या भिंतीवर आदळत होते. आमच्या वतीने एकही वकील कोर्टापुढे उभा राहिला नाही. महाराष्ट्रातील अनुभव वेगळा आहे. कुठल्याही संघटनांच्या सत्याग्रहींना कायद्याची मदत देण्याकरिता वकिलांची फलटण तयार असते. सत्याग्रहींना पाठिंबा म्हणून अनेक संघटनांचे, पक्षांचे अनेक कार्यकर्ते कोर्टात हजर असतात. इथे मात्र आमच्याशिवाय फक्त कोर्टातीलच काय असतील ते लोक हजर होते. कदाचित भारतीय किसान युनियनचा शहरातील जनसंपर्क मर्यादित असेल. कदाचित पंजाबमधील परिस्थिती अशांत! त्यामुळेही असेल किंवा चंडीगडमधील लोकांना कशाचाच विधिनिषेध नाही म्हणूनही असेल. कदाचित असेही असेल, की आमचा सत्याग्रहाचा मूळचा बेत लुधियानाचा होता, तो अचानक बदलून चंडीगडला ठरला याची खबरही कुणाला नसेल. कारण काहीही असू शकेल; पण कोर्टात कार्यकर्त्यांची उपस्थिती नव्हती हे मात्र खरं.

सोळा दिवसांच्या रिमांडनं माझा अगदी संताप झाला. आम्ही सगळी शिकली सवरलेली माणसं. त्यातही सत्याग्रही. कोऱ्या पाट्या आमच्या. आमच्याविरुद्ध पोलिसांजवळ काहीही आक्षेपार्ह नोंदी नाहीत अन् तरीही आमचे हे हाल; तर अडाणी लोकांचे अन् विशेषत: सद्य परिस्थितीत शिख लोकांचे काय हाल होत असतील ते तेच जाणो ! बिनडोकपणे वागायचं ठरवलं म्हणजे सरकार काय करू शकतं हे समोरच दिसत





होतं. अशा वेळी आधीच अडचणीत आलेल्या शिख भाईंची मन:स्थिती काय होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. आम्ही पंजाबचा बडगा आणखी पाहिलाच नव्हता. ही तर नुसती सुरवात होती, 'आगे आगे देखिए होता है क्या'

हा सारा संवाद चालला असताना जोशीसाहेबमात्र मुद्दाम एका खांबाआड दूर उभे राहिले होते. शांत चित्ताने सारा तमाशा पाहत. एक अवाक्षरही काढलं नाही त्यांनी; पण पंधरा दिवसांचा रिमांड मिळेल असा विश्वास त्यांना वाटत असावा अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली. असा रिमांड मिळणं आवश्यकच आहे अशीही त्यांची इच्छा असावी अस मला वाटलं. ते सेनापती होते. त्यांच्यापुढे मोठ्या लढाईचे डावपेच होते. लढा तीव्र होण्यासाठी साहेबांना अटक आणि पंधरा दिवसांचा रिमांड या घटना आवश्यकच असाव्यात. नव्हे त्या अपेक्षितच होत्या. आम्हालामात्र एकच डाव खेळायचा होता. त्यामुळे आमच्यापुढे ही एकच लढाई होती. त्यातही आम्ही पराभूत झालो. '*बडे बे आबरू होकर निकले तेरे कुचे से हम !*' पंधरा दिवसांचा रिमांड म्हटलं, की माझ्या पोटात गोळाच उठला; मात्र साहेब आणि त्यांचे मावळे, हरियानवी भाई अन् शिखभाई यांची प्रतिक्रिया काय होती?

*'ये किसानभाई चले, जेल चले भाई जेल चले...'*

जेल आणि घर दोन्ही सारखंच समजणाऱ्या पंजाब्यांची धन्य आहे. नाही तरी अख्खा पंजाब एक जेलच करून टाकला होता सरकारनं. बाहेरच्या नैराश्याला कंटाळून तर ही स्थितप्रज्ञता आली नसेल ना? कोर्टातनं आम्हाला चंडीगडच्या जेलकडे नेण्यात आलं. आम्ही गाडीत बसलो, गाडीचं दार बंद झालं अन् घाशीरामजींचं तोंड उघडलं, *'कोणे कोणे से आयी आवाज..'* अन् हा कोणे कोणेसे आयी आवाज थेट जेलचं दार आम्हाला आत घेऊन बंद होईपर्यंत नॉनस्टॉप चालूच होता. पंजाब अन् हरियानवी लोकांना 'ण' याअक्षराची आवडच फार. त्यांच्या भाषेत 'न' हे अक्षर नाहीच की काय! बरं सर्वच 'न'चा उच्चार 'ण' करतात असंही नाही. किसान मधील 'न'चा उच्चार 'ण' करायचा; पण युनियन मधील दोन्ही 'न' 'न'च. हे पंजाबी अन् हरियानवी लोकंच जाणो या 'न''ण' चं इंगित.

चंडीगडचा तुरुंग गावापासून भला आठदहा मैल दूर आहे. आमच्या गाड्या पोलिस पहाऱ्यात जेलवर आल्या. आम्हांला पाहिलं अन् जेलनं आपलं तोंड उघडलं. सर्व तुरुंगाचं बाह्यदर्शन सारखंच. भला मोठा दरवाजा, ज्यात एक दिंडी दार अन् त्यालगत

दोन्ही बाजूंनी उंचच उंच भिंतीचं कुंपण. जेलच्या इमारतीचं कॉपीराईट आहे काय की! आम्ही दिंडी दरवाजानं आत शिरलो. मुख्य फाटकातून आत शिरलं, की उजव्या हाताला जेलर बाबूचं कार्यालय अन् डाव्या हाताला, त्याच्या हाताखालील बाबू लोकांचं. मध्यभागी मोकळी जागा, फाटकाच्या आकाराची, त्या जागेत आम्हांला थांबवण्यात आलं. आमच्या नावांची नोंद करण्यात आली. जवळच्या वस्तूंची नोंद झाली. मुख्य फाटकासमोरील दुसऱ्या मोठ्या फाटकाच्या दिंडी दारातून आम्ही जेलच्या प्रचंड आवारात पाऊल टाकलं. जेलभोवतीची उंचंच उंच भिंत सोडली तर तो परिसर काही जेल वाटेना. सगळीकडे हिरवं हिरवंगार गवत. जागोजागी उंच उंच झाडे. मुख्य दारातून आत शिरलं, की सुमारे शंभर कदमांचा रस्ता. रस्त्याच्या डाव्या बाजूला समांतर, जेलमधील कार्यशाळा अन् त्या कार्यशाळेला लागूनच दवाखान्याची छोटी खोली, थोडीशी पुढे आलेली. उजव्या बाजूला उंचच उंच भिंत बराकीची. रस्ता संपला तिथे खूप उंच, एक मनोरा -कम वॉचटॉवर- कम पाण्याची टाकी. त्या टाकीभोवती वर्तुळाकार बराकी. सर्व बराकींच्या मागे आणि मुख्य कुंपणाच्या भिंतीला लगत आतील बाजूस खूप मोठा रस्ता, पहारेकऱ्यांना पहारा देत फिरण्यासाठी. जेलचं आवार खूप मोठं. स्वच्छ मोकळी हवा अन् मोहक निसर्ग. भरपूर पाणी. याला का जेल म्हणायचं. *'घोडा घोडा म्हणतात तो हाच का.'* जेलबद्दल खूपच भीतिदायक, त्रासदायक वाचलेलं होतं. कल्पनेतून जेल म्हणजे नरकाची सुधारित आवृत्ती वाटत होती, पण हे काही वेगळंच निघालं प्रकरण -

*बहुत सुनते थे चर्चे दिल के धडकने की*
*जो काटा तो एक कतरा ए खून निकला*

आम्ही जेलमध्ये शिरलो तेव्हा संध्याकाळ झालेली होती. चंडीगडमधील निसर्गात सकाळ, संध्याकाळ फारच लोभस! त्या वेळी जेलमध्ये राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली काही राजकीय नेते अटकेत होते. त्यांना संध्याकाळी पाय मोकळं करण्यासाठी म्हणून बराकीबाहेरील मैदानात सोडलं जाई. त्यांनी कुणाशी बोलू नये हा दंडकमात्र होता. आम्ही वर्तुळात आलो तेव्हा अशाच एका राजकीय कैद्याला ओळखून श्री. भूपेंद्रसिंग मान यांनी 'सत् श्री अकाल' केलं. तेव्हा त्यांनी थांबून चौकशी केली. मानसाहेबांनी जोशीसाहेबांची व त्यांची ओळख करून दिली अन् सांगितलं,

''हमारा साथ देने जोशीसाब और उनके साथी आये हैं दूर महाराष्ट्र से.'' यावर ते गृहस्थ आकाशाकडे पाहत सुस्कारा टाकत अन् शून्यात का काय कुठे नजर मिळवतात





तशी मिळवून म्हणाले,

''हां कभी वो और हम एक थें.'' यावर लगेच साहेब म्हणाले,

''कभी क्यूं? आज भी हम एक हैं, कल भी एक थें और आनेवाले कलभी एकही रहेंगे. पंजाब और भारत कोई अलग नही है.'' साहेबांच्या या बोलण्याचा त्यांच्यावर फारसा परिणाम झालेला दिसला नाही. तेव्हा चर्चा न लांबवता आम्ही सारे आमच्या बराकीकडे निघालो.

आमची बराक म्हणजे एक लांबोळका हॉल, त्याला समांतर एक बोळ, त्या बोळीला समांतर तीनचार खोल्यांची रांग. बोळीत शिरलं, की आधी उजव्या हाताला एक खोली. त्यालगत आणखी एक खोली. जिचा वापर पूर्वी स्वयंपाकघर म्हणून होत असावा. त्यापुढे सॅनिटरी ब्लॉक. या बोळीच्या दोन्ही टोकांस गजांचं मजबूत दार, हॉल आणि सर्व खोल्यांना बाहेरील मैदानाकडे उघडणाऱ्या खिडक्या. त्यामुळे भरपूर उजेड अन् हवा खेळती. या बोळीच्या एका टोकाला कँटीन. त्याबाहेर दोन्ही बाजूंस परत मैदान अन् मैदानातच; पण भिंतीला टेकून धुण्याभांड्यासाठी पाण्याचे नळ, चोवीस तास पाणी देणारे. सर्व खोल्यांत पंखे लावलेले.

बोळीतील पहिली खोली वापरात आणण्यासारखी होती. साहेबांना अनेक लोक भेटायला येणार तेव्हा ही पहिली खोली साहेबांसाठी म्हणून निवडली आम्ही. त्यांच्याबरोबर आम्हीही चौघांनी बबन, जावंधिया, बद्री अन् मी - पथारी लावली त्या खोलीत. एका टोकाला साहेब अन् दुसऱ्या टोकाला दारासमोर मी. बाकी हरियानवी कंपनी, गुजराथी कंपनी, पंजाबी कंपनी अन् उर्वरित मराठी कंपनीनं बाजूच्या मोठ्या हॉलमध्ये आपापल्या पथाऱ्या लावल्या. पुढे तीनचार दिवसांनी आणखी एक तुकडी आली सत्याग्रहींची. तेव्हा गुजराथी कंपनीनं आमच्याशेजारी असलेल्या स्वयंपाकघराच्या खोलीची साफसफाई करून घेतली अन् तिथे पथारी लावली.

आम्ही खोली निवडतो तोच आमच्यापाठोपाठ जेलची माणसं आली अन् त्यांच्याबरोबर आलं जेलचं सामान. कैद्यांना दिलं जाणारं. आम्हाला खोलीत टाकण्यासाठी एक मोठी जाडसर दुहेरी अंथरता येणारी एक सतरंजी देण्यात आली. प्रत्येकाला एकेक पांढरी चादर, एक रग; पण त्या रगांवर टाकलेल्या औषधांचा वास इतका भयानक, की आम्ही त्यांची घडीही न उलगडता ते तसेच वरच्या माळ्यावर टाकले. प्रत्येक कैद्याला एक ताटली स्टेनलेस स्टीलची, एक ग्लास तोही तसाच. जेलमध्ये आणखी यापेक्षा

अधिक काय पाहिजे? महाराष्ट्रातील जेल तर फार भयानक असं 'अनुभवी' सत्याग्रहींचं मत पडलं. तिथे कैद्यांसाठी एकेक जर्मनची ताटली अन् टमरेल. त्या टमरेलचा वापर पाणी पिण्यासाठीही करावा अन् विधीसाठीही. इसापूरच्या जेलमध्ये तर शौचालयाला दारसुद्धा नाही म्हणे ! बिनदाराचे शौचालय म्हणजे कोण हा जंगलीपणा! इंग्रजांच्या काळात एक ठीक होतं. सक्तमजुरीची कैद, त्यामुळे तेथील श्रमाला कंटाळून कैदी आत्महत्या करायचे, पळून जाण्याचा प्रयत्न करायचे. अशा परिस्थितीत जेलमधील शौचाल्यांना दार नसणं एक वेळ क्षम्य; पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात हीच इंग्रजी परंपरा पुढे चालणं आवश्यक आहे का? इसापूरला तर रात्री बराकी बंद. रामकृष्ण हरे ! हिंदुस्थानमधल्या प्रगत राज्यांपैकी महाराष्ट्र एक आणि तिथं ही तऱ्हा. बिहारची तऱ्हा तर अंगावर शहारे आणणारी. मी आभार मानतो, की माझ्या जेलच्या पहिल्यावहिल्या मुक्कामाला इतका चांगला जेल मिळाला.

खोली लावेपर्यंत संध्याकाळ झाली. रात्रीचं जेवण आलं आणि आम्ही आपापल्या थाळ्या घेऊन लाइन लावली. माणशी चार पोळ्या तळहाताएवढ्या अन् वरण-कम-भाजी बस्स! कैद्याला पोटासाठी एवढं पुरे झालं. मी ताटाकडे पाहत बसलो. पोळीचा तुकडा मोडून त्या भाजी-कम वरणाशी लावून तोंडात टाकला. जेलची पोळी ती! तिला तेल लावलेलं ना तूप! अर्धीकच्ची भाजलेली, मला काही ते जेवण जाईना. माझ्याकडे पाव उरला होता, कालचा. तोच खाल्ला मी. साहेब अन् त्यांचे मावळेमात्र, 'अन्न हे परब्रह्म' वर यथेच्छ ताव मारत होते. जगप्रसिद्ध खवय्यांच्या फ्रेंचांच्या नगरीत उत्तमोत्तम अन्नाचा अत्यंत पॉश वातावरणात आस्वाद घेणारा गडी तो हाच का? ते चित्र खरं का हे? साहेब एक मोठं कोडं वाटलं मला. या घडीपावेतो एकाही पंचतारांकित हॉटेलातील गालिच्यावर पाय ठेवण्याचाही अनुभव नसलेला मी या अन्नाला नाक मुरडत होतो अन् आयुष्यातील काही वर्षे अलिशान वातावरणात गुजारणारा हा गडी चाटूनपुसून ताटली साफ करतो आहे. कशाची तक्रार नाही. कुठलीही कटूता नाही. गप्पांचा ओघ चालूच.

''काय वकीलसाहेब, कसा वाटला अनुभव?'' माझी अन्नाशी चाललेली चाळवाचाळव पाहून साहेबांनी विचारलं. मी ओशाळवाणा झालो अन् म्हणालो,

''माझं पोट जरा नाजूक आहे. हळूहळू होईल सवय.''

''करा सवय करा. पंधरा दिवस जायचे आहेत आपले अन् पुढे किती दिवस काढायचे आहेत, माहीत नाही. क्यूं बालूभाई?''





पंधरा दिवसच फार वाटले आम्हांला अन् हा बुवा म्हणतो आहे, पुढे किती दिवस काढणार आहोत माहीत नाही. बालूभाईंच्या अन् माझ्या घशात घास अडकला. जेवण चालू असताना विविध विषयांवर गप्पा चालल्या होत्या आमच्या. जेवणं आटोपून ताटल्या विसळून आम्ही बराकीत परतलो. तो सर्वांना हॉलमध्ये बोलावण्यात आलं. तिथं आम्ही सगळे जवळजवळ पन्नास जण एकत्र जमलो. सर्वांनी स्वत:ची ओळख करून दिली. रोज रात्री नऊ वाजता हॉलमध्ये जमायचं ठरलं. जेलमध्ये पंधरा दिवस राहायचं. तेव्हा काही योजना आखणं आवश्यक होतं.

एव्हाना शंकरराव वाघ आमचं सारं सामान घेऊन आले होते. कोर्टात त्यांची आमची भेट झाली तेव्हाच आम्ही तसं सांगितलं होतं. त्यांच्याबरोबर चंडीगडचे प्रसिद्ध वकील भालसिंग मलिक हेही आले होते. त्यांनी येताना फळांची करंडी, केळीचा एक घड अन् बरणीभरून लोणचं आणलं. साहेबांपुढे मलिक बसले होते, ते पालथी मांडी घालून, गुरूपुढे शिष्यानं बसावं तसं. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बघण्यासारखे होते. साहेबांबाबत त्यांना वाटणारा आदर नुसता ओसंडत होता. जरा वेळ सर्वांच्या भेटीगाठी घेऊन मलिक परतण्यासाठी निघाले. वाघांनी कुणाला काही निरोप आहे का विचारलं. आमच्यापैकी कुणाला काही निरोप नव्हता. साहेबांचा तर संसारच नव्हता संघटनेशिवाय. निरोप मला द्यायचा होता. घरी फोन करायला सांगितलं मी त्यांना. गुजराथी कंपनीनं आपापले फोन नंबर दिले होते निरोपासाठी. वाघांनी मला मिस्किलपणे विचारलं,

''वकीलसाहेब, घरच्यांसाठी काही खास निरोप आहे का?''

''खास निरोप असा तुमच्यामार्फत पाठवायचा नसतो. तो तर टेलिपथीनं जातो.''

तेवढ्या गडबडीत गुजराथी कंपनीनं बरीच पत्र लिहून आणली अन् दिली वाघांजवळ पोस्ट करायला. निघता निघता वाघांनी साहेबांना निरोपासाठी विचारलं,

''हो, बापूंना, रामचंद्रबापू पाटील- कळवा भाऊंनाही (भास्करराव बोरावके) निरोप द्या. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम पार पडला पाहिजे म्हणावं.''

''हो. मी त्यांना फोन लावण्याचा प्रयत्न करतो आहे; पण आणखी काही फोन लागला नाही. परत रात्री फोन लावून बघतो.''

वाघ अन् मलिक गेले. रात्र आणखी गडद झाली. पलीकडच्या हॉलमध्ये एव्हाना निजानीज झाली होती. आमच्या खोलीतली गडबड शांत झालेली होती. आमच्या खोलीतले चौघेही एव्हाना झोपले होते. मला काही झोप येईना. शेवटी मी दिवा मालवला

अन् पॅसेजजवळील गजाच्या दाराला टेकून बसलो.

आतापर्यंतचा वेळ इतका घाईगडबडीत गेला, की मनातले विचार आवरायला वेळच नाही मिळाला. आता रात्रीचे अकरा वाजले आहेत. चोहीकडे नीरव शांतता पसरली आहे. मनही एवढं शांत आहे. आतापर्यंत जेलमध्ये थोरामोठ्यांनी एवढं लिखाण कसं केलं असेल ते लक्षात येतंय. मनाची एकाग्रता येते ती इथे. आपल्याकडेच आपण थोडं त्रयस्थ होऊन पाहतो. मन:शांती अन् एकाग्रता आणि तीही जेलमध्ये हे जरा विचित्रच वाटतं; तरीही ते खरं आहे. बाहेरच्या जगात विचारांची साखळी तोडणारी अनेक निमित्तं असतात; पण जेलमधली रात्र ही मनाला शांतता देणारी. रात्री सोबतीला असते ती रातकिड्यांची किरकिर. अधूनमधून हाळी देणाऱ्या रात्रीच्या पहारेकऱ्यांच्या आवाजाची. 'होऽऽशियाऽऽर' एकाने आधी आवाज द्यायचा अन् बाकीच्यांनी एकामागे एक 'आलबेल है' चा जवाब द्यायचा. मधूनच तासाचे टोलही पडत असतात.

बाहेरून दिव्यांचा भगभगीत प्रकाश आत येत होता. त्या प्रकाशात घरी पत्र लिहायला बसलो. मी आणि माझी पत्नी आम्ही दोघेही एकाच गावचे. त्यामुळे पत्रं लिहिण्याचा योगच नाही आला. काय लिहीत असतील लोक आपल्या बायकोला? मायन्यातलं 'प्रिय' वगैरे ठीक आहे; पण पुढे काय लिहायचं? 'तुझी फार आठवण येते.' वगैरेच्या पुष्कळच पुढे गेलेली गाडी. दोन गोड आठवणी दिलेल्या घरी. इकडील हालहवाल समजून घ्यायला लोक उत्सुक होते. तेव्हा जेलमध्ये येईपर्यंतचा वृत्तांत लिहून पत्र पूर्ण केलं, तो रात्रीचा एक वाजून गेला होता.

॥ ६ ॥

अनोळखी जागी अनेक आवाज ऐकायला येतात झोपेत. त्यामुळे झोप अधूनमधून चाळवते. कुणी तरी मला नाव घेऊन जागं करीत होतं. डोळे उघडायला तयार नव्हते. सकाळचे साडेसहा वाजले होते अन् जेलमधील सकाळचा चहा समोर तयार होता. साहेबांनी विचारलं,

''काय वकीलसाहेब, एवढं काय लिहीत बसला होता रात्री?'' केव्हा त्यांनी मला पाहिलं? समोरून तर गेलेच नाहीत!

''घरी मंडळीला पत्र लिहीत बसला होता काय? चार दिवस झाले नाहीत घर सुटल्याला, तो पत्रापत्री सुरू झाली तुमची!''





त्यावर बबन बोलला, ''तुम्हाला संन्याशाला काय कळणार त्यातली गोडी.'' साऱ्या शेतकरी संघटनेचा संसार चालवणारे साहेब. आंतरराज्य समन्वय समितीचे प्रेरक साहेब, ते कसे संन्यासी? शरीरानं ते जरी जेलातच असले तरी मनानं ते संघटनेच्या कार्यालयातच होते पुण्याला.

एव्हाना साऱ्या बराकीत चहलपहल सुरू झाली होती. साडेआठच्या सुमारास नाश्ता आला. अंडी खाणाऱ्यांना एक एक अंडे अन् एक कप दूध अन् आमच्यासारख्या शुद्ध शाकाहारी मंडळीसाठी अंड्याऐवजी एक कप दूध जास्त, हा झाला नाश्ता. आमच्या बरोबर ब्रेड आणखी उरलेली होती. ती खाल्ली दुधाबरोबर अन् नाश्ता आटोपला. सारे विधी आरामाने आटोपता वाजले अकरा. म्हणजे झाली जेवणवेळ. जेवण परत तेच. चपाती अन् भाजी-कम वरण. जेवताना माझी चलबिचल पाहून साहेबांना राहवलंच नाही. लगेच ते म्हणाले,

''हे असं चालणार नाही वकीलसाहेब. या अन्नाची सवय झाली पाहिजे तुम्हाला. ब्रेड म्हणजे फार चांगली अन् हे अन्न म्हणजे कदान्न असं समजू नका. इतका कच्चा माणूस चालणार नाही आम्हाला. काय बबन?'' तेव्हापासून मीही 'उदरभरण नोहे' सुरू केलं.

दुपारी भारतीय किसान युनियनचे बलबीरसिंग वगैरे लोक साहेबांना भेटायला आले. येताना त्यांनी गुळाची ढेप, कांद्याचं पोतं अन् दुधाची कॅन आणली अन् आमचा पंजाबी सत्याग्रही बलवंतसिंगच्या सर्व हवाली केलं. त्यानं दूध सर्वांना वाटलं अन् उरलेल्या दुधाचं दही लावलं एका मडक्यात. बलबीरसिंगांनी वृत्तपत्रं आणली होती तिकडील. त्यात आमच्या सत्याग्रहाची बातमी होती. भूपेंद्रसिंग मान अन् जोशीसाहेबांचा पोलिसांच्या गाडीत चढताना काढलेला फोटो आलेला होता तिकडील वृत्तपत्रांत. आलेल्या नेत्यांबरोबर पुढील वाटचालीची चर्चा केली जोशीसाहेबांनी. त्यांनी प्रस्ताव ठेवला, की सरकारवर दबाव वाढवला पाहिजे आणि हा दबाव कायम ठेवण्यासाठी सत्याग्रहींची संख्या वाढवली पाहिजे. आज रोज शंभर जण सत्याग्रह करतात. तेव्हा ही संख्या अडीचशेवर नेली पाहिजे आणि एक आठवड्यानंतर ही संख्या पाचशेच्या वर न्यायला पाहिजे. बलबीरसिंगांनी सत्याग्रहासंबंधीचा पंजाबातील रिपोर्ट आणला होता. सर्वांना ऐकण्याची इच्छा होती, तेव्हा आम्ही सारे मोठ्या बराकीतील हॉलमध्ये जमलो. तिथे बलबीरसिंगांनी वृत्तांत सांगितला. सगळ्या पंजाबमध्ये आमच्याबरोबर वीस तारखेला साठ हजार लोकांनी सत्याग्रह केला; पण त्यांना पकडून लगेच सोडून देण्यात आलं होतं.

याउलट हजारो सत्याग्रहींना सरकारने अटकही केली नाही. सत्याग्रहींची खरी संख्या लोकांना कळली असती अन् सरकारला तेच नको होतं. म्हणून त्यांनी हजारो सत्याग्रहींना अटकच केली नाही. नाही तरी एवढ्या लोकांना अटकेत ठेवायला जेलात तेवढी जागा तर पाहिजे ना! बलबीरसिंगांनी या सत्याग्रहातील अनेक ठिकाणच्या गमतीजमती सांगितल्या. त्यांनी दिलेल्या बातमीमुळे बराकीत उत्साहाचं वातावरण पसरलं. लोकांनी 'सत्श्री अकाल, वाहे गुरूका खालसा वाहे गुरूकी फते' च्या गजरात अन् भारतीय किसान युनियनच्या घोषणांत त्यांच्या बातमीचं स्वागत केलं. एवढं दडपशाहीचं वातावरण असूनही लोकांनी एवढ्या मोठ्या संख्येनं सत्याग्रहात सहभाग दिला, याचा अर्थ लोकांतील भयगंड कमी झाला असाच होतो. आमच्या दृष्टीनं हे एक सुचिन्ह होतं.

आता उत्सुकता होती महाराष्ट्राची. थोड्या वेळानं बलबीरसिंग आणि पार्टी गेली अन् लगेच आले शंकरराव वाघ, सर्वांचे निरोप घेऊन. त्यांनी पुण्यास फोन केला होता आणि ठरल्याप्रमाणे महाराष्ट्रात कार्यक्रम साजरा होणार असा निरोप त्यांनी आणला होता. महाराष्ट्रात कसा काय निरोप पोचवला गेला याची मला उत्सुकता होती. तेव्हा साहेबांशी वाघांचं बोलणं सरलं, की मी त्यांना घेरलं अन् विचारलं,

"तुम्ही सरकारच्या तावडीतून कसा काय निरोप पाठवलात? पंजाबात एवढे कडक निर्बंध, एवढं सेन्सॉर असताना तुम्ही संदेश पोचवलात कसा?"

सत्याग्रहाच्या काळात निरोप पाठविण्याची काही तरी पद्धत असली पाहिजे हे तर उघडच होतं. ती काय पद्धत असेल याची मला उत्सुकता होती. दोन देशांचे अध्यक्ष, पंतप्रधान अशी बडी बडी मंडळी एकमेकांना भेटतात तेव्हा त्यांच्यात काय बोलणं होत असेल? थॅचरबाई इंदिरा गांधींना भेटली म्हणजे काय मुलाबाळांची चौकशी करत असेल का साड्यांबद्दल कौतुक करत असेल. शेवटी बाया त्या बायाच. भल्या पंतप्रधानपदी बसल्या म्हणून साडी-फ्रॉकचं आकर्षण थोडंच कमी होणार आहे. गोर्बाचेव्ह गप्पा मारताना व्होडकाचा आग्रह करत असतील का? तसंच सत्याग्रहाच्या काळात निरोपा-निरोपीची काय व्यवस्था असू शकेल याची उत्सुकता होती; पण आतापावेतो अशा चळवळीत माझा सहभाग नव्हता. त्यामुळे ही उत्सुकता आणखीही कायम होती. शंकररावांनी पद्धत समजावली आणि आमच्या डोक्यात ट्युब लागली. आमचा सत्याग्रह पार पडून साहेबांना अटक झाली, की शंकरराव चंडीगडमधील एका फळ विक्रेत्याच्या नावाने पुण्याच्या मंडईतील एका फळ विक्रेत्याला तार करणार होते 'अवर ऑर्डर फॉर ॲपलस्





इज कॅन्सल्ड.' पुण्याचा तो फळवाला तो टेलिग्राम बापू अन् भाऊंना शेतकरी संघटनेच्या ऑफिसात नेऊन देणार होता अन् त्यानंतर ठराविक दिवशी साऱ्या महाराष्ट्रात सत्याग्रह होणार होता. त्याप्रमाणे शंकररावांनी साहेबांना अटक झाल्यावर तार केलीही होती. अच्छा असं होतं तर 'ऑपरेशन ॲपल !'

"काय बातमी आहे महाराष्ट्रातली. कार्यक्रम कसा पार पडणार?" साहेबांनी शंकररावांना विचारलं.

"मी बापूंशी बोललो. काल रात्री बऱ्याच उशिरा लागला फोन. बापू तेव्हा कार्यालयातच होते. ते विचारतात पुढे काय करायचं?" शंकरराव वाघ उत्तरले. बापू म्हणजे रामचंद्र बापू पाटील. ते आणि भास्करभाऊ बोरावके हे पुण्याच्या कार्यालयात राहून सूत्र सांभाळत होते.

"बापूंना म्हणावं, काय करायचं तो निर्णय तुम्ही घ्या. सर्व सूत्रं आता तूमच्या स्वाधीन आहेत." साहेबांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळासाठी निरोप दिला. सर्वांचे निरोप घेऊन शंकरराव वाघ अन् आलेली मंडळी परतली. परतताना शंकररावांनी 'हजबे मामूल' सर्वांचं टपाल गोळा केलं. कुणाचं उत्तर येण्याचा प्रश्न नव्हताच म्हणा.

ठरल्याप्रमाणे रात्री आम्ही सर्वजण मुख्य बराकीत जमा झालो. प्रत्येकानं काही तरी कार्यक्रम सादर करावा असं ठरलं. बलवंतसिंगनं एक कविता म्हणून दाखवली, पंजाबी भाषेतली. आवडली मला ती. आणखी काही ओळी आठवतात मला त्या कवितेच्या. पंजाबी भाषेतली असली तरी अर्थ समजण्यासारखा आहे. अशी आहे ती कविता-

*पत्थर दे नगरी, बसदे ये लोग*
*पत्थर जिहां दिल, ए पत्थर दे लोग*
*ऐ बेलुड बेलोडे, ए मुठ्ठीभर थोडे,*
*ने कॅन्सर दे फोडे*
*काममी निकम्मे ए गंदगीते जन्मे*
*देशते रेंगण ए किडे मकोडे,*
*मनुख्ता दे दामन, ते लगी एक जौंक॥ पत्थर दे ...॥*

पहिले दोन एक दिवस जेलाच्या दैनंदिन कार्यक्रमाला जुंपून घेण्यात गेले अन् नंतर असं ठरवलं, की रोजच्या कार्यक्रमाची आखणी करायला पाहिजे. रोज रात्री बराकीत जमायचं अन् जेलमधील मुक्कामाचा वापर प्रशिक्षणासाठी करायचा. त्याप्रमाणे तेवीस

जुलैपासून हे प्रशिक्षण सुरू झालं. या प्रशिक्षण योजनेचे प्रमुख म्हणून हरियानाचे श्री. मांगेरामजी मलिक यांना नेमण्यात आलं.

तेवीस तारखेला दुपारी पतियाळा जिल्ह्यातील साहेबांचे एक चाहते, उंच्यापुऱ्या देहाचे पेशावरसिंग ऊर्फ 'पेशोरसिंग' आले. आले ते गर्जत गर्जतच. सोबत अर्थात दुधाची कॅन, गुळाची ढेप, कांद्याची दोन पोती अन् खूप खूप उत्साह. साहेबांना पाहिल्याबरोबर पेशोरसिंगांनी त्यांना घट्ट मिठी मारली. तेव्हा त्यांचा चेहरा विलक्षण बोलका झाला होता. साहेब स्वत:च '*गडी अंगानं उभा नि आडवा, त्याच्या रूपात गावरान गोडवा*' असे तर पेशोरसिंग याच वर्णनाची पंजाबी आवृत्ती. आधीच पंजाबी लोक उंच धट्टेकट्टे अन् पेशोरसिंग तर पंजाबी लोकांच्या तुलनेतही अधिक उंच, अधिक तगडे. साहेबांनी त्यांची अन् आमची ओळख करून दिली. आम्ही तर त्यांच्या मगरमिठीला आधीच भिऊ लागलो; पण त्यांची मिठी आमच्यासारख्या गली में गलबलासाठी नव्हतीच म्हणा! पेशोरसिंगांनी पंजाबमधील बऱ्याच खबरा आणल्या होत्या. धामधुमीत आलेले पेशोरसिंग गेले तेही धामधूम करीत. अगदी थोडा वेळ होते ते जेलात; पण होते तोवर सारा जेल दणाणून सोडला होता त्यांनी.

त्याच दिवशी रात्री साहेबांनी प्रशिक्षणाची सुरवात केली. पंजाबी, हरियानवी शेतकऱ्यांना महाराष्ट्राची ओळख करून दिली त्यांनी हिंदीत.

साहेबांची बरीच भाषणं मी ऐकली. त्यांची काही पुस्तकंही वाचली. दरवेळेस त्यांच्या प्रतिपादनानं मी भारावून जातो. दरवेळेस काही नवीन सांगताहेत असं वाटतं. दरवेळेस त्यातून नवीन मुद्दे सापडतात अन् भाषा तर विलक्षण सोपी अन् ओघवती. शब्द कसे मोटेतून बाहेर येणाऱ्या पाण्यासारखे वाहत येतात. साहेबांसारखं बोलू शकणारे साहेबच!

॥ ७ ॥

आम्ही जेलात येण्याअगोदर दोन-एक दिवस पंजाबमधील कीर्ती युनियनच्या शंभरएक कार्यकर्त्यांना आमच्याच जेलमध्ये टाकलेलं होतं. ही युनियन कम्युनिस्टप्रणीत शेतमजुरांची. नाव हे असं 'कीर्ती किसान युनियन' का, असं मी भूपेंद्रसिंग मान यांना विचारलं, त्यांनी हसत हसत सांगितलं,

''वकीलसाहब, ए लोग किसानों में अपनी युनियन जमा नही पा रहे हैं, तो





मजदूरोंका ही संघटन कर रहे हैं. लोगो को ये एहसास दिलाना चाहते है कि गोया ये भी किसानोंकी ही युनियन है. इसी लिए हमारे 'भारतीय किसान युनियन' से मिलता हुवा नाम 'कीर्ती किसान युनियन' ले रखा है ये लोगोंने.''

या युनियनला किसानांचा अजिबात पाठिंबा नाही; पण मजदुरांचा अत्यल्प पाठिंबा आहे ; मात्र भारतीय किसान युनियनच्या कार्यक्रमाला कुठे तरी अपशकुन करता आला तर पाहावं म्हणून आमच्या वीस तारखेच्या जेलभरो आंदोलनाआधी त्यांनी अठराचा मुहूर्त धरला. पुढे सरकारचा अन् त्यांचा काही तरी समझोता झाला अन् त्यांना अठ्ठावीस तारखेला सोडून देण्यात आलं. त्यांनी त्यांच्या मागण्या परत घेतल्या होत्या. जेलात ते लोक स्वत:ला इतरांपासून अगदी अलग ठेवत. आम्हा लोकांत त्यांनी मिसळू नये याकडे त्यांच्या नेत्यांचा कटाक्ष; पण आमच्या विजय जावंधियांना त्यांच्याबद्दल विलक्षण उत्सुकता. ते लोक आपली चूल अशी वेगळी का मांडतात? त्यांच्या मागण्या तरी काय? एरवी अबोल वाटणारे जावंधिया अशा वेळी फार बोलके होतात. धीर-गंभीर व्यक्तिमत्त्वाचे जावंधिया समोरच्या माणसावर तेव्हाच छाप पाडीत. रात्री बराकीत कोंडले असले तरी दिवसभर आम्ही मोकळेच असू. संध्याकाळी मात्र खेळाच्या मैदानावर, नाही तर फिरण्याच्या निमित्ताने कुठे तरी सारे एकत्र येतच असू. सारखं नजरेच्या धाकात ठेवायला, कीर्ती वाले काही लहान नव्हतेच. त्यामुळे त्यांच्यातल्या कैक चुकारू पाडसांची आमच्याशी गाठ पडत असे. अशा वेळी जावंधिया हटकून गाठायचे त्या लोकांना अन् त्यांच्या प्रश्नाची चक्री सुरू व्हायची.

''क्या नाम है तुम्हारा ?''

''गुरमेलसिंग.''

''कहा रहते हो?''

''गुरुदासपूर जी.''

''क्या काम करते हो?''

''किसाण हूं जी.''

''कितनी जमीन है.''

''तीण बिघा जी.''

''क्या उगाते हो ?''

''जिरी.''

हळूहळू त्याचं घर, घरातली माणसं. वार्षिक उत्पन्न सारं सारं सांगू लागतो तो सामनेवाला आणि बोलत्ता बोलता आपण केव्हा बोलतं झालो, केव्हा सारं सांगून टाकलं ते कळतही नसे बिचाऱ्याला. त्यांच्या नेत्यानं त्याला हटकल्यावर लक्षात येई बिचाऱ्याच्या, आपण काही तरी नको ते काम करून बसलो म्हणून. स्वत:ला अलग ठेवणाऱ्या कीर्ती किसान युनियनवाल्यांना एकदा का होईना; पण साहेबांच्या बैठकीला आणायचंच असा जणू विडाच उचलला जावंधियांनी. एकदोन दिवस आपली चक्री चालवून त्यांनी एकेक गाभरू गाठलं कीर्तीवाल्यांचं. विजयबाबूंच्या या तूफानी हल्ल्यामुळे कीर्तीवाल्यांचा एकेक बुरूज ढासळला. कीर्तीवाल्यांवर भारतीय किसान युनियनवाल्यांचाही राग होताच. तरीही विजयबाबूंनी ढासळत्या बुरुजात मुसंडी मारली अन् साहेबांबरोबर एक बैठक आयोजित केलीच, सुटून जाण्याअगोदर एक दिवस. या बैठकीला कीर्ती किसानवाल्यांचे प्रमुख पाच कार्यकर्ते, शरद जोशी, भूपेंद्रसिंग मान, बिपिनभाई, विजय जावंधिया असे लोक हजर होते. कीर्तीवाल्यांचं भरपूर ब्रेन वॉशिंग झालेलं; पण साहेबांनी चर्चेत शेतकऱ्यांची बाजू व्यवस्थित मांडली व शेतकरी अन् शेतमजूर यांच्यात तसा भेद नाही. शेतकरी सुखी तर शेतमजूर सुखी. शेतमजूर हा कालचा शेतकरी, आजचा शेतकरी तो उद्याचा शेतमजूर वगैरे वगैरे मुद्दे पटवून दिले. या मुद्यांना त्या कार्यकर्त्यांजवळ काही उत्तरे नव्हती. मुद्दे खोडताही येईनात अन् पराभव स्वीकारावासा वाटेना. शेवटी काही तरी बोलून त्यांनी वेळ मारून नेली. दुसऱ्याच दिवशी त्यांनी सरकारशी बोलणी केली अन् समेट घडवून आणला अन् आपली पाडसं सुखरूप बाहेर काढली. मला वाटतं, त्यांना शेवटी शेवटी भीती वाटली असावी, की आणखी काही काळ जेलात राहिलो तर नेते अन् त्यांची जनता यात पूर्ण फारकत होते की काय; म्हणून त्यांनी झटकन आपला डाव आवरून घेतला अन् समेट केला. जाताना मात्र साहेबांना भेटून गेले ते लोक. आणखी काही बैठका झाल्या असत्या तर चित्र पालटूनही गेलं असतं. साहेबांची प्रतिपादनशैली मोहक अन् विचारांना चालना देणारी. व्यक्तिमत्त्वच मुळी भारावून टाकणारं. तेव्हा काही बैठकांतच समोरचा माणूस पार खल्लास होऊन जातो. कीर्ती किसानवाल्यांनी आपली गाभरं घाईनं बाहेर काढली ती उगाच नाही!

॥ ८ ॥

रोजच संध्याकाळी जेलमधील मैदान फुलून जायचं. ती वेळही केवढी प्रसन्न!





चोहीकडे डोळ्यांना सुखद वाटणारी हिरवळ, बराकीमागील मैदानात दाट, उंच गवत वाढलेलं. बराकीसमोर व्हॉलीबॉलचं कोर्ट. साहेब, बद्री, नाना, अर्जुन, बबन व्हॉलीबॉलच्या कोर्टावर असायचे. सोबत अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली अटक केलेली दोनतीन पोरं आणि काही इतर कैदी. त्यांच्यातील एकजण विद्यापीठ संघातील खेळाडू. तरणाबांड; पण अत्यंत उर्मट. खेळायचा मात्र खूपच छान. आमच्यापैकी कुणी गप्पा मारत नसे त्याच्याबरोबर; पण गुजराथीभाईंना फार उत्सुकता त्याच्याबद्दल. इतना जवान लडका, ऐसा काम कैसा कर सकता है? हा त्यांचा प्रश्न होता. पुढे एके दिवशी गुणवंतभाई अन् बिपिनभाईंनी त्याला घेरलं अन् पुष्कळ प्रश्न विचारले.

या खेळात दोनतीन दिवस खूप तारुण्य संचारलं साहेबांच्या अंगात. खूप खेळले अन् तिसऱ्या दिवशी त्यांचे पाय अन् वय बोललं. बबनला नाहीच राहवलं.

"उत्साह विशीतला अन् वय पन्नाशीत घुटमळणारं. अंग बोलेल नाही तर काय? 'वनपीस' घरी जाल तेव्हा जीव भांड्यात पडेल आमचा." साहेबांच्या पायाला तेल मालीश करीत बबननं फटकारलं. काय चुकलं होतं बबनचं? खेळायची फारशी सवय राहिली नाही. या आंदोलनात झोकल्यापासून अन् पहिले छूट एकदम शटल, व्हॉलीबॉल हे सगळेच खेळ खेळले तर अंग दुखणार नाही तर काय? भलेही साहेबांनी पूर्वी गिर्यारोहण केलेलं असेल, ट्रेकिंग केलेलं असेल मैलो न् मैल! ते सारं काम वेगळं, ती हवा वेगळी, तो उत्साह वेगळा, ते वयही वेगळं. युरोपमधील थंड हवेत म्हाताऱ्यांचं तारुण्य उलटून येते अन् इथे आपल्याकडे चाळिशीत! कशाला पस्तिशीत सरकलेला माणूस क्रिकेटमधूनसुद्धा बाद होतो, खुडूक होतो. तेव्हा युरोपमधील सारी बातच न्यारी; पण हे साहेबांना सांगावं कुणी?

॥ ९ ॥

रात्रीच्या सभेसाठी साहेबांनी विषय घेतला होता संघटन.

"लोक असं म्हणतात, की शेतकऱ्यांचं संघटन होऊ शकत नाही, का नाही? शरीरात अलग अलग अवयव असले, हजारो पेशी शरीरात असल्या तरी सबंध शरीरच एक सूत्र आहे. एक विचार आहे, तसं शेतकरी अलग अलग हिश्श्यांत, विभागांत वाटलेले असले तरीही त्यांची संघटना होऊ शकते. मार्क्ससुद्धा म्हणाला होता, 'शेतकऱ्यांचं संघटन होऊ शकत नाही. किसान हे पोत्यात भरलेल्या बटाट्यासारखे आहेत. पोतं सोडलं,

की बटाटे सगळे घरंगळून जातात, तसे शेतकरीही.' म्हणून मार्क्स मजुरांकडे वळला. त्यांचा विचारही मजूर समस्यांकडे वळला. सर्वच वर्ग हे आपल्या हक्कासाठी जागृत असतात. कामगार हे अधिक जागरूक असतात. मजुरांची जागृती झाली ती काही मोठा विचार घेऊन, सैद्धांतिक भूमिका मांडताना विचारवंतांनी कामगार हा वर्ग मानला. तसा किसान हा एक वर्ग म्हणून फारसा कुणी विचार केला नाही. चेतना अन् वर्ग, वर्ण, धर्म या गोष्टी भिन्न असू शकतात. गावात अलग अलग वर्ग, जाती असूनही गाव एकचेतना असू शकते. समाजातील एकाच वर्गात श्रीमंत अन् गरीब असे भेद असूनही त्यांच्यातही एक समान चेतना असू शकते. शेतकऱ्याला हे सारं समजून घ्यायला पाहिजे. त्याला हे समजून घेणं आवश्यक आहे, की लुटणाऱ्याची एक जात असते; मग धर्म अन् जात भलेही वेगवेगळी असोत. एकाच धर्मातील श्रीमंत लोक आपल्याच जातीधर्मातील लोकांना लुटल्याशिवाय राहत नाहीत. तेव्हा कित्येकांनी हे लक्षात घ्यायला पाहिजे, की त्यांची जात किसान आहे. त्याशिवाय दुसरी नाही. त्यांच्यात कुणी मोठा किसान नाही, कुणी छोटा किसान नाही, कुणी नुसता मजूर नाही, कुणी नुसता शेतकरी नाही. त्यांच्यात जातिभेद, वर्णभेद नाहीत. पांडव-कौरव परक्यासाठी एकशेपाच होते; मग ते आपसात भलेही शंभर एकीकडे अन् पाच दुसरीकडे असोत. त्यांना एकत्र ठेवणारी चेतना समान होती. किसानांचा देह आहे शेती. जसा कारखाना हा कामगारांचा देह आहे. त्यापुढे ऑफिसरापासून कामगारापर्यंत एक होतात आपल्या प्रश्नावर; मात्र यासाठी किसानांमध्ये परस्परसंपर्क आवश्यक आहे. शेतकऱ्यांचं संघटन मी केलं हे पूर्ण सत्य नाही. ज्या ज्या वेळेस प्रश्न निर्माण होतात त्या त्या वेळी त्या प्रश्नांची सोडवणूक करणारे नेतृत्वही निर्माण होते. ते नेतृत्व केवळ निमित्तमात्र असतं. काळाची गरजच असं नेतृत्व निर्माण करीत असतं. कुणीतरी विचार दिला म्हणून क्रांती झाली, नाही तर क्रांती झालीच नसती हेही म्हणणं चूक आहे. समाजालाच काही तरी करावंसं वाटतं. तशी संधी समाज पाहत असतो. गांधीजींनी दिलेला विचारच लोकांनी का उचलून धरला? त्याआधी कुणी विचारवंतच नव्हते अन् कुणी विचार दिलाच नाही असं तर नव्हतं ! मग गांधीजींचा विचार लोकांनी उचलला, असं का? लोकांना हा विश्वास वाटला, की गांधींनी दिलेला विचार हाच यशस्वी होऊ शकतो अन् त्याप्रमाणे तो विचार यशस्वी ठरलाही.

आपल्याला स्वातंत्र्य मिळालं अन् गांधीजींचं तत्त्वज्ञान बाजूला फेकून देण्यात आलं. शेतकरी संघटना हा एक आरसा आहे. या आरशात शेतकरी आपले चित्र पाहतात.





आपलं काम हा आरसा स्वच्छ ठेवणं हे आहे. लोकशाहीनं काय केलंय? शेतकऱ्यांना पिळलंय. गायीचं दूध काढताना तिला जसं चोंबाळतात तसं लोकशाहीत शेतकऱ्याला चुचकारून चुचकारून त्याला पिळलं जातं. ही व्यवस्था अशी आहे, की जिथे शेतकऱ्यांवर गोळ्या चालवण्याचा हक्क पंतप्रधानांना असतो; पण शेतकऱ्यांना उत्पादनखर्चावर आधारित भाव देण्याचा नाही. किसानांचा मूळ प्रश्न जसा चरणसिंगांना कळाला होता तसा इतर कुणालाही कळला नाही; पण चरणसिंगांना कुणी समजून घेतले नाही. त्यामुळे लोकशाही पद्धतीत व निवडणूक पद्धतीत शेतकऱ्याला न्याय मिळेलच असं समजणं चुकीचं आहे. निदान आज तरी; कारण निवडणुका या शेतकऱ्यांसाठी विफल ठरल्या आहेत.''

साहेबांच्या भाषणातील एकेक शब्द कानात साठवत होते पंजाबी शेतकरी. साहेबांच्या विचारात कुठलाही गोंधळ नव्हता. त्यामुळे भाषणात सोपेपणा आलेला होता. दिशा स्वच्छ होती अन् कारणमीमांसा परखड होती. त्यांनीच सांगितल्याप्रमाणे अनुकंपा, करुणा या दृष्टीने त्यांनी या प्रश्नाकडे कधीच पाहिलेलं नसल्यामुळं त्यांचं विश्लेषण कडक वाटायचं. भीडभाड न ठेवणारं. चरणसिंगांना एवढं समजून घेणारा मराठी माणूस विरळाच. नाही तरी मराठी माणसाची चरणसिंगांकडे पाहण्याची दृष्टी फार वेगळी. आपण त्यांना हेकट, एककल्ली, आततायी समजतो. त्यांच्या विचारांना फारसं कुणी समजूनच घेतलं नाही; पण साहेबांना दोन नेत्यांबद्दल विशेष आकर्षण वाटे. दोघेही जाटच. एक होते इंग्रजी अमदानीतील किसान नेता सर छोटूराम अन् दुसरे स्वतंत्र भारतातील किसान नेते माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग.

॥१०॥

आमच्यापैकी एक सत्याग्रही राजकुमार मजगे याला दोन-तीन दिवसांपासून ताप यायला लागला होता. दुखणं त्यानं अंगावरच काढलं. कुणाला कळू दिलं नाही; पण जास्त झाल्यावर त्यानं सांगितलं बबनला. तीन दिवसांच्या तापानं खूप गळून गेला होता तो. एका शेतकरी कुटुंबातला विशीतला तरुण. काबाडकष्टाची, खडतर जीवनाची अजिबात ओळख नसलेला अन् तरीही अंगावर खादीचे जाडेभरडे कपडे घालून साहेबांबरोबर सामील झालेला, सत्याग्रहात. त्याच्यात हळूहळू झालेल्या बदलाचा मीही साक्षीदार. उंची जीवनमानाची सवय असलेला. उत्तमोत्तम आवडीनिवडी असलेला अन् हाताच्या

अंगठ्याला नेलपॉलीश लावून त्याचं कौतुक करणारा, ट्रान्झिस्टर संस्कृतीतून बाहेर येऊन शेतकरी संघटनेच्या मातीत बोलू पाहणारा. मूळचाच स्मार्ट असलेला राजकुमार खादीच्या कपड्यात एखाद्या हिंदी फिल्मी नटासारखा वाटायचा. घरच्या लाडात वाढलेल्या राजकुमारला जेलचं अन्न काही मानवलं नसावं. त्याला ताप यायला लागला, तेव्हा डॉक्टरकडे दाखवण्यासाठी आम्ही त्याला जेलमधल्या दवाखान्याकडे नेलं. सोबत साहेब अन् विजय जावंधिया, बबन हेही होतेच. जेलातला दवाखाना म्हणजे काय सहा बाय आठची एक खोली! तिथं 'हर मर्ज की दवा' एकच. त्याला औषध, इंजेक्शन वगैरे दिलं. दवाखान्याशेजारच्या भिंतीवर खूप मोठ्या अक्षरांत लिहिलेलं होतं, 'सब दिन होत न एक समान'. म्हणजे जेलरबाबूला रसिकपणा दाखवायची परवानगी आहे इथं चंडीगडला!

राजकुमारला बराकीत नेऊन निजवलं अन् मग लक्षात आलं, आज जुलैची चोवीस तारीख- पूर्वी पहिल्या दिल्लीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आजपासून पंजाबातील शेतकरी तुकड्यांनी सत्याग्रह करणार होते चंडीगडला. शंभराशंभराची एक तुकडी याप्रमाणे अन् आज पहिली तुकडी येणार होती. सकाळपासूनच जेलमधील सत्याग्रही आज उत्सुकतेने वाट पाहत होते येणाऱ्या तुकडीची. कोण कोण असतील त्या तुकडीत? कोण करणार असेल नेतृत्व? आम्हांला तर नाही; पण आमच्याबरोबर आलेल्या पंजाबी सत्याग्रहींना उत्सुकता अधिक. दुपारपासूनच वाट पाहत होते सारे त्यांची. एकदाची संध्याकाळ झाली अन् जेलबाहेरून घोषणा यायला सुरवात झाली. घोषणा ऐकून आम्ही जेलातील मंडळी जेलच्या गेटवर जमलो अन् आम्हीही घोषणा द्यायला सुरवात केली. आतून-बाहेरून होणाऱ्या आमच्या घोषणांनी सारा जेल दणाणून गेला. एकमेकांना भेटण्याची विलक्षण उत्सुकता होती. आतल्यांना अन् बाहेरच्यांनाही. जेलचे सारे सोपस्कार पूर्ण करून ती तुकडी आत आली. तिचे नेतृत्व करीत होते फतेहाबादचे चरणजितसिंग.

शंभरावर संख्या असलेल्या या तुकडीने आत प्रवेश केला अन् परत एकदा जल्लोष उडाला घोषणांचा. जुने अन् नवे सत्याग्रही 'सत् श्री अकाल'च्या घोषणा देत भेटत होते एकमेकांना. ओळखीची देवाणघेवाण झाली. नवीन आलेल्या तुकडीला बाजूची एक बराक खाली करून देण्यात आली. पाचशेच्या वर माणसं बसतील एवढी मोठी बराक होती ती. आमच्या पुढच्या प्रशिक्षणासाठी साहेबांनी तीच बराक निवडली. रोज शंभर सत्याग्रही येणार. तेव्हा एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या माणसांना एकत्र बसण्यासाठी दुसरी मोठी जागाही नव्हती.





आलेल्या तुकडीचे नेते श्री. चरणजितसिंग हे भारतीय किसान युनियनचे एक मोठे कार्यकर्ते. चाळिशी ओलांडलेले. पुढे त्यांची अन् माझी बराच वेळ चर्चा होई जेलात. माणूस बोलून मोकळा, स्पष्ट विचार मांडणारा अन् वृत्तीने धार्मिक. बोलताना एकदा ते मला म्हणाले होते,

''वकीलसाहेब, तुम्हाला वाटतं का, या सत्याग्रहाच्या मार्गाने, शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या पूर्ण होतील म्हणून?''

काय उत्तर देणार मी? शेतकऱ्यांच्या मागण्यांना सरकारनं जी वागणूक दिली ती इतकी स्पष्ट होती, की चरणजितसिंगांच्या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नव्हतंच. तरीही मी साहेबांचीच रेकॉर्ड वाजवली. शांततेच्या मार्गावर आमचा अढळ विश्वास आहे. आंदोलनाने शांततेच्या मर्यादा ओलांडल्या तर शासन निर्दयपणे चिरडून टाकील हे आंदोलन. शासनाकडे अत्याधुनिक शस्त्रे आहेत, प्रचंड माणूसबळ आहे, संघटन आहे व सर्व सत्ता आहे. या सर्वांना आपल्याजवळ काय उत्तर आहे? वगैरे वगैरे मुद्दे मी मांडले. माझ्या बोलण्यातला फोलपणा मलाही जाणवत होता; पण खरंच हिंसा हा पर्याय होऊ शकत नाही यावर संघटनेची अढळ श्रद्धा आहे. चरणजितसिंगांनी पुढे जे विधान केलं तेच विधान पुढील एका बैठकीत बीडीओ कर्तारसिंग यांनी केलं,

''आजपावेतो गेल्या दहाबारा वर्षामध्ये भारतीय किसान युनियनने अनेक सत्याग्रह केले. प्रचंड मोर्चे काढले. जेल नोंदवला. काय परिणाम झाला? आमच्या मागण्यांना वाऱ्यावर सोडून देण्यात आलं. एवढं कशाला, मार्चच्या महिन्यात हजारो शेतकऱ्यांनी चंडीगडच्या राजभवनाला घेराओ दिला होता. हा घेराओ तब्बल आठ दिवस चालला. या दिवसांत एकही अनुचित प्रकार घडला नाही. शेवटी सरकारनं करार केला, कमिटी नेमली. तिचा रिपोर्टही आला. त्यालाही आता चार महिन्यांचा काळ लोटलाय. काय झालं त्या रिपोर्टचं? फलित काय त्या घेराओचं? एवढ्या संयमानं राहूनही सरकार अशीच वागणूक देणार असेल तर लोकांपुढे काय पर्याय आहे दुसरा?''

साठी ओलांडलेल्या बीडीओ कर्तारसिंगासारखा शांत, संयमी, आदरणीय व्यक्तिमत्त्व असलेला माणूसही हा प्रश्न विचारतो; म्हणजेच लोकांच्या संयमाचा दोर अगदी तुटेपर्यंत ताणलेला आहे, हे स्पष्ट दिसत होतं. लोकांशी झालेल्या या चर्चेतून हळूहळू पंजाबी मन कळू लागलं होतं. इतक्या थोड्या लोकांना भेटून, इतकी थोडी माहिती मिळून आपल्याला पंजाबी प्रश्नाची पुसटशी का होईना; पण ओळख होऊ शकते

तर सर्व बाजूंनी माहिती गोळा करणाऱ्याला हा प्रश्न कळत नाही, असं कसं म्हणावं? कळूनही डोळेझाक करायची अन् उग्र रूप धारण केलं म्हणजे दडपशाही मार्गाने प्रश्न निकाली काढायचे, संघटना मोडून काढायच्या, लोकांचा कणाच मोडायचा... हीच नीती अवलंबायची होती सरकारला? काय चुकलं होतं बलबीरसिंगांचं? त्यांनी पहिल्या बैठकीतच स्पष्ट सांगितलं होतं,

''पहिले मुश्किलात मोल लेते है, और बाद में हल चाहते हैं.''

हीच नीती अवलंबायची होती तर काय फरक राहिला इंग्रजांत अन् आपल्या सरकारात? फरक नाहीच. गोरा इंग्रज गेला त्या जागी काळा इंग्रज आला. त्यांचीच शोषणाची, दडपशाहीची नीती हे चालवायला लागले आहेत, हे साहेबांचं म्हणणं अगदी सोळा आणे खरं वाटतं.

॥ ११ ॥

सत्याग्रहींची संख्या आता बरीच झालेली होती आणि रोज येणाऱ्या सत्याग्रहींच्या संख्येत भरच पडणार होती, तेव्हा या लोकांच्या प्रशिक्षणासाठी अधिक वेळ द्यायला पाहिजे असं साहेबांनी सुचवलं अन् भूपेंद्रसिंग मान, बिपिनभाईंनी दुजोरा दिला. त्याप्रमाणे २५ जुलैपासून दिवसाची बैठक सुरू झाली. ही बैठकही मोठ्या बराकीतच व्हावी अन् याही बैठकीचं आयोजन मांगेरामजींनी करावं असं ठरलं होतं.

बैठकीसाठी सर्वांनी हजर राहिलंच पाहिजे असं बंधन टाकण्यात आलं होतं. बैठकीत उपस्थितांनी प्रश्न विचारावेत, आपले विचार व्यक्त करावेत, काही मुद्द्यांचा परामर्ष स्वत: घ्यावा, बाकी मुद्दे साहेबांसाठी सोडावेत. साहेब हे सर्वांचं मुख्य आकर्षण होतं. ते बोलायला उभे राहिले म्हणजे ऐकणारे सावध होऊन बसत अन् चित्त एक करून ऐकत.

आज साहेब बोलायला उठले ते समोरच्या लोकांनी विचारलेले प्रश्न, त्यांचे विचार लक्षात घेऊनच.

''आपल्या देशात आज लोकशाही शासन आहे; पण तेही शासन किसानांचंच शोषण करीत आहे. म्हणजे भांडवलशाही व्यवस्थेचंच धोरण ही लोकशाही व्यवस्था चालू ठेवत आहे. भांडवलशाहीत काय होतं? शेतीतील उत्पन्न जितकं स्वस्त, कारखान्यात तयार होणारे कापड जितकं स्वस्त तितकाच कमी पगार कामगारांना अन् अंतिमत: तयार होणारा माल या लोकांच्या कमी पगारावर जास्तीत जास्त भावात विकायचा. अशा तऱ्हेने शोषणातून भांडवलाची निर्मिती करायची. खेड्यातील लोकांनी गाव सोडून शहराकडे जाणं कारखान्यासाठी आवश्यक आहे. त्यांना पाहिजे असतो स्वस्त कामगारांचा पुरवठा. शेतीवर जर पोट भरू लागलं तर खेड्यातील शेतकरी शहराकडे कसे लोटतील? तेव्हा हे लक्षात ठेवायला पाहिजे, की शेतकऱ्यावर होणारा अन्याय हा अज्ञानातून किंवा चुकीच्या धोरणातून होत नाही, तर समजूनउमजून, ठरवून, योजून व्हावा अशाच पद्धतीने चालली आहे आमची लोकशाही. आजही या देशात किती तरी लोक असे आहेत, की ज्यांना या देशाचं नावही माहीत नाही. कुणाला मत द्यायचं, कशासाठी मत द्यायचं हेही त्यांना माहीत नाही. शेवटी निवडणुका हे शासन बदलण्याचं केवळ साधन आहे, धोरण नाही. एक पक्ष जातो अन् सत्तेवर दुसरा पक्ष येतो; पण शोषणाचं काम अविच्छिन्न चालू राहतं. व्यक्ती बदलते; पण प्रवृत्ती तीच राहते. बलराम जाखड स्वत:ला शेतकरी समजतात पण त्यांनीही सांगितलं. 'आम्हाला सर्व कळतं हो, पण काय करावं? ही नोकरशाही आमचं ऐकतच नाही.' *इस नोकरशाहने निकम्मा कर दिया हमको, वरना हमभी आदमी थे किस 'ी काम के.* एकूण काय, सत्ता न इंदिराजींच्या ताब्यात न हातात. ती तर बड्या कारखानदार व्यापाऱ्यांच्या जबरदस्त पकडीमध्ये आहे.''

॥ १२ ॥

तुरुंगात आल्यापासून साहेबांची जरा जवळून ओळख झाली. तेही बारीक नजरेनं हेरीत असावेत. मला नाटकांची, सांस्कृतिक कार्यक्रमाची थोडीशी आवड आहे हे त्यांच्या लक्षात आलं तेव्हा मी काही तरी कार्यक्रम सादर करावा म्हणून त्यांनी मला सांगितलं. तसं मी तुरुंगातल्या मुक्कामाच्या दुसऱ्या रात्री कीर्तनाच्या ढंगातला एक मुक्त कार्यक्रम दिला होता, काही हिंदी गाण्यांचे मुखडे, काही निवेदन या साऱ्यांची खिचडी करून. त्यावर त्यांनी सहजच सांगावं म्हणून सांगितलं असावं असं समजून मीही सहज 'हो' म्हणालो अन् सोईस्करीत्या विसरूनही गेलो. एव्हाना कुणी तरी त्यांना सांगितलं होतं, मी 'गोंधळात गोंधळ' या चित्रपटात काम केलंय म्हणून. वास्तवात ते काम फारच छोटं, म्हणजे अगदी नगण्यच; पण जेलच्या त्या वातावरणात तीही काडी आधार वाटायला लागली. साहेबांनी मला सांगितलं अन् मी आश्वासन देऊन विसरूनही गेलो. काही राजकीय पक्षांच्या मंडळींशी माझी जवळची दोस्ती होती. त्याचा हा परिणाम म्हणायचा. मी

विसरलो; पण साहेब नाही विसरले. ते मला नेहमी आठवण देऊ लागले व प्रत्येक वेळी मी उद्या करतो असं म्हणू लागलो. माझी टाळाटाळ पाहून शेवटी साहेब मला म्हणाले,

''उमरीकर तुमचं नाव बदलून मी 'उद्याकर' ठेवणार आहे !'' तेव्हा मात्र मी ओशाळलो अन् बैठक मारून लिहायला बसलो.

तुरुंगात सादर करायचा म्हणजे कार्यक्रमाला बऱ्याच मर्यादा येणार. मुख्य अडचण भाषेची. मी कार्यक्रम सादर करणार मराठीत अन् समोर ऐकायला बसणारी पब्लिक फक्त पंजाबी भाषा समजणारी ! कार्यक्रमात भाग घेणारे कलावंतही मोजकेच. मोजके म्हणजे काय मराठी कंपनीपैकी श्री. शरद जोशी, विजयबाबू, राजकुमार मजगे व मी बाद. तेव्हा नेमका तिघाचौघांत सादर करता येईल असा कार्यक्रम अन् तोही रंजक असा सादर करायचा. पुराणातल्या कथेप्रमाणे हिरण्यकश्यपुला तर मारायचं; पण दिवसा नाही, रात्री नाही, शस्त्रानं नाही, अस्त्रानं नाही इत्यादी अटीवर.

हे सारं लक्षात घेऊन मी वगाच्या ढंगात कार्यक्रम सादर करायचं ठरवलं. वग हा प्रकार एरवीच मला विशेष आवडतो. संपूर्ण वग लिहून सादर करणं तर शक्यच नव्हतं. निदान गणगौळण तरी सादर करावी असं ठरवलं अन् गण, गवळण लिहून काढली. सत्याग्रहीपैकी बबन शेलार, बाबूराव हाडोळे अन् नाना जाधव यांना हाताशी धरलं. बबन झाला मावशी, नानाला केलं कृष्ण अन् 'आईये और देखिऐ पेंद्या और गवळण के डबल रोल मे देवर्जन के खास अदाकार - बाबूराव हाडोळे को !' कलावंताचं नाव अन् हाडोळे! कसं वाटतं नाही? पण म्हणतात ना, नावात काय आहे. गुलाबाचं फूल इज आफ्टर ऑल गुलाबाचं फूलच. तुम्ही त्याला कोणत्याही नावाने हाक मारा किंवा कुठलंही नाव ठेवा! वगैरे वगैरे.

सव्वीस तारखेला शे दीडशेपंजाबी अन् नऊ उणे तीन एवढ्या लोकांसमोर आमचा वग सादर झाला. वगच लिहिला होता मी, तेव्हा त्यात माफक का होईना; पण चावटपणा हा होताच. साहेबांपुढे आहे त्या स्वरूपात सादर करायला मला अवघड वाटू लागलं. म्हणून मी साहेबांना ती अडचण सांगितली, तेव्हा ते म्हणाले,

''मला एवढं सोवळं समजता का हो? आधी कार्यक्रम सादर तर होऊ द्या; मग ठरवू किती चावटपणा आहे ते. महत्त्व कार्यक्रम होण्याला, लोकांना गुंतवून ठेवण्याला आहे.'' तेव्हा आम्ही निर्धास्त झालो.

आमच्या बराकीसमोरच्या मैदानावरील हिरवळीवर आमचं स्टेज उभं राहिलं.





उभं कसचं राहिलं! बसलंच म्हणा की, 'उभे' व्हायला स्टेज होतंच कुठं ! जमिनीवरच, प्रेक्षकांच्या पातळीवरच आमचं स्टेज होतं. नाही तरी प्रेक्षक आणि रंगमंचावरील कलावंत यांच्यात सुसंवाद स्थापित होणं वगैरे वगैरे आवश्यक आहेच म्हणतात. तेव्हा हेही पुण्य अनायासे पदरात पाडून घेतलं आम्ही. प्रायोगिक का काय म्हणातत ती रंगभूमी उभी केली आम्ही जेलात. चंडीगडच्या जेलात शंभरी वगैरे साजरी केली तर आमच्या नावे 'ह्या जेलमधील पहिला प्रायोगिक कार्यक्रम सादर केला' या सदराखाली आमचा एखादा मिशा फाकवून हसतानाचा फोटो लावायला काही हरकत नसावी. माझी हरकत नाही म्हणत मी, सरकारची !

हां. तर कार्यक्रमाचा पडदा उघडला- सॉरी, आता पडदा नव्हताच तेव्हा तो उघडणार कसा? पण प्रघात म्हणून म्हणायचं एवढंच. रंगमंचावर सूत्रधार म्हणून आमचा प्रवेश. सुरवातीला वगनाट्य म्हणजे काय, गणगवळण काय असते याबाबत निवेदन. याबाबत परंपरा काय हेही निवेदन- लाइटस् ऑफ- परत सॉरी. लाइट्स नव्हतेच तेव्हा ऑफचा प्रश्न नाही. सूत्रधाराचे गमन आणि नतर नसलेल्या वाद्यांच्या कडकडाटात गण सादर-

*सिद्धी विनायक श्री गणराया, कारागृही या, या हो जागरा ।*
*भाव शुद्ध मनी घेऊन आलो, आलो आम्ही पावन झालो ॥धृ०॥*
*शोषण करण्या शेतकऱ्यांचे, भले भलेही पुढती आले*
*शोषित पीडित बळीराजाला, आशीर्वच द्या, कारागृही या ॥१॥*

गण संपला अन् गवळण सुरू झाली, कृष्ण-पेंद्याची, पारंपरिक वळणांनी जाणारी; पण शेतकरी संघटनेच्या मागणीचे संवाद पेरलेली गवळण आम्ही पेश केली. त्याही गोष्टीला आज इतका काळ लोटलाय; पण आणखी आठवतं ते बबन शेलार अन् बाबूराव हाडोळे यांचं लचकणं अन् मुरका मारणं. बबनचं एक ठीक- त्याची अंगकाठी बारीक तेव्हा त्याला लवलवणं जमेलही; पण बाबूराव म्हणजे तगड्या शरीराचा जवान, त्याचं लचकणं म्हणजे कल्पनेच्याही पलीकडचं असं त्याला पाहून वाटणार; पण या बुवाचं शरीर मात्र रबरी त्यामुळे त्याचं लचकणंही लाजवाब !

पंजाबी लोकांना मराठी भाषेतला वग काय कळणार म्हणा; पण त्यांनी आम्हा मराठी माणसांचं हसणं ऐकलं, अभिनय पाहिला, गाणी ऐकली. त्यावरून हा काही तरी मजेशीर प्रकार असावा असं वाटलं त्यांना. निदान बबन अन् बाबूराव यांचं लचकणं,

मुरडणं, मुरका मारणं हे तर त्यांना कळत होतं. आमचा वग पार पडला एकदाचा. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला, तो कडकडाट, 'संपला एकदाचा वग' असं समजून केला की एवढ्या दूर महाराष्ट्रातून आलेल्या पाहुण्यांनी एवढं केलं, त्यांचं कौतुक नको करायला? असं समजून केला हे तेच जाणोत. आम्ही आपलं सोईस्कर समजतो, आमचा वग फार आवडला त्यांना!

हा प्रकार एकदाचा पार पडला अन् पंजाबी कंपनीनं माझ्याजवळ आग्रह धरला. हाच प्रकार पंजाबी भाषेत सादर करावा म्हणून. गणगवळण हा तर एक अस्सल मराठी प्रकार, इकडच्या वातावरणात वाढला, पोसला. त्यातील पारंपरिक कल्पना मराठी माणसाला परिचित. पंजाबी लोकांचं ग्रामीण जीवन तसं आपल्याला अपरिचित अन् भाषा तर माहीतच नाही. या अडचणींचा पाढा त्यांच्यासमोर ऐकवूनही मंडळी ऐकायला तयार नव्हती. उरवळ्याला पुरवठा साहेबांचाही त्यांना पाठिंबा नव्हे फूस !

"कुठे अवॉर्ड मिळणार आहे आपल्याला? त्यात काय एवढा विचार करायचा? काही कमीजास्त झालं तर कुणी नाव ठेवणार नाही. कशाला फार विचार करताय?" साहेबांचा निकाल म्हणजे सुप्रिम कोर्टाचा निकाल- त्यावर अपील नाही. वकीलसाहेब आता सुटका नाही, 'आलीया भोगासी'...

तेव्हा बिसमिल्लाह म्हणलं, बलवंतसिंग नावाच्या पंजाबी युवकाला हाताशी धरलं अन् नारळ फोडला. बलवंतसिंगला मी एकेक प्रसंग, संवाद समजावून सांगितले, पार्श्वभूमीसह मूळ संवादात काही बदल करून अन् तेही हिंदीत रूपांतरित करून, त्यानं ते पंजाबीत अनुवादिले. गाण्यात बदल करता नाही आला. आपल्या गवळणीत मावशी हा प्रकार रूढ आहे; पण पंजाबी लोकांना 'मावशी' हा प्रकारच माहीत नाही. गवळणीतल्या रूढ अर्थानं तेव्हा त्यांच्याकडच्या परंपरेत 'मावशी'चं कलम केलं अन् 'भाभी' आणली. ते लोक भाभीमधल्या पहिल्या 'भ'चा उच्चार 'प' करतात अन् दुसऱ्या 'भ'चा 'ब' करतात. कृष्णाऐवजी जितू अन् पेंद्याचा झाला'रितू'- कृष्ण म्हणजे केला ग्रामीण पंजाबमधील युवा किसान नेता अन् पेंद्या- म्हणजे रितू- हा गावात उंडारणारा चावट तरुण, जितूचा मित्र. इथपर्यंत ठीक.

आता प्रश्न 'पाबी' ची भूमिका कुणी करायची? इतक्या संख्येत असलेल्या दाढीदीक्षित पंजाब्यांतून कुणी या लिंगबदलासाठी तयार होईना. शेवटी दाढीमिशांच्या जंजाळलेल्या चेहरेवाल्या बलवंतसिंगाने ती जिम्मेदारी घेतली. आता बलवंतसिंगाचा





चेहरा म्हणजे चेहऱ्यावर दाढीमिशा नाहीत, तर दाढीमिशांच्या जंजाळातून, ओठ, नाक अन् दोन डोळे एवढ्यातूनच उरलंच असेल काही तर तो चेहरा. परमेश्वरा, आम्ही केलेल्या पापासून वाचीव रे बाबा आम्हाला अन् पंजाबी प्रेक्षकांना! नाना जाधव झाला तरुण ग्रामीण नेता अन् पेंद्या झाला एक पंजाबी तरुण. नानाने त्याचे पंजाबी संवाद मराठीत लिहून घेतले. बराकीमागच्या मैदानात एका बाजूला दोन दिवस आम्ही तालमी केल्या. पंजाबी लोकांत विलक्षण उत्सुकता निर्माण झाली होती. एक तर तालमीच्या वेळी आम्ही कुणाला जवळही फिरकू देत नव्हतो. शिवाय पंजाबीत हा प्रकार नवीन नि त्यावर जेलमध्ये कुठली करमणूक असणार? तेव्हा प्रत्यक्ष प्रयोगापूर्वी जबरदस्त कुतूहल होतं.

इंतजार की वो घडियां खत्म हुई और जिस घडी का इंतजार था वो आ गयी! तीस तारखेला, संध्याकाळी साहेब, भूपेंद्रसिंग मान व इतर गुजराथी, हरियानवी मान्यवरांच्याच नव्हे तर तीनचारशे सत्याग्रही व जेलमधील इतर कैद्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम मैदानात सुरू झाला. थेटर परत तेच, रंगमंचही तोच, पडदा किंवा बिनपडदाही तोच. अगोदर वग या लोककलेबद्दल दोन मिनिटांत 'सरल हिंदी में' निवेदन अन् समोर प्रेक्षकांत बरेचसे वयस्क अन् आदरणीय माणसं बसली होती, त्यांची माफी मागून कार्यक्रम सादर केला. माफी यासाठी मागितली, की वगातील बरेचसे उल्लेख 'मांसाहारी' होते. शिवाय त्या 'मांसाहारात'ही आम्ही अस्सल पंजाबी चव आणली होती. साहेबांच्या आक्षेपांचा प्रश्नच नव्हता, कारण हे संवाद पंजाबी भाषेत होते अन् ती भाषा साहेबांच्या आवाक्याबाहेर होती. हां, तर माफी यासाठी, की नंतर कुणी काही बोल लावू नये. लोकांनी प्रयोगाची मजामात्र मनसोक्त लुटली. त्यांना सुरवातीचा गण कळला नाही, तो होता मराठीत; पण त्यातील कोरस कळला. त्यांनी केलेल्या कौतुका (?) मुळे आम्हा मंडळीच्या अंगावर मूठभर मांस चढलं. त्यांचं ते सातमजली हास्य अन् प्रतिसाद पाहून बरं वाटलं. पंजाबी लोक म्हणजे तसे खुलुम खुल्ला. आतबाहेर वेगळं नाही. आवडलं तर मनसोक्त दाद देणार. आमचा वग म्हणजे तसा सारा मामला सुमारच; पण म्हणतात ना भुकेला कोंडा अन् निजेला धोंडा. तुरुंगातील त्या वातावरणात त्या खेडुतांना आमचा वग म्हणजे मेजवानी वाटली, ती त्यामुळेच. तरुणांना तर एरवीच 'मांसाहार' पसंत! पण वयस्कांनीसुद्धा त्यातला 'आनंद' लुटला. लगेच काही जणांनी आणखी कार्यक्रमाचा आग्रह धरला. त्यामुळे मी एक अख्खा वगच हिंदीत लिहायला घेतला अन् पुराही केला; पण तो सादर होण्यापूर्वी एका भाषणाच्या वेळी साहेबांना घेरी आली अन् त्यांना दवाखान्यात हलवावं

लागलं. कदाचित हृदयविकाराचा झटकाही असू शकेल; पण त्यामुळं सारा रंगच बदलून गेला, जेलवर अवकळा पसरली अन् सारा उत्साहच संपून गेला अन् हिंदी वर्गाची कल्पना बारगळली.

॥ १३ ॥

आज एक आठवडा झाला तुरुंगात आल्याला. आवडीनिवडीप्रमाणे लोकांनी आपापले गट तयार केले होते. एव्हाना त्या गटांना आम्ही वेगवेगळी 'नावं' ठेवली होती. हरियानवी मंडळीचा आवडता 'टाइमपास' म्हणजे चिलीम ओढण्याचा. तो एक मोठाच कार्यक्रम सांग्रसंगीत! चिलमीसाठी सारखा विस्तव पाहिजे. म्हणून धुनी तयार पाहिजे. त्यासाठी खापराची एक धुनी तयार केली. त्या खापरात विस्तव सतत पेटता राहिला पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे. मग चिलमीत तंबाखू किंवा इतर काय 'द्रव्य' असेल, ते भरणे. चिलमीच्या टोकावर विस्तव ठेवणे. एखादं फडकं ओलं करून त्या चिलमीभोवती गुंडाळणे अन् मग उकिडवं बसून 'हो जाने दो, दो दो दम !' म्हणून या कंपनीचं नाव ठेवलं होतं, 'दम मारो दम क्लब!' साऱ्या गडबडगोंधळात ही मंडळी मात्र आपल्यात अन् आपल्या चिलमीत मश्गुल! त्यांना कपंनी द्यायला कधी कधी पहाऱ्यावर नसलेली हरियानवी शिपाई मंडळीही यायची. धुनीभोवती कोंडाळं करून बसलेल्या या हरियानवी लोकांत काय खुसरपुसर चालत असेल कुणास ठाऊक! तोंडानं ते बोलायचे की डोळ्यांनी! पण त्यांच्या बोलण्याचा आवाज कधी तोंडाबाहेर पडला नाही अन् पडणार तरी कसा म्हणा, तोंड चिलमीनं नाही तर धुरानं भरलेलं; मात्र बैठकीची वेळ कधी टळू दिली नाही या कंपनीनं.

याविरुद्ध गुजराथी कंपनी. भूलाभाई, बालूभाई, बिपिनभाई अन् गुणवंतभाई अन् मराठी कंपनीपैकी विजय जावंधिया अन् मी. आम्ही निखळ शाकाहारी माणसं! राहणं, बोलणं, खाणं, पिणं कसं अगदी सोवळ्यात, डोक्याची 'गंगा-भागीरथी' फक्त केलेली नव्हती एवढंच. अंथरूण, पांघरूण कसं अगदी व्यवस्थित, साफसूफ. त्यामुळं या कंपनीला नाव दिलं होतं, 'तुलसीमाला क्लब' अन् बाकीची मराठी कंपनी म्हणजे बबन, अर्जुन, नाना, राजकुमार, बाबूराव अन् बद्री अन् या साऱ्यांचे सिपाहसालार स्वत: साहेब. या साऱ्यांचा 'क्रांती क्लब.' बोलणं जहाल, वागणं फिकीर नॉट. नऊपैकी साहेबांचा अपवाद वगळता सारे मांसाहारी, खाण्यासाठी पृथ्वीवरील चालणारा कुठलाही प्राणी यांना वर्ज्य





नव्हता. आला दिवस हसतखेळत घालवणारे, कुठल्याही चिंतेच्या खाली न दबता. पैकी आमचा 'तुलसीमाला क्लब' अधिक प्रसिद्ध झाला किंवा खरं सांगायचं तर तो एक विनोदाचा विषय झाला होता. हां, कुठल्याही काळात असंस्कृत लोकांनीच सुसंस्कृत लोकांवर स्वाऱ्या केल्या आहेत; मग आम्हा 'तुलसीमाला क्लब' बापड्यांचा काय पाड! पटेल हे तर कुठलं तरी धार्मिक पुस्तक वाचत बसायचे. अवतीभोवतीच्या या 'मांसाहारी' वातावरणात धार्मिक पुस्तकांचे वाचन म्हणजे फारच झालं. हां, आता भांगेतही तुळस असते म्हणा! थोरले पटेल म्हणजे भूलाभाई यांना निरनिराळ्या चटण्या बनवण्याचा छंद. त्यासाठी निरनिराळ्या वस्तू आणवून घेत ते. आमच्या या क्लबचं सदस्यत्व अर्थात मर्यादित होतं. आमच्या कडकपणामुळे क्लबच्या कार्यक्रमापासून बाकी जनता दूर राहत असे. पैकी भूपेंद्रसिंग मान हे आमचे कायम आमंत्रित सदस्य होते. इतरांपैकी साहेबमात्र आमच्या क्लबची खिल्ली तर उडवायचेच, शिवाय आमच्या शाकाहारी आयटेमवरही त्यांचा डोळा असायचा. एरवी कडक इस्त्रीच्या चेहऱ्याची ही मंडळी साहेब आले, की मुक्त हास्यात बुडून जायची. जनसामान्यांपासून इतकं दूर कसं राहवत असेल या लोकांना? पण आपणहून सहसा कुणाला बोलणार नाहीत. साहेबांच्या अगदी विरुद्ध टोक. साहेबांची बातच न्यारी. ते बोलायचे अन् बोलतं करायचे. विचार करायचे अन् विचार करायला लावायचे. तो तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग, नव्हे ते तर त्यांनी अंगीकारलेलं कार्य!

॥ १४ ॥

तीनचार दिवस वय विसरून सतत व्हॉलीबॉल खेळले साहेब, त्याचा परिणाम आज जाणवला. त्यांनी सव्वीस तारखेला पूर्ण विश्रांती घेतली. त्यामुळे आमचं प्रशिक्षण शिबिर मांगेरामजी मलिक यांनी चालवलं. संध्याकाळी नेहमीप्रमाणे एक नवीन तुकडी आली सत्याग्रहींची. जवळजवळ दीडशे माणसं होती तीत. परत एकदा घोषणा. परत एकमेकांच्या ओळखीपाळखी. नवीन लोकांना उत्सुकता असायची 'सर्द जोसींना' पाहण्याची. साहेबांना नीट नीट शरद जोशी म्हणणारा पंजाबी विरळाच. लोकांनी साहेबांचं नाव ऐकलेलं होतं. मार्चच्या घेराओमधील त्यांच्या कामगिरीमुळे साहेब सर्वदूर तसे परिचित होते नावाने. चर्चाही खूप झालेली होती त्यांच्यासंबंधी. त्यामुळे हेही एक रुटीन झालं होतं. नवीन तुकडी आली, की सामान टाकल्याबरोबर एकेकानं येऊन बोळीत उभं

राहायचं, खोलीच्या दाराशी थोडं घोटाळायचं, थोडी हिंमत बांधून साहेबांचं 'दर्शन' घ्यायचं, मागच्या पावली परत जायचं. एखादा धीट रावळा खोलीत धडकायचा, 'सत् श्री अकाल' म्हणायचा. 'की गल है' विचारायचा अन् धन्य धन्य होऊन परतायचा. तो सारा प्रकार पाहून बबन म्हणायचा,

''जय देवा खुशाल ठेवा ! एकेकानं नारळ फोडला असता 'सर्द जोसी'पुढे, तर गूळ खोबरं तरी खायला मिळालं असतं.''

गेल्या दोन दिवसांत जवळजवळ अडीचशेवर सत्याग्रहींची आवक झालेली होती जेलात. नवीन आलेल्या माणसांत कर्तारसिंग बीडीओ नावाचे एक सज्जन कार्यकर्ते होते, साठीतले. गृहस्थ स्वभावानं अत्यंत शांत, विचारी अन् प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा. चेहऱ्याकडे पाहिलं, की कुणालाही आदर वाटावा. फाळणीपूर्वी लाहोरजवळ कुठे तरी शेती होती यांची पाकिस्तानात. फाळणीनंतर निर्वासित होऊन पंजाबात आले. भारत सरकारने त्यांना तिकडच्या जमिनीच्या मोबदल्यात इकडे जमीन दिलेली. कुटुंब बरंच मोठं. चार भाऊ, भावांची मुलं-मुली, एकूणच कारभार मोठा. पंजाबात गटविकास अधिकारी म्हणून नोकरी केलेली. त्यामुळे त्यांना सारे लोक बीडीओसाब याच नावाने हाक मारायचे. आल्यापासून बैठकीचं संयोजन करायचं काम त्यांच्यावरच सोपवलेलं होतं. दररोज नवनवीन लोक जेलमध्ये यायचे. बहुतेक सारे अशिक्षित, सामान्य वकुबाचे. त्यामुळे रोज बैठकीत प्रतिपादन करताना साहेबांना भाषा फारच सोपी ठेवावी लागे. खूप मोठा विचार; पण अत्यंत सोपा करून सांगावा लागे. ती हातोटी नाही तरी त्यांना साधलेली होतीच. आम्हाला तर रोज नवनवे विश्लेषण ऐकायला मिळे.

रोजच्याप्रमाणे सुरुवातीला भूपेंद्रसिंग मान बोलायला उठले. सर्वांच्या मनात जोल कमिटीबद्दल उत्सुकता होतीच. तेव्हा त्यांनी तोच विषय छेडला,

''मार्चमध्ये पंजाबी शेतकऱ्यांनी आठ दिवस घेराओ केला होता चंडीगडच्या राजभवनाला. त्याची परिणती एका करारात झाली होती. त्या कराराआधारे गव्हाच्या किमतीचा प्रश्न जोल कमिटीकडे सोपवण्यात आलेला होता. या कमिटीने मुदतीच्या आत आपला अहवाल सादर केला सरकारला. ज्या कराराआधारे ही कमिटी कायम करण्यात आली, त्या करारात भारतीय किसान युनियन ही एक पार्टी आहे. शासनाला जेवढा हा रिपोर्ट समजून घेण्याचा हक्क आहे तेवढाच किसान युनियनलाही आहे; मग हा रिपोर्ट शासनाकडे आलेला असूनही शासन हा रिपोर्ट आमच्यापासून का लपवून ठेवत





आहे? याचं कारण म्हणजे या रिपोर्टात हे स्पष्ट नमूद करण्यात आलेलं आहे, की गेल्या दहा वर्षांपासून शासनाने जाणूनबुजून गव्हाला कमी किंमत देऊन शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय केलेला आहे. तेव्हा शेतकऱ्यांना आपल्या न्याय्य हक्कासाठी लढावं लागणार आहे.''

एकूणच प्रकारामुळे किसानांमध्ये एक प्रकारचं वैफल्य आलेलं होतं. तेव्हा या वैफल्यातून बाहेर काढून त्यांना लढ्यात नेणं आवश्यक होतं. त्यासाठी प्राप्त परिस्थितीतून मार्ग कसा काढता येईल याचाही विचार व्हायला पाहिजे असाही सूर लोकांच्या प्रश्नातून येत होता. हे सारं ध्यानात ठेवून साहेब बोलायला उठले.

''भारताला स्वातंत्र्य मिळालं ते अपार कष्ट करून आणि आता किसानांना त्यांना हवं असलेलं ते स्वातंत्र्य पाहिजे असेल तर अपार कष्टाची तयारी ठेवायला पाहिजे. त्यासाठी गावबंदी, धान्यबंदी, कर्जबंदी असे अनेक कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला, तरच घामाचं दाम पदरात पडेल. आता आपण जेलमध्ये आहोत. जेल आपल्यासाठी तपश्चर्येचं ठिकाण आहे. आपण सत्याग्रही आहोत म्हणजे सत्यासाठी जगणारे आहोत. म्हणून सर्व अन्यायाविरुद्ध जागरण हे आपलं कर्तव्य आहे. पंजाबनं १९८० पासून आंदोलन चालवलं आहे, कशासाठी? वीजबिलाच्या योग्य आकारणीसाठी. मी तर म्हणतो वीज बिल किती आकारायचं आहे ते आकारा. त्याला आमचा विरोध नाही; मात्र जे बिल आकाराल तेवढी रक्कम धान्याच्या किमतीत धरा. ही आमची मागणी आहे. शासन पंजाबातील सर्व गहू, तांदूळ खरेदी करतं, तेव्हा किंमत आकारताना हेक्टरी विजेचं बील धरलं जातं ७८/- रुपये अन् प्रत्यक्षात विजेचा खर्च येतो हेक्टरी १५३/- रुपये, हे असं का? लोकांच्यापासून त्यांच्या गरिबीचं खरं कारण लपवण्यासाठी शासन अनेक खेळ खेळतं.

हिंदू-शिख असा नवा वाद पंजाबात आहे असा भास तयार करण्यात येत आहे. वास्तवात हा वाद तसा नाही. पंजाबात जवळजवळ ८० % किसान शिख आहेत व बहुतेक सर्व व्यापार हिंदूंच्या हाती आहे. मुळात हा झगडा शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कमी भावाचा. त्याचं दुसरं रूप किसान विरुद्ध व्यापारी. आता व्यापारी हिंदू व किसान शिख म्हणून हा वाद वरवर हिंदू-शिख असं दाखवलं जातं. केरळात बहुसंख्य शेतमालक हिंदू अन् मजदूर हे मुसलमान. तेव्हा त्याचं रूप हिंदू विरुद्ध मुसलमान असं धरलं जातं. खरा झगडा हा गरीब-श्रीमंतांचा. मुळातच तो किसानांना न मिळणाऱ्या भावाचा आहे. याबाबत

शासनाची नीती स्पेनमधल्या बैलाच्या खेळासारखी. स्पेनमधील बैलांचा हा खेळ फार प्रसिद्ध आहे. माजलेल्या बैलाला खेळणारा हातात लाल कपडा दाखवून हुलकावण्या देतो अन् बैल थकून गेला म्हणजे त्याचा वध केला जातो. शेतकऱ्यांना असेच हिंदू-मुस्लिम, हिंदू-शिख या लाल कपड्यांनी हुलकावणी दिली जाते. वर्षानुवर्षापासून सत्याग्रह करून लोक कंटाळले आहेत, तेव्हा काही तरी नवीन आंदोलन होऊ शकतं. भारतातील पंधरा लक्ष टन गव्हापैकी जवळजवळ साडेनऊ लक्ष टन गहू एकट्या पंजाबात पिकतो. ज्या दिवशी पंजाबी शेतकरी हा गहू रोखतील, त्या दिवशी शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याची पहाट होईल.'' साहेब खाली बसले; पण पंजाबी शेतकऱ्यांच्या डोक्यात एक वादळ उभं करून.

॥ १५ ॥

आज चंडीगडचे डिव्हिजनल कमिशनर आले होते साहेबांना भेटायला. त्यांची काय चर्चा झाली ते कळू शकलं नाही आम्हांला. साहेबांना विचारण्यात काही अर्थ नव्हता अन् सांगण्यासारखं काही असतं तर त्यांनी सांगितलंच असतं; पण असं वाटतं, की शासन पेचात आलेलं असावं. चोवीस जुलैपासून रोज किमान शंभर लोक सत्याग्रह करणार होते अन् त्याप्रमाणे होतही होतं. एक तारखेपासून रोज किमान तीनशे लोक सत्याग्रह करणार होते. एक दिवस तर केवळ महिलांचाच सत्याग्रह होणार होता. सत्याग्रहींची संख्या अशीच वाढू लागली तर पंजाबातील तुरुंगही अपूर्ण पडतील. आधीच दहशतवादी व इतर राजकीय पुढाऱ्यांची प्रचंड प्रमाणावर धरपकड झालेली. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अनेक लोकांना पकडून ठेवलेलं. या सर्वांची व्यवस्था इतर कैद्यांपासून अलग करणंही आवश्यकच. अशा परिस्थितीत सत्याग्रहींचा लोंढा थोपवणार कसा? आमच्या पहिल्या तुकडीला सोळा दिवसांचा रिमांड हा अन्याय आहे हे सरकारलाही पटलं असावं ; पण जोशीसाहेबांना आता सोडलं तर सरकार घाबरलं असा अर्थ होईल अन् लोकांत अधिक जोश फैलावेल. बरं तुरुंगात ठेवावं तरी आंदोलन जारी राहणारच. उलट महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता अधिक. बरं साहेबांना इतर कुठल्या तरी तरतुदीखाली अटक केली अन् इतरत्र तुरुंगात ठेवलं तर त्याची अति तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्रात उमटेल अन् सरकारला नेमकं नको तेच घडेल, हीही भीतीच. त्यामुळे सरकारची स्थिती दोलायमान. इकडे सोळा सोळा दिवसांचा रिमांड दिलेला असूनही सत्याग्रहींचे नीतिधैर्य अप्रतिम. ठिकठिकाणी सत्याग्रहींनी रांगा लावलेल्या. बाहेरून आलेल्या वृत्तावरून





जनतेतील सैन्याची दहशतही आता कमी झालेली. खरं सांगायचं तर रोज मरे त्याला कोण रडे असं झालेलं होतं. त्यामुळे लोकांना वाटणारी दडपणाची तीव्रता सवयीमुळे कमी झालेली. एकदा हेही दडपण गेलं, की पंजाबी शेतकरी कुणाच्या बापालाही भिणार नाही, मग तर पंजाबचे तुरुंग तुडूंब भरून वाहतील असा एकूण मामला दिसतो. सरकारची झोप उडाली, ती लोकांचे मनोधैर्य पाहून. कमिशनरांची भेट झाली हे कळल्यामुळे बालूभाईंनी साहेबांना विचारलं,

''क्युं साब, सारो छे ?''

''हा, हा. सारोच छे. आणखी महिनापंधरा दिवस तरी जेलमध्येच सारो छे!'' असं साहेब म्हणाले.

''क्यूं बालूभाई कैसा लगता है? खुष तो हो!'' आईच्या काळजीनं बालूभाई खचलेले. त्यांची आई बरीच थकलेली; पण बालूभाईंवर तिचा भारी जीव. त्यांना पाहिल्याशिवाय जेवणही घ्यायची नाही. आईची आठवण झाली, की डोळे पाणवायचे त्यांचे. एव्हाना त्यांच्याही मनाची तयारी झालेली होती, की काही झालं तरी चार ऑगस्टच्या अगोदर सुटका नाही. मग काळजी तरी कशाला करा? वाघ म्हटलं तरी खाणार अन् वाघोबा म्हटलं तरीही- म्हणून ते म्हणाले,

''हां. हां. साब, आपुन तो खुष है.'' नंतर माझ्याकडे वळून बालूभाई म्हणाले,

''क्यूं तुलसी माला, सारो छे?'' त्यांची ही पलटी पाहून क्षणभर मीच 'सारो छे' झालो.

येणारा प्रत्येक दिवस नवीन माणसं, नवीन विचार, नवीन घटना घेऊन यायचा. आज सकाळपासून चांगलंच अंधारून आलं होतं. सकाळी सहापासून तर चक्क पाऊस पडायला लागला होता. झिमझिम वातावरणात एकूण उदासीनता होती. खिडकीच्या गजाच्या बाहेर पडणारा पाऊस पाहून नक्की काय वाटत होतं कुणास ठाऊक! या नाजूक वेळी साहेबांना आठवलं 'मेघदूत'. कालिदासाच्या या काव्यातील उतारेच्या उतारे साहेबांनी म्हणून दाखवले.

कुणीतरी खिडकीबाहेर पाहून सहज म्हणालं, 'आषाढस्य प्रथम दिवसे' अन् साहेबांची प्रतिभा सरसावली. आकाशातील ढगाला संदेशवाहक होण्याची विनंती करून प्रिय सखीस संदेश पाठवणाऱ्या यक्षाची व्यथा इतकी सुंदर टिपलीय कालिदासानं! सकाळी सकाळी ढगाळ वातावरणात जोशी साहेबांच्या तोंडून स्वच्छ आवाजात उतारेच्या उतारे

संस्कृतातून ऐकणं या अनुभवाला तोड नाही. या आनंदालाही वेदनेची एक कडा होती. आमच्या खोलीत साहेबाबरोबर बद्री अन् विजय जावंधिया या तिघांनीही घर सोडल्याला महिन्यावर काळ लोटलेला. त्यामुळे सर्वांनाच घरची आठवण तीव्रतेने यायला लागली.

साहेबांनी बद्री अन् विजयला विचारलं, ''काय रे, किती दिवस झाले घर सोडल्याला?''

''काय साहेब, दीड महिना झाला. फिरतोच आहे तुच्याबरोबर, तेव्हापासून घरचं तोंडही नाही पाहिलेलं.'' बद्रीच्या बोलण्यावर बबन लगेच साहेबांना म्हणाला,

''तुम्हांला काय त्याचं? अंधे को दिन रात बराबर.''

साऱ्यांनी एकमेकांची थट्टा केली. या थट्टेतही एक हुरहूर जरूर होती. हा हुरहुरीचा क्षण सोडला तर आपण घरापासून फार दूर आहो असं वाटणारे क्षण फारसे आलेच नाहीत.

मेघदूत संपलं अन् साहेबांनी अनेक कवींच्या कविता म्हणून दाखवल्या. अगदी सानेगुरुजींपासून ते मर्ढेकरांपर्यंत सर्व कविता अगदी मुखपाठ. असेच पाठांतर मला नंतर दिसलं होतं दोघांजवळ. एक शंकर वैद्यांजवळ. परभणीच्या कविसंमेलनानिमित्त मी, मूलगीर अन् ते गप्पा छाटत बसलो असता त्यांनी कवितांचं भांडार खुलं केलं. एकाच विषयावरील अनेक कवींच्या कविता काय, प्रेमगीतं काय, काही विचारू नका अन् दुसरे विनय हर्डीकर. सेलूचा कार्यक्रम आटोपून आम्ही साहेबासंगे नांदेडला जात होतो तेव्हा विनय अन् साहेब दोघांत जणू स्पर्धा लागली होती पाठांतराची. साक्षीला होतो मी, गोविंद जोशी अन् इरळदचे रामूकाका. आम्हांला पाठ फक्त एकच कविता. केव्हा तरी प्राथमिक शाळेत पाठ केलेली: *पडू आजारी मौज हीच वाटे भारी.* ही कवितासुद्धा पाठ झाली ती यासाठी की कविता म्हणताच आई रागवायची,

''काय ही दळभद्री कविता म्हणतोस रे? म्हणे पडू आजारी.''

कवितांचा दौर संपला. साहेब आज भलतेच मुडात होते. नंतर त्यांनी हिंदी सिनेगीतांना सुरुवात केली. हा प्रांत तसा आमचा; पण साहेबांनी आक्रमण करावयास सुरवात केलेली पाहून मीही गाणी म्हणावयास सुरवात केली. आपलं क्षेत्र राखायला; पण साहेब आमच्या जन्माच्या घुगऱ्या जेवलेले होते. त्यांचा गाण्याचा स्टॉकही तगडा. त्यामुळे आम्ही याही क्षेत्रात साहेबांपुढे हात किंवा खरं म्हणजे जीभ टेकवली. गाणीसुद्धा साहेब म्हणत ती छान चालीवर. मैफलीत आम्ही रंगून गेलो. सिनेमा, गाणी, आठवणी.





सारा जुना काळ उजळून निघाला. कॉलेजजीवनातील मखमली स्वप्नं समोर उभी राहिली. मैफल संपावी असे वाटेचना; पण वाटून मैफल किती लांबणार. मैफल संपली अन् मी सहज म्हणालो,

''साहेब तुमचं पाठांतर विलक्षण आहे. मेघदूतापासून ती 'सैय्या दिल में आना रे, आ के फिर ना जाना रे'पर्यंत म्हणजे केवढी रेंज आहे. परत कविता, नाटकांतले उतारे आहेतच उरवठ्याला पुरवठा. तुम्हाला नक्कीच दैवी शक्ती आहे.'' मी दैवीशक्ती म्हटल्याबरोबर अंगावरून पाल झटकून टाकावी तसं त्यांनी दैवी शक्ती झटकून टाकली.

''आपला विश्वास नाही या देवावर अन् दैवी शक्तीबद्दल. सगळा खुळचटपणा आहे हा सारा.'' मी अननुभवी म्हणजे साहेबांच्या स्वभावाबद्दल, म्हणून त्यांच्याशी वाद घालायचा खुळचटपणा करून पाहिला.

''मी देवाला मानायला तयार नाही. दैवी शक्तीचा प्रश्नच येत नाही.''

''इथे आपण एवढे लोक बसलो आहो, पैकी तुमच्या एकट्यालाच एवढं पाठांतर कसं?'' मी विचारलं

''देवाला तुम्ही मानता का?'' त्यांनी विचारलं.

''आम्ही देवावर विश्वास ठेवत नाही.'' बाकी सगळे म्हणाले. मीमात्र म्हणालो,

''माझा देवावर विश्वास आहे. मी देवळात जात नाही. जत्रेयात्रेला जात नाही; पण घरी पूजा करतो.''

''देव सर्वसमावेशक आहे असं म्हणतात ना; मग तुम्ही मूर्तीची पूजा का करता?'' साहेबांनी मुद्दाम छेडलं हे लक्षात न येताच मी म्हणालो,

''तसं पाहिलं तर निर्गुण निराकाराची पूजा करायला पाहिजे; पण तेवढी एकाग्रता आलेली नाही, तेव्हा सर्वसमावेशक देवाचं प्रतीक म्हणून या मूर्तीची पूजा करतो मी.''

''बरं. देव हा सर्वकल्याणी, सर्वमंगलदायी आहे असं मानता का तुम्ही? सर्व निर्मिती ही त्याचीच असंही मानता ना तुम्ही?''

''अर्थातच,'' मी

''मग या सर्वमंगल मांगल्य देवानं अमंगल का निर्माण केलं? पाप का निर्माण केलं? सर्वच मंगल का नाही निर्माण केलं?'' साहेबांच्या या प्रश्नाला माझ्याकडे काही उत्तर नव्हतं. माझा या विषयाचा अभ्यास नव्हता,

''साहेब, या विषयाचा माझा अभ्यास नाही. त्यामुळे मी तुम्हाला उत्तर देऊ

शकणार नाही. तरीही मी देवावर विश्वास ठेवतो. शेवटी तोही एक श्रद्धेचाच भाग आहे.'' मी नंतर हाच प्रश्न माझ्या या विषयातील काही अभ्यासक मित्रांना विचारला. देव जर सर्वमंगल मांगल्य तर जगात अमंगल का? पाप का? उत्तरं अनेक आली; पण समाधान कुणी नाही करू शकलं. माझ्या एका मित्रानं सांगितलं, हाच प्रश्न अनेक तत्त्वज्ञान्यांनाही पडलेला आहे. त्याचं उत्तर कदाचित श्री अरविंदांच्या साहित्यात सापडेल. मी आणखी ते साहित्य वाचू शकलो नाही किंवा कुणा जाणकारालाही भेटू शकलो नाही. फारशा वादात न शिरणारे साहेब केव्हा तरी असं अडचणीत गाठायचे.

॥ १६ ॥

आजच्या बैठकीची सुरवात कर्तारसिंग बीडीओ यांनी केली.

''१९४२ मध्ये इंग्रजी अमदानीत सर छोटूराम यांनी इंग्रजी गव्हर्नरलाही गहू विकण्यास नकार दिला होता, योग्य भावाचा आग्रह धरून. महाराष्ट्रात फुल्यांनीही शेतकऱ्यांचा प्रश्न उचलून धरला होता; पण शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या मागे शरद जोशी यांनी जी शक्ती लावली, तिला तोड नाही. आता त्यांनी दिलेल्या विचारांनी राज्याराज्याच्या सीमाही ओलांडल्या आहेत. एवढा तगडा, व्यापक विचार दिला आहे शरद जोशी यांनी.''

चर्चेत सहभागी होत विजय जावंधिया म्हणाले,

''याच वेळेस सर्वांना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जाग का यावी? कीर्ती किसान युनियन, इंदिरा काँग्रेसचे लोक, शेतीमालाला भाव ही मागणी सोडून, बाकी वाटेल त्या मागण्या पुढे करीत आहेत. नेमकं याच वेळेस. इंदिरा काँग्रेसने तर अशा मागण्या मांडल्या की धर्मशाळा, रस्ते, शौचालय आदींसाठी अधिक पैसा ग्रामीण विभागात देण्यात यावा. खतात जी मिसळ दिसून येत आहे तिची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. या अशा मागण्या नेमक्या याच वेळी पुढे येत आहेत, त्या का? भारतातील शेतकरी अधिक प्रमाणात शेतकरी संघटनांच्या पाठीमागे जात आहेत, ही त्यांची पोटदुखी आहे. त्यांना शेतकऱ्यांच्या भल्याबुऱ्याशी काही देणंघेणं नाही.''

शेवटी साहेब बोलायला उठले, ''हे वर्ष स्वातंत्र्यवर्ष आहे. स्वातंत्र्य पदरात पाडून घ्यायचं असेल तर गहू बाजारात येण्यापासून रोखावा लागेल. यात नवीन काही नाही. पूर्वीही सर छोटूराम यांनी इंग्रजांना हेच सांगितलं होतं, की योग्य भाव मिळणार नाही तोपर्यंत गहू आम्ही बाजारात आणणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे कसे





पाहते यासंबंधी नसिरुद्दीनची गोष्ट फार बोलकी आहे. मुल्ला नसिरुद्दीन एकदा त्यांची हरवलेली अंगठी घरात शोधत होते. पाहणाऱ्यांपैकी एकाने त्यांना विचारले, ''काय पाहताय मौलवीजी?'' ''अंगठी'' मुल्ला उत्तरले. यावर तो पाहणाराही त्यांना शोधण्यास मदत करू लागला. त्यानंतर इतरही माणसं त्यांना अंगठी हुडकण्यास मदत करू लागले. अंगठी काही सापडेना. शेवटी कंटाळून एकानं विचारलं, ''मौलवीजी, तुम्ही तुमची अंगठी हरवली तरी कुठे?'' यावर मुल्ला म्हणाले, ''जंगलात !'', ''मग घरात का पाहता? जंगलात का नाही.'' त्यांना विचारण्यात आलं. यावर मुल्ला उद्गारले, ''जंगलात अंधार आहे, उलट घरात पाहणं सोपं आहे म्हणून घरात पाहतो आहे.''

''आपली शेती हा एक जुगार आहे. शेतीत पोट भरत नाही, तरी आपण शेतीच करत राहतो. म्हणजे आपण स्वत:ला खाऊनच पोट भरतो. शेतीच्या उत्पन्नातून शेती होत नाही. म्हणून आपण कर्ज काढतो. अधिक कर्ज, अधिक खर्च, कमी उत्पन्न. असं चाललं आहे रहाटगाडगं. आपलं दुखणं आहे, आपल्या मालाला मिळणाऱ्या अयोग्य भावात अन् आपण त्याची कारणं हुडकून काढीत आहोत इतरत्र कुठेही. मुल्ला नसिरुद्दीनसारखं नुकसान जेव्हा पैशाच्या रूपात होतं तेव्हा ते चटकन जाणवतं, त्याचे चटके लोकांना जाणवतात, पण नुकसान जेव्हा वस्तूच्या रूपात होतं तेव्हा ते फार उशिरा कळतं. हरितक्रांतीचा गवगवा फार झाला, पण ठिकठिकाणच्या शेतकरी संघटनांचा हा अनुभव आहे, की ही हरितक्रांती शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरली नाही. या साऱ्यांचा विचार करता, शेतकऱ्यांना आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी संघटन आवश्यक आहे.''

साहेबांच्या गुडघ्यानं जास्त धरलं आज. त्यामुळे साहेबांनी आज सुटी घेतली; पण सकाळच्या आसनांना नाही. गेल्या काही दिवसांपासून देवर्जनच्या बाबूराव हाडोळे याने योगासन शिकवायला सुरवात केली होती. तेव्हापासून सारे जेलकरी त्यांना गुरुजी म्हणायला लागले. आसन करण्याचा क्रमही ठरला होता. अगोदर साहेब, बद्री अन् बबन हे आसन करायचे. नंतर गुजराथी कंपनी; मात्र ही आसनाची गोडी मी व जावंधिया या दोघांना काही लागेना. गोडीचं काहीही असो; पण आसनासाठी मंडळी भल्या पहाटे उठायची त्यामुळे आम्हालाही त्यांना जागा करून देण्यासाठी पहाटे उठावं लागायचं; हीच खरी बला! पहाटेच्या मस्त झोपेच्या वेळी ही आसनं म्हणजे कोण नतद्रष्टपणा! या पापाबद्दल देव कधी क्षमा करणार नाही कंपनीला. आता साहेब देवच मानत नसल्यामुळे

साहेब स्वत: देवाच्या अधिकारकक्षेबाहेर राहतात की काय, हा भाग अलहिदा. मराठी कंपनीनंतर नंबर लागायचा तो गुजराथी कंपनीचा. त्यानंतर मोठ्या बराकीतील काही लोक व भूपेंद्रसिंग मान यांची पाळी. बाबूराव आसन कामात तज्ज्ञ. त्याचं करकर वाकणारं अंग पाहिलं, की वाटायचं या तगड्या शरीराच्या तरुणाच्या अंगात हाडं आहेतच का नाहीत! एरवी दणकट दिसणारा हा गडी आसन करताना भलताच रबरी होता. कंपनी जी आसनं करीत त्या आसनातही श्वानासन विशेष. कुत्र्यासारखी जीभ काढून ल्याहा ल्याहा करायचं. साहेब, बद्री अन् बबन या मंडळींना हे आसन करताना पाहून एखाद्या चित्रपटात घेण्यासारखा मस्त विनोदी सीन वाटायचा. 'सिंहासना'च्या वेळी तर सारा हॉल दणाणून जायचा गर्जनेनं! सिंहासनात जशी 'सिंहगर्जना' तसं श्वानासन वेळी 'श्वान गुरगुर' का असू नये? बाकी आसनं करताना बद्रीची धडपड 'बघणीय' असायची. बाळसेदार शरीराच्या बद्रीला एकाच वेळी, गुडघे, डोकं अन् पायाच्या अंगठ्याला हाताचा स्पर्श यांचा मेळ जमवणं कधी जमलंच नाही. प्रत्येक आसनात शरीराचा कुठला न् कुठला भाग त्याला दगा द्यायचाच. बद्रीची ही 'आसनकारिता' आमच्यासाठी करमणुकीचा कार्यक्रम झाली होती.

जेलमध्ये आल्यापासून एका वेगळ्या अर्थानं आम्ही लोक संसारी झालो होतो. आता सोळा दिवस जेलमध्ये काढायचे म्हणजे पेस्टपासून साबणापर्यंत अन् साखरेपासून लोणच्यापर्यंत खाण्याच्या वस्तू, तर खेळण्यासाठी कपड्यापासून फूल, बॅटीपर्यंत अनेक वस्तू लागायच्या आणि त्या तशा जमत जायच्याही. विजय बाबू कॉफीचे भक्त, तेव्हा त्यांच्यासाठी कॉफीची बाटली. साहेबांना अधूनमधून चघळायला लागे सुपारी, बबनसाठी विडीकड्डा, राजकुमारला बडीशेप, साहेबांना लपवून माझ्यासाठी पाव अन् सर्वांसाठीच साखर. म्हणून साखर ठेवायला मोठा डबा. मलिकसाहेबांनी दिलेली लोणच्याची बरणी, दही लावण्यासाठी पैदा केलेली काचेची बरणी. एक ना दोन अनेक वस्तूंनी सजला होता, आमचा 'ब्रह्मचर्याश्रम'. वेळोवेळी कुणी गूळ, कुणी बिस्किट पुडे आणून देत. त्यामुळे संसाराला चांगला दृष्ट लागण्यासारखा आकार आला होता. सारा जोडजमाव पाहून बबन म्हणायचा,

''आपण आलो तेव्हा ही खोली कशी रिकामी होती! आता बघा एकेक सामान कसं वाढू लागलंय. लोणच्याची बरणी, मधाची बाटली, सॉस, कांदे, दूध, दही, लोणी, साखर, मला तर वाटतं खोली सोडताना एक बायको सोडली तर सारा संसार जमा झालेला





असेल!''

कुठल्या तरी जिल्ह्यातून आज 'कडा' (आपला शिरा) अन् खीर आली. आली ती डब्यातून नव्हे भांड्यातूनही नव्हे, तर चक्क ट्रॅक्टरमधून! ट्रॅक्टर आला अन् चक्क तुरुंगाच्या महाद्वाराजवळ थांबला. जेलर तो ट्रॅक्टर आत घेईना. तो म्हणे भांडे आत उतरवून आणा. सरदारजी म्हणत 'ट्रॅक्टरमधली भांडी तर बघ, हालवता येतात का याचा विचार कर, शिवाय तुझ्या त्या महाद्वाराच्या दिंडीतून जेमतेम माणूस वाकून जाऊ शकतो. तिथून ही भांडी जाऊ शकतात का तेही बघ अन् भांडी हलवता तरी येतात का याचाही विचार कर. जेलरही असा वस्ताद, की बाहेर येऊन स्वत: वस्तुस्थितीची पाहणी करेना आणि सरदार लोकांची अडचणही लक्षात घेईना. खरं म्हणजे ज्या भांड्यात खीर अन् कडा आणलेला ती भांडी आकाराने प्रचंड, उचलणं अन् दिंडीतून उचलून आणणं अशक्यच. शेवटी सरदारजींनी आपलं धमकीचं अखेरचं अस्त्र बाहेर काढलं. बऱ्या बोलानं महाद्वार उघडलं नाही तर आम्ही ट्रॉली आडवी लावतो अन् ट्रॅक्टर घेऊन जातो! या जेलर लोकांना डोकं वापरण्यास सक्त मनाई करत असावेत कायद्यानं किंवा भरती करताना कमीत कमी मार्क घेणाऱ्यांना प्राधान्य देत असावेत. त्यांचं नेहमी आपलं वरातीमागून घोडं. सरदार लोकांनी दाखवलेली अडचण खरीच होती. तेव्हा नंतर 'हो' म्हणण्याऐवजी अगोदरच 'हो' म्हटलं असतं तर? शेवटी नाइलाजानं जेलरनं महाद्वार उघडलं. एव्हाना जेलर व ट्रॅक्टरवाल्यांच्या या शब्दयुद्धाची बातमी सगळ्या बराकींतून पसरली होती. त्यामुळे आतल्या महाद्वाराजवळ ही गर्दी जमा झालेली! महाद्वार उघडून तो 'रणगाडा' धडधडत आत येताना पाहून लोकांनी *'सत् श्री अकाल'* व *'भारतीय किसान युनियन'*च्या प्रचंड घोषणा दिल्या.

कड्याचा प्रसाद वाटायचं काम अर्थातच बलवंतसिंग या युवकाकडे आलं. त्यांना त्याच्या दृष्टीनं 'प्रसादा'सारखा वाटलेला 'कडा' आम्ही एकेकजण दोन दोन दिवस खातच होतो. प्रसाद म्हणजे आपल्याकडे कसा जेमतेम वास घेण्याइतकी आपल्या हातावर काही तरी वस्तू टाकण्यात येते. मुळात साखर किंवा खोबरं असलेली ती वस्तू हातात पडेपर्यंत रंग बदलून ओळखण्यापलीकडे गेलेली असते; पण या लोकांचा प्रसादाचा 'कडा' म्हणजे चांगल्या तुपात शिजवलेला शिरा. चांगला खात राहण्यासारखा एक पदार्थ. मी तर माझ्या वाट्याचा 'प्रसाद' साखर टाकून पुरवून पुरवून खाल्ला आणि खाऊही घातला. आमच्या ब्रह्मचर्याश्रमाचा कोठीवाला मीच झालो होतो. काय वाटेल ती 'खेय'चीज मागा, क्षणात हजर! अल्लाउद्दीनच्या चिरागातला जिन झालो होतो मी.

सत्याग्रहींच्या तुकड्या जसजशा यायला लागल्या, तसतसं एक मात्र प्रकर्षानं जाणवलं, पंजाबी लोकांत शरद जोशींबद्दल विलक्षण कुतूहल होतं. प्रदर्शनातील वस्तू पाहावी तसं लोक शरद जोशींना पाहायला यायचे. नवीन आलेली माणसं टोळक्या टोळक्यांनी यायची अन् खोलीत जाऊन साहेबांचं दर्शन घ्यायची. दर्शन घेतलेल्या साहेबांचं भाषण दुसऱ्या दिवशी कानात जीव ओतून ऐकायचे. मला तर वाटलं, साहेबांइतका किसानप्रिय माणूस पंजाबात तरी दुसरा कुणी नसेल. पंजाबमधील शेतकरी संघटना तरी इतर प्रांतांच्या तुलनेत जबरदस्त आहे. संघटनेत चांगले कार्यकर्तेही आहेत. तळमळीचे जिवाभावानं काम करणारे नेतेही आहेत; पण साहेबांसारखं उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेला माणूस निदान उत्तरेत तरी नाही. दक्षिणेत कर्नाटक आणि तामिळनाडूत शेतकऱ्यांची संघटना उभी करणारे नंजुडास्वामी अन् कै. नारायणस्वामी नायडू यांसारखी माणसं आहेत-होती; पण लोकांपर्यंत जाऊन भिडणारा खास संदेश नाही. साहेबांनी 'उत्पादनखर्चावर आधारित भाव' हे सोपं अन् चपखल बसणारं सूत्र सांगितलं अन् ते लोकांपर्यंत परिणामकारकरीत्या पोचवलं तसं दक्षिणेत घडवता आलं नाही; तिथल्या नेत्यांना. तत्त्वज्ञानाच्या जोडीला जी रणकुशलता पाहिजे ती या नेत्यांत नाही-नव्हती. आंदोलन प्रभावी करण्यासाठी डावपेचांची आखणी करावी लागते अन् नावीन्यही आणावं लागतं. या सर्वांचीच कमतरता आहे इतर नेत्यांत. त्यामुळे शेतकरी नेत्यांच्या गर्दीतही साहेब म्हणजे,

*क्या रंग, क्या रूप, क्या जमाल है*
*सारी भीड में वो तनहा नजर आते हैं*

तुरुंगातील शिख कार्यकर्त्यांसमवेत आमची वेळोवेळी अनेक विषयांवर चर्चा व्हायची. तशी साहेबांबाबतही झाली. सरदार चरणजितसिंग हेही साहेबांना मानणारे, त्यांचे चाहते, एक भक्तच. भारतीय किसान युनियनचे ते एक उच्च पदाधिकारी. त्यांना साहेबांबद्दल विलक्षण आदर. ते एकदा मला म्हणाले,

"वकीलसाब, आप लोगोंके पास ये व्यक्तिवाद क्यूं?"

"क्यूं, क्या हुवा? किस संदर्भ में आप बोल रहे है ?" मी

"आप लोक ये 'शरद जोशी झिंदाबाद' क्यूं बोलते है? सिर्फ शेतकरी संघटना जिंदाबाद क्यूं नही बोलते ! क्या संघटना से व्यक्ति बडी होती है? क्या आपका ऐसा ही मानना है?" त्यांनी विचारलं.





हा प्रश्न बलबीरसिंगांनी परभणी अधिवेशनातही उपस्थित केला होता. तेव्हा स्वत: जोशीसाहेबांनी सर्वांना आवाहन केलं होतं, शरद जोशी जिंदाबाद ही घोषणा देऊ नये म्हणून. याबद्दल जेलमध्येही माझं साहेबांशी बोलणं झालं होतं. ते स्वत: पंजाबी लोकांच्या मताशी सहमत होते. व्यक्तीचं स्तोम माजवू नये असंच त्यांनीही वारंवार सांगितलं होतं. तोच प्रश्न आताही निघाला. मी चरणजितसिंगांना सांगितलं, की महाराष्ट्र काय; पण हिंदुस्तानही व्यक्तित्ववादीच राहिला आहे. अनेक चळवळी, अनेक कार्यक्रम व्यक्तीभोवतीच फिरत राहिलेले आहेत. भारतात हिंदू धर्मच प्रमुख असल्याने प्रचंड संख्येनं लोक कुठल्या न् कुठल्या देवाला मानणारे. त्यामुळे भक्तीची किंवा कुणा तरी एकाला मानण्याची, एकावर श्रद्धा, भक्ती ठेवण्याची परंपराच निर्माण झाली. यातूनच पुढे निर्माण झाली टिळक, गांधी, नेहरू अशी दैवतं. म्हणून व्यक्तिपूजा आम्हाला मानवते, आवडतेही. म्हणूनच महाराष्ट्रात प्रचंड व्यक्तिमत्त्वाच्या परंपरा निर्माण झाल्या. आम्ही व्यक्तीतून तत्त्वाकडे जातो. उलट शिख हे मूर्तिपूजा न करणारे व समूहवादी. त्यामुळे पंजाबात एक नेता असा आढळत नाही. कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या असूनही ज्याला अख्खा पंजाब मानेल असा एक नेता दिसत नाही. टिळक, गोखले, रानडे, फुले, आंबेडकर अशी एक परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली. पंजाबात अशा सर्वमान्य व्यक्तिमत्त्वाची माणसं फारच कमी किंवा नसल्यातच जमा. हा एकूणच दोन प्रांतांतल्या जडणघडणीचा फरक. व्यक्तिवाद इष्ट का अनिष्ट हा मुद्दा बाजूला ठेवूनही मलामात्र असं वाटतं, की संघटनेला मोठं करण्यासाठी व्यक्ती मोठ्या व्हाव्या लागतात. व्यक्तीचं मोठेपण संघटनेला असं पूरकच ठरतं. शिवाय मराठी माणसाला अगोदरपासून आधाराची सवय झालेली. शिवाजी महाराजांना पाहिल्यावरच आपण हर हर महादेव म्हणणारे." माझ्या युक्तिवादानं चरणजितसिंगांचं समाधान झालं किंवा नाही, कुणास ठाऊक! पण त्यांना पडलेल्या प्रश्नाची उकल करण्याचा एक मार्ग तर सापडला त्यांना.

**॥ १७ ॥**

आज तीस तारीख जुलैची. म्हणजे बरोबर अकरावा दिवस तुरुंगातला. एकीकडे वेळ कसा चालला होता हे कळेना असं म्हणावं, तर दुसरीकडे दिवस मोजतो आहे. मला वाटतं, दोन पातळ्यांवर मनाचा कारभार चालला असावा आमचा. वर वर कुठे खूष असलो तरी आत सुटकेची वाट पाहत होतो. "सावरकर, जन्मठेप म्हणजे किती काळ

असेल हो?''

साहेबांनी आजच्या सभेसाठी विषय घेतला होता 'संघटन'.

''शेतकऱ्यांचं संघटन पाहिजे कशासाठी? शेवटी संघटन म्हणजे तरी काय? एक काठी तोडता येते; पण दहा काठ्या तोडता येत नाहीत. याला संघटन म्हणतात. लोखंडात जर वीज सोडली तर त्यातील सर्व कण एका दिशेने होतात व त्यात चुंबकत्व येते. ही शक्ती आली कुठून? सर्व व्यक्ती जेव्हा एका दिशेने चालतात, विचार करतात तेव्हा शक्ती येते. घोषणा देताना क्षणभर का असेना आम्ही स्वत:ला विसरून एका महान शक्तीचा भाग बनतो. आपलं शरीर हेच मुळी एक उत्तम नमुना आहे संघटनेचं. शरीरातील सर्व कण शेवटी एका आज्ञेत बांधलेले असतात. संघटनेसाठी हे आवश्यक आहे, की काही काळ का असेना वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून समूहाचा विचार करायला पाहिजे.''

गेल्या दोन-एक दिवसांपासून सत्याग्रहींची धीटाई अधिक वाढलेली आहे. रोज चालणाऱ्या अभ्यासवर्गामुळे त्यांचं विचारचक्र वेगात आलं म्हणून असेल किंवा संख्या अधिक म्हणूनही असेल पण लोक अधिकाधिक प्रश्न विचारताहेत आता. दोघांनी केलेल्या प्रश्नाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. दोघांनीही साधारण तोच प्रश्न विचारला होता; पण दोघांचाही रोख वेगवेगळा होता. बीडीओ कर्तारसिंग यांनी साहेबांना सभेत एक प्रश्न विचारला,

''गेल्या दहाबारा वर्षांत आम्ही सत्याग्रह केले, धरणे धरले, मोर्चे काढले, लेखी निवेदनं दिली. सत्याग्रहाचे सर्व मार्ग चोखाळले, तरीही आमच्या प्रश्नांची तड लागत नाही. आता यापुढे काय मार्ग अवलंबायला पाहिजे?'' सर्वांच्याच मनातला हा प्रश्न होता. पुढील आंदोलनाची दिशा सर्वांना जाणून घ्यायची होती. साहेबांनी अत्यंत परखड उत्तर दिलं. पंजाबी शेतकऱ्यांना गहू रोखून धरण्यास सांगितलं होतं काही काळ; पण ती योजना शेतकऱ्यांची पूर्ण साथ न मिळाल्याने ढासळली होती. जेमतेम सातआठ दिवस शेतकऱ्यांनी गहू रोखला. त्यांचा धीर सुटला अन् 'कनक रोखो' बारगळला ! साहेबांचा रोख तिकडेच होता,

''शेवटी ही एक लढाई आहे. लढाईत डावपेच खेळावेच लागतात. स्वातंत्र्यासाठी प्रचंड त्यागही करावे लागतात. आजपर्यंत तुम्ही केलेली आंदोलनं पारंपरिक मार्गाने जाणारी होती, त्यात नावीन्य काहीही नव्हतं आणि अशा आंदोलनांना भीक घालायला सरकार दुबळंही नव्हतं. कुठंतरी सरकारला कोंडीत पकडणारं आंदोलन करायला पाहिजे.





असंच एक आंदोलन म्हणून आम्ही तुम्हाला आवाहन केलं होतं. एक महिना पंजाबात गहू रोखावा म्हणून. तसं झालं असतं तर सरकारला कोंडीत पकडण्यात आपण यशस्वी झालो असतो अन् सरकारनं आपल्या मागण्या विचारात घेतल्या असत्या; पण तुम्हाला जेमतेम आठ दिवस दम धरवला अन् तुमचा गहू मंडईत आला. लढा लढण्याची ही रीत नाही. त्याग केल्याशिवाय कुणालाही स्वातंत्र्य मिळालं नाही अन् स्वातंत्र्यासाठी कुठलाही त्याग मोठा नाही. तुम्हाला असं आश्वासन द्यावं लागेल, की यापुढे संघटना जो आदेश देईल त्याचं आम्ही पुरेपूर पालन करू, तरच आंदोलनाच्या गोष्टी करा. इंग्रजांच्या पुढे यशस्वी ठरलेली हत्यारं काँग्रेसपुढे बेकार ठरतील. काही झालं तरी इंग्रज हे काही नीतीनियमांना मानणारे, आंतरराष्ट्रीय संकेतांना मानणारे व्यापारी.''

अशा प्रश्नांची चर्चा फत्तेबादच्या चरणजितसिंगांनीही केलेली होती. त्यांच्यासारख्या शांततेच्या मार्गाने जाणाऱ्या माणसाचा कलही जेव्हा सरळ सरळ संघर्षाकडे जातो तेव्हा शेतकऱ्यांचं दुखणं किती खोलवर गेलेलं आहे आणि त्यातून केवढं वैफल्य निर्माण झालेलं आहे हे लक्षात येतं. सर्वसामान्य पंजाबी शेतकऱ्यांचा कल हाच असेल तर! जोल कमिटीच्या रिपोर्टला शासनानं गुंडाळून ठेवून शेतकऱ्यांचा केलेला घात त्यांच्या काळजात कुठे तरी खोल, घट्ट रुतून बसलेला होता.

## ॥ १८ ॥

तसे जेलमध्ये सगळे दिवस सारखे. तेच ते अन् तेच ते अन्न. दिवसाचे कार्यक्रमही ठरलेले. सगळे दिवस कसे छापाच्या गणपतीसारखे. आमचं एक ठीक. आम्ही काही दिवसांचे पाहुणे; पण जेलमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्यांचं काय? तसं पाहायचं झालं, तर बाहेरील जीवनाचीसुद्धा एक चौकट असतेच ना व हालचालींवरील बंधनं सोडली तर एका दिवसात अन् दुसऱ्या दिवसात फरक काय? मला तर एवढाही फरक नाही वाटला. तो एवढ्यासाठी, की मला चंडीगडच्या तुरुंगातही सल्ला विचारणारे दोन अशील भेटले. मला भेटलेले दोघेही जण चांगले सुशिक्षित, उच्च मध्यमवर्गातले, दोघेही प्राध्यापक अन् दोघांवरही आरोप होता पत्नीला जाळून मारल्याचा. मी वकील आहे हे कळल्यावर दोघांनीही आपापली कागदपत्रं मला चोरून दाखवली. दोघांनाही खालच्या कोर्टानं शिक्षा दिलेली. दोघांचीही वरच्या कोर्टात अपिलं चालू असलेली अन् दोघांचीही आणखी जमानत न झालेली ! शिकल्यासवरल्या, भल्या घरच्या माणसासाठी जेल म्हणजे महाभयानक अनुभव.

जेलमधील खुनी, दरोडेखोर आणि इतर आरोपाखाली जेल भोगणाऱ्या भयानक कैद्यांसोबत दिवस घालवायचे म्हणजे वेड लागायचं.

उत्तर भारतातील हा हुंडाबळीचा प्रकार मात्र फार भयानक. विशेष म्हणजे अशा जळितात काही विशेष आहे असं कुणाला वाटतही नाही. स्त्रियांचा छळ हा होणारच हे लोकांनी एवढं गृहीत धरलंय, की त्यात काही तक्रार करण्यासारखं आहे असं प्रत्यक्ष स्त्रियांनाही वाटत नाही. धन्य धन्य स्त्रीजातीच्या सहनशीलतेची ! ज्या दोघांची कागदपत्रं मी पाहिली त्यांपैकी एकजणानं लिहिलेली पुस्तकं महाविद्यालयात अभ्यासक्रमासाठी लावलेली. एक नव्हे दोन नव्हे, चांगली पाच पुस्तकं. शिवाय त्याने काही गाईडस्ही लिहिलेली. दुसऱ्या कैद्याच्या घरी फ्रीज, स्कूटर, टी.व्ही. अशी सारी आधुनिक उपकरणं, शिवाय स्वत:च्या मालकीचा फ्लॅटही हप्त्यात घेतलेला. पैकी काही हप्ते परत करायचे होते आणि त्या हप्त्यांसाठी हा बळी. बाहेर धूर येताना पाहून भाडेकरूंनी टोकलं तेव्हा हा पठ्ठ्या छोट्या मुलीला घेऊन खाली बागेत फिरत होता. वर पत्नी जळत होती अन् खाली हा फिरत होता. त्या प्रसंगाची कल्पना करूनही अंग शहारतं अन् हा गृहस्थ निवांत.

आज सकाळच्या बैठकीचा विषय होता, शेतकऱ्यांबाबत होणारा पक्षपात! साहेब बोलू लागले म्हणजे कधी कधी वाटतं, ते प्रकट चिंतन करत आहेत. त्यांच्याशी बौद्धिक टक्कर घेऊ शकणारी माणसं एरवीच फार कमी आणि हा तर जाणूनबुजून जेल, कदाचित त्यामुळे साहेबांना प्रकट चिंतनाची आवश्यकता वाटत असावी. ते हिंदीत बोलत तेव्हा कमीत कमी इंग्रजी शब्द वापरीत. समोरच्या अशिक्षित पंजाबी किसानालाही सहज समजेल इतक्या सोप्या भाषेत अन् सरळ हिंदीत ते बोलत. मुळात त्यांच्या विचारात अजिबात गोंधळ नसल्यामुळे प्रतिपादनात सुस्पष्टता यायची.

## ॥ १९ ॥

एखादा दिवसच अशुभ असतो की काय, कुणास ठाऊक! त्या दिवसाची लक्षणं दिसू लागतात म्हणे, निदान कथाकादंबऱ्यांतून, सिनेमांतून तरी तसं वाटतं; पण मला तरी एक ऑगस्ट १९८४ चा दिवस काही वेगळा नाही वाटला. कोणत्याही इतर दिवसापेक्षा. तीच सकाळ, तीच दिनचर्या, तेच आम्ही अन् सारे तेच ते अन् तेच ते! उलट मी तर एक पंजाबी भाषेत सादर करावयाच्या वर्गाची तयारी चालवली होती. सुमारे अर्धा तास चालेल एवढा वर्ग हिंदीत लिहून हातावेगळा केला होता मी. त्यासंबंधी बलवंतसिंगशी





बोलून पंजाबीत भाषांतर करावं अन् तीन तारखेला प्रयोग सादर करावा असा बेत आखत होतो.

अन् तरीही आजचा दिवस विलक्षण ठरणार होता. ठरलाही तसा. नेहमीप्रमाणे आमचा दुपारचा वर्ग सुरू झाला. अनेकांनी प्रश्न विचारले. काहींनी विचार व्यक्त केले. हे सारं झालं ते नेहमीप्रमाणे; पण नेहमीप्रमाणे घडलं नाही ते एकच. साहेब आज मध्येच बोलायला उठले. सर्वांचं बोलणं ऐकल्यावरच साहेब उठायचे बोलण्याकरिता; पण आज तसं झालं नाही. काही तरी विचारमंथन चालू असावं डोक्यात अन् त्याला वाट करून देण्यासाठी म्हणूनही असेल. कदाचित काही वृत्तपत्रांतून साहेबांवर 'इंडिया' व 'भारत' या कल्पनेमुळे टीका केली जात होती. तीही कदाचित त्यांच्या डोक्यात घोळत असेल; पण त्यांनी नेमकं याच विषयाला तोंड फोडलं.

''मी इंडिया आणि भारत म्हणतो तेव्हा कुठलीही भौगोलिक सीमा मला अभिप्रेत नाही. इंडियात भारत आहे अन् भारतात इंडिया. मी शहरे आणि खेडी असाही भेद सांगत नाही. खेड्यातही 'इंडिया' आहे आणि शहरातही 'भारत'. खेड्यातील शेतकऱ्यांचं पोट शेतीवर भरत नाही म्हणून पोट भरण्यासाठी ते शहरात जातात; म्हणून शहरातही भारत आहेच; मात्र मी वेगळा भारत मागतो आहे म्हणून खोडसाळ प्रचार केला जातो. वास्तवात अशी आमची मागणी नाही. विचारही नाही. कुणाच्या डोक्यात तसं काही असेल तर त्यांनी ती कल्पना काढून टाकावी. जो शोषण करतो तो इंडियावाला आणि ज्याचं शोषण होतं तो भारत इतकी ढोबळ अन् स्पष्ट कल्पना आहे ही.'' साहेब अचानक खाली बसले. मला त्यांनी पाणी मागितलं. मी शेजारीच बसलो होतो. मी पाणी देणार तोच झटकन बद्री पुढे आला. मला खस्सकन् बाजूला ओढलं अन् हलकेच म्हणाला,

''पळत जाऊन डॉक्टरला बोलवा,'' साहेब पाणी मागताहेत अन् हा डॉक्टरांना बोलवायला सांगतो आहे. क्षणभर मला काही कळेचना; पण बद्रीच्या चेहऱ्याकडे पाहिलं अन् मी धावतच बाहेर पडलो. काय झालं ते क्षणभर कुणालाच कळलं नाही; पण साहेब मटकन खाली बसले, मी धावत बाहेर पळालो. माझ्यामागेच जावंधियाही पळाले तेव्हा काही तरी भानगड आहे असं समजून सारे लोक साहेबांभोवती गोळा झाले. मी धावत बाहेर पळालो अन् दवाखान्याकडे गेलो तेव्हा बरोबर चार वाजले होते, सायंकाळचे. दवाखान्यात तर पत्ताच नव्हता डॉक्टरांचा. धावत धावतच मी जेलरच्या ऑफिसात गेलो तर तिथेही कुणी नव्हतं. ऑफिसातला फोन उचलला, तर तो तोही डेड झालेला.

दारावरील पोलिसाला सांगितलं, ताबडतोब जेलरबाबूला बोलवायला. एव्हाना ऑफिसात विजयबाबू, बिपिनभाई, भूलाभाई हेही आले होते. बरीच गर्दी झाली होती. गर्दी पाहून काहीतरी भानगड आहे असं समजून शिपाई धावत गेला अन् असिस्टंट जेलर श्री. गिल यांना घेऊन आला. त्याला घेऊन आम्ही बराकीत परत आलो; तो साहेब निजलेले अन् त्यांच्याभोवती माणसांचा हा गराडा पडलेला. बद्री अन् बबन इवलाले चेहरे करून बसलेले. त्यांनी उत्सुकतेनं विचारलं, ''डॉक्टर आले?'' एव्हाना जेमतेम पाचसात मिनिटं झाली असतील नसतील; पण त्या दोघांना तासाचा अवधी वाटला. जेल कंपाऊंडर एव्हाना आला होता. त्यानं साहेबांना एक इंजेक्शन दिलं. बहुधा कंपोझचं असावं. जेलमधलाच कंपाउंडर तो. माणूस अन् जनावर यात फारसा फरक करत नसावा. सर्वांच्याच नजरेवर काळजी पसरली होती. असिस्टंट जेलर श्री. गील यांना घेऊन आम्ही परत बाहेर पडलो. या वेळी आमच्याबरोबर पंजाबी लोकांचा एक जथाच आला. गील लगबगीने जेलबाहेर गेले अन् जेलर श्री. शर्माला घेऊन आले. एव्हाना साहेबांना हृदयविकाराचा झटका आला होता हे स्पष्ट झालं होतं, त्यांच्या चेहऱ्यावर वेदना स्पष्ट दिसत होती. शर्मांनी जेलच्या ऑफिसात येऊन परत फोन करून पाहिला. फोन परत डेड. बाहेर पंजाबी अन् ऑफिसात आम्हा साऱ्यांच्या नजरा बघून जेलरही घाबरले. ते म्हणाले, ''बताईये अब मैं क्या कर सकता हूं?''

''पहले आप बाहर जाकर फोर लगाईए डॉक्टर को. इसके बाद भी अगर कुछ नही हुवा तो आप नही, हम करेंगे जो करना जरूरी है.'' पंजाबी जथ्यामधला एकजण ओरडला. लोकांचा हा मूड पाहून ते अधिकच घाबरले अन् घरून फोन करण्यासाठी बाहेर पडले. त्यांच्या घरी गेले. होणाऱ्या उशिरानं वातावरण विलक्षण तापलं. त्याचा परिणाम काहीही होऊ शकत होता. अनेक नेत्यांचे जेलात जे हाल झाले होते, त्याच्या स्मृती आणखी ताज्या होत्या लोकांच्या मनात. साहेबांचंही तसंच व्हावं ही कल्पनाही कुणी सहन करू शकत नव्हतं. साहेबांना काही झालं तर महाराष्ट्र आम्हांला क्षमा करणार नाही अन् पंजाब तर यजमान. क्षणाक्षणाला वातावरण ताणत चाललं होतं. एकेक क्षण युगायुगासारखा वाटत होता. फोन करून थोड्याच वेळात श्री. शर्मा परत आले.

''हमने ॲब्युलन्स बुलवाई है, लेकीन जेल कुछ दूर है गांव से ! आने में बीस एक मिनिट लगही जाऐंगे.'' आम्ही विचार केला, येण्यास वीस मिनिट जाण्यास वीस मिनिटे अन् इथे तर 'भारता'चा जीव धोक्यात आलेला! अन् एवढा विलंब? क्षणात सारे चिडले.





जेलरही हतबल झालेला होता. समोर त्याची फियाट गाडी दिसत होती, दिंडी दरवाजातून. आम्ही त्यास सुचवलं या मोटारीतून साहेबांना त्वरित न्यावं,

''ऐसी हालत मे पेशंट को हिलाना बहुत रिस्की है.''

''और यहांही रखना तो और भी रिस्की है. इससे बेहतर तो साब को इसी मोटारसे दवाखाने ले जाना है.'' आम्ही सुचवलं. एकूणच मूड पाहून या सूचनेला नाही म्हणायची त्याची हिंमत होईना. बरं, अशा अवस्थेत साहेबांना हलवणं इष्ट का नाही हेही कळेना. यावर लोकांची धमकी,

''जोसीजी को कुछ हुआ तो ये जेल जला देंगे, आपकी तो बातही नही.'' हे सारं ऐकून शर्माला तर घामच फुटला. त्याचा काही इलाज चालला नाही. ती गाडी आत आणून त्यांनी बराकीजवळ लावली. साहेबांना ब्लँकेटसचं एक स्ट्रेचर करून आणलं अन् मागच्या सीटवर नीजवलं. त्याही स्थितीत लोकांनी शर्माला बजावलं, साहेबांना एकट्याला आम्ही तुझ्या हवाली करणार नाही. या सरकारवर आमचा विश्वास नाही. साहेबांसोबत भूपेंद्रसिंग मान अन् बद्री देवकर हे जातील. दोन कैद्यांना परवानगीशिवाय बाहेर कसं सोडायचं अशी शंका शर्मांनी काढली,

''हम उसूल, कानून कुछ नही जानते. हम मानते हैं तो हमारे जानसे प्यारे जोसीजी को. सवाल इनके जान का है.'' पंजाब्यांपैकी एक जण बोलला. सर्व नियम बाजूला सारून शर्मांनी भूपेंद्रसिंग मान व बद्री या दोघांना गाडीत बसवलं. बद्री, बबन अन् विजय जावंधिया यांच्याकडे पाहिलं तर वाटत होतं, औषधाची गरज आहे ती यांनाच. आम्ही मानसाहेबांना सांगितलं, दोघांपैकी एकानं साहेबांबरोबर राहायचं दवाखान्यात. आम्हाला नियम वगैरे काही माहीत नाही. एकानं दवाखान्यात थांबायचं अन् दुसऱ्यानं परत येऊन आम्हांला रिपोर्ट द्यायचा. तोपर्यंत आम्ही बराकीत जाणार नाही. तोपर्यंत जेलबंदी होणार नाही. आम्ही कुणी जेवणही घेणार नाही अन् हे सारं कुणी म्हणावं? गांधीवादी बिपिनभाईंनी! त्यांचा फार जीव साहेबांवर. आम्ही बद्रीला धीर दिला अन् साहेबांची गाडी बाहेर पडली.

हार्ट ॲटॅक म्हणल्यावर आम्हा साऱ्यांचीच अंत:करणं जड झाली. जेलमध्ये चिंतेचं वातावरण पसरलं, चारपाचशे सत्याग्रही. सारेच बाहेर मैदानात जमलेले; पण एवढा मोठा जमाव असूनही सारं वातावरण चिडीचूप. आपण बोललो तर काय होईल? सारेच चिंतेत चूर झालेले. हरियानाच्या किसान संघाचे अध्यक्ष श्री. मांगेरामजी मलिक तर चक्क रडायला लागले. एवढा मोठा माणूस वयानं अन् अधिकारानेही, त्याला रडताना

पाहून कससंच झालं. त्यांचीच समजूत घालायची वेळ आली.

"मांगेरामजी, साहेबांच्या गैरहजेरीत आम्ही आपल्याकडे आधारासाठी बघत आहोत. आपण जर असा धीर सोडला तर आम्ही कुणाकडे बघावं?"

यावर ते म्हणाले, "वकीलसाहेब, तुम्हाला तुमच्या माणसाचं मोल कळत नाही, एवढ्या मोठ्या माणसाचं काही बरंवाईट झालं तर साऱ्याच शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान होणार आहे, न भरून येणारं. कोण कुणाची समजूत घालणार आहे तेव्हा?" त्यांच्या या बोलण्यामुळे तर सारंच वातावरण आणखी गंभीर झालं. एकेक क्षण तासातासासारखा वाटायला लागला. भरभक्कम शरीराच्या पंजाबी लोकांच्या करुण चेहऱ्याकडें पाहिलं, की पोटात कालवाकालव व्हायची. आम्ही सर्वांना एकेठिकाणी बोलावून शांत करण्याचा प्रयत्न केला. एव्हाना बिपिनभाई शांत झालेले होते. त्यांची सुचवलं, आपण साहेबांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून सार्वजनिक प्रार्थना करूया. ही प्रार्थना सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी करावी असं ठरलं. सर्वांना बराकीत जाण्याची विनंती केली; पण कुणी त्या मूडमध्येच नव्हतं. सर्वच जण गुडघ्यात मान घालून मैदानात विखरून बसले. जेलात सत्याग्रहींशिवाय मोठमोठ्या शिक्षा भोगत असलेले कैदी होते. त्यांच्याही कानावर एव्हाना बातमी गेली होती. हळूहळू एकेकानं येऊन साहेबांची चौकशी केली. "कैसी तबियत है अब? कुछ संदेशा आया?" काय सांगणार त्यांना? आपण आपल्या भावना आवराव्या अन् त्यांनाही धीर द्यावा. केवळ काही दिवसांच्या सहवासानं साहेबांनी केवढा लळा लावला सर्वांना. एकवेळ सत्याग्रहींना साहेबांबद्दल काही आत्मीयता वाटली तर ते ठीक आहे, पण या इतर कैद्यांचा काय संबंध? वाऱ्याने सुगंध चोहीकडे पसरावा, त्याच्याकडे कुठे भेदभाव आहे? कीर्तीचंही असंच. सत्याग्रही काय अन् इतर कैदी काय, महानतेपुढे सगळेच नमतात.

"किती वेळ झाला? जेमतेम एक तास, मग आणखी खबर आली नाही!"

"काही खबर? काही तरी !"

मन तर फारच पुढे धावतं. कुठे तरी गुंतून ठेवलं पाहिजे. तसा एकच तास तर झाला होता. आघात झाला होता चारच्या सुमारास अन् जेमतेम पाच वाजताहेत; पण वाटलं किती वेळ झाला! साडेपाचच्या पुढे मान साहेब आले. 'मानसाब आ गयें', 'मानसाब आ गयें' जो तो ज्याला त्याला सांगायला लागला अन् बोल बोल म्हणता सारा जेल जमा झाला मैदानात. प्रत्येकाला वेगळा रिपोर्ट देण्याऐवजी सर्वांना एकत्रच सांगा असा सल्ला





दिला आम्ही मान साहेबांना. एव्हाना सगळ्या बराकी आल्या होत्या मैदानात. मानसाहेबांनी वृत्तांत द्यायला सुरुवात केली,

"आधी सांगतो, साहेबांची प्रकृती उत्तम आहे. काही काळजी करण्याचे कारण नाही." मान साहेबांच्या या शब्दांनी सारी मरगळ झटकली गेली. पंजाबी भाईंनी गजर केला, 'वाहे गुरू की खालसा, वाहे गुरू की फते' मानसाहेबांना आम्ही आग्रह केला, सर्व सांगा अगदी तपशिलात सांगा.

"आम्ही सोळा सेक्टरमधील सरकारी इस्पितळात गेलो. आम्ही जाईतो सारी तयारी झालेली होती. आधीच फोन गेलेला होता. त्यामुळे दवाखान्यातील ख्यातनाम डॉक्टर तय्यार होते. साहेबांसाठी सारी व्ही.आय.पी तयारी केली होती. हार्ट ॲटॅकच्या उपचारासाठी ज्या उपकरणांची आवश्यकता होती ती सारी उपकरणं जय्यत तयार होती. खास खोलीही तयार करण्यात आलेली होती. डॉक्टरांनी नीट तपासणी केली अन् घाबरण्याचे काही कारण नाही; मात्र साहेबांना विश्रांतीची नितांत आवश्यकता आहे असं सांगितलं. साहेबांना भेटायला डिव्हिजनल कमिशनर स्वत: आलेले आहेत. उत्तमातील उत्तम डॉक्टर सेवेत तयार आहेत, व्यवस्थाही उत्तम आहे. स्वत: शासन जागरूक आहे. मी कमिशनर साहेबांना विनंती केली, की आमच्यापैकी एका माणसाला साहेबांबरोबर दवाखान्यात राहण्याची परवानगी द्यावी. ती मागणी त्यांनी मान्य केली असून बद्रीभाई साहेबांबरोबर राहतील. ॲड. भालसिंग मलिक हेही दवाखान्यात हजर झालेले आहेत, शिवाय शंकरराव वाघही आहेत." त्यांनी वृत्तांत सांगितला तेव्हा कुठे वातावरणातील ताण क्षणभर कमी झाला. बिपिनभाईंनी सुचवलं, की आपण आता साहेबांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून प्रार्थना करू या. भूपेंद्रसिंगांनी विचारलं,

"आप लोगों में कैसी प्रार्थना की जाती है?"

"मानसाब, आप 'आप लोगों में' ऐसा क्यूं कहते है? हम तो आपको हमसे अलग नही मानते. जो प्रार्थना आप रिवाज करते आये है वही प्रार्थना कीजिए."मी

"फिर भी आप किस भगवान की प्रार्थना करते है?"

"हमारा और आपका भगवान एकही है मानसाब."

यावर शिख पद्धतीने प्रार्थना करावी असा आग्रह आम्हा मराठी कंपनीने धरला. शिखांचे आणखी एक नेते श्री. चरणजितसिंग यांनी शिखांची एक प्रार्थना म्हणजे 'अरिदास' पढला. या अरिदासमध्ये सर्व शिख संतांना वंदन असते. त्या प्रार्थनेत सर्व

शिख सहभागी झाले. शेवटी 'वाहे गुरू का खालसा, वाहे गुरूकी फते' होऊन प्रार्थना संपली. परत भूपेंद्रसिंग बोलायला उठले. या प्रार्थनेला सारा जेलच आला होता. स्टाफचेही काही लोक आले होते अन् सत्याग्रही तर झाडून सारे आले होते. साहेबांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून आम्ही अरिदास पढण्याबद्दल आग्रह केला याचा शिख लोकांवर फारच परिणाम झाला. पाणावल्या डोळ्यांनी मानसाहेब भाषणात म्हणाले,

''कहां कहांसे, कितने दूरसे आये हैं ये लोग. जरा उनकी भावना को तो देखिए. उन्होने प्रार्थना की, तो हमारी भाषा में. हम से कहा के हम अरिदास पढे और ये भी कहा कि आपण और हम एक हैं. देखिए अभी भी मेरे जिस्म पर रोमांच खडे हैं. ठीक ही कहा आपने, हम एक थे, एक है, और रहेंगे.'' पुढे त्यांना बोलवेना. त्यांचा गळा भरून आला. साऱ्यांचेच डोळे पाणावले. काय विशेष केले आम्ही! शिखपंथाप्रमाणे प्रार्थना म्हणायला लावली एवढंच. आम्ही ही छोटीशी कृती अगदी निर्हेतुक अन् सहज केलेली होती; पण या छोट्याशा कृतीनं केवढं काम केलं होतं. साहेबांच्या दूरदर्शीपणाचा वेळोवेळी, छोट्यामोठ्या गोष्टीतून असा प्रत्यय येतो. लातूरला त्यांनीच नव्हतं का सांगितलं, पंजाबी शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा, की या तुमच्या लढ्यात तुम्ही एकटेच नाहीत, तर महाराष्ट्रही आहे बरोबर तुमच्या.''

प्रार्थना संपली अन् आम्ही सारे रेंगाळत्या पावलानं बराकीत परतलो. मान साहेबांनी विश्वास देऊनही चिंतेचं वातावरण काही हलकं होत नव्हतं. कुणी कुणाशी बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हतं. सारं वातावरण चिडीचूप होतं. रात्र आली ती चिंतेची सावली घेऊनच. रात्री कुणाला बरोबर झोप आली असेल असं वाटत नाही. आमच्या बराकीत तर रात्रभर चुळबूळ चालू होती.

पंजाबी लोकांचं साहेबांवर विलक्षण प्रेम, दुरून दुरून आलेले खेडूत दबक्या पावलांनी येऊन आम्हाला विचारीत: ''वकीलसाब, की खबर है जोसी साबनू?'' आम्ही सांगावं: ''चंगी खबर है जी,'' त्यांनी मान डोलवावी अन् दुसऱ्या कुणी येऊन विचारावं, ''की खबर है जोशी साब नू?'' तेव्हा आम्ही ठरवलं, की सर्व बैठकांतून सकाळच्या अन् दुपारच्या अगोदर साहेबांच्या प्रकृतीबद्दल वृत्तांत द्यायचा अन् मग कार्यक्रम. बिपिन भाईंनी तर तीन तीनदा सांगितलं, ''तुम्ही साहेबांना जास्त वापरू नका. त्यांचं जीवित फार मौल्यवान आहे. तुम्हाला त्यांचं मोल कळत नाही.'' त्यांनी तर दुसऱ्याच दिवशी साहेबांना चिठ्ठी पाठवली-मला नंतर पाहायला मिळाली ती. ''तुमचा देह तुमच्या





मालकीचा नाही. त्यावर या राष्ट्राची मालकी आहे. या तुमच्या देहाचा वाटेल तसा वापर करण्याचा अधिकार तुम्हांला नाही. तेव्हा ही राष्ट्रीय संपत्ती जपून वापरा अशी माझी तुम्हाला नम्र प्रार्थना आहे!'' या चिठ्ठीनं मी पार हेलावून गेलो. बिपिनभाईंसारख्या थोर माणसानं साहेबांचा यापरता आणखी गौरव काय करावा? बिपिनभाईंची साहेब नेहमी थट्टा करायचे; पण बिपिनभाई कधी बधले नाहीत. साहेब गांधींना विलक्षण मानतात हे त्यांना ठाऊक होतं. त्यामुळे साहेबांशी वादात न पडता स्मित करून बिपिनभाई साहेबांची टीका बोथट करायचे. बिपिनभाईंनी त्यांच्या साहेबांवरील प्रेमाचं कधी प्रदर्शन केलं नाही. हा प्रसंग आला नसता तर त्यांच्या अंतरीची भावना त्यांनी कदाचित प्रकट केलीही नसती. मोठ्यांच्या गोष्टी मोठ्या अन् आगळ्याही असतात. बिपिनभाईंशी बोलताना त्यांच्या मोठेपणाची झलक जाणवायची; पण त्यांच्या एकूणच व्यक्तित्वाच्या मानाने आपण फार छोटे. त्यामुळे आम्हासारख्यांशी बोलताना त्यांच्या बौद्धिक स्तराला काय चालना मिळणार? त्यामुळं त्यांच्याशी विशेष गंभीर अशी चर्चा कधी झालीच नाही.

चिंतेनं झाकोळलेली रात्र कधी तरी संपली अन् दिवसही उजाडला. सकाळीच जेलर शर्मानं दवाखान्यात फोन करून साहेबांची ख्यालीखुशाली विचारून आम्हांला कळवली; पण आमचा विश्वास बसायला पाहिजे ना त्यांच्यावर. आम्हांला पाहिजे होता आमच्या दृष्टीने अधिकृत अहवाल. आम्ही त्यांना सांगितलं, की दवाखान्यात फोन करून तिकडे शंकरराव वाघ असतील तर त्यांना म्हणावं, की इकडे येऊनच ख्यालीखुशाली कळवा. शेवटी शंकरराव आले जेलात. त्यांनी साहेबांची ख्यालीखुशाली कळवली. साहेबांचं अन् बद्रीचं सामान पॅक केलं. संध्याकाळचं बुलेटीन फोनवर द्यायचं कबूल केलं अन् ते परत गेले.

साहेबांच्या गैरहजेरीत मानसाहेबांनी आज कार्यक्रमाचं संचालन केलं. त्यांनी अगोदर जोशीसाहेबांच्या प्रकृतीबद्दल वृत्तांत सांगितला. साहेब असले म्हणजे सभेत एक चैतन्य असायचं; पण आज एक मरगळ वाटत होती. कदाचित साहेबांच्या प्रकृतीच्या काळजीमुळेही तसं वाटत असेल. बैठकीत नेहमीप्रमाणे मानसाहेब, मांगेरामजी व जावंधिया बोलले. त्यांच्या जोडीला आज माझंही नाव पुकारलं गेलं. मी चकित झालो. माझ्याकडे पाहून बिपिनभाई हसले अन् माझ्या लक्षात आलं. हा डाव त्यांचाच. मी बोलतो हे बिपिनभाईंनी केव्हाच अंदाजलं होतं. म्हणून त्यांनी अनेकवेळा माझं नाव सुचवलं होतं; पण नाव पुकारण्यापूर्वी दर वेळेस कार्यक्रमाच्या बदलत्या संचालकानं मला विचारावं

अन् मी नाही म्हणावं हे ठरलेलं होतं, साहेबांच्या उपस्थितीत आपण काय विश्लेष करणार? तेव्हा आज बिपिनभाईंनी माझ्या नावाची चिठ्ठी पाठवली. आजचं संचाल स्वत: मानसाहेब करत होते. तेव्हा मला न विचारता माझं नाव पुकारलं त्यांनी. आले आलीया भोगासी... म्हणून मी उभा राहिलो. बोलण्यापूर्वी एक गीत सादर केलं. जेलाती एका भिंतीवर लिहिलेलं होतं 'सब दिन होत न एक समान', कैद्यांना दिलासा देणारं वाक् ते- ती ओळ माझ्या डोक्यात घोळत होतीच. वेळोवेळी बैठकीतून कार्यकर्त्यांनी जे प्र विचारले होते' त्यांतूनही त्यांचं नैराश्य डोकावत होतं. इतकी वेळ चळवळ चालवून पदरात काही पडत नाही. शेवटी असं किती दिवस चालायचं हा त्यांना पडलेला प्रश्न अ त्यातूनच निर्माण झालेलं नैराश्य! भिंतीवरील ती ओळ अन् या लोकांचं नैराश्य - डोक्या फिरत होतं अन् त्यातून हे गीत बनलं होतं-

*सब दिन होत न एक समान*
*कछु दिन कटते काटे न जाये, कछु दिन दौडे भागे ॥*
*रातभी आये, रात भी जाये, फिर तो होय सवेरा,*
*काहे डरता, हो अंधियारा, कल तो हो उजीयारा ॥१॥*
*कलके राजे, और रजवाडे, अब है आज कहाँ,*
*फिर जगरीती चली रही है कोई रहा न तहाँ ॥२॥*
*थके हारे हो, ऐ बलीराजा, काहे होत उदास,*
*सूरजकिरने फैल रही है, रोशन होत आकास ॥३॥*

गंभीर सुरातलं हें गीत आवडलं लोकांना. कदाचित साहेबांच्या आजारपणाच्या पार्श्वभूमीवर हे गीत अधिकच भिडलं असेल मनाला. बैठकीनंतर मंडळी याच ओळ गुणगुणत होती. बिपिनभाई अन् भूलाभाईंनी तर हे गीत पुन्हा पुन्हा म्हणवून घेत माझ्याकडून. जावंधियाही हेच गीत गुणगुणायचे.

दुपारी शंकरराव आले. त्यांनी सांगितलं, की प्रकृती ठीक आहे, घाबरण्या काही कारण नाही; मात्र पूर्ण विश्रांती घ्यायला सांगितलीय त्यांना डॉक्टरांनी; पण 'मात्र' फार अवघड होता. साहेब अगदी आनंदी आहेत. त्यांच्या वागण्याबोलण्या ताणतणाव नाही असेही ते म्हणाले; पण हे सारे आम्ही घाबरू नये म्हणून तर नाही

जेलमधील शिक्षा काय असते हे कळलं शेवटचे दोन दिवस. दोन अन् तारीख संपता संपेना! हे दोन दिवस जास्त तासांचे तर नाहीत? एका माणसा





जेलबाहेर जाण्यानं एवढी मरगळ यावी? आम्हा भारतीय लोकांचं हे एक वैशिष्ट्यच! नेहरू असताना नेहरूनंतर कोण. मग इंदिरा गांधींनंतर कोणपासून तो अमिताभनंतर कोण इथपर्यंत 'कोणा'ची चर्चा. सर्वच क्षेत्रांत कुणानंतर कोण हा शाश्वत प्रश्न आपल्या समोर राहिलेला आहे. एकदाची तीन तारीख संपली.

**॥ २० ॥**

आज चार ऑगस्ट १९८४. आमचं भवितव्य आज ठरणार होतं. आज आम्हाला कोर्टात हजर करणार होते. बालूभाईंनी विचारले, ''वकीलसाब आज क्या होनेवाला हैं?''

''बालूभाई, एक महिना तो पक्का! जिसमें से सोला दिन तो आज पूरे होते है। रहे अब चौदा दिन।''

''क्यूं डरा रहे हो भाई? इतने दिन तो खुशहाल रहे, अब क्या डरते हैं?''

खरं म्हणजे मलाही भीतीच वाटत होती. काय होईल याची. पंजाबचा प्रश्न अवघड होत असल्यामुळे लोकांत दहशत बसावी यासाठी काहीही पावलं उचलली जाऊ शकली असती ही शक्यता होती. म्हणून सारीच अनिश्चितता. ते काही का असेना निदान आज रिमांडची कटकट मिटून एकदाची शिक्षा तर सुनावली जाईल म्हणजे किमान ती अनिश्चितता तर राहणार नाही. शिवाय कोर्टात हजर राहण्याच्या निमित्ताने बाहेरच्या जगाचा फेरफटका तर होईल. म्हणजे बघा, जेमतेम सोळा दिवसांचा रिमांड अन् लगेच मनात विचार बाहेरचं जग पाहण्याचा. परत एकदा 'सावरकर! आपण वर्षानुवर्षे कशी काढली असतील तुरुंगात? अन् तीही अंदमानच्या तसल्या भयानक वातावरणात?' कल्पनेनंही अंग शहारतं!

सकाळपासून आमची गडबड चालली होती. न्हाऊन, धुऊन, नटूनथटून, जेवणं आटोपून सारे बराती तयार होऊन बसले. आम्हांला काय शिक्षा होते यावर नंतर आलेल्या तुकड्यांचं भवितव्य ठरणार होतं, त्यामुळे सर्वांचं लक्ष आमच्याकडे होतं. आम्हाला गेटवर जमा करण्यात आलं, तेव्हा सारा जेल आला होता आम्हांला 'अलविदा' करायला. जेलातील रजिस्टरात आमच्या नोंदी झाल्या. जेलची दारं उघडली गेली. आम्ही मोटारीत बसलो, मोटारी सुरू झाल्या अन् घाशीरामजींनीही आपलं तोंड उघडलं, 'कोणे कोणेसे आई आवाज' अन् हा आवाज थेट कोर्टाच्या आवारात पाऊल टाकेपर्यंत चालू होता. तिथे आम्हांला एका मैदानावर बाजूला बसवण्यात आलं. दवाखान्यातून बद्री अन् वाघ

दोघेही आले होते. काही वेळाने भालसिंग मलिकही आले. ते कोर्टात जाऊन आले अन् मग कोर्टाच्या हे लक्षात आलं, की एका वटहुकूमान्वये २७ ऑगस्टपासून सर्व अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यांना, म्हणजे कलेक्टरला देण्यात आले असून न्यायाधीशांचे अधिकार काढून टाकण्यात आले आहेत; मग आता प्रश्न, आम्हाला रिमांड न्यायाधीशांनी दिला ती तारीख अन् आज आहे चार; मग आमच्या केसेस चालवण्याचा अधिकार कुणाला? ''ते सरकारला माहीत. निदान मला तरी माहीत नाही,'' आमचे जुने न्यायाधीश म्हणाले. मग आम्हांला या प्रश्नाचा निकाल लावून घेण्यासाठी सुप्रिम कोर्टात जावं लागणार की काय? तेही ठीक आहे; पण मग तोपर्यंत आमची पोझिशन काय हे तरी कुणी ठरवायचं? आम्ही कैदी की रिमांडवाले? की कुणीही नाही? कायदा गाढव आहे म्हणतात ना तो हा असा. पोटात गोळा आला परत आमच्या. परत सरकारी वकील अन् चंडीगडच्या एका उपविभागीय दंडाधिकाऱ्यापुढे आम्हांला न्यायचं ठरवलं तेव्हा कळलं, की त्या महाशयांना अशा केसेसचा अनुभव नाही. आता काय करावं हा परत प्रश्न. मग मलिकसाहेबांनी तोडगा काढला. कोर्टाच्या कामातील एका तरबेज कारकुनाला पकडून आरोपींना विचारावयाच्या प्रश्नांचा नमुना बनवला आणि प्रोसीजरप्रमाणे जे व्हायला पाहिजे ते सारं साहेबांना सांगून तयारी केली. आमचं भवितव्य काय? आता उपजिल्हाधिकारी म्हणजे शासनाचा हस्तकच. काय थट्टा आहे की काय न्यायाची? खटले भरणार कोण? शासन. तक्रार दाखल करणार कोण? पोलिस-म्हणजे शासन. खटले ऐकून निकाल देणार कोण? परत परत शासनच. अरे, मग हा फार्स तरी कशाला करायचा? सरळ ठरवायचं, सत्याग्रह केला, की पकडून शिक्षा द्यायचे अधिकार पोलिसालाच. आमच्या जागरूक विरोधी पक्षाला पत्ताही नाही, की वटहुकूम काढून केवढं भयानक हत्यार सरकारच्या हातात दिलं गेलं आहे. देवच वाचवो या देशाला! शिख लोकांचं चिडणं, वैतागणं आता कुठे लक्षात यायला लागलं होतं. काय करणार? एवढी सारी सत्ता अन् तीही निरंकुश एकत्र साठली तर तर दुसरं काय होणार?

आता प्रश्न पडला होता. साहेबांचं काय करायचं?त्यांना तर कोर्टापुढे आणणं जरुरी अन् त्यांना हलवायचं नाही ही तर डॉक्टरांची आज्ञा; पण सत्तेपुढे काही चालत नाही. न्यायदेवता तर एरवीच आंधळी असते अन् या वेळी तर खाकी कपड्यावरच न्यायदेवतेनं काळा डगला चढवलेला. तेव्हा डॉक्टरांच्या विरोधाला न जुमानता साहेबांना ॲम्बुलन्समध्ये आणण्यात आलं. आमची सुनावणी होणार होती ती वरच्या मजल्यावर.





अन् तिथे तर लिफ्टही नव्हती. तेव्हा जिना चढण्याच्या त्याही दिव्यातून साहेबांना जावं लागलं. आमच्यापुढे प्रश्नावलीचा कागद ठेवण्यात आला. आम्ही त्यावर मुकाट सह्या केल्या. आम्हाला सोळा दिवसांची शिक्षा सुनावण्यात आली अन् जेलमध्ये आम्ही घातलेले रिमांडचे सोळा दिवस शिक्षेत वळते करून घेण्यात आले. आम्ही मुक्त झालो!

मुक्त झालो आम्ही; पण ज्या मुक्ततेची वाट पाहत होतो आम्ही ती, झाल्यावर वाटले आणखी काही दिवस राहतो तर बरं झालं असतं. आमचा मराठी कँप तर चक्क नाराज झाला. कधी न बोलणारा अर्जुन म्हणाला,

''वकीलसाब, लई बेकार झालं. किमान एक महिना तरी शिक्षा व्हायला पाहिजे होती.'' हो. म्हणजे आणखी दोन आठवडे साहेबांच्या सहवासात राहायला मिळालं असतं. बाबूरावनंही मान डोलावली. हरियाना कँप तर आतबाहेर फारसे अंतर मानणारा नव्हताच. त्यांना बाहेरही हुक्काच ओढायचा होता अन् आतही.

साहेबांशी बोलण्याचा तर प्रश्नच नव्हता. आम्ही साऱ्यांनी त्यांना जवळून पाहिलं आज आजारी पडल्यानंतर. पावलं जड पडत होती. चेहऱ्यावर थकवा जाणवत होता. नेहमीचे हसरे बोलके डोळे मलूल वाटत होते. त्यांचं दर्शन मात्र सर्वांना चटका लावणारं ठरलं. साहेब येईपर्यंत बाहेर गप्पा छाटणारे आम्ही सॉलीड मूडमध्ये होतो. आणखी आम्हाला कोर्टापुढे हजर व्हायचं होतं, आणखी आमची सुनवाई व्हायची होती. शिक्षा तर फार पुढे होती; पण आम्ही बेफिकीर होतो. साहेबांची ॲॅब्युलन्स आली. साहेब बाहेर पडले, तो आम्ही सारे चिडीचूप झालो. त्यांनी सर्वांकडे पाहून हसण्याचा प्रयत्न केला अन् पाणी आलं डोळ्यांतून कंपनीच्या. हरियानवी भाई, गुजराथी कंपनी, मराठी कंपनी अन् मान साहेब, विशेष करून बिपिनभाई. सारे एकमेकांची नजर चुकवत होते. कुठे डोळ्याला डोळे भिडले अन् डोळ्यात पाणी आलं तर? हलक्या पावलानं, बद्रीच्या खांद्यावर हात ठेवून साहेब एकेक करत पायऱ्यांचा पहाड चढले. सोपस्कार आटोपून बाहेर पडले अन् ॲॅब्युलन्समध्ये बसून दवाखान्यात परतले. ते परत गेल्यावरच आवाज सापडला सर्वांना आपापला. तोपर्यंत सर्वांनी आपले श्वासच रोखून धरले!

आम्ही परत मोटारीत बसलो. परत मोटारी सुरू झाल्या. परत घाशीरामजींना कंठ फुटला, 'कोणे कोणेसे आई आवाज...' परत जेलची दारं उघडली. आम्ही आत जाऊन सर्वांच्या भेटीगाठी घेतल्या. सामान गोळा केलं. 'सत् श्री अकाल' म्हटलं अन् जेलबाहेर पडलो. संध्याकाळ झालेली होती. एव्हाना एक जण पुढे गेलेला होता. त्यानं रस्त्यावरच्या

बस ड्रायव्हरला विनंती करून थांबवून ठेवलं. ती बस चुकती तर पुढची बस परत एका तासानं. जवळपास दुसरे वाहनही नव्हतं. हातातील जड सामान घेऊन दुसरे वाहन मिळेपर्यंत काही किलोमीटर्सचं अंतर पायी तुडवायचं.

बस ड्रायव्हर अन् कंडक्टर दोघेही समजूतदार निघाले. आम्ही सारे आत बसल्यावर बस सोडली त्यांनी. त्यांना समजले, आम्ही सारे निरनिराळ्या प्रांतांतून सत्याग्रहासाठी आलो अन् आता शिक्षा भोगून परततत आहोत. तेव्हा ते आमची तिकिटंही फाडीनात. उलट अख्खी बसच पंचायत भवनाकडे नेण्याची तयारी दाखवली. तेव्हा मानसाहेबांनी त्यांची समजूत घातली. तिकिटं फाडावयास लावली अन् फक्त विनंती एवढीच केली, की स्टॉपच्या पुढे रस्त्यावरच असलेल्या वळणावर मुद्दाम बस थांबवा. म्हणजे सामान घेऊन जायला ते अंतर जवळ पडेल. त्यांनी नाराजीने होकार भरला, अख्खी बस पंचायत भवनाकडे न्यायची त्यांची इच्छा पूर्ण होत नव्हती ना? वाहक अन् चालक दोघेही शेतकरी चळवळीचे सहानुभूतीदार होते. आम्ही पंचायत भवनवर पोचलो तेव्हा चांगलाच अंधार पडलेला होता. आम्हा सर्वांना उत्सुकता होती, साहेबांना पाहण्याची. सकाळी वेळ मिळाला नसता म्हणून गुजराथी कंपनी, मी अन् जावंधिया आम्ही दवाखान्याकडे गेलो तेव्हा साहेबांकडे मैफल जमली होती. भालसिंग मलिक, रामकृष्ण गांधी, प्रो. गोपाळराव आदी मंडळी जमलेली होती. भास्करराव बोरावके भाऊही आलेले होते. शंकरराव वाघ अन् बबन ही कंपनीही होतीच. साहेबांना आराम करायला सांगितलेला अन् हे तर सारे गप्पा मारत बसलेले. साहेबांना सांगायचं कुणी अन् साहेब ऐकणार तरी कुणाच्या बापाचं! आम्ही आलो तसं साहेबांशी बोललो थोडंसं. साहेबांनी त्याही अवस्थेत बिपिनभाईंची थट्टामस्करी केली. त्यांच्या त्या 'राष्ट्राची संपत्ती'वाल्या चिठ्ठीबद्दल. नेहमीप्रमाणेच काहीही न उत्तर देता बिपिनभाई हसले फक्त. आम्ही लगेच बाहेर पडलो. बाहेर आम्हाला निरोप द्यायला भाऊ आले म्हणून मी रेंगाळलो. भाऊंशी गप्पा मारल्या. साहेबांची प्रकृती तशी काळजी करण्यासारखी नाही; पण त्यांनी विश्रांती घ्यायला पाहिजे असं त्यांचंही मत होतं. अर्धाएक तास बाहेर लिफ्टजवळ आम्ही गप्पा मारल्या. लिफ्टनं किती तरी वेळा खाली-वर चकरा मारल्या मी अन् भाऊंनी; पण आमचं गप्पांचं गुऱ्हाळ काही संपेना. शेवटी आतून बद्री बोलावू लागला भाऊंना तेव्हा आम्ही परत एकदा आत गेलो. साहेबांबरोबर कुणी थांबावं हा प्रश्न होता. तयार सर्वच होते, इच्छाही सर्वांची होती. शेवटी निर्णय साहेबांनीच घेतला, भास्करभाऊ अन् बबन या जोडीनं थांबावं;





तेव्हाच हा प्रश्न मिटला. सामान आणण्यासाठी बबन आता माझ्याबरोबर आला. परत भाऊ आम्हांला सोडायला लिफ्टपर्यंत आले अन् मगच आम्ही परतलो.

सर्वांनी सगळी आवराआवर केली अन् मराठी कंपनी घेऊन आम्ही साहेबांच्या भेटीसाठी दवाखान्यात परत गेलो. साहेब तेव्हा चांगल्या मुडात होते.

''काय वकीलसाहेब काय ठरलं ?''

''आम्ही दुपारच्या मिळेल त्या ट्रेननं जाणार परत.''

''नाही हं ! चंडीगड दाखवा या पोरांना. मोठं सुंदर शहर आहे हे.'' मी साऱ्या पोरांकडे पाहिलं. पोरं कसली पोरांचे बाप होते ते. शेवटी नाना म्हणाला,

''नाही साहेब, आता मन नाही लागत. घरी जावं म्हणतो.''

''अरे, अशी काय घाई आहे? एक दिवस राहा, गाव पाहा अन् मगच जा.'' पण कुणी तयार होईना राहायला. शेवटी साहेबांची रजा घेऊन आम्ही बाहेर पडलो. बाहेर पडल्यावर नाना, अर्जुन, बाबूराव यांना विचारलं,

''राहायला का नाही म्हणालात रे?''

''वकीलसाहेब, साहेब आजारी दवाखान्यात अन् आपण मजा मारावी हे मनाला पटल नाही. हां. साहेबांनी त्यांच्या सेवेसाठी ठेवलं असतं दवाखान्यात तर खुषीनं राहिलो असतो.'' बाबूराव बोलला.

''खरं आहे तुझं. तूच काय, बद्री, शंकरराव सारे त्याच क्षणाची वाट पाहत होते. साहेबांच्या सहवासाचा एकेक क्षण लुटता यावा म्हणून सारेच उत्सुक.'' पण ते भाग्य फक्त दोघांच्या पदरी आलं; भाऊ अन् बबन. नाराज होऊन बद्री अन् शंकरराव बाहेर पडले.

आता आमचे मार्ग भिन्न होते. बद्री अन् विजय दिल्लीमार्गे त्यांच्या गावी जाणार होते. बाकी मराठी कंपनी मनमाडमार्गे जाणारी. साऱ्या सामानाची गुंडाळपट्टी केली आम्ही अन् लगेच निरोप घेतला सर्वांचा. आता परतणं नक्की झालं होतं. त्यामुळे ओढ लागली होती घरची. आठवायला लागले चेहरे एकेकाचे. एकोणीस-वीस दिवसांचा काळ म्हणजे काहीच नाही; पण हुरहूर लागली होती हे मात्र खरं. इकडे येताना कसलाच विचार केला नव्हता; पण परतताना शंभर काळज्या लागल्या होत्या.

चंडीगडहून आम्हांला गाडी नव्हती. तेव्हा आम्ही अंबाला कँटला आलो बसनं. तिथून मनमाडकडे जाणाऱ्या गाडीत चढलो. मनमाडला मी, बाबूराव, नाना, अर्जुन, शंकरराव

व राजकुमार उतरलो. शंकरराव व राजकुमार पुण्याला,नाना व अर्जुन नाशिकला, मी अन् बाबूराव एक्स्प्रेसनं परभणीकडे आलो.

सकाळी सकाळी परभणीला पोचलो. तेव्हा घरापुढे नेहमीप्रमाणे सडा टाकलेला, रांगोळी काढलेली, बैठकीत उभी ही. मला असं अचानक आलेलं पाहून अनेक भावना डोकावल्या डोळ्यांत. डोळ्यांतले ते सारे खेळ पाहिले अन् वाटलं, सारे श्रम सार्थकी लागले!

■■



# चांदवडच्या वाटेवर

॥ १ ॥

शेतकरी संघटनेच्या मेळाव्याबाबत आमचा आपला नेहमीचाच अनुभव आहे. मुक्कामी लवकर पोहोचायचं असेल, तर भाषण संपता संपता निघायला पाहिजे. एकदा का गर्दीच्या प्रवाहात सापडलो, तर बाहेर पडायला अर्धा-पाऊण तास सहजच लागणार. आमचा असाही अनुभव आहे, की हे सारं माहीत असूनही अन् आधी गर्दीबाहेर पडायचं ठरवूनही सर्वांत शेवटी होणाऱ्या साहेबांच्या भाषणात आम्ही एवढे गुंगून जातो, की पूर्वीचे अनुभव विसरून आम्हीही साहेबांच्या भाषणानंतर घोषणांच्या गर्जनांत सामील होतो अन् गर्दीत अडकून पडतो. आजही असंच झालं. गांधीजयंतीच्या मुहूर्तावर अकोल्याला कापूस परिषद आयोजित केलेली. महाराष्ट्रभरातून हजबे मामूल म्हणजे, नेहमीच्या प्रथेप्रमाणे शेतकरी प्रचंड संख्येने हजर झालेले. दुपारी दीड वाजता सभेला रीतसर सुरवात झालेली. साहेब भाषणाला उभे राहिले आणि आम्ही लवकर निघायचं विसरून गेलो. संघटनेच्या रिवाजाप्रमाणे सभा संपल्यावर घोषणांचा गदारोळ झाला. त्यांत आम्हीही सामील झालो. हात वर करून, मूठ वळवून वगैरे वगैरे आणि हे सारं पार पडेपर्यंत आम्ही गर्दीच्या चक्रात अडकलो. या चक्रातून अभिमन्यूलाही सुटका करून घेता आली नसती. आम्ही तर पामर, तेंव्हा ठरवलं आपण आधी साहेबांची भेट घेऊ आणि तोपर्यंत घराकडच्या रस्त्यावरची गर्दी ओसरलेली असेल; मग आपण साहेबांशी बोलून परतू. आम्हाला वाटले- आमची ही युक्ती इतर कुणाच्या लक्षात येऊन इतर कुणी साहेबांच्या मुक्कामावर जाण्याअगोदर आपण तिकडे पोहोचू, पण आम्ही मुक्कामावर गेलो तेव्हा लक्षात आलं, की आमच्या सारखाच 'शहाणपणाचा' विचार करणारे खूप कार्यकर्ते आहेत. तेव्हा आम्ही एका गर्दीतून सुटलो अन् दुसऱ्या गर्दीत फसलो आणि आता त्या गर्दीला तोंड द्यायची वेळ आली. मुक्कामाला म्हणजे जिथे साहेब थांबले, तिथे आम्हाला शेषराव मोहित्यांनी गाठलं,

''वकीलसाहेब, तुम्हालाच पहात होतो. साहेबांनी भेटायला बोलावलं आहे.''

''कशाला बुवा?''

''काही कल्पना नाही ! पण सभेत महिला अधिवेशनाची घोषणा झालेली, तेव्हा त्यासंदर्भात काही तरी काम असेल असं वाटतं.''

श्रीरंगनाना मोरे, शेषराव मोहिते, लक्ष्मण वंगे, गोविंद जोशी असे आम्ही मराठवाड्यातील कार्यकर्ते मिळून साहेबांच्या खोलीकडे वळलो. दारावर कुणी स्थानिक कार्यकर्ता होता, तो काही आम्हाला आत सोडेना.

''साहेब आत आराम करताहेत, आत कुणाला सोडू नका असा आदेश आहे.'' आम्ही परोपरीनं सांगितलं, ''आम्हाला साहेबांनीच बोलावलं आहे, तेव्हा काम महत्त्वाचं असलं पाहिजे;'' पण तो काही ऐकायला तयार होईना. तेव्हा शेषराव मोहिते तडकून म्हणाला,

''ये, तुला एकट्याला सायबांची काळजी आहे व्हय? तुझा जलम झाला नव्हता तेव्हापासून आम्ही संघटनेत आहोत. तू काय सांगतोस, चल हो बाजूला.'' तसा एरवी शांत असणारा हा गडी एवढा तडकेल असं आम्हाला वाटलंच नाही. त्याचा आवाज ऐकून आम्हीही जरा चमकलोच. त्याच्या आवाजाची धार बहुधा आत पोहोचली असावी. आतून साहेबांनी चौकशी केल्यावर आम्ही सारे आत गेलो. आम्हाला पाहून साहेबांनी बसवून घेतलं, चहा मागवला आणि सांगितलं,

''मुद्दाम तुम्हाला बोलावून घेतलंय, चांदवडच्या अधिवेशनासाठी महिला कार्यकर्त्यांचा दौरा आयोजित करायचा आहे. तुमच्या भागात कोण येणार आहे ते पाहून घ्या. तारखा ठरवून घ्या आणि एक पक्के लक्षात ठेवा दौरा महिलांचा आहे. त्यांची काहीही गैरसोय होता कामा नये. त्यांची राहण्याची व्यवस्था कुणाच्या तरी घरी करून द्या. हॉटेलात वगैरे उतरवायचं नाही. हा दौरा फार गांभीर्यानं घ्यावा; म्हणून मुद्दाम तुम्हाला बोलावून सांगतो आहे.''

एवढ्या 'प्रेमळपणानं' साहेबांनी कधीच सूचना दिलेल्या नव्हत्या. एकदा कार्यक्रम जाहीर केला, की त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी कुणा एका प्रमुखावर सोपवली जाई आणि पुढचं नियोजन त्याने आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून करायचं हा संघटनेचा रिवाज. तेव्हा रिवाजाप्रमाणे आम्ही व्यवस्था चांगली ठेवलीच असती. महिलांच्या बाबतीत साहेबांची दृष्टी अधिक जागरूकतेची होती एवढं मात्र खरं. मुक्कामावरच्या गर्दीत आम्ही चौकशी केली तेव्हा समजलं -परभणीच्या दौऱ्यावर सुमनताई बढे आणि मायाताई वानखेडे येणार म्हणून. सुमनताईंशी पूर्वीचीच ओळख होती. त्या





बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्या. या पूर्वी परभणीत त्यांचे काही कार्यक्रम आयोजीत केलेले. तेव्हा त्या आम्हाला नवीन नव्हत्या. ग्रामीण भागातून आलेल्या. अध्यात्मात विशेष गोडी. त्या प्रवचन करायच्या. कपाळावर मोठं कुंकू, नऊवार साडी, डोईवर पदर. ग्रामीण रूपाचा साक्षात अवतार. जेमतेम शिक्षण झालेलं. मायाताईंना संघटनेच्या बैठकीतून पाहिलेलं. मायाताई म्हणजे दुसरं टोक. मध्यमवर्गीय शहरी कुटुंबातून आलेल्या. एम.ए. पर्यंत शिक्षण. एका संस्थेत शिक्षिका म्हणून कार्यरत. डाव्या चळवळीतून आलेल्या. चंद्रकांत वानखेडे या डाव्या चळवळीतील कार्यकर्त्याशी प्रेमविवाह केलेला. सुमनताई ग्रामीण महिलांचे प्रतीक, तर या शहरी महिलांचे प्रतिबिंब. परकटी म्हणजे बॉब केलेले केस, बारीक अंगकाठी, डोळ्यावर चष्मा आणि अर्थातच गोल साडी. दोघेही पतीपत्नी शेतकरी संघटनेत आलेले. मेटीखेडे या गावी राहून ग्रामीण जीवनाचा अनुभव घेणारी जोडी. त्याच मुक्कामावर कार्यक्रमाच्या तारखा ठरवणाऱ्या मायाताईंची आम्ही भेट घेतली. त्यांच्याशी बोलून कार्यक्रमाचा मार्ग आणि दिवस ठरवून घेतले. तिथून गोविंदभाऊ, वैजनाथराव रसाळ आणि सेलूच्या कार्यकर्त्यांबरोबर आम्ही परभणीकडे परतलो.

॥ २ ॥

अकोल्यात ठरल्या कार्यक्रमाप्रमाणे दौऱ्याची सुरवात होणार ती जिंतूर तालुक्यापासून. कार्यक्रमाची आखणी आधीपासून झालेली. संघटनेच्या परभणी जिल्ह्याच्या बांधणीत आम्ही जिंतूर रोड विभाग म्हणून एक विभाग स्वतंत्र केलेला. परभणी जिल्हा, जिंतूरपर्यंत जाणाऱ्या रस्त्याच्या पूर्व व पश्चिम बाजूस असलेल्या सर्व खेड्यांचा हा भाग होता. त्या विभागाचे प्रमुख म्हणून वैजनाथराव रसाळ यांची नियुक्ती केलेली. वैजनाथराव रसाळांनी दौरे करून महिलांच्या सभांची व्यवस्था केलेली. दुसऱ्या दिवशी आम्ही मोहिम उघडणार होतो ती परतुडात. तिकडे परतुडात बापूराव महाराज, बाबुराव वांझुळकर आणि त्यांचे सहकारी धार परजूनच होते.

पंचवीस ऑक्टोबरला सकाळपासूनच वैजनाथराव रसाळ येऊन बसले, त्यांच्या सहकाऱ्यांसह. मुक्कामाची, सभा गावांची माहिती दिली. कार्यक्रमाची उजळणी झाली, पण सूर्य वर यायला लागला, तरी पाहुण्या बाया येईनात. वैजनाथरावांचा जीव वर-खाली. सकाळी येणाऱ्या बाया दुपार झाली तरी येईनात असं झालं तरी काय? त्यांचा शोध कुठे घ्यावा हेही कळेना. परभणीत त्या येणार कुठून हे माहीत नव्हतं. त्यामुळे

आम्हा मंडळीचं नुसतं आत बाहेर चाललं होतं. कंटाळून एकेक जण सटकायला लागला. वैजनाथरावही जेवण करून येतो म्हणाले. सगळी मंडळी ओसरली. बैठक शांत झाली; पण मी मात्र काळजीत. आधीच साहेबांनी आम्हाला 'प्रेमळ' भाषेत समज दिलेली. शिवाय महिलांचा दौरा. काही कमी-जास्त झालं तर नाही म्हणायला जबाबदारी येतेच. त्यामुळे आमचा जीव टांगणी लागलेला. वाट पाहता पाहता केंव्हातरी डोळा लागला.

दुपारी एकच्या आगेमागे सुमनताई आल्या. सोबत साधना दुबे ही पोरगी होती.

''बाकी मंडळी दिसेना सोबत?''

''त्या मागून येताहेत.''

''तुम्ही तर सकाळीच येणार होता. आपण पहाटेच रवाना होणार होतो, जिंतूर दौऱ्यावर.''

''त्याचं काय झालं वकीलसाहेब, आम्ही सगळे मिनीबसनं येत होतो. रात्री पालमजवळ गाडीला अपघात झाला, भर रात्रीची वेळ, जवळपास कुठे गाव नाही. सोबत कुणी नाही. रात्र आम्ही रस्त्यावरच गाडीत झोपून काढली. सकाळी पालम गाठलं. तिथे ओळखीनं चहा वगैरेची व्यवस्था झाली. मी या साधनाला घेऊन बसने परभणीकडे आले. माया गाडी नीट झाल्यावर मागाहून येईल.'' सुमनताईंनी साधनाची ओळख करून दिली. साधना दुबे म्हणजे विशीतली पोरगी, मेटीखेड्याची. मायाताईंच्या पठडीतली. भाषण द्यायची, फटाकडी गाणी म्हणायची.

रात्रभर जागरण, प्रवासाचा शिणोटा अन् धूळ. दोघींनी आधी गरम गरम पाण्यानं आंघोळ करून घेतली. गरम गरम जेवण केलं अन् मायाताईंची वाट पाहता पाहता ब्रह्मानंदी टाळी लागली. दोघीला माडीवरच उतरवलं होतं. त्यामुळे त्यांची निवांत झोप झाली.

संध्याकाळी चार साडेचारच्या सुमारास घरापुढे मिनीबस थांबली. त्यातून मायाताई आणि कु. जयस्वाल उतरल्या आणि खाली उतरली आमच्या डोक्यावरील काळजी.

आल्या आल्या मायाताईंनी जयस्वालची ओळख करून दिली. गाडी फेल झाल्याची माहिती दिली. सारी रात्र जंगलात या चार महिलांनी काढली. जंगल म्हणजे काही घनदाट झाडांनी, श्वापदांनी व्यापलेलं जंगल नाही. सडकेच्या दोन्ही बाजूंस शेतं पसरलेली; पण रस्त्यापासून वस्ती पार दूर असलेली. रात्रीची वेळ, त्यामुळे रस्तेच नव्हे, तर सारा परिसरच निर्जन. तशी या रस्त्यावर दिवसाही वाहतूक नसायची. रात्री तर





पाहायला नको. तशात या चार महिला आणि सोबत 'डायवर' अन् 'किलनर'. अशा परिस्थितीत, साहेब देवाला भले न मानोत बाया तरल्या, त्या देवामुळे एवढं खरं ! जय हो झाशीवाली ! मायाताई सोबत आलेल्या जयस्वालचं आणखी एक कौतूक. मेटीखेड्याच्या या पोरीचं लग्न ठरलेलं. आता साखरपुडा आणि लग्नाच्या काळात तरण्याताठ्या पोरीनं घराबाहेर दौऱ्यावर कसं जायचं? पण या बहाद्दर कन्येनं अन् तिच्या घरच्यांनी ते लग्न पुढे ढकललं आणि दौऱ्यात ती आली. 'आधी लगीन चांदवड महिला अधिवेशनाचं आणि मग माझं!' कार्यकर्त्यांची ही मानसिकता पाहिली, की वाटतं संघटनेत काहीतरी खास आहे. ज्यामुळे लोक आपल्या अडीअडचणी बाजूला सारून या कामाला जुंपून घेतात.

त्या दोघींना आंघोळी, जेवणं आटोपून तयार व्हायला सांगेतो कार्यकर्ते हळूहळू जमा झाले. अगोदर आले वैजनाथराव अन् लाहोटी. परभणीतले हे दोघे चिवट कार्यकर्ते परभणी अधिवेशनानंतर संघटनेत आलेले. आले ते अगदी चिकटून बसले संघटनेला. वैजनाथराव जिंतूरचे, तर लाहोटी वसमत तालूक्याचा संघटना प्रमुख. दोघांचीही आर्थिक परिस्थिती सामान्य. वैजनाथरावांकडे थोडी बहुत शेती, पण लाहोटीकडे तर तीही नाही; पण काहीतरी करून दाखावायची जिद्द दोघांकडेही. दोघांच्या गावोगावी ओळखी. अशा कार्यकर्त्यांमुळेच तर संघटना एवढी 'श्रीमंत' झालेली.

पण दोघांच्या दोन तऱ्हा. वैजनाथराव उंच, सडसडीत बांध्याचे. लाहोटी बुटका. वैजनाथराव नेहमी स्वच्छ पांढऱ्या कपड्यात राहणार. केसाला तेल लावून ते नीट विंचरलेले. लाहोटी देह कसाबसा कपड्यांत झाकणारा. डोक्यावरच्या केसाला जेमतेम कुंपण घालणारा. एकजण अबोल शांत, तर दुसऱ्याच्या तोंडात तीळ भिजणार नाही. हां, संघटनेवर कुणी हल्ला केला, तर हाबूक ठोकून वाद कुस्ती घालायला दोघेही तय्यार. तिथे भिडभाड नाही. वैजनाथराव पदवीधर, तर लाहोटी जेमतेम शालांत परीक्षा ओलांडलेला. वैजनाथराव आपली मतं ठाम मांडणारे. लाहोटी वादाला बगल देऊन पुन्हा मुद्याशी येणारा; पण साहेबांचा उल्लेख निघाला, की दोघेही हात जोडून 'जय देवा सुखात ठेवा' म्हणणार. इतपत त्यांच्यावर श्रद्धा ठेवणारे. साहेब हे नास्तिक, तर हे महा नास्तिक.

या दोघांच्या कात्रीत मी मात्र आज सापडलो. महिला दौऱ्याची सुरवात होणार होती, ती योजनेप्रमाणे जिंतूर तालूक्यापासून. म्हणजे वैजनाथरावांच्या क्षेत्रात आणि शेवट होणार तो वसमतमध्ये म्हणजे लाहोटीच्या प्रांतात. आता अडचण ही होणार होती, की या महिला उशिरा आल्यामुळे दौऱ्यातून एक जिंतूर तरी किंवा वसमत तरी

वगळावं लागणार होतं. नेमके दोघेही अत्यंत जिद्दीचे कार्यकर्ते आणि त्यांनी विलक्षण तयारी केलेली. त्यातही जिंतूर विभागात अगदी नव्यानं कामाला सुरवात झालेली. हा विभागच मुळी नव्यानं तयार केलेला आणि तिथला दौरा रद्द करावा, तर वैजनाथरावांना काम करणं अवघड होणार आणि वसमत टाळावं तर त्या भागात झालेल्या चांगल्या कामाला बगल दिल्यासारखं होणार. त्यामुळे मी मात्र या आड विहिरीत सापडलो.

एरव्ही दोघेही समजूतदारपणाने वागणारे; पण आज दोघांच्याही अंगात कली शिरलेला. दोघेही माझे अत्यंत लाडके कार्यकर्ते. आता समजूत घालावी कशी? शेवटी अशी तडजोड केली, की कार्यक्रमाचा क्रम थोडा बदलायचा. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम २५ च्या संध्याकाळपासूनचा क्रम कायम ठेवायचा आणि एक दिवस जास्तीचा 'चोरून' हां हूं करून महिला कार्यकर्त्यांची समजूत घालायची. थोडेसे इतर कार्यक्रम मागेपुढे करून 'दौरा' यशस्वी करायचा. दोघे बदलाला राजी झाले. दोघांचेही स्वर खाली आले नाही तर, ''वकील साहेब, जिंतूर तालुका युनिट रद्दच करून टाका. लोकांनी एवढी तयारी केलेली आणि तुम्ही आम्हाला बाजूला ढकलावं! नकोच हे संघटनेचं काम.'', ''तूमचं नाहीतरी वैजनाथरावांवर जास्त लक्ष. आम्ही वसमतमध्ये एवढं चांगलं काम करून आम्हांला ही नकारघंटा. सांभाळा तुम्ही वसमत, मैं तो चला.'' दोघांच्या बोलण्याचा सूर असा, जणू जे काही घडतंय ते सारं माझ्यामुळे. ऊस माळ्याचा अन् भांडण कोल्ह्यांचं. असं एकेरीवर आलेले हे अहि-मही रावण सांभाळणं फारच कठीण गेलं असतं.

आता कार्यक्रम ठरला. वैजनाथराव जिंतूरकडे रवाना झाले, बदललेल्या कार्यक्रमाची सूचना करायला. थोडेसे नाराज, बरेचसे खूष. लाहोटी तर खूषच. आपल्या तयारीवर विश्वास होता त्याचा. महिला अधिवेशनाला संख्येनं आघाडी मारायची या धोरणानं त्यानं आखणी केलेली होती. या आखणीत महिला दौऱ्याला महत्त्व म्हणून त्याचा हा 'प्रेमळ' आग्रह!

एव्हाना मायाताई आणि जयस्वाल तयार झालेल्या. त्यांच्या गाडीचे वाहक-चालकही जेवणखाण आटोपून तयार झालेले. लाहोटीला सोबत घेऊन आम्ही संध्याकाळी निघालो महिला दौऱ्याच्या मिनीबसने. चालकाला आम्ही वारंवार विचारून गाडीच्या प्रकृतीबद्दल खात्री करून घेतली. तोही म्हणाला, ''बेश्ट आहे जी.'' आम्ही त्या 'बेश्ट' मिनीबसमध्ये बसून परतूडच्या दौऱ्यावर उसवदकडे सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास रवाना झालो.





उसवदला सभा सायंकाळी लागलेली. उसवद गाव हे स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठवाड्यात गाजलेलं. इथल्या रझाकारांनी परिसरात धुमाकूळ घातलेला निजामी राजवटीत; पण आता केशव महाराजांच्या प्रभावाखाली ज्ञानेश्वरीच्या मार्गी लागलेला हा गाव. आमची वाट पाहत मंडळी खोळंबून बसलेली. आम्ही रात्री नऊ वाजता पोहोचलो. आम्हाला उशीरा का होईना; पण आलेले पाहून मंडळींनी सोडलेला सामुदायिक सुस्कारा थेट आमच्या कानापर्यंत आला. उसवद हे केशवपुरी महाराजांचं गाव. केशव महाराज म्हणजे प्रसन्न व्यक्तिमत्त्व. मध्यम उंची, सामान्य अंगकाठी, गोरा रंग, धुवट कपडे. पारंपरिक महाराजाप्रमाणे दाढी दीक्षित नाही. भगवे वस्त्र नाही, अहंकार तर नाहीच नाही. गावकरी त्यांच्याकडे फार आदराने पाहत. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत संघटनेनं पुलोद आघाडीला पाठिंबा दिलेला होता. त्या निवडणुकींत परभणी लोकसभा मतदारसंघात संघटना पुरस्कृत उमेदवार श्री. शेषराव देशमुख उभे होते. त्यांच्या प्रचारदौऱ्यातील शेवटची सभा परतूड तालूक्यातील श्रीधरजवळा या गावी झालेली. त्या दिवशी बापूराव महाराज, केशव महाराज, बाबा महाराज किर्लेकर या महाराज मंडळींची ओळख झालेली. सायंकाळी पाच वाजता प्रचार संपला. लाउडस्पीकर थंड झाले. आम्ही त्याच गावातील महाराजांच्या एका शिष्याच्या घरी जेवायला बसलो. आमच्या छातीवरील बिल्ले पाहून संघटनेबाबत चर्चा सुरू झाली. त्या वेळी शेषराव माहिते प्रचारात सोबत होते. शेषराव म्हणजे फर्डा वक्ता. काळ्या मातीत वावरलेला आणि संघटनेच्या आखाड्यात घोळलेला. त्यांच्या भाषणाचा प्रभाव जरूर पडला, तेव्हापासून ही मंडळी संघटनेच्या प्रेमात पडली. पैकी बापूराव महाराज यांचा शिष्यपरिवार मोठा. परतूड, अंबड तालुक्यांत पसरलेला. संघटनेला मिळालेली ही एक मोठी देणगी होती. महाराज मंडळीच्या प्रवचन-कीर्तनातून संघटनेचा विचार अधिक प्रभाव पाडू शकतो. केशव महाराजांनी बरीच वर्षे पुढे संघटनेचे काम केले. अनेक मेळावे, सभा, अधिवेशनांत हजेरी लावली, शिष्यगणांसह. गेल्याच वर्षी त्यांचे निधन झाले (इ.स. २०००). बापूराव महाराज हे अधिक प्रभावशाली. एका पायाने अधू, स्वभाव काहीसा तामसी; पण भक्तगणांना या तामसी स्वभावाचंही कौतुकच. परतूड तालुक्यात संघटनेची बांधणी करण्यात बापूराव महाराजांचा सिंहाचा वाटा. या महाराज मंडळीच्या शिष्यांनी प्रचारात फार आघाडी घेतलेली. महाराजांच्या प्रभावाखाली महिलावर्ग खूप मोठ्या प्रमाणात. नेमका याचाही फायदा या महिला दौऱ्यात झाला. या महिला दौऱ्यात बाबूराव वांझूळकर हे परतूड तालूका प्रमुख होते. या दौऱ्याचं आयोजन

त्यांनी बापूराव महाराजांच्या सल्ल्यानं केलेलं. बाबूराव वांझुळकर सुशिक्षित मराठा कुटुंबातले. परभणी अधिवेशनापासून संघटनेकडे आकृष्ट झालेले. गावोगावी मित्र परिवार आणि सोयरसंबंध. त्यामुळे परतूड तालूक्यात कामाच्या उभारणीत त्यांचा फार मोठा सहभाग. बाबूराव वांझुळकर यांचं घर ऐन मोंढ्यात. त्यामुळे दैनंदिन व्यवहारासाठी लोक मोठ्या प्रमाणावर मोंढ्यात येत. त्यांना आरामाचं एक ठिकाणही झालेलं आणि त्यामुळे गावोगावच्या लोकांशी संपर्क फार सोपा झाला. कामासाठी लोक तालुक्याला आले म्हणजे अनायासे भेटीगाठी व्हायच्या.

तिसरे महाराज बाबामहाराज किर्लेकर. हे मुळात बापूराव महाराजांचे शिष्य; पण आता त्यांचा स्वत:चा शिष्यपरिवार तयार झालेला. मंठ्याजवळील तळणीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डावीकडील किर्ले हे त्यांचं गाव. डोळ्यात विलक्षण जरब, उंच शिडशिडीत बांधा, गौरवर्ण. व्यक्तिमत्त्व एकदम प्रभावशाली; पण स्वभाव अत्यंत शांत. दिखाऊ व्यक्तिमत्त्वाच्या एकदम विरुद्ध. जरब दाखवायचं कधी कामच नाही.

उसवदला केशव महाराजांच्या बैठकीत चहापाणी झाले आणि आम्ही सभास्थानी पोहोचलो. सभा गावाबाहेरील मुख्य रस्त्यालगत पाण्याच्या टाकीशेजारी रात्री दहा वाजता सुरू झाली. एवढी रात्र झालेली असूनही शेजारीपाजारी असलेल्या आंदवाडी, कानडी, देवठाणा प्रामुख्याने या भागातून दीड दोन हजार स्त्रीपुरुष हजर होते. महिला दौऱ्यात पुरुषांना मंचावर जागा नव्हती. आम्ही पार मागे सडकेवर बसलो होतो. शेतकरी संघटनेनं शरद जोशींच्या आदेशानुसार एक पायंडा पाडला. सभेत पुढे बसणार त्या स्त्रिया. पुरुष मंडळी त्यामागे. सभा, मेळावे, अधिवेशनात हाच पायंडा आणि हा तर महिला मेळावा दौरा. या दौऱ्यात तर मंचावर फक्त स्त्रियाच.

सुरुवातीला साधना आणि जयस्वाल या 'किसानांच्या बाया आम्ही' व 'उष:काल होता होता काळरात्र झाली' ही दोन गीतं सादर करायच्या. नंतर साधना युवावर्गाच्या भावना प्रकट करायची. त्यानंतर मायाताई आणि शेवटी सुमनताई बोलायच्या. क्रम हा असा असायचा. सुमनताई बढे या ग्रामीण कुटुंबातल्या. पूर्वायुष्य ग्रामीण विभागातच गेलेलं. त्यामुळे त्यांच्या भाषणात जमिनीशी नातं जाणवायचं. ग्रामीण जीवनातील रोजचे अनुभव त्यांनाही आलेले. त्यामुळे त्या बोलत तेव्हा जणू समोरच्या श्रोत्यांची भाषाच बोलत. त्यांचा स्वत:चा पिंड आध्यात्मिक. त्यामुळे पूर्वीपासून प्रवचनाचा वगैरे नाद. त्यात आता संघटनेची धार आलेली. त्यांच्या भाषणाने समोरचा समाज हेलावून





जायचा, त्यांचं व्यक्तिमत्त्वही ग्रामीण जीवनाशी एकरूप होणारं. त्यामुळे या दौऱ्यात त्यांचं भाषण म्हणजे लोकांसाठी एक मोठं आकर्षण. स्त्रिया मोठ्या संख्येनं आवर्जून असायच्या. मायाताई या सुशिक्षित, पेशानं शिक्षिका. पाचवारी साडी, डोळ्यावर चष्मा, बॉब केलेले केस अन् सडपातळ बांधा. शरद यादव, मुलायम सिंग यांच्या शब्दांत म्हणजे, 'पर कटी' औरत. त्यांचं भाषण वैचारिक. मायाताईंनी संघटनेत येण्यापूर्वी संघर्षवाहिनी, क्रांती दल या कार्यात, समाजवाद्यांच्या युवा चळवळीत काम केलेले. त्यांच्या बोलण्यातून साम्यवाद पडद्याआडून दिसायचा. आता शेतकरी संघटना म्हणजे साम्यवादाचं विरुद्ध टोक; पण संघटनेनं एकाच वेळी वाघ आणि शेळी यांना दावणीला बांधलेलं. संघटनेत दोन टोकांची अनेक मंडळी होती आणि हे सारे एका छत्राखाली नांदत होते, हे एक आश्चर्यच वाटतं. संघटना ही मुक्त अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ती तर भांडवलशाहीचा विरोध हे ज्यांचं भांडवल ती डावी मंडळी मांडीला मांडी लावून होती. अल्पच काय; पण मुळीच भू-धारक नसलेल्या ब.ल.पासून तो खासगी पाणीपुरवठ्याची व्यवस्था असलेल्या बागायतदार भाऊसाहेब बोरावकेंपर्यंत. राजकारणाच्या आखाड्यात रंगलेल्या प्रल्हाद पाटील कराड, माधवराव मोऱ्यांपासून तो राजकीय पक्षापासून कोसो दूर राहणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत आणि ऊस, केळी, संत्री यांसारख्या बागायतदारापासून कापूस, ज्वारीसारख्या कोरडवाहू पिकांपर्यंत सारी रंगीबेरंगी मंडळी एका मांडवात नांदत होती. म्हणणारे भले म्हणोत संघटना बड्या बागायतदारांची आहे. एवढ्या मोठ्या संख्येनं बागायतदार या महाराष्ट्रात असते तर आज शेतकऱ्यांचं चित्र भिकेला लागलेल्या माणसासारखं दिसतं, ते थोडेच दिसलं असतं? पण पेपरवाल्या मंडळींना हे कुणी सांगायचं? त्यांना मूठभर पर्यावरणवाद्यांना सांभाळलं की झाले. सामान्य शेतकऱ्याशी काय देणंघेणं? कुणी तरी एकदा म्हटलं, की ही बड्या शेतकऱ्यांची संघटना, की सारे लागले लिहायला तेच.

सभा आटोपली तेव्हा रात्रीचे बारा वाजून गेले होते. लोक बैलगाडी, ट्रॅक्टर, मिळेल त्या वाहनाने वा पायी गावाकडे तशा रात्री परतले. हातात काठी अन् कंदील, खेड्यातून रस्ते सापडायला एवढं पुरेसं आहे. आम्ही रात्री केशव महाराजांच्या घरीच मुक्काम केला. रात्री जेवणं आटोपून झोपायला दीडदोन वाजले. तेवढ्या रात्री मायमाउल्यांनी गरम गरम स्वयंपाक केला अन् जेवू घातलं आम्हांला.

सकाळी महाराजांनी उठवलं तेव्हा पापण्या उघडायला तयारच होईनात. डोळ्यात

ही झोप भरलेली! महाराज मंडळींना रात्र काय अन् दिवस काय 'अंधे को दिन रात बराबर!' कसे तरी उठलो. वाटलं या आरत्या उसवदमध्ये होताहेत त्या पहाटे का रात्री? वाटलं एवढ्या अपरात्री उठणारे आम्ही एकटेच; पण लोटा घेउन बाहेर पडलो तो दिसलं अख्खं गावच गावाबाहेर लोटलंय. माणसं टाळीत टाळीत लांबवर जाव लागलं. वाटलं आता शेजारचं गाव लागतं की काय! आम्ही परत यायच्या आत महिला मंडळींनी सारं आटोपून आंघोळी केलेल्या अन् चहाफराळासाठी आमची वाट पाहत बसलेल्या. त्यांच्या उत्साहाला सलाम करीत आम्ही सारे आटोपून फराळावर तुटून पडलो.

तिथून सोबत महाराज मंडळी आणि इतर कार्यकर्ते एका जीपमध्ये घेऊन आम्ही पुढच्या टप्प्यावर म्हणजे परतूड तालुक्याच्या टोकाचं गाव तळणीला गेलो. तळणीची सभा ऐकायला धर्मा नाईक नावाचे एक शेतकरी आलेले होते. तळणीचा कार्यक्रम त्यांनी ऐकला आणि संघटनेकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. सुमनताईंच्या भाषणाने ते प्रभावित झाले होते. तळणीहून किर्ला, जयपूर या सभा आटोपून रात्री मुक्कामाला वायाळ पिंपरीला. तिथे शेवटची सभा भल्या रात्री घेतली. घेतली म्हणजे काय हाणली. प्रत्येक सभेत नवीन काय बोलणार? तीच तीच रेकॉर्ड, तोच क्रम; पण आम्ही जुने असलो तरी प्रत्येक सभेला ऐकणारे नवीन असायचे. त्यांना सारा विचारच नवीन वाटायचा. सभा आटोपल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील भाव खूप काही सागायचे.

आजही रात्री बराच उशीर झालेला; पण एव्हाना उशिराची अन् सकाळी लवकर उठण्याची सवय झालेली. एवढी जागरणं करून, सकाळी ताजेतवाने राहणाऱ्या आमच्या महिला कार्यकर्त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडं. खेड्यापाड्यात फिरायचं, तिथला सारा कारभार 'उघड्यावर'. बंदिस्त घरातल्या सवयी बाजूला ठेवून कुठलीही किरकीर न करता दिवस दिवस दौऱ्यावर राहण्याचं दिव्य पार पाडणाऱ्या या रणरागिणींच्या निष्ठेची कमाल म्हणावी. सभेत बोलायला उभ्या राहिल्या म्हणजे सभेतील श्रोत्यांच्या प्रतिक्रिया टिपण्यासारख्या असायच्या.

पुढे चालून चांदवडच्या भव्य मेळाव्यात महिलांनी उपस्थितीचा जागतिक उच्चांक स्थापन केला. त्याची बीजं या महिला कार्यकर्त्यांच्या चिवट प्रचारात होती, हेच खरं. पुरुष मंडळींचं एक वेळ ठीक आहे. त्यांचा सारा कारभार एरवीच उघडा. खेड्यापाड्यात जिथे घरच्या लक्ष्मीलाच आडोसा अक्षरश: नावाला, तिथे पाव्हण्या बायांना आडोसा कुठला असणार; पण या पाव्हण्या बायांनी आपल्या वागणुकीत कधी यजमान मंडळीला





आपल्याला काही अडचण होते आहे, काही त्रास होतो आहे हे जाणवू दिलं नाही. त्यांच्याप्रमाणे याही महिला कार्यकर्त्या प्रभू ठेविले तैसे ऱ्हावे अशा झाल्या होत्या. विशेषत: मायाताईंचं कौतुक करावं तेवढं थोडं. ही बाई 'परकटी' असूनही ज्या घरी उतरेल त्या घरच्या बायकांत मिसळून जायची आणि त्यांना अवघड न वाटू देता, त्यांच्या स्वयंपाक कामात हातभार लावायची. ग्रामीण जीवनाच्या जवळ जायची तिची धडपड असायची आणि तीही अगदी सहज घडणाऱ्या कृतीतून.

॥ ३ ॥

सत्तावीस तारीख. म्हणजे आजचा तिसरा दिवस. सकाळची सभा होती परतूडपासून जवळ असलेल्या अंबा या गावी. त्यानंतरची सभा वाईला. वाई हे गाव मंठा-जालना रोडवर उजव्या बाजूला. तिथे दुपारी सभा घेतली. वाई गावाला बापूराव महाराजांची शिष्यमंडळी अधिक. पैकी शालिग्राम उबाळे या शिष्याने तिथल्या सभेचे आयोजन केलेलं. दुपारचं जेवण त्यांच्या घरीच झालेलं. आमच्याबरोबर ही भलीमोठी पंगत बसलेली. लग्नाचं जेवणच जसे! कपाळावर गंध-बुक्का लावलेल्या शिष्यमंडळीचं 'पार्वती पते हरहर महादेव' च्या घोषणात जेवण पार पडलं. उबाळे मंडळीच्या वागण्यात विलक्षण नम्रता. सोबतच्या महाराज मंडळीच्या पायावर डोकं ठेवून त्यांनी नमस्कार केला. महाराज मंडळीनेही पाय लांबवून नमस्कार घेतला आणि हात लांबवून आशीर्वाद दिला. त्यांचं एक ठीक आहे; पण वयस्क मंडळी जेव्हा गाडीबरोबर नळ्याची यात्रा घडवू लागली तेव्हा मात्र आम्ही आमचे पाय आखडून घेतले; त्यामुळे आमची आणि त्या शिष्यमंडळीची अक्षरश: 'हाता-पायी' झाली. त्या मंडळीचा सहवास सोडून मुक्काम मोडताना खूपच वाईट वाटलं. काही लोकांचा लवकरच लळा लागतो हेच खरं.

बापूराव महाराजांचा आवाका फारच मोठा. सभा झाल्या फार अन् माणसं झाली थोडी असा प्रकार असल्यामुळे सर्वच ठिकाणी आमचं पूर्ण युनिट हजर राहणं अवघड काय, अशक्यच झालं. महिला दौऱ्याचा लाभ जास्तीत जास्त पदरात पाडून घ्यावा व संघटनेचा प्रचार अधिकाधिक करून घ्यावा म्हणून बापूराव महाराजांनी खूप सभा लावल्या. आता सर्व सभा करता याव्या म्हणून वाईहून आम्ही दोन युनिटस् केले. एव्हाना संघटनेचा एक जुना कार्यकर्ता एल.पी. देशमुख हाही आम्हांला जॉईन झाला होता, त्याच्या गाडीसह. एल.पी. देशमुख हा एल.पी. या नावानेच प्रसिद्ध. परभणीच्या कृषी विद्यापीठात शिक्षण

घेत होता तेव्हापासून संघटनेत सहभागी.

परभणीला झालेल्या अधिवेशनाच्या तयारीत एल.पी., शेषराव मोहिते यांचा सिंहाचा वाटा. सारी विद्यार्थी फौज यांनी उभी केलेली. परभणी अधिवेशनाच्या प्रचाराची आघाडी पायाला चाकं लावून शेषराव, एल.पी. आणि त्यांच्या पोरांनी सांभाळलेली. एल.पी. म्हणजे बुटकी मूर्ती. विलक्षण बोलका स्वभाव. बिनबॅटरीचा रेडिओ. महाराष्ट्रातील बहुतेक छोट्यामोठ्या कार्यकर्त्यांचा वैयक्तिक परिचय असलेला. आता आता बायर कंपनीत नोकरीला लागलेला. संघटना सुटत नव्हती अन् नोकरी सोडता येत नव्हती. अशा अडचणीत जमेल तशी मदत करायचा एल.पी. संघटनेला. संघटनेच्या महिला आघाडीचा दौरा अन् आपण आयोजनापासून दोन दिवस दूर, ही कल्पना त्याला स्वस्थ बसू देईना. तेव्हा 'कच्चे धागेसे बंधा, दौडा दौडा आया' अन् वाईपासून जॉईन झालेला. तेव्हा त्याच्या उपस्थितीचा फायदा घेऊन किंवा त्याच्या गाडीच्या उपलब्धतेचा फायदा घेऊन आम्ही दोन गटांनी सभा करायचं ठरवलं. एका गटात मायाताई, साधना दुबे, मीना जयस्वाल, केशवपुरी महाराज व बाबाराव महाराज किर्लेकर अन् दुसऱ्या गटात सुमनताई, एल.पी., बापूराव.

दुसऱ्या गटानं केंधळीची सभा केली. केंधळी म्हणजे मंठा-जालना रस्त्यावर डाव्या हाताला असलेलं गाव. बागायती शेती- हिरवागार परिसर. शेतकरी कामगार पक्षाचे झुंजार नेते अंकुशराव घाऱ्यांचं गाव. गाव चांगलं आखीवरेखीव. घरांची बांधणूक चांगली पक्की. गावालगतच असलेल्या मोठ्या औरसचौरस मैदानात सभा भरलेली. सारा गावच नाही, तर जवळपासच्या गावांहूनही माणसं आलेली.

केंधळी गाव फार पूर्वीपासून शेकापच्या पठडीतलं. तिथे इतर विचारांना फारसा थारा नाहीच; पण अशा 'अवघड' ठिकाणी संघटनेनं घेर दिला होता. काय असेल ते कारण असो; पण डाव्या पक्षापैकी शेकापचा शेतकरी संघटनेवर विशेष रोष. कदाचित असं असेल, की संघटित क्षेत्रातील विशेषत: कामगार व नोकरदार क्षेत्रात फार पूर्वीपासून साम्यवादानं हातपाय पसरलेले. त्यामुळे तसा उशिरा आलेल्या या शेकापला या क्षेत्रात पाय रोवणं अवघड गेलं असेल. तेव्हा त्यांनी आपला मोर्चा शेतकऱ्याकडे वळवला. नाही तरी शेकापमध्ये फक्त 'शे'च होते 'का' चा पत्ताच नाही आणि आता या 'शे'वर हक्क सांगणारी आणखी एक संघटना पुढे येते आहे, यामुळे शेकापचा संघटनेवर रोष असणं साहजिकच; तरीही त्या गावची दोन तरणी पोरं बालासाहेब व प्रभाकर यांनी हिंमत करून





संघटना उभी केली या गावात आणि ती बघता बघता फोफावली. त्यांच्या पाठीवर थाप मारण्यासाठी इथे सभा होणं आवश्यक होतं. या पोरांनीही उत्साहानं तयारी केलेली. सभा सारी माणसांनी फुलून गेलेली. कुठे इंचभरही जागा रिकामी नव्हती. बाजूच्या घरांच्या ओट्यांवरही मंडळी बसलेली. संध्याकाळी चारचा सुमार. सभेसाठी वेळही योग्य होती. या ठिकाणी महिलांतर्फे बोलणाऱ्या एकट्या सुमनताई तेव्हा पुरवठ्यासाठी त्यांच्यासोबत एल.पी.ला उभं केलं. एल.पी. बोलायला फर्डा. त्याच्या बोलण्याचा एक खास ढंग आहे. थेट ग्रामीण वळणाचा. बोलण्यात प्रसंग सांगणार, तेही खेड्यापाड्यातल्या लोकांच्या अनुभवांतले. भाषा थेट हाणामारीची, भिडभाड न ठेवणारी. त्यामुळे हशा टाळ्यांचा कडकडाट होता सभेत. त्या मागे बोलायला उभ्या राहिल्या सुमनताई. समोरचा मोठा जमाव पाहून त्याही भरात आल्या. पाऊण तास लोकांना गुंगवून ठेवलं. खेड्यातल्या कोतवाल, सरपंच, बीडीओ आदी अधिकाऱ्यांची साखळी सांगताना खेड्यातल्या मडक्यांच्या उतरंडीचं असं खुबीदार वर्णन त्या करायच्या, की एकाच वेळी माणसं हसायची अन् अंतर्मुखही व्हायची. बायाबापड्यांच्या हालअपेष्टांचं वर्णन करताना कुठलीही नाटकीय भाषा न वापरताही समोरच्या सभेला त्यांनी हेलावून सोडलं. सभा आटोपून लोक परतले ते एल.पी. अन् सुमनताईंची आठवण घेऊनच.

॥ ४ ॥

आता आमचा परतूडचा दौरा संपला होता. पहिल्या गटासाठी निरोप ठेवून आम्ही पाथरी तालुक्यात चाक ठेवलं गाडीचं. आता चार्ज घेतला तो सेलूच्या गोविंदभाऊंनी. गोविंदभाऊ म्हणजे संघटनेसाठी फार मोठी देणगी होती. पाथरी तालुक्यात काम करायचं म्हणजे गोविंदभाऊंना गटवायचं धोरण फार पूर्वीपासून ठरवलं होतं. त्यासाठी त्यांना हेरून गळ टाकून ठेवले होते. गोविंदभाऊ जोशी म्हणजे सेलूचं एक प्रस्थ. उंच बांधा, गोरा रंग, पांढरे सफेद कपडे, संस्थानिकाचा बडेजाव. अवतीभोवती माणसांचा वावर. घरची खानदानी श्रीमंती. बराच मोठा शेती विस्तार. पाण्याखालची शेती अन् कोरडवाहूही.

त्यांच्या निरोपाप्रमाणे आम्ही रात्रीचा प्रवेश केला पाथरी तालुक्यातील मानोली या गावी. सारा गाव रोषणाईने नटलेला. एखाद्या लग्नातील स्वागतासाठी मांडव सजवावा तसं सभास्थान सजवलेलं. गावातलं वातावरण पाहून अन् लोकांनी केलेलं प्रचंड स्वागत पाहून पाहुणी मंडळी तर खूष झाली. चला, पाथरीतली सुरुवात तर चांगली झाली. चांगली

सुरवात म्हणजे अर्धं यश. नेहमीच्या प्रथेप्रमाणे अवतीभोवतीच्या कैक खेड्यांतल्या माणसांनी गर्दी केलेली. स्वागताला गोविंदभाऊ, पांडुरंगराव मगर, उद्धवराव, भुजंगराव खरात ही पाथरीमधली बडी बडी मंडळी. एकूणच सभा 'वजनदार' झालेली. एव्हाना आमच्यापाठोपाठ मायाताईंची मिनीबसही आलेली. रात्र चढत गेली, तशी सभा रंगत गेली.

संघटनेच्या रिवाजाप्रमाणे बाप्यागड्यांना मागे सारून महिलांना पुढे आणलं. मंचावर परत मायाताई, सुमनताई, साधना अन् मीना जयस्वाल. रात्र चढत गेली. कळस गाठला तो परत सुमनताईंनी. दिवसाच्या सभेपेक्षा रात्रीची सभा जास्त रंगते. मला वाटतं, रात्रीच्या वेळी श्रोते आणि वक्ते यात सुसंवाद लवकर होत असावा. दिवसा इकडंतिकडं लक्ष जातं माणसाचं. रात्री अवतीभोवती अंधार, त्यामुळे साहजिकच एकाग्रता लवकर येते. मांडे कंपनीनं झटून मेहनत केलेली. त्यामुळे सभा चांगली पार पडली. रात्रभरचा मुक्काम, जेवण अर्थात मानोलीला. तिथे महिला मंडळाची व्यवस्था लावून आम्ही बाप्येगडी गोविंदभाऊ, त्यांच्यासोबतची कंपनी आणि मानोलीचे कार्यकर्ते यांची मैफल जमली.

तेव्हापासून मानोली म्हणजे शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला झालेला आणि आजही आहे. केव्हातरी गप्पा मारता मारता आम्ही झोपी गेलो.

॥ ५ ॥

आज २८ ऑक्टोबर. बोल बोल म्हणता तीन दिवस संपलेले. सकाळी आम्ही सारे इरळदला रवाना झालो. इरळद म्हणजे रामूकाका यांचं गाव. महाराष्ट्रातील इतर कुठल्याही खेड्याप्रमाणेच एक खेडं. मानवत-सेलू रस्त्यावरचं छोटेखानी गाव. रामूकाका मुळे याच गावचे. संघटनेनं भारावलेल्या माणसाचा उत्तम नमुना म्हणजे रामूकाका. जवळ हुशारी असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे योग्य शिक्षण न घेता आल्यामुळे रामूकाकांच्या हुशारीला तसा लौकिक अर्थ राहिला नव्हता. जेमतेम पोट भरता येईल एवढीच शेती. पोट बांधून संघटनेचं काम करणारा हा गडी तसा लाजराबुजरा; पण बैठकीत बसला म्हणजे अशी उदाहरणं देतो, की समोरचा माणूस गार झाला पाहिजे. एकलव्यासारखं, अगदी जंगलात राहून शरद जोशींवर 'लक्ष' ठेवणारा. त्यांच्या विचारानं भारावलेला. एरवी बैठकीत एकापेक्षा एक सरस उदाहरणं देणाऱ्या रामूकाकाची सभा म्हटलं, की बोबडी वळते. संघटनेनं दिलेला कुठलाही कार्यक्रम अगदी प्रामाणिकपणाने राबवणारा हा





गडी आमचा अगदी आवडता कार्यकर्ता. रामचंद्र बापू अध्यक्ष असताना संघटनेच्या घोषणेनं उत्तम गाव रंगवण्याची एक स्पर्धा आयोजित केली होती संघटनेनं. त्या वेळी इरळद गावाची सजावट, गावानं सडारांगोळ्यानं केलेलं स्वागत पाहून बापू इतके भारावून गेले होते, की अवाक् होणं म्हणजे काय याचा उत्तम नमुना दाखवला त्यांनी आम्हांला. पाणावल्या डोळ्यांनी बापूंनी इरळदची सभा गाजवली अन् महाराष्ट्रातलं सर्वोत्कृष्ट गाव म्हणून गौरवलं. त्या गौरवाचे खरे मानकरी रामूकाका; पण त्यांचं मोठेपण एवढं, की हा मान स्वीकारायला त्यांनी गावच्या दुसऱ्याच माणसाला पुढे केलं. 'मी तर हैच की संघटनेचा; पर एक अजून मानूस जुळतो आपल्या संघटनेला.' ही त्यांची भूमिका. हा भाग अर्थात फार पुढचा. या वेळीही आमच्या स्वागतासाठी गाव झाडून स्वच्छ केलेला. मारुतीपुढच्या मैदानात सकाळची सभा आयोजित केलेली. सभास्थान पताकांनी सजवलेलं. सगळी तयारी करून देऊन मांडवात कुठेतरी पडणाऱ्या पुलंच्या नारायणाची ही संघटना आवृत्ती. आम्ही हात धरून त्यांना पुढे बसवलं. महिला दौरा असल्यामुळे मंचावर बसवता आलं नाही एवढंच. इरळदच्या मागे सावंगी मगर आणि त्यानंतर देऊळगाव अवचार. दोन्ही गावं नव्यानं संघटनेत आलेली. त्यामुळे त्यांचा उत्साह उल्लेखनीय. दोन्ही सभांतून बाप्येगड्यांनी पुढे जागा धरलेल्या; पण आमच्या आवाहनाला मान देऊन बिचाऱ्यांनी 'लक्ष्मुयाहला' पुढं बसवलं. दोनही कार्यक्रम आटोपून आम्ही गोविंदभाऊंचा, रामूकाकाचा निरोप घेतला. एकूण पाथरीचे कार्यक्रम सर्वार्थानं अवर्णनीय. सभांचं उत्तम आयोजन, स्वागताची तयारी जय्यत. सभांतील अंतर उत्तम. वेळेचं भान आणि जबरदस्त प्रचार. त्यामुळे गर्दीत पार पडल्या साऱ्या सभा. गोविंदभाऊंच्या पगडीत आणखी एक तुरा. पाथरी तालुक्याला रामराम ठोकून आमच्या सवाऱ्या 'वसमती'कडे रवाना झाल्या. पाहू आता किंवा दाखवू महिला प्रचारकांना लाहोटी काय 'दिवे' लावतात ते. लाहोटीच्या तयारीवर मला पूर्ण विश्वास असल्यामुळे वसमतच्या प्रतिसादाबद्दल मायाताईंनी चौकशी केली तेव्हा मी मिशीतल्या मिशीत हसून मौन साधलं होतं. मिशीतल्या मिशीत यासाठी की तेव्हा मी मिशा राखलेल्या होत्या. हल्लीसारखा सिमेंट रोड नव्हता तेव्हा आमचा.

॥ ६ ॥

लाहोटीची आमची भेट 'नियती'ने चुडाव्याला ठरवलेली होती. आमची प्रचारयंत्रणा म्हणजे काही राजकीय पक्षासारखी नव्हती तासन्‌तास उशीर करायला.

तरीही लोकांच्या आग्रहाला बळी पडत पडत आम्ही ही वसमतीत उशिराच प्रवेश केला. चारच्या सभेला आम्ही फक्त साडेतीन तास उशीर केला. वसमतचे सारे कार्यक्रम त्यामुळे वरखाली होणार होते. आधीच सारे कार्यक्रम एक दिवस उशिरा सुरू झालेले; त्यामुळे पुढचा एक दिवस वैजनाथरावांसाठी कसा पदरात पाडून घ्यावा या चिंतेत आम्ही. त्यात लाहोटीच्या कार्यक्रमाला असा दांडगा उशीर; पण लाहोटीला कसं मनवायचं आम्हांला चांगलं ठाऊक होतं. त्यामुळे आम्ही निश्चिंत मनाने मार्गस्थ झालो. चुडावा म्हणजे वसमत तालुक्यातलं पूर्णा-नांदेड रस्त्यावरचं एक मोठं गाव. हे गाव म्हणजे रंगनाथ देसाई या कार्यकर्त्याचं गाव. रंगनाथ देसाई म्हणजे सर्वार्थानं काळ्या मातीतला माणूस. शेतात नांगर धरणार, पेरणी करणार अन् कापणीही करणार. श्रमाची प्रतिष्ठा मानणारा शेतकरी. चुडाव्याला स्वत:चं टिनपत्र्याचं का असेना; पण घर असलेला. घराला खूप मोठं अंगण. समोर बैठक. चेहरा नजरेत न भरणारा. धोतर, सदरा अन् खांद्यावर उपरणं हा नेहमीचा वेश. संघटनेचा निष्ठावान कार्यकर्ता. वाचनाचं विलक्षण वेड. वाचनाचं म्हणजे कथाकादंबऱ्या नव्हे तर शेतीविषयक लिखाण. संघटनेचा मोर्चा असला म्हणजे समोरच्या अधिकाऱ्याला अत्यंत अडचणीचे वाटणारे प्रश्न विचारून निरुत्तर करणारा गडी. साखर कारखान्याच्या बैठकीत तर संचालक मंडळाची भंबेरी उडवणारा अन् तरीही स्वभावानं अत्यंत शांत असा कार्यकर्ता. रंगनाथ, रामूकाका, वैजनाथराव, लाहोटी अन् त्यांच्यासारखे कैक कार्यकर्ते म्हणजे संघटनेचं खरंखुरं वैभव. त्यांच्या निष्ठा पाहिल्या म्हणजे आपल्या दिखाऊपणाची लाज वाटावी. दर वेळेस मला आश्चर्य वाटतं, त्यांच्या संघटनेवरील श्रद्धेचं. संघटनेत पैसा नाही, कुठलं पद नाही, सरकार दरबारी काही स्वार्थ साधला जात नाही. कार्यक्रमाला गेले म्हणजे धड उतरण्याचीही सोय केली जात नाही. तरीही हे कार्यकर्ते संघटनेला घट्ट चिकटून राहतात. लाखा लाखांच्या सभेत गर्दीत बसून पार दुरून साहेबांचं 'दर्शन' घेतात डोळे भरून, कान भरून ऐकतात आणि तेवढ्या शिदोरीवर पुढची वाटचाल करतात. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचं मोठेपण आमच्या उच्चभ्रूपणात अन् व्यावसायिकतेमुळं. बाकी खरे मोठे कार्यकर्ते हीच मंडळी.

चुडावा म्हणजे तसं राजकारणी लोकांचं गाव; पण संघटनेसाठी साऱ्यांचं साह्य. त्यामुळे कार्यक्रम बिनधास्त अन् चांगल्या तऱ्हेने पार पडायचे. चुडावा परिसरातून फार मोठ्या संख्येनं माणसं आलेली होती. आता सुरू झाला लाहोटीच्या प्रतिष्ठेचा प्रदेश. त्यानं जिद्दीनं प्रचार करून मोठमोठ्या सभा आयोजित केलेल्या. त्याचं पहिलं दर्शन





झालं ते चुडाव्याला. हे दर्शन मोठं उत्साहवर्धक होतं. ही सभाही अर्थातच सुमनताईंनी गाजवली. त्या दिवशी शेवटची सभा होती काऊलगावी. रात्री साडेदहा वाजता सभा सुरू झाली. गावातल्या चौकात ही सभा झाली. नेहमीप्रमाणे साधना अन् मीना यांनी किसान गीत म्हटलं, 'उष:काल होता होता' हे गीत झालं. एव्हाना मायाताई आणि सुमनताई काय बोलणार हे आम्हाला पाठ झालं होतं. दिवसाकाठी चार चार सभा करायच्या. प्रत्येक सभेत काय नवीन बोलणार, तेव्हा भाषणाची होते तयार एक तबकडी अन् प्रत्येक ठिकाणी तीच वाजत राहते. ऐकणारा प्रत्येक ठिकाणी नवीन असतो. त्याला सारी मांडणी नवीन असते. तो भारावून जातो अन् आम्ही साथीची माणसं जुन्या कार्यकर्त्यांशी नव्याने संपर्क करून माहिती गोळा करू लागतो. पहिल्या एकदोन गावांनंतर सोबतच्या लोकांचा कार्यक्रम हाच ठरलेला. काऊलगावची सभा आटोपून आम्ही चुडाव्याला परतलो, मुक्कामाला. हे होतं लाहोटीचं नियोजन. आता मुक्काम चुडाव्याला तर शेवटची सभा तिथे नको व्हायला? पण सांगणार कुणाला, आलं लाहोटीच्या मना तिथे कुणाचं चालेना ! आमचं काहीही असो, पण दोनही गावांच्या सभा मस्त झाल्या म्हणून लाहोटी खूष होते. म्हणजे पर्यायाने म्हात्रेसरही खूष. लाहोटी म्हणजे म्हात्रेसरांचा शिष्य. ते प्रभू रामचंद्र तर हे त्यांचे हनुमान. नाही तरी लाहोटी म्हणजे हनुमानच. सारखी भ्रमंती चालू. सभांना मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे पाहुण्याबायाही खूष. त्या खुषीत लाहोटीनं केलेली चुडावा-काऊलगाव परत चुडावा ही त्रिस्थळी यात्रा त्यांच्या लक्षातही नाही आली आणि त्यांच्या लक्षात नाही आलं, ते आम्ही तरी कशाला लक्षात आणून देऊ? तेव्हा आम्हीही लक्षात न आल्यासारखं दाखवून लाहोटीला खूष केलं.

॥ ७ ॥

वसमतमधलं पुढचं गाव होतं आलेगाव. सकाळी साडेसातला आम्ही तिथे पोहोचलो. लाहोटी आमच्याआधी तासभर तिथे गेलेला. आम्हाला वाटाड्या म्हणून सोबत रंगनाथ देसाई होतेच. आलेगावला सभा नव्हती. एक धावती भेट होती. मुख्य देवाबरोबर छोट्यामोठ्या देवांचं दर्शन व्हावं तसं. तशी सभा आयोजित होती ती हिवऱ्याला; पण हिवरा (बु.) हे जरा लांबच्या अंतरावरचं गाव, तेव्हा जाता जाता आलेगाव हे गाव करावं, बैठकीत चर्चा करावी व चहापानाचा कार्यक्रम करावा, की लगेच हिवरा गावी रवाना व्हावं असं ठरवलं. हिवऱ्याला दुपारी ११.३० वा. व त्यानंतर चिखली,

सावंगी या गावी सभा करून रात्री नऊ वाजता एरंडेश्वर या गावी आम्ही आलो. एरंडेश्वर हे वसमत तालुक्यामधलं एक मोठं गाव. गावात कॉंग्रेसी मंडळींचा राबता. रंगनाथ देसाईच्या मदतीनं स्थानिक लोकांना हाताशी धरून लाहोटीनं गाव उभं केलं होतं. त्या गावी रात्री जंगी सभा झाली. रात्र झालेली; पण आमची सुटका काही होणार नव्हती. दौऱ्याचा कार्यक्रम आयोजित करण्याऐवजी लाहोटीनं खरं म्हणजे उसाचा चरक लावायला पाहिजे होता. चरकवाले नाही का, पुन्हा पुन्हा चोयट्या चरकात घालून शेवटचा थेंब काढत. त्याबरहुकूम आलेल्या पाहुण्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यात या पठ्ठ्याचा हात कुणी धरणार नाही. एरंडेश्वरची सभा पाहून आम्ही खूष झालो, हे पाहून लाहोटीनं हळूच विषय छेडला:

"वकील साब, अभी एक प्रश्न है मेरे सामने." लाहोटीचा प्रश्न म्हटलं, की माझ्या पोटात गोळा! तेव्हा आलीया भोगासी असावे सादर !

"फर्माइये नेताजी अब क्या हुकूम है ?"

"वडदच्या लोकांचा फार आग्रह. त्यांनी फार जंगी तयारी केली आहे. अवती भोवतीच्या लोकांना जेवण द्यायची तयारी केलेली आहे. उनको मैं ना नही बोल सकता, इसलिये मैंने.हां भर दी है. अब आपही हमारे गुरू है. सम्हाल लो." आता आली का पंचाईत. पंचाईत म्हणजे काय अगदी आणीबाणीच्या काळात इंदिराजी राष्ट्रपतीपुढे आणीत तशी पंचाईत! वटहुकुमावर सही करावी तर पंचाईत अन् न करावी तर त्यापेक्षाही जास्त पंचाईत. लाहोटीनं वडदच्या लोकांना सांगून सर्व बनाव आधीच केलेला, तेव्हा हा प्रेमळ बनाव आम्हाला ठोकरता येणं शक्य नाही हेही त्याला माहीत. आता महिला कार्यकर्त्यांना कसं सांगायचं हा आमच्यापुढे अवघड प्रश्न. रात्रीचे दहा वाजून गेलेले. मंडळींच्या घशाचं भुसकट पडलेलं अन् आणखी एक सभा म्हणजे .....

मी लाहोटीला म्हटलं,"आता असं करू, तुम्ही सभेची बात करू नका. पुढे जाऊन तयारी करा. मी देसाईला सोबत घेऊन येतो. मुक्कामाचं गाव वडद आहे. तिथे जायचं, जेवायचं अन् आराम करायचं असं मी सांगतो. तुम्ही तिथल्या लोकांना सांगा, बाईंना विनंती करा, "आम्हाला विचार ऐकायची उत्सुकता आहे. पुन्हा तुमच्यासारखे पट्टीचे बोलणारे काय ऐकायला मिळणार! एवढी गंगा दारी आली अन् आम्ही कोरडं राहावं का? तेव्हा तुम्ही चार शब्द बोलावं. आम्ही समदी तयारी केलीय. शेजारपाजारच्या दहा गावचे लोक सांजधरून वाट पहायलेत.' अशी पट्टी पढवून ठेवा अन् पहा काय होतं ते; मात्र गेल्या गेल्या सारी तयारी करायची. चहाचा कप तयार ठेवायचा." पडत्या फळाची आज्ञा घेऊन लाहोटी सटकला. आम्ही एरंडेश्वरची सभा आटोपून 'योजनेबरहुकूम' मुक्कामासाठी म्हणून वडद गावाकडे निघालो. पुढच्या सभेची महिलांना काही कल्पना नव्हती.





आम्ही वडदला रात्री साडेअकराच्या सुमारास पोहोचलो तो गाव माणसांनी फुलून गेलेला. आमची जीप पाहताच सारा परिसर घोषणांनी दणाणून गेला; आम्ही मुक्कामी पोहोचतो तो मोठी वरातच निघाली. बैठकीला टेकतो, तोच चहापाणी समोर आलं अन् पट्टी पढवल्याप्रमाणे एकेक पोपट बोलायला लागला,"सुमनताई, एक इनंती हाय. लई आशेला लागलू आमी. एक डाव ऐकावं." एवढ्या अजिजीनं गावातील एकेक वयोवृद्ध माणूस 'इनंती' करू लागल्यावर काय टाप लागली कुणाची नाही म्हणायची. आमची मात्रा लागू पडली अन् एवढ्या रात्री बारा वाजता सभा सुरू झाली. समोर प्रचंड जमाव एवढी रात्र असूनही आलेला पाहून ताईंना उत्साहाचं भरतं आलं. कंबर कसून त्या उभ्या राहिल्या भाषणाला आणि सभा अशी रंगली, की सारा शीण हरपला. केव्हातरी सव्वादीडला सभा आटोपली, प्रचंड घोषणा झाल्या अन् आम्ही परत वरातीनं मुक्कामी आलो अन् पानावर अक्षरश: तुटून पडलो.

॥ ८ ॥

तीस तारखेची पहाट वडदला झाली. परभणीला तातडीची काही कामं असल्यामुळं मी एकटा परभणीस परतलो. इतका कार्यक्रम चांगल्या तऱ्हेने पार पडला; पण मला काही तरी खटकत होतं. या महिला कार्यकर्त्यांत काही तरी कुरबूर चालली असावी असं सारखं जाणवत होतं. समोर काही घडत नव्हतं. शीतयुद्ध चालू असावं अशी पुसटशी शंका गेल्या दोन दिवसांपासून यायला लागली. निश्चित असं काही सांगता येत नव्हतं. आपल्याला उगाच असं वाटलं अशी समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

मी सकाळी लवकरच आलो परभणीला आणि लगेच तासादीडतासांनी महिला मंडळ आलं परत, वडदहून. घरात जाऊन हातपाय धुऊन चहा घेईपर्यंत लाहोटी येऊन ठेपला. वैजनाथराव सकाळीच आलेले. वाट पाहून होते, आता त्यांच्या भागात दौरा सुरू होणार होता. लाहोटी आले ते हिरमुसले होऊन. आल्या आल्या कुणी बाया जवळपास नाहीत हे पाहून मला म्हणाले,

''वकीलसाब, एक भानगड हो गयी.'' मला शंका होतीच... ''सुमनताई म्हणतात की मी मायाबरोबर जाणार नाही. मला परत पाठवा, नाही तर तिला परत पाठवा. बडी मुश्किल से इनको मनाके यहां तक लाया हूं. अब इसमें से रस्ता निकालो. मी तर हातच टेकले.'' त्याचं बोलणं होईपर्यंत सुमनताई तरातरा बाहेर आल्या अन् म्हणाल्या,

''वकीलसाहेब, मी काही मायाबरोबर बसत नाही. माझी परतीची व्यवस्था करा.''

''ताई, असं घायकुतीला येऊ नका. काय भानगड झाली ते मग पाहू. तुम्ही असं करा वैजनाथरावांच्या बरोबर त्यांच्या जीपमध्ये बसून पुढे व्हा. मी मायाताईंबरोबर येतो. दौरा असा अर्धवट टाकू नका. तुम्ही म्हणजे आमचा हुकमी एक्का आहात. तुम्ही नाही म्हणजे..... '' वगैरे वगैरे बोलून त्यांना मनवलं अन् वैजनाथरावांना बरोबर देऊन पुढे रवाना केलं. मी दाढी, स्नान आटोपून घेणार होतो. ते सारं आता बाजूला राहिलं. लाहोटीची जीप बिघडली होती तेव्हा ती परत करून मोटारसायकल घेऊन जिंतूरला गाठतो असं सांगून तो सटकला. दोघींच्या भांडणात हा बिचारा भरडून गेला असावा तेव्हा काही तरी करून सटकून जावं असं ठरवूनच तो आला असावा. नसता एखादं काम असं अर्धवट टाकून रणातून पळ काढणारा रणछोडदास थोडाच होता तो; पण ते काहीही असलं तरी दोघींना सांभाळून दौरा पुढे रेटणं मला जरुरीचं होतं. लगोलग मी मायाताई, साधना अन् मीना यांच्यासोबत मिनीबसमध्ये निघालो.

पुढे मायाताई सुमनताई यांच्यात झालेल्या कुरबुरीचा त्यांच्या पद्धतीनं वृत्तांत समजला. लाहोटीकडूनही दौऱ्यात हळूहळू माहिती समजली. इंग्रजांचा बाप तो शेक्सपिअर का कोण, तो म्हणाला होता ना, 'मत्सरा तुझे नाव स्त्री'. तो भले इंग्रजीत म्हणाला. आम्ही आपले एतद्देशीय भाषेत सांगत आहोत. बेबनाव झाला त्या दोघींत हे ठीक आहे; पण त्यामुळे आमची झाली पंचाईत. 'दोन बायकांचा दादला' वगैरे वगैरे आम्ही वगातून पाहिलं, ऐकलं होतं; पण दोन महिलांत सापडला कार्यकर्ता हे नाटक आम्ही पहिल्यांदाच अनुभवत होतो. आमची अवस्था झाली ती, 'एक गाडी, दोन नारी, एक नउवारी, दुसरी पाचवारी, दोघी म्हणती मीच खरी' ही अशी. मायाताईला वाटायचं -'सुमनताई म्हणजे संघटनेत आलेलं रॉ मटेरीयल. तिच्यावर संस्कार होणं जरुरी आहे. त्याचसाठी साहेबांनी माझ्यासोबत तिला दिलेलं. माझ्या तालमीत तिनं तयार व्हावं म्हणून.' मायाताई म्हणजे परकटी औरत. एम.ए. वगैरे शिकलेली, शिक्षिकेचा पेशा असलेली. तेव्हा शिकवणं हे रक्तातच, शिवाय इंग्रजीतली जाडजाड पुस्तकं पाहिलेली, वाचलेली, डाव्या आंदोलनात





खेळलेली महिला. त्यांच्या दृष्टीनं सुमनताईंना कुठल्याही चळवळीची, कुठल्या संघटनेची काहीही पार्श्वभूमी नाही. शिवाय प्रवचन वगैरे करणाऱ्या मंडळीजवळ कळत न कळत एक अहं तयार झालेला असतो, समोरच्या श्रोत्यांनी जपलेला, वाढवलेला. संघटनेत असा अहं कसा काय चालणार? इथे बारा गावची, बारा विचारांची माणसं जमा झालेली. त्यांना समावून घेणारे नेतृत्व पाहिजे... हा विचार मायाताईंचा.

याउलट सुमतनताई म्हणायच्या, 'ही स्वत:ला काय समजते? इंग्रजी आलं म्हणून माणूस मोठा होतो की काय? हिला खेड्यातला काय अनुभव आहे? मी खरी ग्रामीण महिलांची प्रतिनिधी. मी त्यांच्यात जन्मले, वाढले, राहिले, राहत आहे. ही कोण माझ्यावर संस्कार करणारी? मी प्रभावशाली कार्यकर्ती आहे म्हणूनच साहेबांनी या दौऱ्यासाठी माझी निवड केलेली.' त्याही पलीकडे, त्यांच्या अहंला धक्का न लावता, मोठेपणाचा आव न आणता थोडा कमीपणा घेऊन मायाताई वागल्या असत्या तर सुमनताई नरमाईनं वागल्या असत्या.

खरं तर असं होतं सुमनताईंच्या भाषणांना मिळणारा प्रचंड प्रतिसाद आणि त्यामुळे त्यांचं होणारं उत्स्फूर्त स्वागत, त्यांच्याभोवती सभेनंतर जमणारा कार्यकर्ता जमाव याची कळत नकळत मायाताईंच्या मनात असूया निर्माण झाली असावी. ते साहजिकच आहे. मायाताईंचं भाषण म्हणजे रूक्ष. त्यांचे मुद्दे असतीलही महत्त्वाचे; पण त्यांच्याकडे वक्तृत्व नव्हतं. त्यापेक्षा साधना छान बोलायची; पण हा आपला दोष स्वीकारायला मायाताई तयार नव्हत्या अन् त्यांना याची निश्चित जाणीव होती. कुरबुरीचं मूळ कारण हे असं.

तसं वक्त्या म्हणून सुमनताई उजव्या असल्या तरी त्यांचं वागणं अहंपणाचं. महिलांत मिसळणं त्यांना माहीतच नाही. कुठेही गेल्या म्हणजे बैठकीत पुरुषांबरोबर बसणार. महिलांचा जणू स्पर्शही नको. त्याउलट मायाताई कुठेही गेल्या, की थेट माजघरात, स्वयंपाकघरात जाणार. घरच्या लक्ष्मीची चौकशी करणार. त्यांच्या कामात हातभार लावणार. अवतीभोवती महिलांना जमवणार. जमलेल्या महिलांशी हळूहळू जवळीक करणार. त्यांचं मग महिलांशी चांगलंच सूत जमे. जेवतानाही त्या आमच्याबरोबर नाही तर घरच्या बायकांबरोबर बसायच्या. याउलट सुमनताईंचं काम. त्या मंचावरून ग्रामीण महिलांची व्यथा सांगत, अगदी प्रभावीपणानं; पण मंच सुटला, की त्याही पुरुषांच्या रांगेत बसायच्या. रांगेतच नाही तर पंगतीलाही पुरुषांच्या. महिलांशी बोलणं तर सोडा,

संपर्कही टाळायच्या. सुमनताईंची दोन रूपं अशी होती. तर मायाताई आतून बाहेरून एक. त्यांच्यातील असूयेचा भाग सोडला तर कुठलंही काम पुढे होऊन त्या अंगावर घेत. सुमनताई मात्र मला पहा अन् फुलं वहा प्रवृत्तीच्या!

फुलं वाहायला आम्ही तयार होतो; पण फक्त हा दौरा आटोपेपर्यंत. पुढे हातभर दूरच राहायचं होतं आम्हाला. 'अंबाबाई, एवढा दौरा सुखरूप पार पडू दे. तुझी खणा-नारळांनी ओटी भरीन, आमच्या लक्ष्मीच्या हातानं. अर्थात जोशीसाहेबांना ओटी भरण्याचा पत्ता न लागू देता. देवाबिवाच्या ते सख्त खिलाफ. त्यांच्या कामात कशाला हे देवबिव! आज शेवटचा दिवस. तेव्हा जय देवा खुशाल ठेवा!'

आज आम्ही जिंतुरात प्रवेशणार होतो. वैजनाथरावांचा हट्ट पूर्ण होणार होता; पण त्यांच्या चेहऱ्यावरील काळजीच्या रेषा आणखी घट्ट झालेल्या दिसल्या. जिंतूरच्या दौऱ्याला सुरवातीपासूनच नाट लागलेला. दौऱ्याची सुरुवात जिंतुरातून होणार होती. तो सारा कार्यक्रम पाच दिवसांनी पुढे ढकलावा लागला. देवा देवा करता दौऱ्याचा शेवटचा दिवस उगवला, तो सुमन-माया यांच्या महाभारतीय युद्धाच्या सावल्या घेऊनच. युद्धातला पहिला बाण सुमनताईंनी टाकला तेव्हा वैजनाथराव समोरच होते. इतक्या कष्टानं सभा आयोजित केलेल्या, त्यांचा फज्जा उडतो की काय ही काळजी घेऊनच वैजनाथराव पुढे निघाले. त्यांच्या जीपच्या मागेच आम्ही पंधरावीस मिनिटांनी निघालो. जिंतूर तालुक्यातील कान्हड या गावची सभा सुरू झाली, सकाळी साडेदहा वाजता. जिंतूर तालुक्यातील बोरी हे मोठं गाव. त्या गावाहून कुपटा गावी जाणाऱ्या रस्त्यावरचं कान्हड हे उजव्या बाजूचं छोटेखानी गाव. त्याच रस्त्यावर दोन्ही बाजूंस आठदहा किलोमीटर परिसरात बरीच गावं. त्यामुळे अवतीभोवतीच्या गावकऱ्यांनी सभेस खूपच गर्दी केलेली. कान्हडचा युवा कार्यकर्ता विठ्ठल डोंबे व वैजनाथराव यांनी चांगलाच प्रचार केलेला दिसला. सभांना झालेली गर्दी पाहून वक्त्यांना तर स्फुरण चढतंच; पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे कार्यकर्त्यांना येणारा हुरूप. कुठे तरी आपल्या श्रमाचं चीज झालं, या समाधानाची पावती मिळते.

परभणीहून मला फार घाईत निघावं लागलं; त्यामुळे दाढी, स्नान राहिलेलं. सभास्थानाला लागूनच एक आड होता. त्या आडापुढे मिनीबस आडवी लावलेली. तिच्या आडोशाला दाढी, आंघोळ करायला माझी सोय झाली. तिकडे साधना दुबे, मीना जयस्वाल या दुकलीने 'किसानाच्या बाया आम्ही शेतकरी बाया' हे गीत सुरू केलं आणि मी





आडातलं पाणी शेंदून हर हर शंभो सुरू केलं. च्यायला आडाचं पाणी बरंच गार होतं की! वैजनाथराव विठ्ठल यांच्या पहाऱ्यात आंघोळ आटोपून कपडे बदलून तयार झालो तो सुमनताईंची मडकं गाडग्याची उतरंड सुरू झालेली. समोरची गर्दी पाहून त्यांनाही स्फुरण चढलं. सारा रागलोभ विसरून त्याही फॉर्मात आल्या. वैजनाथरावांचा चेहरा आणखी उजळला. मंचाबाहेरील माणूस अन् मंचावरील कलावंत हे एकाच वेळी दोन वेगवेगळी अन् तरीही एकच व्यक्तिमत्त्व असा काहीसा चमत्कार असतो. सुमनताईंचं मंचाबाहेरील वागणं आणि त्या देत असलेल्या भाषणावरून त्यांचं उभरणारं चित्र यात एवढी तफावत का असावी ? मंचावर रूक्ष वाटणाऱ्या मायाताई, मंचाबाहेर एवढ्या माणसाळलेल्या, सामाजिक, कौटुंबिक होतात हे तरी कसं. कुठलं चित्र खरं? सभा गाजवणाऱ्या माणसाचंही काहीसं असंच असावं. एरवी दांभिक असणारी माणसं सभा मारून नेतात अन् राजकारणात तरतात, तारतात. सारी गंमत आहे झालं.

सभा संपली. कार्यकर्तेमंडळी खाली उतरली अन् शीतयुद्ध परत सुरू. सुमनताई अन् मायाताई यांची फारकत चालू राहिली. दोघींना दोन गाड्यांत बसवलं. वैजनाथरावांच्या हवाली केलं सुमनताईंना आणि पुढच्या मुक्कामाकडे आमची दौड सुरू झाली. पुढचा मुक्काम वाघी धानोरा. कान्हड आणि वाघी धानोरा हे अंतर बरंच आहे. आम्हाला पोहोचायला तीन वाजून गेले होते. पब्लिकला जबरदस्त भूक लागलेली. वाटेत एकही हॉटेल नव्हतं. वाघी धानोऱ्याला पोहोचलो तेव्हा जेवणं तयारच होती. वैजनाथरावांनी हे काममात्र चांगलं केलं होतं. सभांत अंतर चांगलं ठेवल्यामुळे जास्तीत जास्त गावी आम्ही पोहोचू शकलो. दूरदूरहून माणसं सभेसाठी जमायला लागली. त्यामुळे सभांना हजेरीही भरगच्च राहायची. दुसरं त्यांनी आधीच निरोप दिला असल्यामुळे जेवण, चहा फराळाच्या वेळाही व्यवस्थित पाळल्या गेल्या.

वाघीच्या लोकांनी भाकरी-वरणाचा बेत केला. हायब्रीडची भाकर अन् तिखटजाळ वरण, आम्हाला घाम फुटला. शेतकरी म्हटलं, की मर्द माणूस. त्यामुळे तिखट खाल्लंच पाहिजे. तिखट खाणं हे मर्दपणाचं एक लक्षण. पाण्याच्या घोटाबरोबर आम्ही आमची भूक शांत केली. वैजनाथरावांना आमची दया आली तेव्हा त्यांनी गुळाचा खडा मागवून आमची इज्जत वाचवली. जेवणं झाली, थोडं लोळणंही झालं, एव्हाना संध्याकाळ झालेली. गावालगतच्या मैदानातच सभा लावली होती. संध्याकाळच्या कलत्या प्रकाशात कार्यक्रम पार पडला. अंवतीभोवती हिरवी शेतं, मैदान स्वच्छ, वातावरण

प्रसन्न होतं. बोलण्याचा आनंद वक्त्यांनी आणि ऐकण्याचा आनंद श्रोत्यांनी तर निसर्ग न्याहाळण्याचा आनंद आम्ही लुटला.

पुढचा टप्पा होता अंबरवाडी. प्रकाश क्षीण होत चाललेला. रस्ता डोंगर जंगलातला. रस्त्यावर चिटपाखरूही नाही. तसा रस्ता चांगला; पण निर्मनुष्य. नाही म्हटलं तरी धडधड व्हायला लागली. आम्ही निम्माशिम्मा रस्ता पार करतो न करतो तोच मिनीबसच्या टायरनं फुस्स म्हटलं. आता बोंबला. किर्र जंगल, दिवस माळवतीकडे झुकलेला. सोबतची जीपही पुढे गेलेली. पंक्चर जोडल्याशिवाय गाडी पुढे जाणार नाही व स्टेपनीसुद्धा फुस्स झालेली, ही खुषखबर चालकाने दिली. आम्ही धडधडत्या अंत:करणानं अवतीभोवतीचा निसर्ग न्याहाळत अन् चोराचिलटांची वाट पाहत बसलो. अंधार दाटत चालला. तेव्हा मी एकट्यानं अंबरवाडीकडे जायला निघालो. मायाताई, साधना, मीना, चालक, वाहक ही जोडी अन् सोबतीला मारवाडी गावचा कार्यकर्ता मुंजाभाऊ ऊर्फ 'जिंतूरचे 'ब.ल.' यांना मागे ठेवलं. मी थोडं पुढे जातो तो मायाताई म्हणाल्या,

''उमरीकर, तुम्ही एकटे जाऊ नका, मी सोबत येते.''

त्यांनी बॅटरी सोबत घेतली अन् आणखी काही पावलं पुढे जातो तो लंगडत लंगडत मुंजाभाऊ आला अन् मला मोठमोठ्यानं हाका मारीत एका बाजूला घेऊन म्हणाला,

''वकील साहेब, तुम्हीच मागे रहा बुवा, किर्र जंगलचा रस्ता, रस्त्यावर कुणीही नाही अन् दोन जवान पोरी. मला भीती वाटते. मी मायाताईबरोबर जातो, तुम्ही मागे थांबा.'' मायाताईंना हे सांगितल्यावर त्या हसल्या अन् म्हणाल्या,

''आमच्यासोबतची माणसं आमच्या अत्यंत विश्वासातली. तेव्हा तुम्ही काही काळजी करू नका.'' एव्हाना आम्हाला उशीर होतोय हे लक्षात आल्यामुळे वैजनाथरावांची जीप परत आली. त्या जीपमधे बसून आम्ही सारे अंबरवाडीला आलो. वाहक, चालकांनी तिथे चाक दुरुस्त करून घेतलं अन् जीपमधे टाकून ते परत गेले गाडी आणायला.

एव्हाना रात्रीचे आठ वाजले होते. अंबरवाडीला शाळेसमोरच्या मैदानावर सभा भरलेली. सायंकाळी सहा वाजता होणारी सभा रात्री आठ वाजता सुरू झाली. आमची गाडी आल्यावर घोषणांचा गदारोळ झाला अन् लगेच सभा सुरू झाली. तोपावेतो चहापाण्याची व्यवस्था झालेली होती. सोबत पोह्यांचा फराळही होताच. तिथली सभा आटोपून निघायला रात्रीचे दहा वाजले होते. आणखी एक सभा शिल्लक होतीच. अंबरवाडी जिंतूरच्या एका बाजूला, तर दौंडगाव हे जिंतूरच्या अगदी विरुद्ध टोकला; पण त्या गावी





सुभाष मगर या आमच्या प्रेमातल्या कार्यकर्त्यानं सभा लावलेली; त्यामुळे रात्रबेरात्र झाली तरी ती सभा करणं भाग होतं. पूर्वी ठरल्याप्रमाणे लाहोटी आम्हाला जिंतूरच्या नाक्यावर भेटणार होता. आमचा रस्ता जिंतूरहूनच जाणार होता. तसा तो वाटच पाहत होता. नाक्यावरच्या 'दिनरात' खुल्या हॉटेलात आम्ही चहा घेतला अन् लाहोटीला घेऊन आमची महिला दौड चालू ठेवली.

आम्ही दौडगावला गेलो तेव्हा रात्रीचा दीड वाजला होता. सभा होणार नाही असं समजून लोक घरोघरी निघून गेले होते. परगावच्या लोकांना एवढ्या रात्री परतणं शक्य नव्हतं म्हणून ते जवळच्या देवळात जागा मिळेल तिथे झोपले होते. आम्ही आल्याची खुषखबर सुभाषनं लाउडस्पिकरवरून गावात कळवली अन् पाहता पाहता लोक सभास्थानी जमले. एवढी रात्र झालेली असूनही हजार आठशे माणसांचा जमाव पाहून आम्ही हातच जोडले. काय उत्साह म्हणावा लोकांचा ! सुभाष मगर अन् वैजनाथराव दोघांचीही धन्य म्हणावी.

सभा आटोपेतो सुभाषच्या घरी जेवणाची व्यवस्था केलेली. गरम गरम भात, वरण, पोळी, गोडधोड केलेलं. वर माया अन् सुमनताई यांचा साडी-चोळी देऊन सत्कार केला. शिकलेल्या असो की बिनशिकलेल्या, बाया त्या बायाच. साडी-चोळी म्हटलं, की खूष. एकाच साडी-चोळीच्या कार्यक्रमानं पाचवारीही खूष अन् नऊवारीही. सुभाष मगरचं घर तसं जुन्या परंपरेतलं, त्यांनी ही परंपरा राखली. आम्ही पाठ थोपटली वैजनाथरावांची. शेवटी सुभाषची आई म्हणजे वैजनाथरावांची बहीणच की. रात्री मुक्काम दौडगावालाच. सकाळी चहा फराळ करूनच आमची दौड पुढे चालू झाली. साऱ्या सभा पार पडल्याचा आनंद तर वैजनाथरावांना होताच, शिवाय ज्या महायुद्धाची भीती त्यांना वाटत होती ते युद्ध झालंच नाही. दोनही पक्ष नुसते फुसफुस करण्यातच धन्यता मानत होते.

आता परभणी दौरा संपलाच होता. तेव्हा राम राम करायला काहीच हरकत नव्हती; पण इतका ठरीव ठाशीव कार्यक्रम पार पाडू दिला तर तो लाहोटी कसला? त्यानं सकाळचा चहा फराळ होऊ दिला अन् हळूच एक पिल्लू सोडले,

''वकील साहेब, मायाताईको यवतमाळ की तरफ बढना है. त्यांना आपण तिकडे रवाना करू. सुमनताईंचे पुढे दिवस रिकामे. तेव्हा आपण वसमतमधील बाकी गावं करू. कैसी रही आयडिया !''

''महाशय! तुम्ही सुमनताईंना पटवा अन् कार्यक्रम करा. हम तो चले देस.'' लाहोटीनं नाममात्र आग्रह केला. आम्ही नाममात्र विरोध केला अन् ठरलं की, मायाताईंनी हिंगोलीमार्गे यवतमाळकडे रवाना व्हावं अन् आम्ही सुमनताईंना घेउन वसमतमध्ये दुसऱ्या फेरीची दौड करावी. लाहोटी तसा आपली कल्पना इतरांच्या गळी उतरवायला पक्का. त्यानं सुमनताईला पटवलं अन् त्यांचा वसमत दौरा पक्का झाला.

सकाळी आम्ही औंढा फाट्यापर्यंत संगमंग आलो. फाट्यावरून मायाताईला यवतमाळ रस्त्याला लावलं. दोनही पक्षांनी एकमेकांकडे शेवटचं पाहून घेतलं अन् 'शरद जोशी आगे बढो' करून दोन दिशांनी प्रयाण केलं. तिथून आम्ही हट्टा फाट्यापर्यंत लाहोटीच्या सोबत आलो. तिथून लाहोटी सुमनताईंना घेउन आरळकडे गेला अन् वैजनाथरावांसह आम्ही परभणीकडे.

■■



# कापूस रक्ताळला!

॥ १ ॥

परवा सकाळी काही कामासाठी मी हिंगोलीकडे चालत्नो होतो. आमच्या एस्.टी.ने औंढा मागे टाकलं आणि आम्ही सुरेगावकडे सरकलो. औंढ्यापासून आठनऊ किलोमीटरवर सुरू होतो सुरेगावचा परिसर. त्याला लागून येहळेगाव व त्यापुढे येतं डिग्रस. आम्ही सुरेगावच्या परिसरात आलो आणि जुन्या आठवणी वर आल्या. मन सैरभैर झालं. ८६ सालातील कापसाच्या आंदोलनाच्या घटनांचा पट समोर उलगडत गेला. सुरेगावच्या पाटीवर जमा झालेली हजारो, हजारो शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी, त्यांनी केलेला घोषणांचा प्रचंड गदारोळ, 'शेतकरी संघटना जिंदाबाद', 'भीक नको, घेऊ घामाचे दाम', 'कापसाला भाव मिळालाच पाहिजे', 'शरद जोशी जिंदाबाद' त्यामागे आले अश्रूधुराचे नळकांडे फुटण्याचे आवाज, 'सुईं ऽऽऽ फद् !' लोकांचा आरडाओरडा, धावाधावीचे आवाज. थाड थाड बंदुकांच्या गोळ्यांचे आवाज, बायाबापड्यांच्या, लहान मुलांच्या किंकाळ्या. काही काळ भयाण शांतता. नंतर कण्हण्याचे आवाज. परत भयाण शांतता.

याच परिसरातल्या तीन शेतकऱ्यांचा पोलिसांच्या गोळीबाराने बळी घेतला. शेकडो शेतकऱ्यांचं रक्त वाहिलं, तेही याच परिसरात. तिघांच्या हौतात्म्यानं आणि शेकडो स्त्रीपुरुषांच्या रक्तानं पावन झालेला हा परिसर.

एव्हाना आम्ही हिंगोलीला पोहोचलो; पण डोळ्यापुढचं चित्र काही फिकट होईना. ज्या दिवशी हा भयानक गोळीबार झाला, त्या दिवशी आम्ही प्रमुख कार्यकर्ते तुरुंगात होतो. त्यामुळे घटना प्रत्यक्ष पाहू शकलो नव्हतो; पण त्यानंतर लगेच त्या भागातील शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी शरद जोशी यांनी सांत्वन दौरा काढला. त्या दौऱ्यात मी त्यांच्यासोबत होतो. सत्याग्रहात सहभागी शेकडो शेतकऱ्यांनी साहेबांना वृत्तांत कथन केला तेव्हा डोळ्यासमोर स्पष्ट चित्र उभं राहिलं. आज त्या साऱ्या आठवणींना उजाळा मिळाला. अंधारलेल्या आठवणींना उजाळा. मन उदास झालं. हे असं कां झालं असावं ?

लोकांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांचं, शासनाचं भयाण रूप उभं राहिलं समोर. एरवी उठता बसता शेतकऱ्यांच्या नावाची जपमाळ ओढणारं शासन प्रसंगी एवढं

क्रूर निर्दयी होऊ कसं शकतं? वीरप्पन, दाउद, शकील अशा गुंडांपुढे पायात शेपूट घालणारे हे पोलिस नि:शस्त्र सत्याग्रहींवर असा निर्दयी गोळीबार करतात, हा या लोकशाहीतला मोठाच विरोधाभास आहे. जालियनवाला बागेतल्या गोळीबारास जबाबदार असलेल्या जनरल डायर आणि स्वतंत्र भारतातील पोलिसांत काही फरक नाहीच का? असलाच तर एवढाच, की त्याला त्याच्या देशाचं हित पाहायचं होतं अन् यांना? जाऊ द्या कोळसा उगाळावा तेवढा काळा !

केव्हा कुठे कशी सुरवात झाली या साऱ्या घटनांची ? १९८६ मध्ये कापसाच्या पिकाची परिस्थिती फार बिकट झालेली होती. महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या एकाधिकार योजनेमुळे शेतकऱ्यांना शासनाला कापूस विकणं आवश्यक होतं. शासनाने जाहीर केलेले भाव हे ८५ सालच्या भावापेक्षा जवळजवळ निम्म्याने कमी होते. शेतकऱ्यांसाठी हा फार मोठा धक्का होता. एकीकडे सर्वच क्षेत्रांत प्रचंड भाववाढ झालेली. कर्मचाऱ्यांच्या पगारात/ महागाई भत्त्यात वाढ झालेली. तेव्हा कापसाची भाववाढ अपेक्षित होती. भाववाढ तर सोडा, गतवर्षीचा किमान भाव द्यावा ही अपेक्षा तरी पूर्ण व्हायला पाहिजे होती. शासनाच्या धोरणामुळे शेतकऱ्यांत प्रचंड असंतोष होता. या पार्श्वभूमीवर २ ऑक्टोबर ८६ रोजी अकोल्यात कापूस परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत कापसाच्या परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली आणि लाखो शेतकऱ्यांच्या साक्षीने शासनाकडे कापसाबाबत मागणी नोंदवावी आणि ही मागणी मान्य न झाल्यास महाराष्ट्रभर कापूस आंदोलन पुकारावं असा ठराव अर्थातच एकमताने मान्य करण्यात आला. हा ठराव मनात ठेवूनच लोक घरोघरी परतले. या लाखो लोकांच्या निश्चयाची दखल शासन घेईल, ही अपेक्षा होती.

एवढ्यावरही शासन जागं झालं नाही. ते होणारही नव्हतं. संकटरावांच्या नेतृत्वाखालील हडेलहप्पी सरकार, ते काय अशा आंदोलनाला मानणार? आणीबाणी परंपरेतले संकटराव लोकमताची काय कदर करणार? तेव्हा शेतकरी संघटनेनं त्यांना दुसरी वॉर्निंग दिली चांदवडला. ८६ सालच्या नोव्हेंबर महिन्यात शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीचं अधिवेशन चांदवडला भरलं होतं. न भूतो न भविष्यति अशा संख्येनं जमल्या होत्या महिला या अधिवेशनाला. 'परकटी' महिलांपासून ते डोक्यावर बोचकी आणि लाकडाची मोळी घेऊन मैलो न् मैल पायी चालून आलेल्या महिलांपर्यंत अन् जीन्स-टॉप घालणाऱ्या महिलां पासून तो दो दांडाच्या लुगडेवाल्या महिलांपर्यंत लाखो





लाखोंच्या संख्येनं महिला जमल्या होत्या आपली दु:ख सांगायला, ऐकायला, दिलासा घ्यायला- द्यायला. काही नवी वाट सापडते का हे पाहायला.

या संमेलनात अनेक ठराव झाले. या अनेक ठरावांत एक ठराव कापसाच्या आंदोलनाबाबत होता. या ठरावान्वये सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आलं होतं. कापसाच्या प्रश्नाकडे व त्यानिमित्त संघटनेच्या कापूसविषयक मागण्यांकडे शासनाचं लक्ष वेधण्यासाठी दिनांक २३ नोव्हेंबर ८६ रोजी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत एक दिवसाचं चक्का जाम आंदोलन पुकारण्यात आलेलं हांतं आणि या आंदोलनासाठी मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि विदर्भातील कापूस पिकवणाऱ्या पाच जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली होती. या पाच जिल्ह्यांत ठरावीक ठिकाणी आयोजित आंदोलनात प्रचंड संख्येनं शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं असं आवाहन करण्यात आलं होतं. या एक दिवसाच्या आंदोलनाची दखल घेऊन शासन शहाणं झालं तर ठीकच, नसता -

२३ नोव्हेंबरला नांदेड, परभणी व विदर्भातील पाच जिल्ह्यांत ठिकठिकाणी सूर्योदयापासून या आंदोलनाला सुरुवात झाली. लाखोंच्या संख्येनं लोक या चक्का जाम आंदोलनात सहभागी झाले. या भागातून होणारी सारी वाहतूक एकदम ठप्प झाली. अपेक्षा ही होती, की या आंदोलनापासून शासन काही शहाणपण शिकेल. शासन काही शिकणार नाही हे सांगायला काही कुणा ज्योतिषाची गरज नव्हती; पण आपली एक भाबडी समजूत, न जाणो चुकूनमाकून कुणा लोकप्रतिनिधीला, कुणा शहाण्या अधिकाऱ्याला सद्‌बुद्धी झालीच तर नंतर होणाऱ्या हालअपेष्टा टाळता येतील; पण असं व्हायचं नव्हतं. 'या माळावर एकही वृक्ष नसे' तेव्हा शेतकऱ्यांनी कूजन करून काय उपयोग ?

झालंही तसंच. शासन ठार बहिरं झालं होतं. झोपेचं सोंग घेऊन आमच्याकडे अतिरेकी नाहीतच असं सांगणाऱ्या पाकिस्तानसारखं. त्यामुळे वाटाघाटीचे दरवाजे बंद. दारापर्यंत येऊ दिलं, तर वाटाघाटी होतील ना. इथे तर सरकार आंदोलनाची दखलसुद्धा घ्यायला तयार नव्हतं. वाटाघाटी तर दूरच. काय गंमत आहे बघा, शे-सव्वाशे कार्यकर्त्यांच्या आंदोलनानं पर्यावरणवादी आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधून घेतात. अरुंधती रॉय, सलमान रश्दी असे आंतरराष्ट्रीय तारे आपली चमक या मूठभर लोकांच्या आंदोलनाला देतात आणि शे-सव्वाशे नव्हे तर लाखालाखांच्या संख्येनं सहभाग दिलेला असूनही शेतकरी आंदोलनाला आंतरराष्ट्रीय तारे तर सोडाच; पण जिल्हापातळीवरील

काजवेसुद्धा आपली चमक द्यायला तयार होत नाहीत ! 'हा हंत हंत !'

याहीपेक्षा खंत आहे, ती वेगळ्या गोष्टीची. शहरी बाबूंना ग्रामीण लोकांची दु:खं नाही कळली तर एक वेळ क्षम्य आहे; पण शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि काळ्या मातीत वाढल्याची पदोपदी ग्वाही देणाऱ्या गावगन्ना पुढाऱ्यांनीसुद्धा या प्रश्नाचं गांभीर्य शासनाच्या निदर्शनास आणून देऊ नये, यासारखं दुसरं दुर्दैव काय असू शकतं ! घायल की गत घायललाही कळू नये !

आग्रा शिखर वार्तेनं ठरवलं, वाटाघाटी पुढे चालू ठेवण्यासाठी आणखी एक शिखर परिषद घेऊ. या आंदोलनानं सांगितलं, भावांनो पुढचं पाऊल उचलावं लागणार. सात डिसेंबरपासून बेमुदत रस्ता बंद. सातपासूनच्या बंदचा निरोप गावोगावी देण्यासाठी कार्यकर्ते मार्गस्थ झाले. आतापर्यंतच्या प्रयत्नांची शासन दखल घेत नाही हे लक्षात येऊनही लोकांच्या उत्साहात कणभरही कमी नव्हती. लोकांत विलक्षण उत्साह होता, तसा शासनातही विलक्षण उत्साह संचारला होता. सात डिसेंबरच्या आंदोलनाची हाताळणी शासनाने ज्या तऱ्हेने केली, त्याकडे आज मागे वळून पाहताना असं वाटतं, की वाटेल ते करून हे आंदोलन चिरडून टाकावं, असंच धोरण शासनानं ठरवलं असावं. शेतकऱ्यांना एकदाचा असा धडा शिकवावा, की त्यांनी बापजन्मी संघटनेचं नाव काढू नये. सुरेगाव प्रकरणापर्यंतचा घटनाक्रम पाहिला, की या संशयाला बळकटी येते. मुळात त्या वेळी शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी शेतकरी संघटनेशी उभा दावा मांडलेला. गेल्या काही वर्षांपासून शेतकरी संघटनेनं कापूस खरेदी योजनेतील अनेक दोषांवर बोट ठेवून या दोष निवारणासाठी सातत्यानं काही मागण्या लावून धरलेल्या. मुळात कापसाला देऊ केलेली किंमत ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील किमतीशी तुलना करण्यालायक नव्हती. महाराष्ट्राबाहेरील राज्यात उपलब्ध किमतीपेक्षाही ती कमी होती. तेव्हा उत्पादनखर्चावर भाव या मागणीसाठी शेतकरी संघटनेनं सतत चळवळी केलेल्या.

पुढे मला अटक करायला आलेल्या पोलिस अधिकाऱ्याशी चर्चा करताना मी त्यांना म्हणालो होतो, "प्रमुख कार्यकर्त्यांची धरपकड ही वाईट गोष्ट आहे. आता आंदोलन नीट वळणावर ठेवायला कुणी प्रमुख कार्यकर्ता आंदोलन स्थळी उपस्थित नाही राहू शकला या अटकेमुळे आणि काही कमीजास्त प्रकार घडले तर त्याची जबाबदारी कुणावर राहणार?" पोलिसांनी यावर उत्तर देण्याचं टाळलं. ते म्हणाले ते एवढंच, "आम्ही हुकुमाचे ताबेदार !" अशा तऱ्हेनं प्रमुख कार्यकर्त्यांना अटक आणि प्रत्यक्ष आंदोलनस्थळी दिलेली





वागणूक, लाठीहल्ला, गोळीबार या घटना लक्षात घेतल्या तर हे आंदोलन मोडून काढण्याचा निश्चयच शासनाने केला होता हे स्पष्टच होते. त्या वेळी कार्यरत असलेल्या एका मोठ्या पोलिस अधिकाऱ्याने पुढे माझ्याजवळ काढलेल्या उद्गारामुळे शंकररावांच्या या निश्चयाला पुष्टी मिळते. सुरेगाव इथे गोळीबाराच्या कैक फैरी झालेल्या असूनही माणसे मात्र तीनच मेली, या घटनेचा संदर्भ देऊन ते म्हणाले होते, "इतक्या फैरी झाडलेल्या असूनही माणसं फक्त 'तीनच' मरतात. शिपाईलोकांची चौकशी करून xxx ना शिक्षाच द्यायला पाहिजे." घडलेल्या घटनेबद्दल खंत तर सोडा, पण 'फक्त तीनच' असे उद्गार काढण्याची हिंमत होते, यावरून त्या वेळी शासनाची मानसिकता कशी होते हे स्पष्ट व्हावं ! ऑपरेशन दडपशाहीची ही होती पार्श्वभूमी !

### ॥ २ ॥

'ऑपरेशन दडपशाही'साठी पोलिसांनी मुहूर्त तर चांगला पाहिला. चांगल्या कामासाठी मुहूर्तही चांगला असावा असा दंडक आहे आणि तो आवर्जून पाळला जातो असा अनुभव आहे; पण वाईट कामालासुद्धा मुहूर्त पाहिला जातो, हे मात्र याच वेळी अनुभवाला आले. मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी सटीच्या (चंपाषष्ठी) सणाला विशेष महत्त्व आहे. शेतीसंबंधीच्या अनेक सौद्यांत, देवाणघेवाणीच्या व्यवहारांत सटीचा वायदा केलेला असतो. शासनानंसुद्धा त्यांच्या अमानुष शक्तीची चुणूक शेतकऱ्यांना दाखवण्याच्या वायद्यासाठी ८६ सालच्या सटीच्या सणाचा मुहूर्त धरला असावा.

आमच्या घरी कुलधर्म, कुलाचार आवर्जून पाळले जातात. घराण्याच्या परंपरेत खंडोबा पाहुणा आणि तुळजाभवानी कुलदैवत. त्यामुळे सटीला विशेष महत्त्व. खंडोबाची पूजा करायची, घरच्या देवाची नित्याची पूजा करायची, खंडोबाचा येळकोट येळकोट करायचा, मग नैवेद्य, आरती आणि नंतरच जेवण असा क्रम ठरलेला.

मी नेहमीच्या प्रथेप्रमाणं सोवळं नेसून पूजेला बसलो. जरा वेळाने दारावरची घंटी वाजली. कुणी तरी दार उघडलं. आलेल्या माणसांना बसायला सांगितलं. मी माझी, पूजा, येळकोट, येळकोट इत्यादी सारं आटोपून घेतलं आणि तसाच सोवळ्यात बाहेर येऊन कोण आलं ते पाहिलं. दारात पोलिसांची गाडी, काही पोलिसचे लोक आणि बैठकीत स्वत: पोलिस इन्स्पेक्टर टोणपे बसलेले. त्यांची माझी ओळख तशी जुनीच. शांतता समितीच्या बैठकीला आमच्यासारख्या पापभीरू तसेच अनेक गुंड, पुंड प्रवृत्तीच्या

माणसांनाही बोलावलं जातं. अशा बैठकांच्या वेळी आणि अनेक सामाजिक कार्यक्रमांतून त्यांची भेट झालेली; पण घरी त्यांनी यावं असा हा पहिलाच प्रसंग.

''कसं काय येणं केलंत टोणपे साहेब ?''

''एस.पी. साहेबांनी तुम्हाला बोलावलंय वकील साहेब.''

''काही हरकत नाही. माझं आटोपत आलंच आहे, मी दोनच्या पुढे जाऊन साहेबांची भेट घेतो.'' माझी कल्पना उद्यापासून आंदोलन सुरू होणार, तेव्हा या आंदोलनाबाबत चर्चा करण्यासाठी हे आमंत्रण असावं. शेतकरी संघटनेचा सारा कारभार खुला. कुठेही लपवाछपवी नाही. आंदोलनाची ठिकाणं आम्ही आधीच निश्चित केलेली आणि त्यासंबंधी पूर्ण माहिती शासनाला कळवलेली. न जाणो त्यांना आणखी काही माहिती पाहिजे असेल म्हणून टोणपे आले असावेत, असं समजून दुपारी जाऊया असं म्हणालो. त्यावर,

''नाही वकीलसाहेब तुम्हाला घेउनच या असा हुकूम आहे.''

''ठीक आहे. मी जेवण आटोपून घेतो. तुम्ही तासा-दोन तासांनी या.''

''आपण असं करूया. तुम्ही तुमची सारी कामं आटोपा. तोवर मी इथेच तुमच्या बैठकीत आराम करतो.''

टोणपेंचा एवढा आग्रह पाहून मला वेगळीच शंका आली. संघटनेचा मी जिल्हाप्रमुख, व्यवसायानं वकील, अद्वड वयाचा नागरिक, मी काही कुठे पळून जाणार नव्हतो. मग हे असा गैरविश्वास का दाखवताहेत ? त्यामुळे मी त्यांना स्पष्टच विचारलं,

''टोणपे साहेब, काय भानगड आहे ?''

''वकील साहेब, संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांना अटक करण्याचे शासनाचे आदेश आहेत. त्यामुळे तुम्हाला सोडून जाता येणार नाही. सॉरी. रोष नसावा.''

तरीही मी म्हणून पाहिलं, ''तुमचा निर्णय चुकीचा आहे. तुम्ही सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना, थेट तालुका पातळीवरील कार्यकर्त्यांनासुद्धा अटक करणार असाल तर रस्ता बंदच्या वेळी जमा झालेल्या लोकांवर नियंत्रण कोण ठेवणार? काही कमी-जास्त प्रकार झाला, तर लोक तुमचं काही ऐकणार नाहीत, तेव्हा अटक करायची ती आंदोलनस्थळी तरी करा. म्हणजे तो दिवस आटोपेतो शांतता राहू शकेल व दुसऱ्या दिवशीच्या आंदोलनाचा भार कुणा जबाबदार कार्यकर्त्यावर सोपवता येईल.''

''सॉरी, वकील साहेब. हा निर्णय माझा नाही. शासनाचा आहे. मी काय दिल्या





हुकुमाचा ताबेदार. तुमचं म्हणणं मला पटतं; पण मला पटून काय उपयोग? मी काही निर्णय घेणारा नाही. मी अंमलबजावणी करणारा.'' बऱ्याच वेळा होतं हे असं. प्रत्यक्ष मैदानात काम करणाऱ्यांची मनं विचारात घेतली जात नाहीत. निर्णयपातळी आणि अंमलबजावणी यात बरंच अंतर राहतं. तोंड द्यावं लागतं स्थळावरील माणसांना. टोणपे बोलले नाहीत; पण त्यांच्या बोलण्याच्या स्वरावरून त्यांचा रोख लक्षात येण्यासारखा होता.

आता अटक ठरलेली. मी जेवण करून तयारीला लागलो. मागच्या दारी सहज डोकावलो हात धुवायला, तो मागच्या गल्लीत दोनही टोकाला पोलिस उभे. म्हणजे मी पळून जाईन, भूमिगत होईन अशी भीती वाटली की काय पोलिसांना? समोरच्या दारात स्वत: इन्स्पेक्टर आणि मागच्या दारात त्यांचे सहाय्यक ! याही परिस्थितीत मला हसू आलं. माझ्यासारखा भित्रा माणूससुद्धा पळून जाईल असं समजून पोलिसांनी बंदोबस्त ठेवला. मी एवढा महत्त्वाचा वाटलो की काय शासनाला? मी माझ्या मिशीला पीळ भरला. म्हणजे माझ्या मिशा पिळाव्या इतक्या मोठ्या नाहीत; पण आपलं रीत म्हणून म्हणायचं. अटकेची तशी भीती नव्हती म्हणा, आम्ही चोरदरोडेखोर थोडी होतो. काही दिवसांचा तर प्रश्न आहे; पण मला काळजी होती ती आंदोलनाची. आम्ही सगळे आत म्हटल्यावर बाहेरचं कसं? याची .

जेवायला बसल्यावर घरच्या महिला आघाडीला अटकेची कल्पना दिली. माझी आई तशी वृद्ध. मला तिची जास्त काळजी होती; पण तिने सारा प्रकार शांततेनं घेतला. पत्नीला सांगितलं- आता तिला केंद्रप्रमुख व्हावं लागेल. आंबेठाणहून निरोप घेणे, देणे अन् कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवणे. लोक मार्गदर्शनासाठी येणार, तेव्हा त्या साऱ्यांना आंबेठाणचा निरोप सांगणे. आम्हा आत जाणाऱ्या माणसाचं काम तसं एका अर्थी सोपं. सारी काळजी बाहेर ठेवायची अन् आत निवांत बसायचं. 'उद्याचं काय?' ची जबाबदारी नाही. बाहेरच्या माणसावर ओझं जास्त. आंदोलन चालू राहिलं पाहिजे. जेलमधल्यांची व्यवस्था लावायची, काय लागलं, भागलं पुरवायचं. काम होतं कटकटीचं. पत्नीला कामाची पूर्वीपासून 'सवय' होती. चंडीगडला सोळा दिवस जेलात होतोच. तेव्हा घर तिनंच सांभाळलं होतं. संघटनेच्या कार्यकर्त्यांची आवकजावक घरी नेहमीच. त्यामुळे बहुतेक सर्व कार्यकर्त्यांची ओळख. तिला फारसं सांगावं लागलं नाही. म्हात्रेसरांना निरोप करायला तिला सांगितलं. देवापुढे सुपारी ठेवली. आईला नमस्कार केला. तिनं हातावर दही- पोहे

ठेवले. ते घेतले. पिशवीत जुजबी कपडे भरलेले होतेच. सर्वांचा निरोप घेउन पोलिसांच्या जीपमधे बसलो. पोलिस पहाऱ्यात आमची वरात ठाण्याकडे निघाली. चला, यानिमित्ताने का होईना, वरात तर निघाली. नाही तरी लग्नात माझी वरात निघाली नव्हती. ती राहिलेली हौस अशी पूर्ण झाली. आमची वरात पाहायला शेजारीपाजारी, गल्लीतले लोक लगलीच दाराखिडक्यांत जमा झाले. कुठल्याही लफड्यात न पडणाऱ्या माणसाला पोलिस का पकडून नेताहेत, या उत्सुकतेपोटी असेल; पण लोकांनी गर्दी केली.

पोलिस ठाणे काय, घरापासून पाच-दहा मिनिटांच्या अंतरावर.उपकार एवढेच की टोणप्यांनी हातकडी न बांधता वरात काढली आणि ठाण्यात गेल्यावर पोलिसांच्या 'खास' कोठडीत न ठेवता त्यांच्या खोलीत शेजारी बसवून घेतलं.

एव्हाना अटकेची बातमी फैलली आणि एकेक जण भेटायला यायला लागला. येणाऱ्या माणसांची रीघ पाहून टोणपेंनी आमच्यासाठी पोलिस स्टेशनच्या आवारातील एक मोठी खोली साफसूफ करून दिली. सतरंजी टाकून दिली. तिथे आम्हांला भेटणाऱ्या माणसांची आणि आमची मैफल जमली. तासाभरात ब.ल. तामसकर आले. स्टेशनजवळील किसान रसवंतीवर बसलेले असताना त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्यामागे कारेगावहून सोपान अवचार आणि टाकळीहून भास्कर सामाले यांना आणण्यात आलं. सर्वांत मागाहून नारायण जाधव आला. आमच्या जिवात जीव आला. गप्पा मारायला कंपनी आणि नाही म्हटलं तरी बेंबीत बोट घातलं; की आपल्याप्रमाणे आणखीही कुणाला विंचू चावला, की बरं वाटतंच की! यांच्या अटकेमुळे ग्रामीण भागातले कार्यकर्ते भेटायला यायला लागले. त्यांच्याशी विचारविनिमय करून आंदोलनाची पुढील तयारी करणं सोपं झालं. यापुढे आमचं घर हे सर्व निरोपासाठी केंद्र राहील हा निरोप गावोगाव पाठवण्याची अनायासे सोय झाली. आणखी वैजनाथराव रसाळ यांना अटक झालेली नाही हे लक्षात आलं. तेव्हा अटक न होऊ देता आंदोलन सांभाळा असा निरोप त्यांच्याकडे पाठवला. जिंतूर- औंढा फाट्यावर त्यांचं आंदोलन होणार होतं. काय गंमत आहे पाहा. आंदोलन दडपून टाकावं म्हणून प्रमुख कार्यकर्त्यांना आधीच अटक केली. या अटकेचा संशयही कुणाला येऊ न देता, अपेक्षा ही, की शेवटच्या दिवशी तयारी करायला, भेटीगाठी घ्यायला वेळ मिळू नये आणि आम्ही सारे प्रमुख कार्यकर्ते कुठे एकत्र जमलो, तर थेट पोलिस ठाण्यात, पुढील आखणी करायला. एकदम पोलिसांच्या पहाऱ्यात! दिव्याखाली अंधार म्हणतात ना, तसं! एव्हाना जेलबंदीची वेळ होत आलेली. तेव्हा





आम्हा सर्वांची रवानगी परभणीच्या तुरुंगात करण्यात आली.

॥ ३ ॥

परभणीचा तुरुंग तरी किती दूर? घरापासून पाच ते दहा मिनिटांच्या अंतरावर. आम्ही तुरुंगात आलो तो सायंकाळ होत आलेली. तुरुंगाच्या दिंडी दरवाजातून 'अंत:गृहात' म्हणजे प्रत्यक्ष तुरुंगात प्रवेश केला. तुरुंगाच्या मोकळ्या हवेत श्वास घ्यायला बरं वाटलं. पोलिस ठाण्यातल्या आमच्यासाठी साफसूफ केलेल्या खोलीत कित्येक वर्षांत माणसांचा वावर नसताना येतो तसा कुबट वास येत होता. पोलिस ठाण्यातील अनेक नामी, गिरामी चोर, डाकू, खुन्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या लॉक-अपपेक्षा नाही तरी बाहेरची खोली कुबट का असेना पण बरी होती; तरी त्या वासानं आमचं डोकं भणाणून गेलं होतं. त्यामुळे जेलमधली 'मोकळी' हवा आम्हाला सुखद वाटली !

तुरुंगातली एक मोठी बराक आमच्या स्वागतासाठी सज्ज केलेली. आम्ही कच्चे कैदी, त्यातही सत्याग्रही. त्यामुळे आम्हाला तुरुंगातला तो दर्जेदार गणवेश दिलेला नव्हता किंवा स्टँडर्ड ताटवाटी, लोटी, परात, घोंगडी, पांघरूण हे साहित्यही दिलेलं नव्हतं. तसे आम्ही सत्याग्रहीही नव्हतो. कारण सत्याग्रह करण्याआधीच आम्हांला संरक्षणात्मक अटक करण्यात आलेली होती. तेव्हा फार तर आम्हाला राजकीय कैदी म्हणता आलं असतं. राजकीय-कैदी या नावाला एवढं स्वस्त करायला आम्हांला खूप अवघड वाटतं. टिळक, आगरकर, गांधी, सावरकर आणि शेकडो थोर देशभक्तांनी पावन केलेल्या 'राजकीय कैदी' यांच्या रांगेत मी, बलं, नारायण, भास्कर, सोपान म्हणजे जरा जास्तच झालं.

पूर्व-पश्चिम लांबीची भलीमोठी बराक ती. पन्नास-साठ माणसांना आपल्या पोटात झोपायला जागा देणारी आणि त्या एवढ्या मोठ्या बराकीत हम पांच ! या टोकाला उभं राहून हाक दिली तर त्या टोकाला ऐकायला यायला कठीण. बराकीला मध्यभागी दक्षिणेकडे तोंड करून दरवाजा. दक्षिणेकडून प्रवेशद्वार असले म्हणजे लक्ष्मीची मर्जी खप्पा होते म्हणे. आता जिथे देवाची मर्जी खप्पा झाली म्हणून आम्ही जेलात आलो तिथे प्रवेशद्वार दक्षिणमुखी असलं काय आणि नसलं काय ! बराकीच्या पश्चिम - उत्तर कोपऱ्यात स्वच्छतागृह- बिन दरवाजाचे! न जाणो आत बसून एखाद्या कैद्यानं दार बंद करून घेतलं आणि काही बरंवाईट करून घेतलं तर बलामत! तेव्हा दारच नको; पण आम्ही काही चोर, उचले नव्हतो. 'तसला' काही विचार आमच्या मनात येणंही शक्य नव्हतं. आम्ही मागणी

केली तर कुणी दारही बसवून देणार नव्हतं. म्हणून आम्ही मागणी केली ते दार झाकण्यापुरत्या एका बोंदऱ्याची. तीमात्र तत्परतेनं पूर्ण करण्यात आली. पश्चिम भिंतीला लागून; पण स्वच्छतागृहापासून सातआठ फुटांवर एक मोठा हौद पाण्यासाठी. त्यापलीकडे पश्चिम-दक्षिण कोपऱ्यात परत आठदहा फुटांची मोकळी जागा. त्या जागेलगत दक्षिण भिंतीत एक खिडकी. तेव्हा या खिडकीजवळची जागा मी माझ्यासाठी आरक्षित केली. एव्हाना निरोपाप्रमाणे महिला आघाडीनं ताट, वाटी, प्याला, अंथरूण, पांघरूण आदी साहित्य पाठवलं. कोपरा धरलेला होताच. अंथरूण टाकून ठेवलं.

दिवेलागण व्हायच्या आधी जेलचा वॉर्डन जेवणाची चौकशी करायला आला. त्याला अर्थातच नको म्हणून सांगितलं. आम्हा पांचही जणांच्या भाकऱ्या घरून आलेल्या होत्याच. केवळ प्रघात म्हणून 'भाकरी म्हणायचं एवढंच. जेवण घेऊन आम्ही थट्टामस्करीत वेळ घालवला. रात्र गडद झाली. अवतीभोवती नीरव शांतता पसरलेली. बराकीतल्या नागड्या दिव्याचा प्रकाश भगभग वाटायला लागला. गप्पा मारता मारता केव्हा तरी झोप लागली.

॥ ४ ॥

सात तारीख उजाडली. आजपासून आंदोलन सुरू होणार होतं. जिंतूर -औंढा फाटा, मानवत रोड, खळी पूल, झिरो फाटा, आरळ, सुरेगाव, मंठा इत्यादी आंदोलनाची ठिकाणे ठरलेली होती. तिथल्या वार्ता कळाव्यात म्हणून आम्ही उत्सुक होतो. परभणीच्या तुरुंगात चहाची व्यवस्था नव्हती, त्यामुळे आम्हांला कडकडीत उपवास- चहापुरता घडला. त्यांऐवजी कांजी दिली गेली. आता जेलची कांजी म्हणजे ...

आमचा वॉर्ड साफ करणाऱ्या कैद्याला आम्ही आमची कांजी देऊ केली आणि त्या मोबदल्यात सारी बराक अधिक स्वच्छ करून घेतली. टिवल्याबावल्या करण्यात आणि बलंची छेडखानी करण्यात काही वेळ घालवला. बलं बिचारे बालब्रह्मचारी. म्हणजे त्या वेळी ब्रह्मचारी होते; पण बाल राहिले नव्हते. तेव्हा त्यांचं लग्न हा कायम थट्टेचा विषय. थेट भास्करभाऊंपासून कार्यकर्ते थट्टा करायचे. त्यात सोपान, नारायण हे बलंचे जुने सहकारी मित्र. त्यामुळे थट्टा करण्याचा त्यांना अधिकार. मी त्यांच्या थट्टेत नसलो तरी हास्यात सहभागी होऊ शकत होतो.

आता एकेक रथीमहारथी जेलात यायला लागले. पहिले आले गोविंदभाऊ सेलूहून





सोबत इरळदच्या रामूकाकाला घेऊन, "आम्हांला कालपासूनच सेलूत पकडून ठेवलेलं. रात्र झाली म्हणून काल न आणता आज आणलं."- रामूकाका. पहिले मानकरी म्हणून हम पांचनी त्यांचं घोषणा देऊन टाळ्या वाजवून जोरदार स्वागत केलं. त्यांच्याशी बातचीत होते न होते तोच आले जवळ्याहून पुरुषोत्तम लाहोटी. "मी काल वसमतला होतो. पोलिसांचा पाहुणा." लाहोटीनं माझ्याशेजारी पथारी लावली. आता आमचा 'बॉक्स' फुल्ल झाला. नाही तरी दोघांपुरतीच जागा होती त्या कोपऱ्यात.

या लोकांच्या येण्याचा आनंद दुहेरी होता. एक तर गप्पा मारायला कंपनी झाली. एकसे भले दो. दो से भले चार! शिवाय कालपासून बाहेरची खबर नाही. आज तर आंदोलनाचा दिवस तेव्हा आजच्या आंदोलनाची काही तरी खबरबात कळावी ही अपेक्षा. तशात लाहोटीकडून बातम्यांची जास्त अपेक्षा. लाहोटी म्हणजे खबरबुबू! दुनिया की खबर रखते हैं ! तशात कालपासून आम्ही अडकून पडलेलो. अख्खा दिवस नाही, केवळ काही तासच आमचा बाहेरच्या जगाशी संपर्क तुटलेला, की लगेच आमचा जीव लागला कासावीस व्हायला; पण आलेल्या मंडळीने आल्या आल्या सांगून टाकलं, त्यांना कालपासून ठाण्यावरच अडकवून ठेवलेलं. त्यामुळे आंदोलनाबाबत पुढची खबर त्यांना नाही; पण या ढगाला एक रुपेरी कडा होती. अटक कितीही होवो, आंदोलन हे होणारच. लोकांत विलक्षण उत्साह आहे. आलेल्यांनी हा निर्वाळा दिला.

लाहोटी काहीसा गंभीर होता.

"का बुवा? इतने गंभीर क्यूं हो ?"

"वकील साहब, मेरे मनमें एक डर है. आमच्या भागात लोकांत उत्साह फार आहे. माझ्या कानावर ज्या बातम्या आल्या आहेत त्यावरून शासनानं फार कडक धोरण घ्यायचं ठरवलं आहे. यहां अपन सब लोग पहले से अंदर है, बाहर नियंत्रण करने कोई नहीं. अशात काही गडबड झाली तर?"

"आपले लोक काही गडबड करणार नाहीत. मग डर काहे का?"

"कुछ भी बोलो, मला काही वेगळंच वाटत आहे." लाहोटी परत गंभीर. वातावरणात परत ताण. ताण सैल व्हावा म्हणून रामूकाका म्हणाले,

"वकील साहेब ते 'डिंग डाँग बोला' गाणं होऊन जाऊ द्या." लगेच माझी रेकॉर्ड वाजायला सुरवात झाली. गाण्यांच्या धुमधडाक्यात डर पीछे रह गया!

एव्हाना घरोघरून डबे आलेले. तेव्हा तुरुंगातलं जेवण संबंधित सफाई करणाऱ्या

कैद्यांना वाटून आम्ही जेवण उरकलं. नाही तरी तुरुंगातलं जेवण म्हणजे हायब्रीडची भाकर आणि पातळ 'भाजी-कम-वरण'. हायब्रीडची ज्वारी आणि तीही वास मारणारी. पुढे आम्ही चौकशी केली तेव्हा समजलं जेलला धान्याचा पुरवठा होतो तो शासनाकडून. शासन तर शेतकऱ्याकडून जी हायब्रीड ज्वारी घेतं, ती तर चांगली असते, काळी पडलेली ज्वारी नाकारली जाते. ओलसर कुबट ज्वारी नाकारली जाते; मग इथे वास मारणारी ज्वारी येते कशी? "ते तुम्ही बघा. आम्हाला जसा पुरवठा होतो, तसा आम्ही वापरणार." सांगणाऱ्यानं हा खुलासा दिला. आमच्यासोबत लाहोटी होताच. त्यानं खुलासा दिला. "वकीलसाब, ये अंदर की बात है. ये सप्लायवाले क्या करते... सरकारी खरेदीची चांगली ज्वारी ते व्यापाऱ्यांना देतात आणि व्यापारी त्यांच्याकडील खराब माल सप्लायला देतात. नगाला नग. बीच का गाला दोनों बांट लेते हैं ! ये दोनों की मिलीभगत है!" सर्वांना माहीत असलेलं हे प्रकट गुपित लाहोटींनी आम्हाला ऐकवलं; पण वास मारणाऱ्या हायब्रीडच्या भाकरीलासुद्धा कैद्यांत प्रचंड मागणी. त्यांच्या रोजच्या जेवणाचा जो कोटा, त्यात त्यांचं पोट भरत नसे. त्यामुळे त्या लोकांचं लक्ष आमच्या जेवणाकडे असे. जेवण आलं, की परस्पर कैद्यांना वाटून आम्ही आमच्या भाकरी खायला मोकळे.

जेवण आटोपेतो जिंतूरहून ताजी ताजी अटक झालेली तुकडी आली. त्यात होते शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार गुलाब राठी, पंचायत समिती, जिंतूरचे माजी सभापती व शेकापचे कार्यकर्ते पांगरी (ता.जिंतूर) चे अर्जुनराव बुधवंत, भोगावचे शिवाजी देशमुख, जे पुढे शेतकरी संघटनेचे तालुका प्रमुख झाले आणि दौडगावचे सुभाष मगर.

शेकापची मंडळी आमच्या आंदोलनात कशी आली? मला हे कोडंच होतं. शेकाप आणि शेतकरी संघटना यांच्या विचारसरणीत महद अंतर. शेकाप साम्यवादी विचाराचा तर शेतकरी संघटना खुल्या अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ती. शेकापची मंडळी मजुरांचे मोर्चे काढून रुपयाला पायली ज्वारीची मागणी करीत; तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मोर्चे काढून एक शेर ज्वारीला रुपया भाव अशी मागणी करीत. या दोनही मागण्यांच्या विरोधाभासाकडे आमचे कार्यकर्ते वैजनाथराव रसाळ आवर्जून बोट दाखवायचे; पण मग आमच्या आंदोलनात ते आले कसे? पुढे वैजनाथ रसाळांनी खुलासा केला, "वकील साहेब, आपण अर्जुनरावांच्या पांगरी या गावी एकदा प्रचारसभा घेतली होती. तेव्हा अर्जुनरावांच्या बैठकीत चहापान करताना तुमची व त्यांची चर्चा झाली होती. आम्ही कापूस आंदोलना वेळी त्यांच्या गावी प्रचार बैठक घेतली तेव्हा त्यांनी तुमची आठवण





काढली. आम्ही त्यांना म्हणालो, 'तुमचे विचार काहीही असोत, कापसाला भाव या मुद्द्यावर तर आपलं एकमत आहे. तेव्हा या मागणीसाठी आपण एकत्र यायला काय हरकत आहे? यावर आम्ही विचार करतो असं ते बोलले. नंतर त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि ते रास्ता रोकोमध्ये सहभागी झाले व सात तारखेला त्यांना रास्ता रोकोत अटक झाली." गावोगावी केलेल्या प्रचाराच्या प्रतिसादाचा आणखी एक नमुना वैजनाथरावांनी सांगितला. "जिंतूर तालुक्यात अंबरवाडी गावाजवळ डोंगरातील एका आडवळणाच्या खेड्यावर आम्ही प्रचाराला गेलो होतो. गप्पा मारता मारता तो वाणी म्हणाला, "आम्ही तर काही शेतकरी नाही. मला काही जमीन नाही. माझा धंदा दुकानदारीचा. माझा या आंदोलनाशी काय संबंध?" त्या वेळी दुकानावर एक खेडूत बाई आली होती. ती म्हणाली, "अवो अप्पा, तुमच्या दुकानी कोन येनार? आमी शेतवाले. आमचं शेत पिकलं तर आमी दुकानी येनार. न्हाई तर कोन माल घेनार? तवा तुमी काई वायले न्हाई. आमी न् तुमी एकच." विशेष म्हणजे हे वाणी सात तारखेच्या रास्ता रोकोत सहभागी झाले. त्यांना अटकही झाली आणि दहा दिवस इसापूरच्या तुरुंगात ते अटकेतपण राहिले." ग्रामीण भागातील छोट्यामोठ्या माणसापर्यंत संघटनेचा सांगावा गेलेला होता. त्यांना थोडं जागं करणं, संघटित करणं जरूरी होतं.

जिंतूरच्या मंडळींची बलंची जुनी ओळख. बलंनी आमची अन् त्यांची ओळख करून दिली. सुभाष मगर हे आधीपासून संघटनेत होते. बाकी तिघे या आंदोलनापासून शेतकरी संघटनेत राहिले. गुलाब राठी आणि शिवाजी देशमुख हे हल्ली राष्ट्रवादीमध्ये आहेत.

आता सत्याग्रहींच्या टोळ्याच्या टोळ्या यायला लागल्या. दोन दिवसांत तीन बराकी पूर्ण भरल्या. दीडशे माणसं तीन बराकींत राहू लागली. येणाऱ्या सत्याग्रहींचा ओघ एवढा होता, की शासनही भांबावलं होतं. लोकांना ठेवावं कुठे? जेलची मर्यादा ठरलेली असते. महाराष्ट्रातील सर्व तुरुंगांची ही मर्यादा तर केव्हाच उलटून गेली होती. मग कुठे स्टेडियम, कुठे शाळा, मैदाने अशा ठिकाणी अटक करून तात्पुरती सोय करायची आणि नंतर सोडून द्यायचं. जेलमध्ये जागा नाही म्हणून बऱ्याच वेळा तर सत्याग्रहींना रात्र रात्र एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरवण्यात आले. जेलपुढे जायचं, जागा आहे का विचारायचं. नसेल तर चालले पुढच्या जेलगावी. लहानपणी आम्ही एक खेळ खेळत असू. कोपऱ्याकोपऱ्यातून मुलांनी उभं राहायचं आणि ज्याच्यावर राज्य त्यानं

एकेकापुढे उभे राहून म्हणायचं, ''आई मला पुरी दे.'' त्या मुलानं हातावर टाळी मारायची आणि म्हणायचं ''जाय त्या घरी'', पोलिसांनी असाच खेळ खेळला. जेलरला विचारलं, ''जागा आहे का?'', ''जा त्या दुसऱ्या जेलात.'' दोन रात्रींच्या प्रवासांने कंटाळून सत्याग्रहींना सोडून देण्यात येई. शासनाच्या अजागळपणाचं यापेक्षा दुसरं उदाहरण काय असू शकेल? अटक करतानासुद्धा सर्व सत्याग्रहींना अटक न करता काहीच लोकांना करण्यात येई; तरीही लोकांच्या उत्साहात खंड नव्हता. हजारोंच्या संख्येने लोकांना अटक केली गेली. हजारो सत्याग्रही अटकेविना सोडले गेले. जनक्षोभाची एवढीही कल्पना शासनाला आली नाही किंवा आली असूनही एका माणसाच्या- केवळ एका शंकररावांच्या हट्टापायी हजारो शेतकऱ्यांना वेठीला धरण्यात आलं असंच म्हणावं लागेल.

आमच्या तुरुंगात परभणी, गंगाखेड, वसमत, जिंतूर, पाथरी या तालुक्यांतील लोक प्रामुख्यानं भरती होते. त्यांचा जेलचा जीवनक्रम आता सुरू झालेला होता. सकाळी चहाचीमात्र व्यवस्था नव्हती. आलेल्या सत्याग्रहींपैकी जनता पक्षाचे राम जाधव होते. राम जाधवांनी त्यांच्या अवतीभोवती जमा झालेल्या सत्याग्रहींना सांगायला सुरवात केली, ''आपण राजकीय कैदी आहोत आणि आपल्याला सकाळी नाश्ता म्हणून अंडी, दूध, केळी, फळे, चहा आदी मिळायला पाहिजे. दुपारच्या जेवणात गव्हाची रोटी, दाळ, सायंकाळी चहा, रात्री गव्हाची रोटी, दाळ आणि आठवड्यातून एक दिवस गोडधोड मिळायला पाहिजे. आम्ही अमक्या अमक्या आंदोलनात कैदी होतो तेव्हा आम्हाला हे सारं देण्यात येत होतं.'' त्यांच्या या भाषणानं सारे सत्याग्रही बिथरले. आम्हांला सकाळी कांजी मिळे, चहाचा पत्ता नाही. जेवणात हायब्रीडची भाकर आणि दाळ हेच देण्यात येई. वातावरण एकदम बिघडलं. बिथरलेले सत्याग्रही काहीही करू शकले असते. तेव्हा आम्ही असं ठरवलं, रामराव जाधवसह काही मोजक्या लोकांनी जेलरची भेट घेऊन सर्व बाबींची शहानिशा करावी. त्याप्रमाणे आमच्यापैकी काही लोकांचे प्रतिनिधी मंडळ जेलरला भेटले. जेलरनं रामरावांपुढे जेल मॅन्युअल ठेवलं आणि त्यातील नियमावर बोट ठेवलं. तेव्हापासून रामरावांची बोलती बंद झाली. नाही तर त्यांच्या 'समाजवादी' विचारांनी वातावरण पार बिघडून गेलं असतं; मात्र त्या दिवसापासून आमचे लोक त्यांना टाळायला लागले.

जेलमध्ये अनायासे मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र आलेले. तेव्हा त्यांच्या एकत्र येण्याचा फायदा घेऊन प्रशिक्षण व्हावं ही कल्पना डोक्यात आली. लगेच या कामी





बलंची नियुक्ती झाली. बलंचा स्टॅमिना विलक्षण. ते आळीपाळीनं एका एका बराकीचा 'तास' घ्यायचे. जेलमध्ये वेळ कसा रेंगाळायचा. बरोबर सात वाजता जेलमधील रेडिओ बोलायचा, 'हे आकाशवाणीचं औरंगाबाद परभणी केंद्र ...' जगाशी संबंध तुटलेला, तेव्हा बाहेरची बातमी कळण्याचा हा एकमेव मार्ग. सारे सत्याग्रही एकाग्रतेने बातम्या ऐकत. तिथून बाकी वेळेला मात्र काही बंधन नव्हतं. टोळ्या टोळ्यांनी लोक आपापला दिवस घालवायचे.

पहिले दोन दिवस चहाची व्यवस्था होऊ शकली नाही. नंतर मात्र सौ. आशाला त्याबाबत सांगितलं. मग रोज सकाळी एका कुठल्यातरी संस्थेच्या वतीने चहाची व्यवस्था होई. चहासाठी पत्ती, साखर, दूध यांची सोय करायची जबाबदारी आशानं चांगली पार पाडली. एक दिवस स्वातंत्र्यसैनिक संघटनेतर्फे श्री. आनंदराव कौसडीकर, एक दिवस भाजपतर्फे श्री. विजय जोशी, एक दिवस बीडकर कुटुंबीय, एक दिवस किशार जोशी तर एक दिवस लक्ष्मण ओमणवार यांनी असे दिवस साजरे केले. त्या काळात रोटरी क्लबला विनंती केली; पण त्यांनी या शब्दांत नकार दिला, 'तुमचं आंदोलन सरकारविरुद्ध आहे. आमचं रोटरी क्लब शासनाविरुद्ध जाऊ शकत नाही.' आमचं काय देनेवाले का भला न देने वाले का भी भला; पण श्रीमंत लोकांच्या वृत्तीकडे बोट दाखवणारा हा प्रसंग म्हणून अधिक लक्षात राहिला. एक दिवस बीडकर कुटुंबीयांनी चहाबरोबर नाश्ता म्हणून भले मोठे पोहे करून आणले. तर दुसऱ्या दिवशी किशोर जोशींनी सर्वांना पुरेल एवढा चिवडा करून आणला. भाकरीची व्यवस्था टाकळी, कारेगाव, नांदापूरच्या लोकांतर्फे झाली होती. टोपले भरभरून भाकरी, सोबत कालवण, कांदे हेही असायचं. शिवाय आशानं धावाधाव करून परभणीतून जमा केलेल्या भाकरीही असायच्या. त्यामुळे जेवणाबद्दल फारशी तक्रार नव्हती; पण ही झाली आमच्या बराकीची भाकरीची व्यवस्था; पण इतर बराकींचं काय? त्यांना जेलच्या भाकरी होत्या, आम्ही ज्या देऊ, त्याशिवाय जेलच्या भाकरी. या जेवणाला ते लोक कंटाळले. आम्ही जेलरला भेटलो. तेव्हा जेलरनी सांगितलं स्वयंपाक करायला जेलात कुणी स्वयंपाकी नसतो. जेलमधल्याच कुणा कैद्यावर ही कामगिरी सोपवली जाते. त्याला जमेल तशा भाकरी तो करतो. याला पर्याय नाही.

याला पर्याय शोधला कोथळा, ता. गंगाखेडच्या माणिक बोचरे या कार्यकर्त्यानं. तो म्हणाला आम्हाला स्वयंपाकाची परवानगी द्या, आम्ही करतो व्यवस्था. त्यानं उत्साहात सुरवात केली; पण त्याला मदत करायला फारसं कुणी तयार होईना. शिवाय स्वयंपाक

घरातील जीव गुदमरून टाकणारा धूर. त्यानं जेमतेम एक दिवस अंगावर घेतली व्यवस्था आणि दुसऱ्या दिवशी शरणागती पत्करली. त्यानंतर मात्र जेवणाबद्दल कुणी तक्रार केली नाही. ज्या लोकांना जमेल त्यांनी बाहेरून कुठून तरी भाकरी येतील याची व्यवस्था केली. बऱ्याच प्रमाणात सौ. आशाने आणि इतरांनी व्यवस्था केलेली होतीच.

संध्याकाळी सारे मैदानात जमायचे. दुपारी मैदानातील लिंबाच्या सावलीत टोळ्याटोळ्यांनी मैफली जमायच्या. आम्ही जेलरला विनंती करून एक पेटी आणि एक तबला मिळवला. त्या पेटीतून भात्याच्या भस भस आवाजाशिवाय काहीच निघत नसे आणि तबल्यातून तर विचारू नका; पण आम्हाला काय जंगलात सीता सोयीची. तेवढ्या आयुधावर आम्ही गाण्याची मैफल जमवीत असू. त्या वेळी समूहांनी गायिलेली अनेक गाणी आज कॅसेटच्या रूपाने उपलब्ध झालेली आहेत; पण त्या गाण्यांनी आमचं जेलचं जीवन बरंच 'संगीतमय' केलेलं होतं.

रोज कुणी ना कुणी जेलात आम्हांला भेटायला यायचे. वकील, डॉक्टर, गावातील प्रतिष्ठित लोक अवतीभोवतीच्या खेड्यांतील कार्यकर्ते आणि कैदेतील सत्याग्रहींचे नातेवाईक. भेटीगाठीवर फारसे बंधन नसायचं; पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोक भेटायला येणार तेव्हा जेलबाहेर एका ओट्यावर भेटणाऱ्यांनी बसायचं आणि आतील गजाच्या खिडकीतून सत्याग्रहींनी. आत सत्याग्रहींची रांग आणि बाहेर भेटणाऱ्यांची.

आम्हांला भेटायला येणारे रीतसर अर्ज करून यायचे. त्यामुळे त्यांना आत जेलरच्या खोलीत आणण्यात येई. तिथे जेलरच्या समक्ष भेटीगाठी होत. आम्ही सहा तारखेपासूनच म्हणजे शनिवारपासूनच कैदेत. आठ तारखेला मला भेटायला सौ. आशाचा लहान भाऊ सतीश, त्याची पत्नी वनिता त्यांच्या छोट्या राधा-गीता या दोन्ही मुलींसह आले होते. सारं कुटुंब कोकणी लोकांसारखं गोरंपान. त्यांच्या येण्यानं जेलरची एरवी अंधारी वाटणारी खोली एकदम उजळून गेली. मला पाहिलं, की राधा एकदम हमसून हमसून रडायला लागली, "काका तुम्ही घरी चला." तिला रडं आवरेना आणि आम्हांला हसणं. एरवी टापटीप राहणारे तिचे काका जेलमधील कळाहीन स्वरूपात, दाढी वाढलेली, कपडे मळके या स्वरूपात पाहताना तिला धक्काच बसला. वयही कळण्यासारखं नव्हतं, तिची समजूत घालता घालता वेळ कसा गेला कळलंही नाही. आज ती कॉलेजला आहे फार्मसीला. तिला जेव्हा जेव्हा पाहतो, तेव्हा तेव्हा जेलमधली ती जेमतेम पाचसहा वर्षांची चिमुरडी, फ्रॉकमधील हमसून हमसून रडणारी राधा आठवते. धाकटी गीतामात्र खंबीर





खुट. माझ्या मांडीवर खेळत बसली.

भेटीसाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांकडून कळत होतं, की आंदोलन सर्वच ठिकाणी खूप जोशात चालू आहे. लोकांचा प्रतिसादही जोरात. लोक तर हट्टाला पेटून सहभागी होत होते, शंकररावांना आव्हान देत होते, '.. .....देखना है जोर कितना बाजू ए कातिल में है......'

पहिली वाईट बातमी कळली ती दहा तारखेला सकाळी. नऊ तारखेला, म्हणजे मंगळवारी झिरो फाट्यावर आंदोलन करणाऱ्या स्त्रीपुरुषांना अटक करून गाड्या भरभरून परभणीला आणण्यात आले. परभणीला इतक्या लोकांना पोलिस स्टेशनला कोंडणं शक्यच नव्हतं. तेव्हा त्यांना पोलिस मुख्यालयाच्या मैदानात ठेवण्यात आलं. जेवणाची व्यवस्था न करता खाण्याची पाकिटं देण्यात आली. रात्र झाल्यावर त्यांना सोडण्यात आलं. अनेक महिला लेकराबाळांना घेऊन आलेल्या, रात्री-अपरात्री गावाकडे परतणार कशा? तेव्हा त्यांनी पोलिसांना विनंती केली, की रात्रीची आमची मुक्कामाची सोय करा. लेकराबाळांच्या दुधाची सोय करा. अशा अपरात्री आम्ही जाणार कुठे? पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर अंधार पसरलेला. डोईवर शामियाना नाही, थंडीचे दिवस, बाहेर आसरा नाही. इतक्या लोकांनी अशा अवेळी जायचे कुठे नि कसं? बरं, सत्याग्रही सरळ रस्त्यावरून पकडून आणलेले. परतायचं म्हणलं तर पैशाची सोय काय? पण शंकररावांच्या शासकीय पिलावळीनं कानात बोळे घातलेले. लोकांत अस्वस्थता होते आहे हे पाहून पोलिसांनी दडपशाही सुरू केली. समोर पुरुष पाहिला नाही की बाया! त्यांना काठ्यांनी मारायला सुरवात केली. बायापोरं सैरावैरा पळायला लागली. अनेक बायापुरुष पोलिस मुख्यालयासमोरील शनीच्या देवळात जाऊन लपले; पण पोलिसांनी तिथेही त्यांचा पाठलाग केला, तिथूनही हुसकून लावले. पोलिसांनी एकदा दडपशाही सुरू केली, की त्यांच्या डोक्यात सैतान शिरतो. वास्तवात सत्याग्रही महिलांची अडचण खरी होती. त्यांची विनंतीही रास्त होती, पण एकदा शंकररावांनी ठरवलं होतं, की वाट्टेल ते होवो या शेतकऱ्यांना धडा शिकवायचाच. मग तो धडा जास्त घट्ट गिरवण्यासाठी बायकापोरांसारखे घबाड दुसरं काय मिळणार? अनेक बायांना मार लागला, काहींच्या पायांच्या नळ्या फुटल्या. काही बायकांना दवाखान्यात शरीक व्हावं लागलं. सारं मैदान 'साफ' व्हायला आणि पोलिसांचा तळीराम गार व्हायला सकाळ उजाडावी लागली. सकाळी सकाळी आम्हांला जेलात ही बातमी समजली. नाही तरी जेलात राहून आम्ही काय करणार होतो?

येऊन जाऊन भारत सरकारसारखा खलिता, कडक खलिता, अति कडक खलिता पाठवणे हेच काम ना?

शासनाचा अंदाज, की या धरपकडीने आणि मारझोडीने आंदोलनकर्ते घाबरतील; पण घडलं उलटंच. आंदोलन अधिक तीव्र झालं. नंतर आलेल्या बातम्यांवरून हे स्पष्टच झालं, की दुसऱ्या दिवसापासून तर लोकांचा सहभाग अधिक वाढला. दुसऱ्या दिवशी या दडपशाहीला उत्तर म्हणून सुरेगाव पाटीवर तर लोक अधिकच संख्येनं जमा झाले. घडलेल्या घटनेचा निषेध म्हणून आम्ही साऱ्यांनी रात्रीच्या जेवणाला सुटी दिली आणि अर्ध्या दिवसाचा उपवास केला.

वाईट बातम्या यायला लागल्या म्हणजे एकट्यादुकट्यानं नाही - अशा जमावानं येतात. पोलिस मुख्यालयातील लाठीहल्ल्यापाठोपाठ दुसऱ्या दिवशी म्हणजे दहा डिसेंबर, बुधवारी तर पोलिसांनी दडपशाहीचा कहर केला. जनरल डायर जिथे कुठे थडग्यात असेल, खदखदा हसला असेल, 'गांधीजी मी तरी परकीय इंग्रजांचा हितकर्ता होतो. माझ्या देशाच्या हिताच्या दृष्टीने जे मला इष्ट वाटलं ते केलं; पण तुमच्या शिष्यांचं काय? अहिंसेची जपमाळ ओढणारे आणि ऑफिसाऑफिसातून तुमच्या फोटोखाली बसून गोळीबाराचे आदेश देणाऱ्यांचं काय? गांधीजी, तुमचा पराभव तुमचेच शिष्य करताहेत. याचसाठी तुम्हाला स्वातंत्र्य पाहिजे होतं काय? बोला. गांधीजी बोला.' ते काय बोलणार ? ज्यांनी बोलावं ते शासनाच्या दावणीला बांधलेले, बाकी आश्रयावर जगणारे, 'अर्थस्य पुरुषो दासः!'

दहाचा प्रकार आम्हाला उडत उडत कळला, दुपारनंतर. कुणीतरी जेलात बातमी पाठवली 'सुरेगावला गोळीबार झाला.' निश्चित काही कळेना. कुणी सांगेना. सायंकाळी आम्ही जेलरची खास परवानगी काढून रात्रीच्या बातम्या ऐकत बसलो तेव्हा कळलं, 'सुरेगाव येथे गोळीबारात दोन ठार व एक चेंगराचेंगरीत ठार.' बातमी ऐकून आम्ही सारे सुन्न झालो. इतका दीडशे जणांचा जमाव; पण -

रात्र कशी गेली का गेलीच नाही? जागेवर सारे तळमळत होते. आम्ही आधीच पोलिसांना म्हणालो होतो- बाहेर नियंत्रणासाठी निदान प्रमुख कार्यकर्त्यांना तरी मोकळं राहू द्या, पण आता हे सारं आठवून काय उपयोग? गेलेले जीव तर परत येऊ शकणार नव्हते.

सकाळी सातच्या बातम्यांत बाकी तपशील कळला. दहा तारखेचा वृत्तांत





समजायला अकरा तारीख उजाडली. तो सारा दिवस साऱ्या सत्याग्रहींनी उपवास करायचं ठरवलं. सकाळपासून साऱ्यांनी नकळत मौनात दिवस घालवला. कुणाला बोलण्याची इच्छाही होईना. सकाळी केव्हा तरी सारे मैदानात जमा झाले. मयतांना श्रद्धांजली अर्पण केली. दिवसभर उपवास आणि मौनव्रत.

हळूहळू सुरेगावचा सारा वृत्तांत कळला. जे कळले ते तर सारं विलक्षण होते. गुरुवारचा म्हणजे अकरा तारखेचा सारा दिवस साऱ्यांनी अस्वस्थतेत घालवला. शुक्रवारी संघटनेचे अध्यक्ष भास्करभाऊ बोरावके भेटायला आले. त्यांनी सुरेगावी भेट दिलेली होती. भाऊ सकाळी जेलात आले. जेलरची आम्ही साऱ्यांनी विशेष परवानगी घेतली. जेलरच्या कार्यालयासमोरील मोकळ्या जागेत आम्ही सारे जमा झालो. तिथे भाऊंनी सुरेगावचा वृत्तांत सांगितला. साऱ्यांना शांत राहण्याची विनंती केली. आपण गांधीजींच्या अहिंसक मार्गाचे वाटसरू आहोत. शासनाने कितीही उचकायचा प्रयत्न केला, तरी आपण त्यांच्या जाळ्यात सापडता उपयोगी नाही. जवळजवळ तासभर भाऊ थांबले होते. त्यांच्या भेटीने अस्वस्थता अधिकच वाढली. सर्वांपुढे एकच प्रश्न होता- का? हे असं का? सरकार कुणाचं? लोक तरी कुणाचे? शेवटी मागण्या तरी अशा कोणत्या अशक्य कोटीतल्या? एवढं सारं सुरेगावी होऊनही प्रश्न अनुत्तरितच, आजही.

भाऊ आले आणि गेले. आमचं रहाटगाडगं चालू राहिलं. सोळा तारखेला आम्हांला तालुका दंडाधिकाऱ्यापुढे उभं करण्यात आलं. दहा दिवसांचा तुरुंगवासातला काळ शिक्षा धरून आम्हाला दहा दिवसांची शिक्षा फर्मावण्यात आली. आम्ही आमचा बाडबिस्तारा सोबतच पोलिसांच्या गाडीत आणलेला होता. पोलिसांनी तसं आम्हांला सांगितलं होतं. सुरेगाव प्रकरणामुळे शासनही हादरलं असावं. आपल्या पेरणीला हे असं पीक येईल याची शासनाला कल्पना आली नसावी. सुरेगाव प्रकरणामुळे असंतोषाचा आगडोंब उसळला. त्यामुळे निगरगट्ट शासनालाही घाम फुटला असावा. त्यामुळे आमची सुटका व्हावी हा शासन निर्णय ठरला असावा. आम्ही तहसीलमध्ये सुटलो. एकमेकांचा निरोप घेतला आणि तडक घराकडे परतलो.

॥ ५ ॥

शेतकरी संघटनेच्या रचनेतील परभणी आणि हिंगोली हे दोन स्वतंत्र विभाग. हिंगोली, कळमनुरी आणि वसमत या जुन्या तीन तालुक्यांचा मिळून हिंगोली विभाग, तर

परभणी, पाथरी, गंगाखेड, जिंतूर आणि जालना जिल्ह्यातील परतूड तालुका अशा पाच तालुक्यांचा परभणी विभाग. हिंगोली जिल्ह्यातील सुरेगाव हे परभणी जिल्ह्याच्या मुख्यालयापासून सुमारे साठ, पासष्ट कि.मी. अंतरावरील ठिकाण. हिंगोली तालुक्यातील कापूस आंदोलनासाठी हे ठिकाण निवडलेलं. हिंगोली विभागाचे जिल्हा संघटक डॉ. अशोक पातूरकर आणि तालूका प्रमुख दत्तराव नाईक हे या ठिकाणी नेतृत्व करणार होते. सुरेगाव हे दत्तराव नाईकांचं गाव. हिंगोली-औंढा या रस्त्यावरील सुरेगाव पाटी हे ठिकाण अवतीभोवतीच्या पाचपंचवीस खेड्यांना सोईचे ठिकाण. औंढा-हिंगोली हा वाहता रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतूकही खूपच. सुरेगावच्या बस थांब्याला लागूनच दत्तरावांचे सामानाचे एक गोदाम व गिरणी. या गोदामालगत पाण्याचा हापसा. रस्त्यावर दुतर्फा गर्द झाडी, त्यामुळे या फाट्यावर सावली भरपूर. गावातच दत्तरावांचे घर; त्यामुळे आंदोलनासाठी येणाऱ्या बायाबापड्यांची सोय होण्यासारखी. एरवीच बारा महिने या बसथांब्यावर येणाऱ्या - जाणाऱ्या माणसांना, वाट पाहणाऱ्यांना या कोठ्याचा मोठा आसरा वाटे. रात्रीबेरात्री बसमधून उतरणाऱ्या जवळपासच्या खेड्यांतील लोकांना या कोठ्यात झोपण्याची सोय होती. त्यामुळे या ठिकाणी अवतीभोवतीच्या खेड्यांतील लोकांचा राबता खूपच. या सगळ्या बाबींचा विचार करूनच हे ठिकाण आंदोलनासाठी निवडण्यात आलं. हिंगोली ते औंढा हा भाग शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला. गावोगावी संघटनेच्या पाट्या लागलेल्या.

सुरेगावहून हिंगोलीकडे जाताना या रस्त्यावर दोनतीन फर्लांगभर एक मोठे वळण आणि त्यापलीकडे गेल्यावर पुढे येहळेगाव, डिग्रस ही रस्त्यावरील गावे व रस्त्यापासून आत दोनही बाजूंस अनेक खेडी. या भागातील जमिनी चांगल्या व शेतकरी उद्योगी, कष्टाळू. या साऱ्या परिसरावर औंढ्याच्या देवस्थानाचे छायाछत्र. त्यामुळे शेतकरी काहीसा धार्मिक आणि स्वभावाने शांत. या साऱ्या परिसरातला नागरिकच एकूण सोशीक. पुढे घडलेल्या घटनांचं मूल्यमापन करताना ही भौगोलिक परिस्थिती, लोकांची मानसिकता आणि नाईक कुटुंबाचे लोकांशी असलेले प्रेमसंबंध लक्षात घेणं आवश्यक आहे.

संघटनेचं आंदोलन सात तारखेला सुरू होणार होतं; पण त्याआधीच म्हणजे सहा तारखेला संरक्षणात्मक अटक करण्यात आली. प्रत्यक्ष आंदोलन सुरू झालं तेव्हा या भागाचे प्रमुख डॉ.पातूरकर आणि तालुका प्रमुख दत्तराव नाईक (सुरेगाव) हे दोघेही अटकेत. जवळच्याच औंढ्याचे राहणारे व जिल्ह्यातील एक प्रमुख कार्यकर्ते ब.ल. तामसकर





हेही सहा तारखेपासूनच अटकेत. परभणीला ज्या वेळी आंदोलन सुरू झालं त्या वेळेपावेतो सारी आंदोलनस्थळे शासनाने 'निर्नायकी' करून टाकलेली. अशा वेळी आंदोलनाचं नेतृत्व महिलांनी केलं. सुरेगावी आंदोलनाचं नेतृत्व केलं ते दत्तरावांची पत्नी लीलाताई नाईक व डॉ. पातूरकरांची भावजय सौ. अंजली पातुरकर यांनी.

॥ ६ ॥

आमचा तुरुंगवास संपला तसा तो महाराष्ट्रातील सर्वच बंदींचा संपला. शेवटी तीन लोकांच्या प्राणाची किंमत घेऊनच शासनानं सर्व बंदींची मुक्तता केली. जेलातून सुटताच शरद जोशींनी महाराष्ट्राचा सांत्वन दौरा सुरू केला. एकट्या सुरेगावीच नाही तर मुदखेडलाही गोळीबार झाला होता. तिथे कुणी दगावलं नाही हा दैवाचाच भाग. कदाचित शंकररावांचा नांदेड हा लाडका जिल्हा म्हणून कुणाच्या जिवावर बेतणार नाही अशी काळजी घेण्याचे आदेश त्यांनी दिले असतील. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सत्याग्रहींना अमानुष वागणूक दिलेली होती. या साऱ्यांच्या पाठीवर मायेचा हात फिरवायला साहेबांनी हा दौरा काढला. जेलमधून सुटताच ते या दौऱ्यावर निघाले.

परभणी तर एरवीच तापलेली. आधी झिरो फाट्यावरील महिला सत्याग्रहींवर केलेला अमानुष लाठीहल्ला आणि त्यावर कडी म्हणजे सुरेगावचा गोळीबार. गोळीबारानंतर तर हिंगोली ते हट्टा फाटा आणि वसमत ते तिनधारा या परिसरात दहा तारखेपासून सारी वाहतूक ठप्प झालेली. लोकांनी आपला राग व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर झाडे तोडून आडवी टाकलेली. दगड रस्त्यावर आडवे टाकलेले. शासकीय कर्मचारी आणि पोलिसांना एवढी दहशत बसलेली, की त्यांपैकी कुणीही या रस्त्यावर जायची हिंमत करीत नव्हतं. एकटा दुकटा पोलिस तर सोडा, गटागटांनीसुद्धा जाण्याची हिंमत कुणी करीत नव्हतं. गोळीबार, लाठीहल्ला या साऱ्या प्रकारांना पोलिसांनी हाताळलं तर खरं; पण नंतर तेच सारे भांबावून गेले; काय करावं हे कुणाला सुधरेना. अकरा तारखेपासून रस्त्यावरील अडथळे दूर करण्याचीसुद्धा हिंमत कुणात राहिली नाही. आपल्या पापकृत्याची जाणीव झाल्यामुळेच सारे पोलिस खाते शरमिंदे झाले होते. शेवटी १६ तारखेला साऱ्या सत्याग्रहींना सोडण्यात आलं. त्यांनी गावकऱ्यांची समजूत घातली तेव्हा कुठे वातावरण निवळायला सुरवात झाली. त्यांनतर बिळातून उंदरांनी बाहेर यावं तसं महसूल कर्मचारी आणि पोलिस शिपाई, अधिकारी यांनी रस्त्यावर यायची हिंमत दाखवली. झिरो फाट्यावर अटक केलेल्या

महिलांना पोलिस मुख्यालयात झोडपण्याचा प्रकार मंगळवारी ९ तारखेला घडला. त्याच्या निषेधार्थ परभणीतील अनेक महिला संघटनांनी मोर्चे काढले. गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे बंद पाळला. अगदी कडकडीत. महिलांनी शासनाला निषेधाचे निवेदन दिले. या महिलांचे निवेदन जिल्हाधिकारी स्वीकारीत होते, त्या वेळी त्यांचे पोलिस सुरेगावी लोकांना गोळ्या घालीत होते. शांततेची बोलणी करताना सीमेवरून घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तान्यांसारखी ही वागणूक होती. या महिलांनी जाब विचारला, 'महिलांवर लाठीहल्ला करावा असं महिलांनी केलं तरी काय होतं?' त्यांनी गावी नेऊन सोडा किंवा रात्रभर राहण्याची व्यवस्था करा एवढीच मागणी केली होती. महिला हिंसक बनल्या म्हणावं तर त्यांच्याजवळ कुठलीही शस्त्रं नव्हती. शस्त्रं तर सोडाच लाठ्याकाठ्याही नव्हत्या. लाठ्याकाठ्यांची तर बात सोडाच पोलिसांचे नेहमीचे हत्यार म्हणजे 'दगडफेक' करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी लाठीहल्ला हेही इथे लागू नव्हतं. साऱ्या महिला पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर होत्या. तिथे तर सापडू म्हटलं तरी दगड सापडणार नाही फेकायला. पोलिसांची खुमखुमी यापरता दुसरे काही उत्तर नव्हते पोलिसांकडे.

॥ ७ ॥

शरद जोशी आले. त्यांनी आधी भेट दिली आरळ या गावाला. त्या गावच्या महिला मोठ्या संख्येने झिरो फाट्यावर सत्याग्रहात उतरल्या होत्या. त्यांना अटक करून परभणीला आणण्यात आलं आणि शासनानं आपले खायचे दात परभणीला दाखवले. पोलिसांच्या अत्याचाराला बळी पडलेल्या या महिलांच्या भेटीला साहेब धावले. महिलांनी आपला राग, संताप बाजूला ठेवला. साहेबांच्या येण्याची बातमी लागली होती, तेव्हा त्यांनी साहेबांचं प्रचंड स्वागत केलं. आपली सारी दु:खं बाजूला ठेवून, परभणीचा अपमान विसरून त्यांना ठिकठिकाणी ओवाळलं. त्यांच्यातील हिंमत पाहून साहेबच चकित झाले. बचेंगे तो और भी लढेंगेच्या पवित्र्यात या महिला होत्या. शरद जोशींवरच्या एवढ्या श्रद्धेचं काय इंगित असेल?

दुसरी भेट दिली सुरवाडीला. सुरेगावखालील या छोट्या वाडीतील शेतकरी ग्यानदेव टोपे हे हुतात्मा झालेले. तशाही परिस्थितीत दु:ख आवरून घरच्या माणसांनी साहेबांचं स्वागत केलं. एका डोळ्यात दु:खाचे तर दुसऱ्या डोळ्यात साहेबांच्या येण्याच्या आनंदाचे अश्रू. इतकी वर्षे संघटनेत राहूनही लोकांच्या मानसिकतेचं कोडं उलगडत नव्हतं.





सुरवाडीहून आम्ही परतलो सुरेगावला. तिथे दत्तराव नाईकांच्या घराला भेट दिली. घरी दत्तराव, त्यांची पत्नी, वृद्ध पिताजी हजर होते. दत्तरावच्या पत्नीने साऱ्यांसमोर सुरेगावला घडलेला वृत्तांत सांगितला. त्यांच्यासमोर साऱ्या घटना घडलेल्या. गोळ्या घालून मारलेली माणसं त्यांनी पाहिलेली. अंजलीताईंच्या आणि इतर शेकडो कार्यकर्त्यांच्या वर्णनातून पोलिसांचं नागडंउघडं रूप दिसलं. प्रसंगी निष्ठुर व्हायचं म्हणजे किती होता येतं याचं प्रात्यक्षिकच या लोकांनी पाहिलं, अनुभवलेलं. ज्या देशात 'यत्र नारी पुज्यंते' त्या देशात स्त्रियांवर अशा प्रकारे अत्याचार व्हावेत हे याच देशात घडू शकतं व नारीची अशी आणि तशीही पूजा याच देशात होऊ शकते.

आता भेट द्यायची होती ती डिग्रस कऱ्हाळेला. या गावच्या दोन लोकांचा बळी घेतला होता पोलिसांनी. लाठीहल्ल्यात जखमी झालेली माणसं बऱ्याच प्रमाणात याच गावची. डिग्रस गावही तसं मोठं. औंढा- हिंगोली रस्त्यावर डावीकडे मुख्य रस्त्यापासून दोन-तीन कि.मी. आत असलेलं हे गाव. या गावच्या लोकांनी बराच अत्याचार सहन केलेला, पाहिलेला. त्यांच्या दु:खावर फुंकर घालायची होती आणि या कामासाठी शरद जोशी यांच्याशिवाय अधिक योग्य कोण असू शकेल? ज्या शरद जोशींनी सारा संसार संघटनेच्या कामापायी वाऱ्यावर सोडला, ज्यांच्या प्रचंड त्यागाच्या अनेक कथा कार्यकर्त्यांना परिचित, त्यांच्या केवळ स्पर्शाने या आंदोनलकालीन जखमा बऱ्या होणार होत्या.

साहेबांनी हुतात्मा परशुराम कऱ्हाळे यांच्या घरी प्रवेश केला. खेड्यातलं छोटेखानी घर. घरात दाटीवाटीत बसलेली माणसं. साहेब येताच लोकांनी घर खाली केलं. साहेबांना पाहून येणारा उमाळा दाबून धरच्या बाया समोर बसल्या, हळूहळू बोलत्या झाल्या. आपल्या भावाला नाही तर कुणाला दु:ख सांगायचं! परशुराम कऱ्हाळे यांना दोन मुलं. दोघांचीही लग्नं झालेली. दोघेही वयानं तरुण. मोठा संभाजी अन् धाकटा शिवाजी. गोळी लागली तेव्हा मुलगा जवळच होता. बापाला पडलेलं पाहिलं अन् लगेच मुलगा धावला. बापाचं डोकं मांडीवर घेतलं. गोळी जिव्हारी लागलेली. प्राण लगेच गेलेले. अवतीभोवती रणकंदन चाललेलं. लोक जिवाच्या आकांतानं सैरावैरा धावत होते. धावणाऱ्या लोकांनाही पोलिस लाठ्याकाठ्यांनी बेदम मारीत होते. "मी बाबाला मांडीवर घेतललं. सांगू लागलो, माझा बाप मेलाय; पण पोलिस ऐकायला तयार नाहीत. त्यांनी सपासपा काठ्या घातल्या अंगावर, डोक्यावर. मी एका हातानं बापाला सावरायलो, दुसऱ्या हातानं काठ्याचे वार

झेलायलो. मार सहन होईना तव्हा बापाला तसंच टाकलं अन् मीबी पळालो. पळंन न्हाई तर काय करीन? बापाशेजारी माझाबी मुडदा पडला असता.'' भरल्या डोळ्यांनी त्यानं सांगितलं. पोलिसी अत्याचाराच्या भयातून आणखी हे घर सावरलेलं नव्हतं. घरचा कर्ता माणूस मरण पावला आणि तोही अशा परिस्थितीत, तेव्हा भेदरलेलं घर लवकर सावरलं जाणं कठीणच. घरातून सारे बाहेर पडले ते अत्यंत जड अंत:करणानं. साहेबांना अशी किती दु:ख पाहावे लागली आणि पुढे पाहावे लागतील कुणास ठाउक.

डिग्रसमधल्याच आणखी एका ठिकाणाला भेट द्यायची होती. याच गावच्या आणखी एका माणसाचा बळी घेतला पोलिसांनी. हुतात्मा निवृत्ती गणाजी कऱ्हाळे! घरी दत्तराव आणि सदाशिव ही दोन मुलं. मोठा दत्तराव सुमारे २२ वर्षांचा. लग्न झालेला. धाकटा सदाशिव जेमतेम १०/१२ वर्षांचा. निवृत्ती कऱ्हाळे डिग्रस ग्रामपंचायतीचे सरपंच राहिलेले. दत्तराव सांगू लागला, ''माझ्या बापाला डोईजड या चीफ साहेबांनी गोळी घातली. माझा बाप शांतपणे आंदोलनात होता. त्यानं काहीही मारहाण, जाळपोळ केलेली नव्हती. तशी जाळपोळ, मारहाण कुणीच केलेली नव्हती. मग कामून गोळी घातली असंन? अन् तेबी डोईजड या चीफ साहेबानं. अहो, या चीफ साहेबांनी किती तरी येळा आमच्या घरी जेवण घेतललं. कवाबी डिवटीवर आला म्हंजी जेवण आमच्या घरी ठरलेलं. खाल्ल्या अन्नाला असा इसरला की त्यो ! साहेब, सकाळीच समद्या कार्यकर्त्यांना घरी फराळाचं दिलं अन् आम्ही निघालो आंदोलनाला. तवा काय ठाव हे असं होणार म्हणून.'' घरच्या माणसांचा विलाप ऐकणं सहनशक्तीबाहेरचं होतं. बऱ्याच दिवसांपासून दाबून ठेवलेलं दु:ख एकदम हे असं बाहेर पडत होतं. घटना घडल्यापासून सारे कार्यकर्ते तुरुंगात, घरचा जबाबदार माणूस गेलेला. आता पोलिसी चौकशीचा ससेमिरा सुरू होणार. इकडे दु:ख सावरायचं तिकडे उद्याच्या काळज्यांना समोरं जायचं.

याच गावच्या अनेक जणांना गोळीबारात जखमा झालेल्या. जखमी अवस्थेत त्यांना परभणीच्या सरकारी दवाखान्यात ठेवण्यात आलं, पोलिस पहाऱ्यात आणि अटकेत. गोळीबारात जखमी झालेली या गावची ही मंडळी अशी: गंगाराम वऱ्हाडे, परशुराम बियाणी, रामजी काळे, सीताराम कऱ्हाळे, सोपान राखुंडे, बापूराव राखुंडे. या साऱ्यांची चौकशी केली. या गावची भेट अत्यंत जड अंत:करणाने आटोपती घेतली.

काय योगायोग बघा, दत्तराव नाईक आणि बळिरामजी कऱ्हाळे या दोघांनी हिंगोली तालुक्यात डॉ. पातुरकरांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेलं. दत्तरावांचं या





आंदोलनात बरंच नुकसान झालेलं. व्यक्तिश: त्यांनी या आंदोलनात तुरुंगवासही भोगलेला. बळिरामजी कऱ्हाळे यांचे डिग्रस गाव तर आंदोलनात अग्रभागी राहिलेलं. त्यांच्या गावच्या दोघांनी हौतात्म्य पत्करलेलं. सातआठ जणांनी अंगावर गोळ्या झेललेल्या. अभिमानानं सांगावा असा पराक्रम पाहिलेल्या गावचे हे दोघे झुंजार कार्यकर्ते मोहाच्या कुठल्या क्षणाला कसे बळी पडले कुणास ठाउक; पण शंकर धोंडगेंच्या बरोबर या दोघांनी शेतकरी संघटनेशी फारकत घेतली आणि राष्ट्रवादीशी घरोबा केला. त्याच भागातील एक कार्यकर्ते मला पुढे म्हणाले, ''राष्ट्रवादीबरोबर घरोबा गोड वाटला; पण आता लोक तेहला टाळायलेत, तवापासून तोंड लपवू लपवू फिरायलेत.'' कार्यकर्त्यांचं हे अध:पतन कां, कसं होत असेल?

आणखी एका गावाला भेट द्यायची राहिलेली. औंढ्यापासून जवळच असलेल्या माथा या गावी गोदावरीबाई नावाच्या महिलेला गोळी पाठीत लागलेली. त्या बाईच्या घरी सारी मंडळी गेली. बाई हिंमतबाज. गोळीबाराच्या जखमा अंगी बाळगूनही भीतीचा लवलेशही नव्हता. यापुढच्या आंदोलनाचं कसं ? ''कवाबी बलवा की. या बलंला इचारा, म्या आंदूलनात यायला कवाबी तय्यारच है की.'' याला म्हणावं मर्दमराठा 'गडनी'. आतापर्यंतच्या गंभीर वातावरणाचा ताण माथा गावच्या या एका भेटीनं कमी झाला.

साहेबांनी आपल्या भेटीगाठी आटोपल्या. ते दौऱ्याच्या बाकी मार्गी लागले आणि आम्ही सारे आपापल्या मुक्कामी परतलो.

॥ ८ ॥

सुरेगावी काय घडलं ? शेतकरी संघटनेतल्या आंदोलनाचं एक ठिकाण सुरेगाव. दहा तारखेला सकाळपासून माणसं जमायला सुरवात झाली. या आंदोलन स्थळावर, वाळकी, राजापूर, सुरवाडी, निशाणा, वडगाव, येहळेगाव, पिंपरी, सुरेगाव, तळणी, माथा, सिद्धेश्वर, सावळी, लोहगाव, डिग्रस, बोरजा, टाकळी, इडोळी, उमरा इत्यादी गावांतील शेतकरी सहभागी झाले. ही सगळी जवळपासची गावं. त्यामुळे काही पायी तर बरेच लोक सायकल, बैलगाडीनं यायला लागले. सकाळपासून माणसं यायला लागली. सकाळी नऊनंतर तर माणसांची रीघच लागली. या केंद्रावरचे प्रमुख डॉ. अशोक पातुरकर, दत्तराव नाईक, बळिरामजी, खंडबाराव आदी कार्यकर्त्यांना संरक्षणात्मक अटक आधीच केलेली. त्यामुळे नेतृत्व केलं ते अंजली पातुरकर आणि लीला नाईक यांनी.

सुरुवातीला माणसं थोडी होती. पोलिस निश्चिंत होते; पण ९ च्या नंतर केव्हातरी हिंगोलीच्या बाजूने पोलिसांची एक जीप आली. त्या जीपने आंदोलन ठिकाणी बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांशी काही बातचीत केली. ती जीप पुढे औंढ्याकडे रवाना झाली आणि तिथून हालचालींना आरंभ झाला. बहुधा जीपमधून आलेल्या पोलिसांनी सांगितलं असावं, फार मोठ्या संख्येनं लोक थेट हिंगोलीच्याही पलीकडून गटागटांनी येताहेत. प्रचंड प्रमाणावर माणसं जमली तर जमाव आवरणं कठीण होईल. तेव्हा आताच तुम्ही माणसांना उचला. यांवर पोलिसचे लोक अंजलीताईंकडे आले आणि रस्ता मोकळा करण्याचा अग्रह धरू लागले. यावर अंजलीताई म्हणाल्या, आता माणसं फार थोडी आहेत. माणसांना जमू द्या, मग आम्ही अटक द्यायला तयार होऊ.

यानंतर झाली सुरुवात पोलिसांच्या क्रूर हत्याकांडाला. अटक, लाठीहल्ला, गोळीबार, जाळपोळ या घटना घडल्या त्या, यानंतर; पण या साऱ्या घटनांची जबाबदारी कुणाची? घटनेनंतर लगेच अनेक पत्रकारांनी, जनता दलाच्या कार्यकर्त्यांनी या घटना स्थळाला भेटी दिल्या आणि प्रत्यक्षदर्शींच्या मुलाखती घेऊन घडलेल्या घटनांचे सविस्तर वार्तापत्र पेपरात छापले. त्या वृत्तपत्रांचे मथळेच खूप काही सांगून जातात. 'मराठवाडा' या दैनिकाने आपल्या १३ डिसेंबर १९८६ च्या अंकात व्यंकटेश केसरी यांचे वार्तापत्र प्रसिद्ध केले. त्या वार्तापत्राचा मथळा हा असा आहे, 'गोळीबार समर्थनीय ठरविण्यासाठी पोलिसांनीच जाळपोळ केली!' आणि उपमथळा, 'सुरेगावच्या ग्रामस्थांनी सांगितलेल्या भीषण कथा'. याच दैनिकाच्या १९ डिसेंबर १९८६ च्या अंकात वसमत येथील प्रसिद्ध वकील, जनता दलाचे कार्यकर्ते लेखक ॲड. रमेश कोटीखाने यांचे वार्तापत्र प्रसिद्ध झाले आहे. त्याचा मथळा हा असा आहे, 'सुरेगाव प्रकरणात दोष पोलिसांचा.' 'केसरी'ने २० डिसेंबरच्या अंकात 'सुरेगावचा गोळीबार अपरिहार्य होता का?' हा प्रश्न समोर ठेवून त्याचा शोध घेणाऱ्या वार्तापत्रांची मालिका सुरू केली. २३ डिसेंबरच्या तरुण भारतच्या अंकात कृ.ना. मातेकर यांनी, 'सुरेगाव : पोलिसांनी कलेले हत्याकांड' या मथळ्याखाली आरोपपत्र सादर केले. महाराष्ट्र टाइम्समध्ये २३ डिसेंबर रोजी शरद देउळगावकरांनी 'न्यायालयीन चौकशीतून खरेखोटे सिद्ध होईल' या मथळ्याखाली वार्तापत्र सादर केले. इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी दैनिकाच्या अरिफ शेख यांनी सखोल चौकशी करून १४ डिसेंबरच्या अंकात तपशिलाने अहवाल सादर केला, तो: 'परभणी गोळीबारातील सत्य' या नावाखाली. 'मराठवाडा'च्या जिंतूरच्या वार्ताहराने २० डिसेंबरच्या अंकात 'सुरेगाव:





कळालेल्या माहितीची शहानिशा न करताच पोलिसांनी दडपनीती स्वीकारली' असा निष्कर्ष काढणारे वार्तापत्र प्रसिद्ध केले.

वास्तविक अकरा तारखेपासूनच हट्टा फाटा-हिंगोली व झिरो फाटा-वसमत या रस्त्यावर फिरणं म्हणजे लोकक्षोभाला बळी पडणं हे दिसत असूनही या वार्ताहरांनी अत्यंत हिमतीनं या भागाचा दौरा करून लोकांच्या भेटीगाठी घेऊन आपले अहवाल तयार केले. वास्तवात त्या वेळी परिस्थिती एवढी भीषण होती, की पोलिस/ महसूल कर्मचारी या रस्त्यावर जाण्याची हिंमत करू शकत नव्हते; पण या पत्रकारांनी धाडसाने, मिळेल त्या वाहनाने या परिसरात भेटी दिल्या. ज्या वेळी शासनाची सत्य दडपण्याची मोहीम आणखी सुरू व्हायची होती, त्या काळातले हे अहवाल आहेत. साहजिकच यातील वृत्तांत अधिक विश्वसनीय आहे. पुढे न्यायालयीन चौकशीतून बाहेर आलेले सत्य (?) ही शासनाची बाजू होती; पण जनतेची बाजू आणि सत्याची बाजू ही पत्रकारांनी लगेच स्पष्ट केली.

शासनाचा पहिला आरोप असा, 'या आंदोलनानं हिंसक वळण घेतलं ते अंजलीताई पातुरकरांच्या भडकवणाऱ्या भाषणामुळे,' या आरोपात कितपत तथ्य आहे?

सौ. अंजलीताई पातुरकर या शांत स्वभावाच्या कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या हिंगोली नगर परिषदेच्या अध्यक्षा राहिल्या आहेत. त्यांनी भडकवणारे भाषण केले असं सांगणारा एकही स्वतंत्र साक्षीदार पोलिसांना मिळाला नाही. एरवी भाषणे टेप करणाऱ्या शासनानं या भाषणाचीही कॅसेट केलेली असणारच; पण ती कॅसेट न्यायालयीन चौकशीतही उपलब्ध केली गेली नाही किंवा कुणा पत्रकारांनाही ऐकवली नाही. अंजलीताईंनी भडकवणारे भाषण केले हा आरोप पोलिसांच्या, 'तू नाही तुझ्या बापाने शिव्या दिल्या असतील', या लांडगी प्रवृत्तीचा निदर्शक आहे. येनकेन प्रकारेण त्यांना हिंसाचार करायचा होता हेच खरं.

अंजली पातुरकरांच्या भाषणानं लोक भडकले व त्यांनी दगडफेक सुरू केली ही कल्पना अगदी बालबुद्धीची, केवळ पोलिसांनाच सुचू शकते. मुळात लोकांनी दगडफेक केली हेही खोटं. ज्या जागेवर सत्याग्रही होते त्या तिथे दगडफेक करण्याइतपत दगड नव्हतेच मुळी! लोकांनी घरून दगड आणले असा दावा कुणी केला नाही; पण पोलिसांचा काही भरवसा नाही. ते असंही म्हणू शकतील, की शेतकऱ्यांनी घराघरातून दगड मागवले त्यासाठी. अंजली पातुरकरांच्या भाषणाबद्दल कृ.ना. मातेकर यांनी 'तरुण भारत'मध्ये

नमूद केलंय, 'समुदायास ध्वनिवर्धकावरून सूचना देण्यात येत होत्या. शेतकरी संघटनेच्या श्रीमती पातुरकर यांनी जे भाषण केलं, त्यात त्या म्हणाल्या, ''आपले आंदोलन शांततामयच असते व असलेच पाहिजे. पोलिसही आपले बांधवच आहेत.'' आणि हे म्हणे भडकावू भाषण! अंजली पातुरकरांच्या शब्दांत सांगायचं तर, ''मी लोकांना शांततेचे आवाहन करत होते, पोलिस हमारे भाई है, उनसे हमारी लढाई नही है.'' असं सांगत असताना पोलिसांनी मला फरपटत नेले. मी खरे तर त्यांच्याबरोबर यायला तयार होते. एका महिला पोलिसाने माझे केस धरले आणि दुसऱ्या पोलिसाने माझ्यावर सपासप काठ्या चालवल्या आणि आता वरून मीच प्रक्षोभक भाषण करीत असल्याचा आरोप ते करत आहेत.' नुसता आरोप नाही, ज्यांच्या अंगावर गोळ्यांच्या खुणा आहेत त्या सर्वांसकट अंजलीताई, लीलाताईसकट ७२ जणांवर भारतीय दंड विधानाच्या कलम ३०७, १४७, १४८, १४९, ३३२, ३५३, ३४१, ३४२, ४५३ खाली खटले भरले. एवढीच कलमं लावणं शक्य झालं. भारतीय दंड विधानात आणखी बरीच कलमं आहेत हे बहुधा पोलिसांच्या लक्षात आलं नसावं! वरील पैकी १४८ च्या गुन्ह्यासाठी 'भयानक शस्त्राने हल्ला' म्हणजे पोलिसांवर तथाकथित दगडफेक म्हणजे, 'भयानक शस्त्राने हल्ला' त्यांना अभिप्रेत असावा. जय हो पोलिस खाते!

खरं तर या कलमाखाली पोलिसांवरच खटले भरायला पाहिजेत. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत शिखांचे शिरकाण झाले, त्याचे खटले कित्येक वर्षांनंतर झालेच ना? मुंबई दंगलीतील गुन्हेगारांवर बऱ्याच वर्षांनी पोलिसांवर खटले भरले गेलेच ना? सुरेगाव प्रकरणी हेच का होऊ नये?

पोलिस संघटनेवर शांतताभंगाचा आरोप करतात. वस्तुस्थिती काय होती? शेतकरी संघटनेच्या शांतिप्रियतेबद्दल हे प्रमाणपत्र बघा, 'नेहमीच अगदी संयमित असेच वर्तन शेतकरी संघटनेचे आतापर्यंतच्या आंदोलनात राहिले आहे. शेतकरी संघटनेच्या रास्ता रोको आंदोलनात हजारो स्त्रीपुरुष सहभागी झाले होते. त्याही वेळी पत्रकारांनी टाकळी, त्रिधारा इ. प्रमुख ठिकाणी आंदोलन कसे आहे हे बघितले होते. लहान मुलांसह अक्षरश: हजारो स्त्रीपुरुष रस्त्यावर भजन म्हणत बसले होते. एकही अपशब्द कुणी उच्चारत नव्हता. एवढेच नव्हे तर पोलिस यंत्रणाच अपुरी पडली तरी सारे संयमाने वागले. पोलिस तर सर्वांना अटकही करू शकले नाहीत.' (तरुण भारत, दि.२३ डिसेंबर १९८६)

खरं तर हे, की हे आंदोलन महाराष्ट्रात सगळीकडेच दडपून टाकावं हे शासनानं





ठरवलं होतं. आंदोलनकाळात एकट्या सुरेगावातीलच नव्हे तर महाराष्ट्रात सगळीकडेच शासनानं दमननीतीचा अवलंब केला. मुळात मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण आणि शेतकरी संघटना यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य. त्यामुळेच हा आकस स्पष्टच होता.

दिनांक २३ नोव्हेंबरच्या रास्ता रोकोत मुदखेडला गोळीबार झाला. ९ तारखेला परभणीला पोलिस मुख्यालयात महिलांवर केलेला लाठीहल्ला. ९ तारखेला वर्ध्यातील गोपुरी चौकात सत्याग्रहींना दिलेली अमानुष वागणूक. अटकेनंतर व तुरुंगातही खाण्यापिण्याची आबाळ ही तर फारच सामान्य तक्रार. 'अन्नदात्या शेतकऱ्याला तुरुंगात उपाशीपोटी झोपावे लागते ही आमच्या सरकारला लाजिरवाणी गोष्ट आहे,' असे मत नागपूर जिल्हा युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष बाबा मोहोड यांनी व्यक्त केले. हा तर शासनाला घरचा आहेर. २३ तारखेच्या आंदोलनातील सत्याग्रहींची हातात बेड्या घालून गावातून धिंड काढण्यात आली. ठिकठिकाणी घडलेल्या या अत्याचाराच्या घटना हे स्पष्ट करतात, की हे अत्याचार परिस्थिती चिघळल्यामुळे नव्हे तर परिस्थिती चिघळावी, लोक संतापावेत व त्यातून हिंसाचार उफाळला म्हणजे गोळीबार समर्थनीय ठरू शकतो, या योजनाबद्ध कार्यक्रमानुसारच या साऱ्या घटना घडवण्यात आल्या.

सुरेगावच्या प्रकरणी गोळीबार समर्थनीय ठरावा म्हणून, 'लोक दगडफेक करू लागले, मालमत्तेला नुकसान पोहोचवू लागले, हिंसाचार व जाळपोळ करू लागले,' हे ठरीव ठशाचे उत्तर शासन देत होते. यासाठी पोलिसांविरुद्ध काही पुरावा राहू नये म्हणून पोलिसांनी साऱ्या घटनांचे साक्षीदार होऊ शकणारे 'मराठवाडा'चे वार्ताहर व प्रेस फोटोग्राफर श्री. तुकाराम झाडे यांचा कॅमेरा हिसकावून घेऊन त्यातील फिल्म काढून घेतली. पोलिसांना लपवाछपवी करायची नव्हती तर कॅमेरा हिरावून घेण्याची त्यांना आवश्यकता का वाटली? गोळीबाराचा अवलंब केव्हा करायचा असतो? प्रकरण हाताबाहेर जात असेल तर, माणसांच्या जीविताला धक्का पोचत असेल तर किंवा मालमत्तेची हानी होत असेल तर. ज्या ठिकाणी सत्याग्रही जमले ते ठिकाण म्हणजे सुरेगाव पाटी ! त्या ठिकाणी एक तर आंदोलनप्रमुख दत्तराव नाईक यांची पत्र्याचे छत असलेली गिरणी आणि त्या बाजूला एक छोटेखानी हॉटेल. गिरणी हे दत्तरावांचे मालकीचे व अवतीभोवतीच्या गावांवरून ये- जा करणाऱ्या माणसांचे निवाऱ्याचे ठिकाण. तेव्हा त्याला आगी लावण्याचे काम शेतकरी करतील हे तर अशक्य. आता त्या ठिकाणी याशिवाय नुकसान करायला दुसरी मालमत्ता कोणती? रस्त्यावर शेतकऱ्यांनी सोडलेल्या त्यांच्या स्वत:च्या मालमत्तेला

कुणी आग लावील ही गोष्ट बुद्धीला न पटणारी. आता पोलिसांचा आणि बुद्धीचा फारसा संबंध येतच नाही, तेव्हा त्यांच्या बुद्धीप्रमाणे त्यांनी नेहमीच्या रिवाजाप्रमाणे हे कारण दाखवलं, एवढंच. राहता राहिला प्रश्न सरकारी मालमत्ता म्हणजे बसेसची जाळपोळ. एक तर बसेस लोकांनी जाळल्या हेच मुळी खोटं. शिवाय बस प्रथम जाळल्या गेली ते ठिकाण सुरेगावहून बरंच दूर, वळणाच्या पलीकडे, सुरेगावहून दिसणारही नाही अशा जागी आणि तिथे आग लावणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सुरेगावी गोळीबार केला ही अफलातून कल्पना फक्त पोलिसांच्याच डोक्यातून (?) निघू शकते.

बसेसची जाळपोळ झाली ती कशी? कुणी? केली हे प्रश्न राहतात. याची उत्तरे शोधण्याचा प्रयास केलाय तो पत्रकारांनी. पत्रकारांनी काढलेला निष्कर्ष असा: पोलिसांनी आधी गोळीबार केला व मग त्याच्या समर्थनार्थ स्वत:च नाईकांची गिरणी, कडब्याची वळई पेटवून दिली. काही बैलगाड्या, सायकली जाळण्याचा प्रयत्न केला. स्वत: हनुमंतराव पोले आणि इतर नागरिकांनी तसा आरोप पोलिसांवर केल्याचे वृत्तपत्रात नमूद आहे. श्री. अरिफ शेख व श्री. व्यंकटेश केसरी या दोघांनी एस.टी. महामंडळाचे चालक श्री.शेख सगीरोद्दीन यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितलेला वृत्तांतच छापला आहे, त्यांच्या वर्तमानपत्रात. परभणीच्या दवाखान्यात असलेल्या या ड्रायव्हरने सांगितले, की बुधवारी त्याला अटक केलेल्या सत्याग्रहींना बसमध्ये बसवल्यावर परभणीला तुरुंगात नेण्याचे काम सोपवलेलं होतं. त्या कामावर सुरेगाव पाटीजवळ सव्वाअकराच्या सुमारास तो येईपावेतो गोळीबार होऊन गेलेला होता. लोक धावपळ करीत होते आणि पोलिसचे लोक सायकल, बस, गाडी जे समोर दिसेल त्याला आगी लावत होते. त्याच्या या सांगण्याला अनेक प्रत्यक्षदर्शींनी पाठिंबा दिलेला आहे. म्हणजे आधी गोळीबार आणि त्यानंतर त्याचे समर्थन करण्यासाठी आगी लावण्याचा प्रकार असा हा घटनाक्रम होता.

या एकूणच प्रकरणात पोलिसांनी लपवाछपवीचे आणि खोटेपणाचे बरेच प्रकार केले. परभणीला दहा तारखेला सायंकाळी घेतलेल्या पत्रकारांच्या भेटीत जिल्हा दंडाधिकारी यांनी असं सांगितले होतं, की दोघेजण गोळीबारात व एक जण चेंगराचेंगरीत मरण पावला. वास्तविक पाहता दुपारीच त्यांनी औंढा येथील दवाखान्यात तीनही प्रेते पाहिली होती व तिघेहीजण गोळीबारात मरण पावले असा निष्कर्ष डॉक्टरांनी काढला होता; मग हे असं खोटं सांगण्याचा प्रयत्न कशासाठी?

या चेंगराचेंगरीच्या शासकीय सिद्धांताचा एक बटबटीत विशेष असा, की, मयत





व्यक्तीशिवाय इतर कुणाच्याही अंगावर चेंगराचेंगरीच्या खुणा नाहीत. जगातील ही पहिली चेंगराचेंगरी असावी जिथे गर्दीतला फक्त एकच माणूस चेंगरून मरतो आणि त्याच्याही अंगावर चेंगरल्याची एकही खूण नसते. तसेच इतर कुणाच्याही शरीरावर या तथाकथित चेंगराचेंगरीच्या खुणा आढळून येत नाहीत. जय हो चेंगराचेंगरी सिद्धांत !

गोळीबारातही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गोळीबार जमावाला पांगवण्यासाठी होता असं म्हणावं तर गोळीबारात मरण पावलेल्या तिघांचीही प्रेते दूर दूर शेतात सापडलेली. म्हणजे शेतकऱ्यांचा पाठलाग करून त्यांना गोळ्या घातल्या असे सिद्ध होते आणि जमावाला पांगवण्यासाठी ६३ फैरी! प्रत्यक्ष युद्धातही एवढ्या फैरींची आवश्यकता पडली नसती. समोरचा शेतकऱ्यांचा जमाव आणि ६३ फैरी हे प्रमाण विपर्यस्त वाटते. गोळीबार करतानाही, माणुसकी असेल तर एक प्रयत्न केला जातो. गोळीबार मांडीच्या खाली म्हणजे बहुधा पायावर केला जातो. त्यामुळे जमावाला पांगवताही येते आणि प्राणहानीही टळते. इथे तर कंबरेच्या वर केलेला गोळीबार म्हणजे, 'ठार करण्यासाठी गोळीबार' असंच म्हणावं लागेल. याला म्हणावं 'संकटरावी न्याय!'

पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी गोळीबाराच्या आधी अश्रूधुराची ६३ नळकांडी फोडली होती. मुळात अश्रूधुराची नळकांडी फोडली हीच शंकास्पद गोष्ट आहे. जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या पत्रकार परिषदेतील या माहितीचे महाराष्ट्र जनता पक्षाचे सरचिटणीस श्री. अंकुश भालेकर यांनी पत्रकार परिषदेतच खंडन केले, की त्यांनी केलेल्या चौकशीत अश्रूधुराची नळकांडी फोडण्याबद्दल कुणीही बोललं नाही तसेच अश्रूधुरामुळे डोळ्यांची कचकच व्हायला पाहिजे, तीही तक्रार कुणी केली नाही. तेव्हा यावर विश्वास ठेवणं कठीण आहे.

पोलिसांच्या खोटेपणाचा आणखी एक प्रकार तर खुद्द जिल्हा पोलिस अधीक्षक यांनीच प्रस्तुत केला. घटनेनंतर त्यांना भेटण्यासाठी जनता दलाचे एक कार्यकर्ते डॉ. व.द. भाले गेले असता श्री. शिंदे यांनी सांगितले, की दोन पोलिसांना लोकांनी ठार केल्याची बातमी आमच्याकडे आहे. आता लोक एवढे प्रक्षुब्ध आहेत, की त्या पोलिसांची प्रेतेही मिळणं कठीण! तेव्हा डॉ. भाले यांच्या संरक्षणात जिल्हा पोलिस प्रमुख येहळेगावी गेले . डॉ.भाले यांनी त्यांची व लोकांची भेट करून दिली तेव्हा त्या 'मेलेल्या' पोलिसांची प्रत्यक्ष भेट गावकऱ्यांनी करून दिली आणि सांगितलं, की लोकांच्या प्रक्षोभाला बळी पडू नये म्हणून आम्हीच यांना लपवून ठेवलं. तुम्ही तुमचा माल सांभाळा आणि ते

पोलिस कृतज्ञ भावनेने लोकांचे आभार मानून परतले. पोलिसांना एवढी माणुसकीची वागणूक देणाऱ्या याच लोकांनी म्हणे हिंसाचार केला!

पोलिसांच्या डोक्यांनी आणखी एक शोध लावला. सत्याग्रहींतून कुणीतरी एकाने म्हणे १२ बोअर बंदुकीतून पोलिसांवर गोळीबार केला. तेव्हा स्वसंरक्षणार्थ त्यांना गोळीबार करावा लागला व त्यासाठी फक्त १३ फैरी झाडाव्या लागल्या. १२ बोअरच्या बंदुकीनं कुणी जखमी झाल्याची माहिती पुढे आली नाही आणि १२ बोअरची बंदूकही सापडली नाही. मुळात नसलेली वस्तू सापडणार कशी? पण गोळीबाराच्या समर्थनासाठी पोलिसांनी सर्व हातखंडे वापरून पाहिले.

सुरेगाव गोळीबाराला आता बराच कालावधी लोटला आहे. सुरेगावची जखम केवळ आठवण होउन राहणार की शासन आणि आपणही त्यापासून काही शिकणार आहोत?

❖